तार्‍यांचे जग

।। अध्यात्म अंतरंग ।।

दीपावली-२०१४

Bharari Creation

किंमत - ₹ १००/-



अंतरंग

धर्मग्रंथ

१) यदा यदा हि........ - सुरेश कुळकर्णी -- १
२) जैन धर्म : संशोधन आणि वास्तव - प्रा. जवाहर मुथा ------------------- ६
३) पारशी धर्म - लता गुठे -- ११
४) तुमचे आमचे रामायण - डॉ. लिला गोविलकर -------------------------- १४
५) बायबल-देवमानवाच्या प्रीतीची गाथा - फादर फ्रान्सिस दिब्रिटो ------------ १७
६) श्रीमद्‌भगवतगीता आणि आजचे युग - अजित आचार्य------------------- २३
७) पवित्र कुरआन आणि मानवी मूल्ये - अे. के.शेख ----------------------- २६
८) आदर्श जीवनाचं अधिष्ठान ! (बुद्ध धर्म) - प्रकाश खरात----------------- ३२
९) भगवान बुद्ध आणि त्यांचा विज्ञानवादी धम्म - डॉ. मंगेश बनसोड ----------- ३६
१०) जीवन जगण्याची कला (विपश्यना) - वा.वि. गुठे ------------------------ ३९
११) सुंदर ते ध्यान (ज्ञानेश्वरी) - सौ. रेखा नार्वेकर ------------------------- ४४
१२) दासबोध सांगे, चातुर्य - लक्षण गौरी कुलकर्णी -------------------------- ४८
१३) मानवी कल्याणार्थ - वेद व कुरआण - डॉ. सुनील सावंत----------------- ५३

युगपुरुष

१४) आदि गुरु वेदव्यास - सीमा ओवळेकर ----------------------------------- ५५
१५) आज्ञात्म प्रभू - रामकृष्ण परमहंस - यशवंत बी. कदम------------------- ५८
१६) स्वामी विवेकानंद - रमेश यादव-- ६३
१७) गंगोत्री स्वानंदाची - मला भावलेले ओशो - पं. यशवंत देव --------------- ६७

समाज प्रबोधन करणारे संत

१८) देखन आयो जगत तमाशा - प्रा. अरविन्द दोडे ---------- ७१
१९) दिपकळ्या - देवीदास पोटे ---------- ७३
२०) हरीचे आम्ही दास - अनुराधा नेरुरकर ---------- ७६
२१) प्रबोधनकार संत नामदेव - ज्योत्स्ना पाटील ---------- ८२
२२) तुका झालासे कळस - साधना कळवणकर ---------- ८५
२३) भिऊ नको मी तुझ्या पाठीशी आहे - वृषाली देशमुख ---------- ९२
२४) गोपाला..गोपाला...देवकीनंदन गोपाला - अशोक लोटणकर ---------- ९६
२५) रामभक्त तुलसीदास - सदगुणांची खाण - रवींद्र आवटी ---------- ९९
२६) कहत कबीर सुनो भाई साधो - श्री. वामनराव अच्युत देशपांडे ---------- १०३

आध्यात्मिक लेख

२७) आत्मशोध - माधवी कुंटे ---------- ११२
२८) मध्ययुगीन संतकाव्य लोकजीवन आणि लोकभाषा - वि.शं. चौघुले ---------- १२३
२९) प्रज्ञाचक्षु - गुलाबराव महाराज - डॉ. चारूशिला ओक ---------- १२६
३०) माझं अध्यात्म - डॉ. विजया वाड ---------- १३२
३१) सुखाचा शोध - प्रदीप भिडे ---------- १३४
३२) आपुलिया हिता - डॉ. गोवर्धन या. घुगे ---------- १३७
३३) अद्‌भूत कैलास मानसरोवर - संगीता अनगुले ---------- १४०
३४) अध्यात्म ज्ञान - समता गंधे ---------- १४५
३५) गीतरामायणातील अमृताचा झरा - मुकुंद सराफ ---------- १४६
३६) अध्यात्म म्हणजे - प्रकाश लब्धे ---------- १४९
३७) मनाला पवित्र करणारी व्रत वैकल्ये - सौ. वसुधा पंडित ---------- १५३

कविता

३८) धाव पाव नारायणा - सूर्यकांत मालुसर ---------- ३५
३९) गुरु अंतर्यामी - शशिकांत तिरोडकर ---------- ३५
४०) निळा सावळा हरी - डॉ. पल्लवी बनसोडे ---------- ६३
४१) तोल - आनन्द श्रीधर सांडू ---------- ६३
४२) तूच सर्वांना आधार एकनाथ आव्हाड ---------- १३१
४३) जय वैष्णवाचा - पंढरीनाथ रेडकर ---------- १३६
४४) श्रीहरी- शिवाजी गावडे ---------- १३६
४५) तूच साई, तू समर्थ, तू गजानन - ज्योती कपिले ---------- १५५
४६) विडंबन (आजचं अध्यात्म) - डॉ. शांताराम कारंडे ---------- १५६

संपादकीय

दिवाळीच्या मंगलमय पर्वाचे स्वागत करण्यासाठी मी आपल्यासाठी घेऊन येत आहे दर्जेदार व सर्वांगसुंदर 'ताऱ्यांचे जग' म्हणजे सुख, शांती, आनंदाची पर्वणीच. गेल्यावर्षी 'चित्रपट शताब्दी' या दिवाळी विशेषांकाला रसिक वाचकांनी भरभरुन प्रतिसाद दिला. उत्कृष्ट अंक म्हणून पुरस्कारही मिळाले. या वर्षीही आपल्या पसंतीस उतरणारा दिवाळी अंक 'अध्यात्माचे अंतरंग' अनेक दर्जेदार साहित्यकांनी लिहलेले लेख व इतर साहित्य म्हणजे शब्दाचे धन लक्ष्मीच्या रुपात संस्कार, परंपरा व संस्कृती घेऊन येणार आहे आपल्या भेटीला....

अंतर्मनाचा शोध घेता-घेता. चांगल्या प्रकारे समजले देव म्हणजे आपल्या ठिकाणी असलेलं चैतन्य, धर्म म्हणजे जो आपण धारण करतो तो आणि अध्यात्म म्हणजे जीवन समृद्ध करण्याची कला. हे उद्दिष्ट कुठेतरी साध्य करायला पाहिजे या उद्देशाने 'ताऱ्यांचे जग' हा दिवाळी अंक अध्यात्मावर काढायचा मी विचार केला. मनात त्याची आखणी केली तेव्हाच ठरवले भारतातील सर्व धर्माच्या सारांश रुपाचं दर्शन या अंकातून करायचं आहे. सर्व धर्म ग्रंथांची निर्मिती मानवी कल्याणासाठी झालेली आहे. चांगली शिकवण धर्मग्रंथ देतात मग तो कोणताही धर्म असो. या धर्मग्रंथांमध्ये मला एकच सूत्र सापडले ते म्हणजे अद्वैतवाद, प्रेम, बंधुता, अहिंसा, परोपकार या मानवी मुलांच्या आधारावर संतांनी परमेश्वर प्राप्ती केली.

अध्यात्म या विषयावर लिहिणाऱ्या लेखकांचा शोध सुरु झाला तेव्हा माझ्यासमोर असे काही लेखकांचे नावं आले की त्या त्या विषयात ते निपून आहेत. मी त्यांच्याशी फोनवर बोलले तेंव्हा त्यांनी आनंदाने लेख लिहायला होकार दिला. बघता बघता अनेक प्रकारचं मला जे हवं होतं ते साहित्य जमा झालं.

अनेक संतांच्या पदस्पर्शाने पावन झालेला हा भूलोकीचा स्वर्ग, त्यामध्ये व्यासांपासून आजच्या संतापर्यंत जे खऱ्या अर्थाने त्यांच्या तपस्येच्या प्रकाशाने दैदिप्यमान झालेले आहेत. असे खऱ्या अर्थाने शोभणारे मौल्यवान तारे. या ताऱ्यांच्या जगामध्ये आले आणि माझं हे छोटसं ताऱ्यांच जग प्रकाशमान झाले. अशा संतांची शिकवण, त्यांचे विचार रसिक वाचकांपर्यंत पोहोचविण्याचे काम मी करु शकले याचा मला खूप आनंद होत आहे.

हा अंक रसिक वाचकांना मनापासून आवडेल, प्रत्येकाच्या घरात एक ग्रंथ म्हणून संग्रही राहील याची मला खात्री आहे. हा दिवाळी अंक तयार करण्यासाठी ज्या मित्र मैत्रिणींची मदत झाली त्यांची मी ऋणी आहे. तसेच त्रिमुर्ती प्रिटींग प्रेसचे मालक नरेंद्र गावकर, शशिकांत पवार, त्यांचे सहकारी व ज्यांनी जाहिराती देऊन आर्थिक मदत करुन मोलाचे सहकार्य केले त्यामुळे मी त्यांची आभारी आहे. दिवाळीच्या सर्व वाचकांना हार्दिक शुभेच्छा !

धन्यवाद !

आपली स्नेहांकित,

लता गुठे

यदा यदा हि....

सुरेश कुळकर्णी

यदा यदा हि........

महायुध्दासाठी आपलेच सगळे बंधु, सखे, सोबती मित्र, हितचिंतक, गुरु व नातेवाईक अस्त्रं आणि शस्त्रं घेऊन आपल्यासमोर उभे आहेत हे पाहिल्यावर अर्जुन आशंकित झाला, संभ्रमित झाला की आपण जे करत आहोत ते योग्य की अयोग्य ? राज्य मिळवण्यासाठी आपण आपल्याच प्रियजनांची हत्या कशी करायची ? वास्तविक पाहता कौरवांनी पांडवांवर एकामागून एक केलेल्या अत्याचारांचा त्याला विसर पडलेला नव्हता. तो महावीर, शूर होता त्यामुळे तो भयभीत किंवा गर्भगळीत मुळीच झालेला नव्हता. पण त्याला नरजन्मातील पाप, पुण्याचा विचार या युध्दापासून परावृत करत होता. तो एक पापभिरु 'नर' होता मग याला उपदेश करायला प्रत्यक्ष 'नारायण' श्रीकृष्ण पुढे सरसावणारच ! त्यांनी अर्जुनाला जे बोधामृत दिले त्याला आपण ''श्रीमद्भगवद्गीता'' म्हणतो. अर्जुन हा तर त्यांचा अत्यंत प्रिय शिष्य आणि सखा ! मग तो खचून कसं चालेल ? त्याचं धैर्य वाढावं, त्याला न्याय मिळावा म्हणून हा गीतापदेश !.

पहिल्या अध्यायात दोन्ही सेना कशा सुसज्ज आहेत व अर्जुनाला झालेला विषाद कथन केला आहे. आप्तस्वकीयांना मारुन पापाचा धनी होण्यापेक्षा युध्दात मी वीर मरण पत्करुन पुण्यच मिळविन असा युक्तिवाद अर्जुन कृष्णासमोर करतो.

दुसऱ्या अध्यायात श्रीकृष्णानी सांख्य योगाची चर्चा केलीय. जन्म मृत्यु ही तर जगरहाटी आहे.

''जातस्य ही ध्रुवोमृत्यु ध्रुवं जन्म मृतस्यच''

या नश्वर देहापेक्षा आत्मा श्रेष्ठ आहे. जे जन्मते आणि मरते ते शरीर आतला आत्मा कधीच मरत नाही. तो अमर असतो. जो जन्मतो त्याला आपण नाव देतो. तो आपल्याला आपण त्याला जीव

लावतो. आई, वडिल, बहीण, भाऊ, काका, मामा, मुलगा, मुलगी वगैरे ! किंबहुना ज्याप्रमाणे माणूस जुनी जीर्ण झालेली वस्त्रं टाकून नवी धारण करतो तद्वतच आत्मा मृत्युसमयी एका देहाचा त्याग करुन दुसऱ्या देही जाण्यासाठी निघून जातो. या आत्म्यास कोणतेही शस्त्र तोडू शकत नाही. अग्नि जाळत नाही, वारा सुकवत नाही, पाणी भिजवत नाही, त्यामुळे अर्जुना तू या देहधारी आत्म्यांच्या मोहात पडून उलट आपला क्षात्र धर्म विसरतो आहेस असं ते बजावून सांगतात. त्यामुळे तुझी अपकीर्तिच होईल.

हतो वा प्राप्स्यसि स्वर्गम्
जित्वा वा मोक्ष्यसे महीम्
तस्मां उतिष्ठ कौंतेय
युध्दस्य कृतानिश्चय : ।।

युध्दात जर मरण पावलास तर तुला स्वर्ग मिळेल आणि जर विजयी झालास तर पृथ्वीचे राज्य भोगशील म्हणून तू या युध्दापासून पळून न जाता युध्द करायचेच असा दृढनिश्चय करुन उठ असे ते सांगतात. याच अनुषंगाने ते पुढे कर्माचेही महत्त्व सांगतात. आपला अधिकार केवळ कर्म करण्याचा आहे. त्याचे फळ चांगले की वाईट, म्हणजे पाप कि पुण्य याचा विचार तू सोड. जो बुध्दियोगी असतो, तो पाप वा पुण्य या दोन्ही कल्पनांचा त्याग करतो. त्याला स्थितप्रज्ञ म्हणतात.

पण स्थितप्रज्ञ होण्यासाठी काय करावे ? असा प्रतिप्रश्न अर्जुन त्यांना करतो.

"जो आपल्या सर्व वासना टाकतो व आपल्या ठायीच संतुष्ट होऊन राहतो तो स्थितप्रज्ञ. दुःखात विषण्णता ज्याला येत नाही व ज्याचे मन सुखात विचलित होत नाही, प्रिती, भय, क्रोध यापासून जो मुक्त असतो तो स्थितप्रज्ञ. यासाठी सर्व इंद्रियांना काबूत ठेवणे महत्त्वाचे परंतु सर्वच सोडलं तर निर्माण झालेली पोकळी भरुन कशी निघणार ? त्यासाठी त्यांनी सांगितले की " माझे ध्यान, माझी प्रार्थना कर आणि मुक्त हो .

त्यामुळे आपसुकच क्रोध, लोभ, मोह, माया, प्रिति, आदि सर्व भावना शमतील व शांती लाभेल.

तिसऱ्या अध्यायात कर्माचे महत्त्व वर्णिले आहे. कर्म करणे टाळता येत नाही ते करावे तर लागतेच पण त्यातील फळाची आशा व फळ न मिळाल्यास येणारी निराशा यांचा त्याग करा.

"काम हे कामासाठी करायचे कोणत्याही आसक्तीने करु नये. तू तुझे काम करुन बाकी सर्व माझ्यावर सोडून मोकळा हो म्हणजेच तुला मुक्ति मिळेल, मोक्ष मिळेल 'काम' व 'क्रोध' या दोन रजोगुणांपासून लांबच रहा कारण या दोन गुणांमुळे पाप करण्याची तीव्र इच्छा होते. हे दोन्ही गुण जणू ज्ञानरुपी आरशावरती जमलेली धूळ आहे."

चौथ्या अध्यायात प्रभू ज्ञानकर्म संन्यासाविषयी सांगतात.

"जेव्हा जेव्हा धर्माचा ऱ्हास होतो. तेव्हा तेव्हा मी अवतार घेतो आणि धर्माचे रक्षण करतो. दूष्ट प्रवृत्तींचा नाश करतो. हे युगांनुयुगे चालू आहे " असे ते म्हणतात. ज्याचे सर्व व्यवसाय फळ व इच्छा विरहित असतात, ज्याच्या मनात वासनांचा मागमुसही नाही, ज्याचे मन व बुध्दि पूर्णतः स्वाधीन आहेत, ज्याने संग्रह करण्याची बुध्दि सोडून दिलीय व जो सहजतः मिळेल त्यात संतुष्ट होतो, सुखदुःख, यश, अपयश, मान, अपमान, राग, द्वेष, यापासून जो मुक्त आहे तोच ब्रम्हपदी पोहोचतो. अशा माणसाला त्याची कर्मे बांधत नाहीत. 'दैव देते नि कर्म नेते' अशी त्याची स्थिति होत नाही."

पाचव्या अध्यायात संन्यास योगाची चर्चा आहे. कर्मयोग श्रेयस्कर की कर्म संन्यास ?असे अर्जुन विचारतो.

तेव्हा "कर्म संन्यास व कर्म योग दोन्ही मोक्ष पदीच येऊन मिळतात असं भगवान सांगतात. त्यातल्या त्यात कर्मयोगाची योग्यता विशेष आहे. जे कर्मयोगी फळाची आसक्ति सोडून सर्व कर्मे परमेश्वराच्या चरणी अर्पितात ते पाण्यातील कमलपत्राप्रमाणे अलिप्त असतात."

सहाव्या अध्यायात ध्यानयोगाचा उहापोह केला आहे. पवित्र व शुध्द अशा भूमीवर आधी दर्भ, त्यावरती वस्त्र अंथरुन फार सखल नव्हे तर फार उंचही नव्हे असे आपले स्थिर आसन मांडून आपले चित्त व इंद्रिये यांचे व्यापार नियमित करुन मन एकाग्र करुन योगाभ्यास करावा. आसनावर निश्चल बसून पाठ, मान व डोके सरळ एका रेषेत धरुन स्वतःच्या नाकाच्या शेंड्यावर दृष्टी लावून मन शांत व निर्भय ठेवून ब्रम्हचर्य व्रत राखून, मन पूर्णःत श्रीकृष्णाकडे लावून, श्रीकृष्ण हेच सर्वस्व मानावे. मान, अपमान शीत, उष्ण, सुख, दुःख हे ज्याला समान वाटतात. जो निर्विकार, जितेंद्रीय आहे, ज्याला मातीचे ढेकूळ, दगड सोने सर्व समान आहे त्यालाच योगी म्हणतात. अती खादाड किंवा काहीच न खाणारा, अती झोपाळू किंवा अती जागरण करणारा यांना हा योग जमत नाही. आहार, विहार कर्माचरण, निद्रा, जागृती ही यथायोग्य प्रमाणात ठेवणाऱ्यालाच हा दुःख नाशक योग साध्य होतो. ”

सातव्या अध्यायात ज्ञानविज्ञानाचा उहापोह आहे. भगवान म्हणतात, “ माझी प्रकृती आठ प्रकारांनी बनलेली आहे. ती अशी- पृथ्वी, आप, वायु, तेज, आकाश, मन, बुध्दि आणि अहंकार. याशिवाय परा (श्रेष्ठ) प्रतिची जीवनरुपी चेतना माझ्यात आहे. माझ्यात सर्व पदार्थांचे अनादी बीज आहे. बुध्दिमंतांची बुध्दि मीच आणि तेजस्वी लोकांचे तेजही मीच आहे. सर्व त्रिगुणी, सात्विक, राजस, तामस, भाव आणि पदार्थ श्रीकृष्णापासून उत्पन्न झालेले आहेत. भक्त हे चार प्रकारचे असतात. दुःखाने पीडित, ज्ञानाची इच्छा असणारे, द्रव्याची इच्छा असणारे, आणि ज्ञानी. यातील ज्ञानी भक्त परमेश्वराला अधिक आवडतात. ”

आठव्या अध्यायात अक्षरब्रम्ह योग विषद करुन सांगितला आहे. अध्यात्म कशाला म्हणतात. ?कर्म म्हणजे काय ? ब्रम्ह म्हणजे काय ? अधिभूत व अधिदैव कशाला म्हणावे ?”असे अर्जुन विचारतो,

“सर्वात श्रेष्ठ व अविनाशी आदितत्त्व म्हणजे ब्रम्ह! तर प्रत्येक वस्तूचा मूळ भाव म्हणजे अध्यात्म! सचेतन व अचेतन अक्षरब्रम्हापासून भूताची उत्पती करणारा जो व्यापार त्याला कर्म म्हणतात. या सर्व चराचरात मीच भरुन राहिलोय म्हणून जो मरणसमयी माझे स्मरण करीत देहत्याग करतो तो माझ्या स्वरुपात लीन होतो. किंबहुना मरणसमयी मनुष्य ज्या ज्या स्वरुपाचे स्मरण करता करता देह सोडतो त्याला तो जाऊन मिळतो. म्हणूनच सदा सर्वदा आपण श्रीकृष्णाचे स्मरण करत रहावे ” असे त्यांनी म्हटले आहे.

नवव्या अध्यायात राजविद्या राजगुह्य योग चर्चिला आहे. राजविद्या म्हणजे सर्वात श्रेष्ठ विद्या. राजगृह्य म्हणजे सर्वात श्रेष्ठ गृह्य! सर्व जगाची घडामोड ही माझ्यामुळे होते असे श्रीभगवान म्हणतात. सर्व पुजा साहित्यात मीच आहे, पुजा करणारा मीच व पुज्यही मीच आहे! सर्व वेद मी, पाऊस मी, उष्णता मी, उत्पति, प्रलय, स्थिती, गती सारे मीच! अमृत, मृत्यू, सत्, असत् हेही सर्व मी त्यामुळे अनन्य भावे जे माझे चिंतन करुन मला भजतात त्यांचा योगक्षेम मीच चालवतो ”असे श्रीकृष्ण म्हणतात.

दहाव्या अध्यायात विभूती विषयी वर्णन आहे. बुध्दि ज्ञान, जागरुकता, क्षमा, सत्य, इंद्रियनिग्रह, शांती, सुख, दुःख, उत्पत्ति, भय, अभय, अहिंसा, समता, संतोष, तप, दान, यश, अपयश इत्यादी निरनिराळे भाव ईश्वरापासून म्हणजे माझ्यापासूनच उत्पन्न होतात. सात महर्षि, चार मनु हे माझेच अंश व त्यांच्यापासूनच पुढे सारी प्रजा निर्माण झाली. सर्वांच्या ठायी असलेला आत्मा हा मीच आहे. मीच आदित्यांमधील विष्णु, वेदांतील सामवेद, देवांतील इंद्र, इंद्रीयातील मन, प्राणातले चैतन्य, रुद्रामधील शंकर, यक्षामधील कुबेर, वसुमधील अग्नी, पर्वतातील मेरु, बृहस्पति, समुद्र भृगुऋषी, मीच ॐकार, हिमालय मी, पिंपळवृक्ष, नारद, कपिलमुनी, चित्ररथ गंधर्व, उचैःश्रव अश्व मी, ऐरावत मी व मनुष्यातील राजा मीच! गाईमधील कामधेनु मी, शस्त्रात इंद्राचे वज्र मी, काम मी, वासुकि सर्प मी, अनंत नाग मी, वरुण मी, यमधर्म मी, काळ मी, सिंह मी, गरुड मी, मगर मी, गंगा मी, मीच सृष्टीचा आदि-अंत व मध्य! मीच अध्यात्म, मी वाद, प्रतिवाद, ज्ञान मी, मौन मी, दौड मी सर्वांचे बीज मी थोडक्यात हे सारे विश्व म्हणजे मीच आहे. ”

अकराव्या अध्यायात श्रीकृष्ण भगवान अर्जुनाला विश्वरुप दर्शन दाखवतात. ज्याला असंख्य मुखे व डोळे आहेत. ज्यामध्ये अनेक आश्चर्योत्पादक गोष्टी आहेत. ज्यावरती अनेक दिव्य अलंकार आहेत, हाती अनेक दिव्य शस्त्रात्रे आहेत, दिव्य पुष्पहार व दिव्य वस्त्रे धारण केली आहेत. दिव्य सुवासिक उटण्या लावल्या आहेत. ज्याच्या विशाललेला सीमाच नाही. ज्याचे तेज सहस्त्र सुर्याहूनही अधिक आहे. असे रुप...! अनंत बाहु, अनंत उदरे, अनंत मुखे, अनंत नेत्र, ज्याला आदि नाही व अंतही नाही, मध्यही

नाही असे अती विशाल रुप !

बाराव्या अध्यायात सगुण भक्तीची महती वर्णन केली आहे. अव्यक्त निर्गुण ब्रह्माची भक्ति, उपासना खूप कठीण असते. ती सर्वानाच जमेल असे नाही. म्हणून श्रीकृष्ण म्हणतात, " तू मलाच शरण ये व माझी उपासना कर. सर्वांशी मित्रभाव ठेवणारा द्वेष न करणारा, दयाळू अहंकार नसलेला, सुख दुःख समान मानून सदा संतुष्ट असलेला क्षमाशील संयमी योगी, दृढनिश्चयी भक्त जो माझ्या पदी मन व बुध्दि अर्पण करतो तो मला आवडतो. शत्रू असो वा मित्र, मान -अपमान, शीत, उष्ण सुख दुःख ज्याला सर्व समान आहे. निंदा अथवा स्तुती जो समान मानतो. मौनी व कशाचीही आसक्ति नसलेला भक्त मला प्रिय आहे." असे श्रीकृष्ण म्हणतात.

तेराव्या अध्यायात क्षेत्राविषयी चर्चा केलीय. आपले शरीर हे क्षेत्र व त्याला जाणणारा तो क्षेत्रज्ञ. शरीर हा पंचमहाभूतांचा आविष्कारच, पृथ्वी, जल, वायु, आकाश, तेज याशिवाय बुध्दि आणि अव्यक्त प्रकृति अकरा इंद्रिये, पाच इंद्रियांचे, पाच विषय, इच्छा, द्वेष, सुख-दुःख, देहातील इंद्रियाची जुळणी सचेतनत्व व धैर्य आदि घटक व त्याचे विकार हे क्षेत्र होय. ५ कर्मेंद्रिये + ५ ज्ञानेंद्रिये, ५ विषय व मन असे मिळुन १६ कार्ये तसेच पंचमहाभुते + अहंकार व बुध्दि मिळुन ७ कारणे आणि सर्वत्र दिसून येणारे त्यांचे कर्तृत्व ! या सर्वांचे मूळ कारण प्रकृति असते.

काही लोक सूक्ष्म ज्ञानाच्या द्वारे आत्म्यास ह्रदयाच्या ठायी पाहू शकतात. काही ज्ञान योगाने तर काही कर्मयोगाने त्याला प्राप्त करुन घेतात. पण असे ज्ञान नसलेले पुरुष गुरूकडून हे ज्ञान श्रवण करुन त्याची उपासना करतात. उपदेशावर श्रध्दा ठेवणारे असे पुरुष देखील मृत्यूला तरुन जातात. सर्व भूते भिन्न भिन्न असली तरी ते एका आत्म्यामध्येच स्थित आहेत व त्या आत्म्यापासून सर्व विस्तार झाला आहे. हे जेव्हा समजते तेव्हा ब्रम्हप्राप्ति होते.

चौदाव्या अध्यायात सत्व, रज तम या तीन गुणांविषयी कथन केले आहे. हे तिन्ही गुण प्रकृतीपासून उत्पन्न होतात आणि निर्विकार आत्म्याला देहात बांधून ठेवतात त्यापैकी प्रकाशक व निर्दोष असा गुण म्हणजे सत्वगुण. तो सुख आणि ज्ञान यांच्या संगाने जीवात्म्याला बांधून टाकतो. रजोगण हा रंजनरुप आहे. तो भोगेच्छेच्या आसक्तिपासून उदभवतो. तो जीवात्म्यास कर्माच्या आवडीने बध्द करतो. तमोगुण हा सर्व लोकांना मोहात पाडणारा व अज्ञानापासून उद्भवतो. तो जीवात्म्याला दुष्कृत्य, आळस व निद्रा यांनी बांधून टाकतो. जेव्हा रजोगुण व तमोगुण यांना हरवुन सत्वगुण प्रकट होतो त्याला सात्विक म्हणतात. ज्यावेळी सर्व इंद्रियात व देहात प्रकाश म्हणजे निर्मळ ज्ञान उत्पन्न होते तेव्हा सत्वगुणाची वाढ झालीय असे मानावे. सत्वगुणांचे प्राबल्य असतांना मरण आल्यास तो जीव उत्तम ज्ञानी, निर्मल लोकाला जातो. रजोगुण प्रबळ असतांना मृत्यू पावल्यास कर्मासक्त मनुष्यलोकी जन्म मिळतो. आणि तमोगुण प्रबळ असतांना मृत्यु पावल्यास पशु इत्यादी मूढयोनीत जन्म मिळतो. म्हणून नेहमीच सात्विक गुणांची कास धरावी.

पंधराव्या अध्यायात पुरुषोत्तम योगाची महति सांगितली आहे. सत्व, रज, तम या तीन्ही गुणांनी वाढलेल्या शाखा खाली आणि वर पसरलेल्या असून कर्मविपाकामुळे मनुष्यलोकी पसरलेली आहेत. या वृक्षाला अश्वत्थवृक्ष म्हटले आहे. त्याला अनासक्तिरुप तीक्ष्ण शस्त्राने छेद दिल्यास आसक्तिला जिंकता येते. ज्यांनी आपली आसक्ति जिंकली ते अध्यात्म ध्यानात व ज्ञानात स्थिर होतात. जीव हा कान , डोळे, त्वचा, जीभ आणि मन या सर्वात राहून विषयांचा उपभोग घेत असतो. परंतु त्यातून जो अनासक्त राहतो तोच खरा ज्ञानी ! या सृष्टीत नाशिवंत आणि अविनाशी असे दोनच विभाग आहेत. सर्व पदार्थाच्या अंतर्यामी असलेले आत्मतत्व हा अविनाशी भाग असतो व तोच उत्तम पुरुष होय. त्याला परमात्मा म्हणतात. तो कधीच नष्ट होत नाही.

सोळाव्या अध्यायात देव व असुर याविषयी ज्ञान दिले आहे. निर्भयता, सात्विक वृत्ती, ज्ञान व कर्म योग याविषयी तत्परता,

दान, निग्रह, यज्ञ, सदाचार, तप, सरलता, अहिंसा, सत्य, क्रोध नसणे, त्याग, शांति दया, निर्लोभता, नम्रता, जनलज्जा सुटणे, स्वैर व्यवहार बंद होणे, तेजस्वीता, क्षमा, धृति, शूचिर्भूतपणा, अभिमान नसणे ही देवत्वाची लक्षणं होत. याउलट दांभिकता, दर्प, अभिमान, क्रोध, निष्ठुरता, अज्ञान ही असुरी संपत्ति मानली आहे. द्रव्यसंचय, काम, क्रोध, सत्तालोलुपता, अहंपणा, विषयलंपटपणा, लोभी असणे हे असुरपणाचे लक्षण आहे.

सतराव्या अध्यायात ३ प्रकारच्या श्रध्दांवर उहापोह केलाय. सत्व, रज, तम या त्या तीन श्रध्दा होत, सात्विक लोक देवांची उपासना करतात. राजस लोक यक्ष, गंधर्व व राक्षस यांची, तर तामस लोक भूते, प्रेते, यांची ! तेच तत्त्व आहारा विषयी लागू होते. ज्या आहाराने आयुष्य, बुध्दि, शक्ति, आरोग्य, सुख व प्रेम वाढीस लागते, जे रुचकर, स्निग्ध, शरीरात मुरते, चिरकाल राहते व मन प्रसन्न करते ते सात्विक अन्न !

तिखट, आंबट, खारट अती, उष्ण, झणझणीत नीरस करणारे, दुःख, शोक, राग, उत्पन्न करणारे खाद्य राजस अन्न !.

निवलेले, शिळे, दुर्गंधीयुक्त, उष्टे, नीरस अपवित्र असे अन्न तामस अन्न होय.फळाचि इच्छा न धरता केवळ कर्म म्हणुन केलेला यज्ञ सात्विक तर केवळ फळावर दृष्टी ठेवून आत्मप्रतिष्ठेसाठी केलेला यज्ञ राजस यज्ञ असते. शास्त्रविधी सोडून अज्ञपणे संतर्पण रहीत, मंत्रहीन, दान दक्षिणारहीत, श्रध्दाहीन असा यज्ञ तामस यज्ञ होय ! हेच तत्व, तप, पुजा व दान यांनाही लागू आहे.

अठराव्या अध्यायात मोक्ष संन्यासाविषयी कथिले आहे. यज्ञ, दान व तप ही कर्मे केलीच पाहिजेत. ती चितशुध्दीकारक असतात. आसक्ति व फलाचि आशा सोडुन जे लोक नेमलेले कर्तव्यकर्म करतात त्याला सात्विक त्याग म्हणतात. शरिराला दुःख होईल. कष्ट होतील म्हणून कर्माचा त्याग केला तर तो राजस त्याग होय. त्याने त्यागाचे फळ मिळत नाही मोहवश होऊन सर्व कर्माचा त्याग केला तर तो तामस त्याग होय. सर्व भुतांमध्ये एकच अविनाशी अविभक्त भाव आहे असे ज्या ज्ञानाने दिसते ते सात्विक ज्ञान, ज्या ज्ञानाने सर्व भुतांमध्ये नाना भाव भिन्नत्वाने आहेत असे दिसते ते राजस ज्ञान पण तत्वार्थ न समजता निरर्थक एखाद्या कार्यातच अथवा देहातच तेच सर्वस्व असे समजून गुरफुटून रहाणे त्याला तामस ज्ञान म्हणतात.

अत्यंत शुध्द, बुध्दिने, आत्मसंयम करुन धिराने, इंद्रीय विषयांचा त्याग करुन, प्रीती व द्वेष टाकून निवडक एकांत स्थळी राहुन, मिताहार घेऊन मन व शरीर ताब्यात ठेवणारा जो ध्यान योगात गढून जातो. वैराग्य संपन्न होतो. अहंकार बळ, दर्प, काम, क्रोध, भोग यांना त्यागतो, ममत्वविरहित असा तो शांत जीव ब्रम्हपदी पोहोचतो. ओऽम् शांति शांति शांति.......

श्री. सुरेश द. कुळकर्णी
३०१/२०-बी, न्यु दिंडोशी एकदंत को ऑप हौ. सोसायटी,
नागरी निवारा १ व २, म्हाडा,
गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४०० ०६५
मोबाईल ९८२१९६४०१४

‘आरती भगवद्गीतेची’

जय देवी जय देवी जय भगवद्गीते
जगी पतितांना तू उद्धरिते ।।धृ.।।
आशंकित अर्जुना बोधामृत दिले
नारायणे स्वये उपदेश केले
व्यवहारी जगी या खचुन जाता
धैर्य वाढविले आमुचे माते ।।१।।
निष्काम कर्माचे सांगितले वर्म
भक्तियोगाचे तू दिले साधन
भगवंते वाहिला असे योगक्षेम
आत्मा अविनाशी पुनरूज्जीवन ।।२।।
कर्तव्याप्रमाणे वर्णांचे भेद
कथिली मनुस्मृति वेदांचे सार
सात्विक राजस तामस गुण
तिन्ही गुणांचे दिले प्रमाण ।।३।।
सगुण निर्गुण भक्ती निरुपण
दाखविले विश्वरुप महान
निमित्त मात्रे मानव जन्म
कर्ता करविता परमेश्वर जाण ।।४।।

जैन धर्म

संशोधन आणि वास्तव

भारतीय संस्कृतीची सुरूवात जैन धर्मामुळे झाली असा आपला इतिहास सांगतो. बौद्ध व हिंदू या दोन्ही धर्मापेक्षा जैन धर्म प्राचीन आहे. महावीरांचा निर्वाणकाळ होऊन २५४० वर्षे झाली आहे. ते जैनांचे चोविसावे तीर्थंकर. त्या आधी तेवीस तीर्थंकर झाले. ऋषभदेव हा पहिला तीर्थंकर. महावीरांच्या किमान २००० वर्ष आधी त्याचा कालावधी आहे. असे म्हटले जाते. त्यानंतर बौद्ध, ख्रिश्चन, वैदिक, पारशी इ. धर्मांची स्थापना झाली. १९३५ वर्षापूर्वी शालिवाहन शके, १४३४ वर्षांपूर्वी पारशी व २०१४ वर्षापूर्वी ख्रिस्ती धर्माची स्थापना झाली. असा सर्वमान्य इतिहास आहे. याचाच दुसरा अर्थ असा की जैन धर्मातील पायाभूत तत्वे घेऊनच इतरही सर्व धर्मांची संस्थापना त्या त्या वेळी केली असली पाहिजे. मी पॅरिसला गेलो तेव्हा तेथे जैन धर्माची ओळख करून देताना म्हटले होते की जगातील पहिला धर्म जैन आहे व तो ईश्वराचे अस्तित्वच मान्य करीत नाही, यातील गर्भितार्थ आपण समजून घेतला पाहिजे. धर्म नास्तिक कसा असू शकतो ? परंतु हे वास्तव आहे, हे आपण मान्यच केले पाहिजे. मी स्वतः या बाबींवर खूप संशोधन केले आहे. चिंतन केले आहे. जैन धर्मात आत्म्याला स्थान आहे. स्वतः शुद्ध राहा, तरच इतरांना (सर्व प्रकारच्या) शुद्धतेचा धडा मिळतो व समाज सुखाने नांदतो - हे त्रिवार असलेले सत्य जैनांचे उगमस्थान आहे. हा धर्म आपल्या विचार-प्रणालीच्या व जीवन पद्धतीच्या विकासकार्यमध्ये कोणत्याही संकुचित दृष्टीला कधीही बळी पडला नाही. त्याची भूमिका राष्ट्रीय दृष्टीने नेहमीच उदार व उदात्त राहिली आहे. आज भारत अखंड आहे. याची कितीही कारणे असतील परंतु या धर्माच्या व्यक्तींनी व नेत्यांनी कधीही एकाच भागासंबंधी अभिनिवेश निर्माण होऊ दिला नाही, हे सत्य आहे. सत्ता, संप्रभुता आणि सद्धर्म या त्रयींचा सुंदर मिलाफ झाला तरच समाज सुखी, समाधानी व समर्थपणे एकत्रित राहू शकतो. हे अनेकदा दिसून आले आहे.

आदिकाळापासून भारतीय विचारधारा जरी दोन रूपात दिसत असली तरी श्रमण - प्रधान असलेल्या मूळ जैन रुप विचारधारेनंतरच दुसरी ब्राह्मणवादी विचारधारा आर्यांच्या प्रवेशानंतर सुरू झाली असे दिसून येते. पहिले तीर्थंकर ऋषभदेवांच्या संपूर्ण जीवन कथेवरच महाभारतासारखे महाकाव्य उभे राहिले, हे दुर्लक्षित होता कामा नये. ऋषभदेवाच्या वास्तविक जीवनाची मूळ कथाबीजे हेरून त्यांचा विकास महाभारतात झालेला दिसून येईल. श्रीमद् भागवतातील खालील श्लोकात श्रमणांच्या जीवनपद्धती विषयीचा तपशील पहा -

कृते प्रवर्तते धर्मश्चतुष्पात्तुज्जनैर्धृतः।
सत्यं दया तपो दानमिति पादा विभोर्नृप ।।

चार चरणातील धर्म या लोकांचा असतो. सत्य, दया, तप आणि दान या प्रकारच्या धर्माचे हे लोक पालन करतात असा स्पष्ट निर्देश श्रमण संस्कृती प्रस्थापित झाल्यानंतर नोंदविलेला आहे. माझ्या दृष्टीने हा उल्लेख अत्यंत महत्त्वाचा असा आहे. प्राग्वैदिक

काळातील हा धर्म मानवाच्या कल्याणासाठी पुढे अत्यंत विकसीत रुप घेऊन आला. श्रमण जैन हे मोठे आत्मसमाधानी, परदुःखहारी, दयाळू, समस्त जीवांशी मैत्रीपूर्ण व्यवहार करणारे, शांत, इंद्रियजयी, त्यागी आणि कोणताही अभिनिवेश धारण न करणारे व आत्मकल्याणाची कास धरणारे होते व आहे. आजही त्यापैकी काही गुण प्रकर्षाने दिसून येतात. प्रसिद्ध पाश्चात्य तत्वज्ञ ईलियटच्या इंडिया या ग्रंथात पृष्ठ क्र. ५०६ वर एक फार महत्वाचा संदर्भ आहे. तो म्हणते, "जगात सर्वात प्रथम दोनच धर्म होते. एक पूर्वेकडील शमन (जैन) संस्कृती व पश्चिमेकडे खुरासन धर्म, खुरासन (ख्रिश्चन) हा शमन (जैन) नंतरचाच धर्म आहे. भारताचे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी इंडियन फिलॉसफी च्या खंड १ मधील २८३ पृष्ठांवर जे म्हटले आहे, जैन परंपरा वृषभदेवापासून निर्माण झाल्याचे कथन योग्यच आहे. इसवीसनापूर्वीच्या पहिल्या शताब्दीमध्ये तीर्थंकर वृषभदेवाची पूजा होत होती, याला भरपूर साधार पुरावे उपलब्ध आहेत. त्यावेळी अर्धमागधी, पाली, ब्राह्मी भाषा होत्या. संस्कृतचा जन्म हा त्यानंतरच्या काळातील आहे. अशाप्रकारे भारतीय संस्कृतीचा प्रारंभच मुळात श्रमणसंस्कृतीमध्ये आहे. ती भारताची आद्य संस्कृती आहे, हे सर्वच इतिहासकारांनी मान्य केले आहे. वैदिक संस्कृतीचा उगम महावीरांच्यानंतर किमान पाचशे वर्षानंतरचा आहे असे इतिहास सांगतो.'

महावीरांनी जैन यांनी धर्माला तत्वाज्ञानाचा साज चढवून सुसूत्रीकरण केले. जीवन आणि आजीव ही विश्वातील दोन मूलतत्वे असून ते परस्पर संबद्धीत आहेत. जिवाच्या मन, वचन, कायात्म क्रियेमुळे जीव - अजिवाचा संबंध परंपरेने चालू राहतो. यालाच 'कर्मस्त्रव' व 'कर्मबंध' म्हणतात. यम - नियमादिक पालनामुळे कर्मास्त्रवाची परंपरा रोखणे शक्य होते. तसेच संयम आणि तपाने पूर्वीचा कर्मबंध नष्ट करणेही शक्य होते. अशा रितीने जिवाला जडबंधापासून सर्व प्रकारे मुक्त करून आपल्या अनंत ज्ञानदर्शनात्मक आंतरिक स्वरूपाची प्राप्ती करून घेणे हेच जीवनाचे अंतिम ध्येय असले पाहिजे. यामुळे जन्म-मृत्यूची परंपरा नष्ट होऊन निर्वाणाची प्राप्ती होते. समग्र जैन तत्वज्ञानाचा हा संक्षेप आपण लक्षात ठेवला पाहिजे. जैन समाजाची ही स्वतंत्र विचारसरणीचे जीवन पद्धतीच्या विकासकार्यामध्ये अत्यंत महत्वाची आहे. त्याशिवाय जैन पद्धतीचे सर्वांत महत्वाचे लक्षण म्हणजे त्यांची राष्ट्रीय वृत्ती! उदार व उदात्त दृष्टीकोनातून त्यांनी या राष्ट्रीयवृत्तीची जोपासना केल्याचे दिसून येते. भारतात किंवा

विदेशात हा समाज राष्ट्रीय वृत्तीपासून कधीच दूर राहिला नाही. कोणत्याही एकाच भागासंबंधीचा अभिनिवेश जैन समाजाने कधीच निर्माण केला नाही. ओरिसा, बिहारमधील जैन समाज असू दे किंवा आंध्र, कर्नाटक, महाराष्ट्रातला असू दे, आपल्या अखंडत्वाची जोपासना व संवर्धन करण्यात या समाजाने मोठी निर्धाराची भूमिका निभावलेली दिसून येईल. धर्म प्रचारासाठी किंवा आत्मरक्षणासाठी या श्रमणसंस्कृतीचे लोक आपल्या देशाच्या बाहेर कधी गेले नाही. म्हणूनच प्रांतीयतेची संकुचित भावना जैनांनी कोठेही बाळगू दिली नाही.

जैन धर्म हा सम्राट अशोकाच्या अगोदर निग्रंथ धर्म म्हणून प्रचलित होता. भारतातील हा आदिधर्म आहे. त्यानंतरच्या काळात बौद्ध व हिंदू धर्म प्रस्थापित झाले. परंतु त्या दोन्ही धर्मांच्या तत्वांचा पाया या जैन दर्शनानेच घातलेला दिसून येतो. जीव, अजीव, बंध, संवरा, निर्जरा आणि मोक्ष या सात तत्त्वामध्ये सबंध जैन तत्वज्ञान सामावलेले आहे. याच तत्वज्ञानातून ७२ कलांचा उगम झाला, व तेथूनच भारतीय संस्कृतीचा प्रारंभ खऱ्या अर्थाने झाल्याचे दिसून येते. जैन धर्म हा मूलतः अध्यात्मिक आहे. अगदी सुरूवातीतच त्याचा संबंध कौशल, काशी, विदेह इ. पूर्वेकडील प्रदेश शास्त्रवंशी राजे यांच्याशी घनिष्ठ असा राहिला होता. बहुतेक जैन तीर्थंकरांनी उत्तरपूर्व प्रदेशामध्येच जन्म घेतला, तपश्चर्या केली आणि केवलज्ञानाची प्राप्ती झाल्यावर आपल्या उपदेशाने अखंड असी ज्ञानगंगा निर्माण केली. ती आजतायगायत सुप्रवाहित राहीली. हे सर्व तीर्थंकर क्षत्रिय असून प्रत्यक्षात राजे किंवा युवराजच होते. जनक राजाचेच एक पूर्वज नेमिनाथ हे जैन धर्मीय २१ वे तीर्थंकर होऊन गेले. या घटनेकडेही संशोधनाच्या दृष्टीकोनातून विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. रामायणाची निर्मिती याच काळात झाली होती, असे दिसते.

प्रवृत्ती मार्ग अधिक स्पष्ट व समृद्ध होण्यासाठी कलांची आवश्यकता जैनांनी स्विकारलेली होती. गृहस्थांची जी षट्कर्मे सांगितली आहेत त्यामध्ये असी, मसी, कृषी, सेवा व वाणिज्य यांच्या व्यतिरिक्त शिल्पाचीही महती आहे. अगदी प्राचीन काळी कौशल देशात स्थापन झालेला हा जैन धर्म विदेह, मगध, आणि पश्चिमेकडील तक्षशिला (पाकीस्तानात नंतर गेलेले पोदनपूर) आणि सौराष्ट्र पर्यंत याचा प्रसार झाला. इसवी सन पूर्व सहाव्या शतकात महावीरांनी या धर्म व्यवस्थेला कालक्रमानुसार व्यवस्थित रुप दिले. व देशव्यापी अनुयायी मिळविले. त्यामुळे भारताच्या सहाही भागामध्ये जैन धर्माचा प्रभाव पडला. व म्हणूनच जैन धर्मातील इतिहास, साहित्य, तत्वज्ञान आणि कला यांच्यावर महावीरांची छाप पडली. ज्या आंतरिक गुणांच्या सामर्थ्यावर महावीरांनी नैतिक धारणा व व्यावहारिक जीवन यांचा समतोल घडवून आणला त्याला आजही तोड नाही. जैन धर्माने वर्ण व जातींचा पुरस्कार कधीच केला नाही ही बाब अत्यंत लक्षणीय आहे. त्यामुळे सामाजिक अखंडत्व भारतामध्ये व लोकजीवनामध्ये राहिले. समस्त जीव मात्रांना समान कल्याण व उत्कर्ष अशा भावनांनी या धर्माने कार्य केले. अलंकाराने मुक्त, क्षमेने युक्त, निर्लोभी, सत्य, संयम आणि त्यागाची परमावधी असलेले जीवन सर्वच तीर्थकर, ख्यातनाम इतिहासकार डॉ. हर्मन जेकोबीनी पार्श्वनाथांना (२३ वे तीर्थंकर) एक ऐतिहासिक व्यक्ती म्हणून प्रमाणित केले. नंतरच्या विद्वानांनी याची पुष्टी केली. प्रख्यात संशोधक डॉ. धर्मानंद कोसंबी यांनी अत्यंत महत्वपूर्ण संशोधन करून पार्श्वनाथ आणि महावीर यांच्यामधील काळ २५० वर्षांचा आहे, हे सिद्ध करून दाखविले. महावीरांच्या नंतर जवळ-जवळ तीन दशकांनी गौतम बुद्धाचा उदय झालेला आहे, हे विसरता येत नाही. गौतमबुद्ध हा जैन होता व महावीराचा अनुयायी होता. दिगंबरावस्था त्याला मान्य नसावी, म्हणूनच महावीरापासून दूर जाऊन त्याने बौद्ध मताची स्थापना केली, हा इतिहास आहे.

विसाव्या शतकात सम्राट अशोकाचे एकंदर ३७ लेख संशोधकांनी शोधून काढले. त्यातील सात लेख स्तंभलेख, चौदा लेख शिलालेख, व सोळा लेख हे इतर लेखांमध्ये मोडतात. अशोक हा सम्राट होता. हल्लीच्या बिहार प्रांतास पूर्वी मगध असे नाव होते. त्यातील पाटीलपुत्र आताचे पाटणा हे शहर अशोकाची राजधानी होती. अशोकाचे साम्राज्य फार मोठे होते. सबंध हिंदुस्थान, अफगाणिस्तान व बलुचिस्तानचा भूगाग त्याच्या साम्राज्यामध्ये मोडत असे. अशोक ख्रिस्तपूर्व २७५ च्या सुमारास राजा झाला. व सुमारे चाळीस वर्षे त्याने राज्य केले. त्याचे सापडलेले सर्व लेख हे पेशावर, जगन्नाथपुरी, पाकिस्तान, नेपाळ, म्हैसुर, गिरनार वगैरे हिंदुस्थानातालीे दूर-दूरच्या ठिकाणापर्यंत

सापडलेले आहेत. त्याकाळी हल्लीची देवनागरी लिपी प्रचारात नव्हती. खरोष्टी व ब्राह्मी या नावाच्या लिपीमध्ये हे सर्व लेख आहेत व त्याची भाषा मगधी अशी आहे. या ३७ लेखातील एकाही लेखामध्ये हिंदुधर्म असा शब्दप्रयोग नाही. निर्ग्रंथ (जैन), कंभोज, यवन, नाभक, नाभपंक्ती, भोज, पितनिक्य, आंध्र, पुलिंद या धर्मातील लोकांचा उल्लेख मात्र शिलालेख क्र. १३ मध्ये अशोकाने केलेला आहे. याचा अर्थच हा, की वैदिक धर्माची सुरूवातही अशोकाच्या काळात झालेली नव्हती. या सर्व शिलालेखांचा आपल्या जैन समाजातील विद्वानांनी अजूनही गंभीरपणे अभ्यास केला पाहिजे. १८ व्या शतकात जैन विद्वानांनी अत्यंत महत्वपूर्ण संशोधन केले परंतु तसे पुढे मात्र घडले नाही. हे एकच लक्षण अत्यंत महत्वपूर्ण असे आहे.

इसवीसनपूर्व दुसऱ्या शतकात जैन धर्माला राजधर्म होण्याचे भाग्य लाभले होते. चिनी प्रवासी ह्युएनत्सांगने वर्णन केले आहे की तेथे अनेक प्रकारचे नास्तिक होते, परंतु त्याच्यामागे निर्ग्रंथांची (नी-किनच्या अनुयायींची) संख्या अधिक होती. ओरिसात जैनधर्माचा प्रवेश होऊन अंतिम तीर्थंकर महावीराच्या निर्वाणाच्या १०० वर्षानंतरच जैनधर्म तेथील राजधर्म बनला होता, हे सर्व खारवेलच्या शिलालेखातून ही प्रमाणित होते.

स्वर्गपुरीच्या दुसऱ्या लेखाने प्रामाणित होते की खारवेलच्या पट्टराणीने कलिंगात श्रमणांसाठी एक मंदिर आणि गुंफा बनवली होती. जिल्हा गॅझेटियर म्हणजेच विवरणिकेनुसार ही निश्चित गोष्ट आहे की मौर्य सम्राट अशोकाच्या काळी अनेक जैनांनी येथे वस्ती केली होती कारण उदयगिरी व खंडगिरी येथील वाळूमिश्रीत दगडाच्या टेकड्या त्यांच्या, तपस्व्यांचे विश्रामस्थानाप्रमाणे असलेल्या गुंफांनी वेढल्या गेल्या आहेत, आणि त्याच्यापैकी काही गुंफांमध्ये मौर्य युगातील ब्राह्मी अक्षरांमध्ये शिलालेख आहेत. या सर्व गुंफा जैनाच्या धार्मिक उपयोगासाठी बनविल्या गेल्या असाव्यात असे दिसते कारण शतकांपर्यंत जैन सांधूनी त्यांचा सदुपयोग केला होता.

असे अनुमान काढता येते की ओरिसाचे संपूर्ण राष्ट्र त्या काळी मुख्यत्वेकरून जैनच होते. स्व. के. पी जयस्वाल लिहितात:-

ओरिसात जैनधर्माचा प्रवेश शिशुनागवंशी राजा नंदिवर्धनच्या काळी झाला होता. खारवेलच्या काळाच्या आधी सुद्धा उदयगिरी पर्वतावर अर्हतांची मंदिरे होती, कारण त्यांचा उल्लेख खारवेलच्या लेखात आला होता. असे वाटते की खारवेलच्या काळात जैन धर्म काही शतकांपर्यंत ओरिसाचा राष्ट्रीय धर्म राहिला होता.

इ. स. ६२९ मध्ये आलेल्या चिनी प्रवासी ह्युएनत्सांगने वैशाली, राजगृह, नालंदा आणि पुण्ड्रवधन येथे अनेक निर्ग्रंथ साधूंना पाहिले होते. तो कलिंग देश जैनांचे मुख्यस्थान असल्याने सांगतो. यावरून स्पष्ट होते की खारवेलच्या नंतर देखील इतक्या प्रदीर्घ काळापर्यंत जैनधर्म कलिंग मध्ये टिकून राहिला.

ग्रीक इतिहासाच्या अध्ययनातून असे समजते की इसवी सनाच्या कमीतकमी चारशे वर्षांपूर्वी हे दिगंबर तत्वेतेने पश्चिम आशियात पोहोचले होते. अलीकडेच अनुवादित झालेल्या पोपच्या पुस्तकालयातील एका लॅटिन लेखावरून समजते की इ. स. पूर्व पाहिल्या शतकापर्यंत हे दिगंबर भारतीय दार्शनिक मोठ्या संख्येने इथियोपिया (आफ्रिका) तील जंगलामध्ये राहत होते आणि अनेक ग्रीक विद्वान तेथे जाऊन त्यांचे दर्शन करत असत व त्यांच्याकडून शिक्षण घेत असत.

ग्रीसच्या तत्वज्ञानावर आणि अध्यात्मावर या दिगंबर संताचा इतका दाट प्रभाव पडला की इ. स. पूर्व चवथ्या शतकात प्रसिद्ध ग्रीक विद्वान पिरो याने भारतात येऊन त्याच्या ग्रंथाचा व सिद्धांताचा अर्थात भारतीय अध्यात्म आणि भारतीय तत्वज्ञानाचा विशेष अभ्यास केला आणि ग्रीसला परत जाऊन जान एलिस नगरात एका नवीन ग्रीक तत्वज्ञानाच्या पद्धतीची स्थापना केली. या नवीन पद्धतीचा मुख्य सिद्धांत हा होता की इंद्रियांच्या द्वारे वास्तविक ज्ञानाची प्राप्ती असंभव आहे. वास्तविक ज्ञानाची प्राप्ती केवळ अंत:करणाच्या शुद्धिनेच शक्य आहे आणि त्यासाठी मनुष्याने अत्यंत साधे जीवन व्यतीत करून आत्मसंयम आणि योग यांच्या द्वारे अंत:करणात डोकावले पाहिजे. भारतातून परतल्यानंतर पिरो दिगंबर अवस्थेत राहत होता. त्याचे जीवन इतके साधे आणि संयमी होते की ग्रीक लोक त्याच्याविषयी अतिशय भक्तिभाव बाळगून होते. तो योग्याभ्यास करत असे आणि निर्विकल्प समाधीवर त्याचा विश्वास होता.

असे असले तरी, जैन धर्मातील चोवीस तीर्थकारांची

विश्वसनीय अशी चरित्रात्मक माहिती अजूनही आपण संकलित किंवा संशोधिक करू सकलो नाही याचे वैषम्यही मला आहे. चौवीस तीर्थंकरापैकी ऋषभनाथ, अजितनाथ, अभिनंदन व अनंतनाथ या चार तीर्थकारांचे जन्मस्थान अयोध्या असे दर्शविले आहे तर शांतिनाथ, कुंथुनाथ व अर्हनाथ यांचे जन्मस्थान हस्तिनापूर दर्शविले आहे तर मल्लिनाथ नेमिनाथ यांचे जन्मस्थान मितीलापूरी असल्याचे म्हटले जाते. याबाबतीत पुढील संशोधन अत्यावश्यक आहे. जैन तीर्थकारांचे आयुष्य हे अनेक लाख वर्षाचे आहे असे दर्शविले जाते. हे शक्य आहे का ? याचाही विचार आपण केला पाहिजे. ऋषभनाथ ८४ लाख वर्ष, अजितनाथ ७२ लाख वर्ष, संभवनाथ ६० लाख वर्ष तर महावीरांचे ७२ वर्ष असे आयुष्य सांगितले आहे. यामध्ये तारतम्यता आवश्यक आहे. असे वाटते तीर्थकरांचा जो तपकाल सांगितला आहे त्यामध्ये संशोधन व्हावयास हवे. ऋषभनाथ १ लाख पूर्व वर्षे तपकाल करत होते असे म्हटले आहे. तर महावीरांचा तपकाल केवळ ४२ वर्षे आहे. तीर्थंकरांची चरित्रात्मक माहिती देताना ऋषभनाथांची शरीराची उंची ५०० धनुष्य सांगितली गेली आहे. अजितनाथांची ४५० धनुष्ये, संभवनाथांची ४०० धनुष्ये तर महावीरांची सात हात उंची सांगितली आहे. तसेच अजितनाथांचा जन्म ऋषभदेव मोक्षास गेल्यानंतर ५० लाख करोड सागर काळ व्यतित झाल्यानंतर झाला, असे म्हटले जाते. इतर सर्व तीर्थकरांच्या बाबतीतही या काळाची अनिश्चितता लक्षणीय आहे. या सर्वांवर योग्य ते संशोधन होऊन २४ तीर्थंकरांची सुस्पष्ट जीवनचरित्रे संपादन करणे अत्यंत आवश्यक आहे.

शेवटी निरीश्वरवादी असलेल्या जैन धर्मातील समस्त श्रावकजन वैदिक धर्माप्रमाणे आचरण करू लागतात, याचे आश्चर्य ही या ठिकाणी मला नोंदवावेसे वाटते. भाषा व धर्म यांचा अहंकार न जपता खऱ्या मनावतावादकडेच नेणारा जो जैन धर्म आहे त्याची अमर्याद व्याप्ती आज समस्तांनी ठेवणे आवश्यक आहे, असे मला मनापासून वाटते. इति लेख समाप्ति.

लेखक प्रा. जवाहर मुथा
३७६७, नवीपेठ,
अहमदनगर - ४१४००१ महाराष्ट्र
मो. ९४२२२२०२८०



पारशी धर्म

लता गुठे

धर्म कोणताही असो त्याची शिकवण ही मानवी कल्याणासाठीच असते. जरथुश्त्र ह्या संताच्या शिकवणूकीतून पारशी धर्माचा विस्तार झाला. हिंदू धर्माप्रमाणेच अनेक तत्वे अंगीकारणारा हा धर्म आहे. त्यामध्ये मनाच्या पावित्र्याला महत्त्वाचे स्थान आहे. कारण एकेश्वरवादाचा पुरस्कार करणारा हा पारशी धर्म आहे. 'धर्मगुरु जरथुश्त्राची 'यस्न'मधील प्रार्थना म्हणजे ज्ञानेश्वरांच्या पसायदानाची आठवण होते.

इ.स. पूर्व सहाव्या शतकात परशीयामध्ये स्थापन झालेला हा धर्म आहे. एकेकाळी सर्वात मोठ्या सात प्राचीन आणि महत्त्वाच्या धर्मात पारशी धर्माची गणना होत होती. इराणच्या आग्येय दिशेकडील भागाला 'पार्स' असे म्हणतात. म्हणून या भागात राहणाऱ्यांना पारशी म्हणतात. म्हणजे पारशी लोकांचे मूळ स्थान इराण आहे. ग्रीक भाषेत धर्मसंस्थापकाचे नाव 'झोरोऑस्टर' असे रुढ झाले. त्यावरुन इंग्रजी भाषेत हा धर्म 'झोरोस्ट्रियन रिलीजन' या नावाने ओळखला जाऊ लागला.

धर्म उगम पावल्यानंतर अनेक शतके इराणी लोकांचा तो राष्ट्रीय धर्म होता.धर्मगुरु जरथुश्त्र यांना वयाच्या ३० व्या वर्षी परमेश्वरकृपेने ज्ञानप्राप्ती झाली. मिळालेल्या ज्ञानाचा वापर लोककल्याणासाठी करायचा म्हणून त्यांच्याकडे असलेले ज्ञानाचे भांडार त्यांनी जनसमुदायासाठी खुले केले. ते पवित्र ज्ञान समाजाला शिकवू लागले. प्रथम त्यांना इराणमधील धर्मगुरू व शासनकर्ते यांचा खूप विरोध झाला. अनेक समस्यांना त्यांना सामोरे जावे लागले. त्यामुळे एक प्रकारची निराशा त्यांच्या मनात निर्माण झाली ते निराशेचे क्षण त्यांनी अनुभवले. वैराग्य निर्माण झाल्यामुळे अखेर त्यांना गाव सोडून इराणच्या उत्तरपूर्व भागाकडे जावे लागले. विश्तास्प नावाच्या राजाने त्यांना आश्रय दिला. त्यानंतर त्यांनी परत ज्ञानदानाच्या प्रसाराचे काम हाती घेतले. धर्माच्या शिकवणूकीचा प्रसार, प्रचार जसजसा होऊ लागला तसतसा त्याच्या विचारांचा पगडा लोकांच्या मनाचर होऊ लागला त्यांनंतर त्यांच्या विचाराशी सहमत असलेले अनुयायी मिळत गेले.

त्यांच्या शिकवणूकीत मनाच्या व शरीराच्या पावित्र्य रक्षणाला अतिशय महत्त्व आहे. पावित्र्य रक्षणासाठी अतिशय बारीक सारीक सूचना त्यांनी दिल्या आहेत. त्यांच्या विचारांच्या पाऊलखुणा 'अवेस्ता' या धर्मग्रंथामध्ये 'वेंदिराद' नावाचा जो भाग आहे त्यामध्ये आढळतात.

पारशी धर्माच्या वाङ्मयात ग्रंथांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. पारशी कॅलेंडरचा 'अस्पंदार्मद' हा शेवटचा महिना संपला की नवीन वर्षाच्या सुरवातीला पाच दिवस 'गाथा' वाचन करतात पारशी धर्माची मूलतत्वे गाथांमध्ये सांगितली आहेत. गाथा श्लोक स्वरूपात आहे त्याचा सारांश पुढीलप्रमाणे :-

१) अहुनवद :- या पहिल्या गाथेत पृथ्वीचे व पृथ्वीवरील जीवनाचे पावित्र्य वर्णन केलेले आहे.

२) उश्तवद :- दुसऱ्या गाथेत ज्ञानाचा प्रकाश प्राप्त झाल्यावर होणाऱ्या अवस्थेचे वर्णन केलेले आहे.

३) स्पेंतोमद :- तिसऱ्या गाथेत ईश्वराच्या पावित्र्याचा व तेजाचा महिमा वर्णन केलेला आहे.

४) बोहु-क्षथ्र :- चौथ्या गाथेत प्रेमाचा व सेवाव्रताचा महिमा सांगितलेला आहे.

५) वहिश्तो-इश्त :- पाचव्या गाथेत जीवनाची अत्युच्च आकांक्षा-सत्य, पावित्र्य आणि सौजन्य या विषयी मार्गदर्शन केलेले आहे. असे ह्या गाथांमधील तत्त्वज्ञान ही या धर्माची मोठी शिकवण आहे.

पारशी धर्मातमानवी वर्तणूकीच्या तत्त्वज्ञानाला अतिशय महत्त्व आहे.नववर्ष सुखात आनंदात जाण्यासाठी मनोकामना मंगलमय होण्यासाठी ‘गाथा’ म्हणून पाच दिवस जास्त मानून मग दुसऱ्या वर्षाची सुरुवात करण्याची प्रथा पडली आहे.

पुर्वीच्याकाळी ‘पर्शिया’ मधून हा समाज छळाला कंटाळून इ.स. ७१७ मध्ये भारतात बोटींनी आला. भारताच्या पश्चिम किनाऱ्यास दीव, दमण, संजाण ही बेटे त्यांनी आश्रयास घेतली असली तरी त्यांनी पुढे नवसारी हे केंद्र बनविले. संजाणच्या राजाने त्यांना संरक्षण दले. शेकडो वर्षे ते तेथेच राहिले. गुजरातमध्ये वापीच्या जवळ उदवाडा या गावी पारशी धर्माचे सर्वात प्राचीन अग्नीमंदिर आहे. भारतातून व देश-विदेशातून मोठ्या संख्येने पारशी लोक दर्शनासाठी तेथे जात असतात. पूजा-अर्चा आणि अग्नीला चंदन अर्पण करणे आदि गोष्टी मोठ्या भक्तिभावाने केल्या जातात. मुंबई (४), नवसारी (१) सुरत (२) या ठिकाणीही अग्नीमंदिरे आहेत. इराणमध्येही यझ या छोट्या गावी अग्नी मंदिर आहे. याशिवाय मुंबईत जवळ जवळ ४० च्या वर अग्यारी आहेत. ठाणे व इतरही अनेक ठिकाणी अग्यारी आहेत.सर्व ठिकाणी अग्नीला सुगंधी वस्तू अर्पण करुन पाच वेळा प्रार्थना व घंटानाद भाविक लोक करतात.

पारशी लोकांच्या धार्मिक आचरणात ऋजूता, प्रामाणिकपणा, सत्यनिष्ठा याला महत्व आहे. ‘अहुरमज्द’ व ‘यझन’ यांची पूजा-अर्चा करणे, रोज अवेस्ता धर्मग्रंथातील थोड्या भागाचे पठन करणे, पवित्र अग्नीचे रक्षण करणे, अग्निमंदिरातील (अग्यारी) अग्नीवर दिवसातून पाच वेळा चंदन वाहणे, वयाच्या बारा ते पंधरा वर्षांपर्यंत कुश्ती बांधून - नवज्योत(यज्ञोपवीत) समारंभ करणे. गृहस्थाश्रम पत्करुन प्रजोत्पादन करणे या गोष्टींचा समावेश आहे. तापसी वृत्ती बाळगून अपरिग्रह जीवन जगणे किंवा आजन्म ब्रह्मचर्य पालन करणे यांना

पारशी धर्मात स्थान नाही. वैयक्तिक आचार - विचारांच्या बाबतीत पारशी धर्मात ऋजुता, प्रामाणिकपणा, सत्यनिष्ठा या गुणांना प्राधान्य आहे. द्रोह किंवा कपटाने वागणे याला जराथुश्त्राचा कडवा विरोध होता. अनेक सामाजिक कर्तव्य पार पाडण्यासाठी म्हणून गरजवंतांना दान देणे.आणि पाहुण्यांचा आदर सत्कार करणे यांना या धर्मात आदराचे व गौरवाचे स्थान आहे.

तसेच उदरनिर्वाह करण्यासाठी प्रामाणीकपणे कष्ट करुन कमवावे त्यातून दान करावे, सौजन्याने वागावे, स्वच्छता राखावी गोड बोलवे असेही त्यांच्या धर्मग्रंथात सांगीतले आहे. भटक्या जीवनाचा त्याग करावा, गाय ही मानवासाठी श्रेष्ठ असल्यामुळे तिचा वध करु नये, पशूपालन करावे आणि शेतीभाती करावी या गोष्टींना जराथुश्त्राने सर्वोत्तम मानले आहे. ही धर्माची शिकवण बालपणापासून पारशी लोकांच्या मनात रुजलेली आहे. नितीमुल्यांविषयी पारशी समाज अतिशय जागरुक आहे. संस्कृती, परंपरा याचे ते काटेकोर पालन करतात म्हणूनच पारशी लोक अतिशय सुसंस्कृत आहेत

पंचमहाभूता विषयी: अग्नी, पृथ्वी, प्रकाश,जल, वायू त्यांच्या उपासनेत महत्वाचे स्थान आहे. अग्नी किंवा सूर्य हे साथी आहेत, दैवते नाहीत. त्यांची परमेश्वराची कल्पना म्हणजे तो एक सुंदर प्रकाशमान आहे म्हणजेच चैतन्यमय ऊर्जा स्वरुप आहे एवढीच आहे. एखद, मोबेद, दस्तुर, अबेस्ता हा धर्मग्रंथ म्हणजे मानवाच्या चांगल्या वर्तणूकीचे शास्त्र शुध्द विज्ञान आहे त्यांच्या धार्मिक संस्कारात अनेक मानवी मुल्यांचा समावेश आहे. अहु (सु) रमज्द हा सर्वश्रेष्ठ देव व सर्वज्ञ विचार, उच्चार व आचार यांना आपण स्वत: जबाबदार मानने व असत्य विचार, अपशब्द व कुकर्म यांचा शपथपूर्वक त्याग ही ‘झरतुष्ट्री’ धर्माची चार प्रमुख तत्त्वे होत. त्यांच्या ‘जिंद अबेस्ता’मधील मंत्रांचे उच्चार संस्कृत भाषेशी जवळचे आहेत. पारशी समाज हा आर्यवंशातील मानला जातो. पृथ्वी व अग्नी ही मूलतत्त्वे पवित्र रहावीत म्हणून त्यांची प्रेते ते ‘टॉवर ऑप सायलेन्स’ मध्ये ठेवतात व पक्षी त्यांचे भक्षण करतात.

आतशबेहराम (अग्यारी) हे अग्नीचे महान उपासक आहेत. अग्यारीत अद्यापही अग्निहोत्र करतात २४ तास चंदनाग्नी जळत ठेऊन अग्निहोत्र करणे हे अतिशय अवघड काम

आहे तसेच 'आतश बेहराम'मधील अग्नी सिध्द करणे हे कर्मही कठीण आहे. 'आतशबेहराम' हे पवित्र अग्नी मंदिर मानले जाते.

हजार प्रकारच्या अग्नीपासून आतश बेहरामचा अग्नी सिध्द केला जातो. प्रथम नगरातील १६भरातील अग्नी एकत्र करतात. त्यामध्ये समाजातील राजापासून धनगराच्या घरातल्याअग्नीपर्यंत सर्व अग्निचा समावेश होतो. म्हणजेच सर्व धर्म समभाव येथे पहावयास मिळतो. परमेश्वराच्या दरबारात कोणीही लहान मोठे नाही हा संदेश फार मोठा आहे. रंगारी, कुंभार, टांकसाळ, शिकलगार, भडभुंजा, दारुभट्टीवाला, योध्दा, धनगर, पुरोहित या सर्वांच्या घरतला अग्नी एकत्र केला जातो असे एकूण १६ अग्नी होतात. यातील प्रत्येक अग्नी शुध्द करुन घेतात. तो दुसऱ्या एका जागी नेतात. त्यावर एक पत्रा (अनेक छिद्र पाडून) अग्नीला स्पर्श होणार नाही अशा बेताने धरतात. त्या पत्र्यावर चंदन, धूप, इ. वस्तू ठेवतात. वारा व उष्णता याने ही द्रव्ये पेटतात व अग्नी तयार होतो. असा अग्नी विती-वितीच्या अंतरावर ९१ खड्डे करतात त्या प्रत्येकात इंधन असते. ९१ खड्डयांपैकी एका खड्डयात पत्र्यावरील अग्नी टाकतात व ज्वाला निर्माण झाली म्हणजे त्यावर धातूचा पत्रा पुन्हा धरुन त्यावर चंदन, धूप ठेवतात. ते पेटले म्हणजे त्या ९१ खड्डयांपैकी नं. २ च्या खड्डयात टाकतात. याप्रमाणे विधी करत शेवटचा खड्डाही पेटला म्हणजे त्यातील अग्नी काढून तो मंदिरात नेतात. त्याठिकाणी त्या अग्नीच्या एका भागावर मंत्रांनी संस्कार करुन तो बाजूला ठेवतात. दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी त्या अग्नीच्या दुसऱ्या भागावर संस्कार करतात. मग 'अहुरमज्द' महिन्याच्या प्रतिपदेपासून पुढे ८८ दिवस त्यावर मंत्रांनी संस्कार होतो.बाकीच्या पंधरा अग्नीवरही याप्रमाणेच सर्व सोपस्कार करतात. अग्नी शुध्द करायला ११२५ दिवस लागतात.अशा प्रकारे हे अग्नीहोत्र करतात. त्यातील शुध्द अग्नी

एक चांदीच्या अगर ब्राँझच्या पेल्यात ठेवून तो दगडी चबुतऱ्यावर ठेवतात. ज्या खोलीत हा अग्नी ठेवायचा असेल त्या खोलीत भिंतीवर एक तलवार व चोपदाराच्या दोन काठ्या व प्रत्येक कोपऱ्यात पितळी घंटा बांधतात. या अग्नीची पूजा पाच वेळा करावयाची असते. सध्या मात्र जास्तीत जास्त तीन वेळा करावे, ही प्रथा आहे. चारित्र्यसंपन्न पुरोहित तो अग्नी सतत प्रज्वलित ठेवतात. अग्नी विझणे हे ते अशुभ मानतात. आतश बेहरामवर पारश्यांची पूज्य भावना असते. त्यावर प्रकाश पडलेला त्यांना खपत नाही.

'पतेती' हा नूतन वर्षारंभाचा आधीचा दिवस होय. या दिवशी पश्चातापदर्शज प्रार्थना करतात.फरवर्दीन महिन्याचा पहिला दिवस हा पारसी नववर्षाचा पहिला दिवस म्हणून साजरा केला जातो. ऑगस्ट महिन्यात नववर्षाचा प्रारंभ होतो. या दिवशी पारसी लोक एकमेकांना नवीन वर्ष सुखाचे जावो. 'देरझिशाद बाद' असे म्हणून शुभेच्छा देतात. नवीन कपडे, अलंकार धारण करुन अग्नीची पूजा करतात. खोरदाद साल : पारसी लोकांचा धर्म झोराष्ट्रियन. धर्मसंस्थापक जराशुश्त्र यांचा जन्मदिवस म्हणून हा सण साजरा केला जातो.पारशी लोक प्रार्थना व अग्नीची पूजा करुन आपल्या धर्मसंस्थापकाचा वाढदिवस साजरा करतात. फरवर्दीन महिन्यातील सहावा दिवस हा 'खोरदाद साल' असतो. पावित्र्य, सौजन्य, नम्रता, साधेपणा, प्रामाणिकपणा आणि सत्य यांची शिकवण त्यांनी दिली. अग्नी हा देवांचा संदेश पृथ्वीवर पोहोचविणारा दूत आहे. त्यामुळे अग्नीची पूजा आणि उपासना केल्याने आपले सामर्थ्य वाढते, असे त्यांनी सांगितले. याशिवाय वर्षामध्ये सहा वेळा येणारे 'गाहमबार' सण म्हणून साजरे केले जातात. धर्मसंस्थापक जराशुश्त्र यांचा मृत्यदिनही साजरा केला जातो. पारशी धर्मात 'मुक्ताद' म्हणून दहा दिवस मृतात्म्यांचे स्मरण करण्याची प्रथा आहे.

पारशी धर्मात ७ ते १५ वर्षांच्या दरम्यान मुलाची आणि मुलीचीही मुंज केली जाते (यज्ञोपवीत) पांढऱ्या रंगाचा कॉटन मलमलचा सदरा त्यांना घालण्यात येतो. सदऱ्याच्या आतल्या बाजूस थोडे कापलेले असते, त्याला गिरेबाडी म्हणतात. रोज चांगल्या कर्माचे फळ त्यात भरावे अशी त्यामागची संकल्पना आहे. कोणत्याही डाग नसावा या हेतुने सदऱ्याचा रंग पांढरा ठेवण्यात आलेला आहे.'कुश्ती' म्हणजे 'धागा जो कंबरेला बांधण्यात येतो. शरीराचे एक संरक्षक कवच म्हणून त्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. अशा ह्या पारशी धर्माने दुधात साखर मिसळल्याने जशी गोडी वाढते त्या रितीने भारतीय समाजात मिसळून त्याची गोडी वाढवलेली आहे.

लता गुठे

तुमचे आमचे रामायण



प्रा. डॉ. लीला नारायण गोविलकर

पंढरपूरचा विठोबा हे अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहे. तसेच रामायण व महाभारत हे वाङमय भारतीय संस्कृतीची ओळख आहे. आजही त्यांची मराठी माणसाच्या मनावरची जबरदस्त मोहिनी ग.दि. माडगुळकरांच्या गीतरामायणाने सिद्ध केलेली अहे. जीवनाचा आदर्श उलगडून दाखविणारे रामायण हे केवळ भारताची वाङमयसंपदा आहे असे नाही.

आशिया खंडातील चीन, जपान, थाई, मलेशिया, सिंगापूर इत्यादी अनेक देशांमधून रामभक्तीची काव्यं भरभरून रचलेली दिसतात. त्यांच्या सांस्कृतिक जीवनावर त्यांचा लक्षात येण्यासारखा प्रभावही आहे. रामकथा जिथे जिथे पोहचली तिथे तिथे तिने जीवनाच्या आदर्शाचे बीजारोपण केले.

रामबंधू भरताची एकनिष्ठता हा आपण भारतीय नातेसंबंधातील एक महत्वाचा घटक मानतो. भावा भावामधील भरतभाव वाल्मिकींनी रचलेल्या रामायणापासूनचा आहे. तसे पाहिले तर आज हे वाल्मिकी ऋषींनी रचलेले रामायण फारच थोड्या व्यक्तींना परिचित असेल. पण वाल्मिकी रामायणाच्या पावलांवर पावले टाकत अनेकांनी रामकथा रचलेल्या आहेत..

१६ व्या शतकातील महाराष्ट्रातील एकनाथरचित 'भावार्थ रामायण' व त्याच काळातील अयोध्यापुरामधील गोस्वामी तुलदिसांचे 'रामचरित मानस' या दोन महान ग्रथांनी वाल्मिकीची रामकथा आपल्या काळापर्यंत परिचित करून दिली. वाल्मिकीच्या रामायणाला या दोघांनी रामभक्तीचे एक वेगळे रूप आणून दिले.रामायण हे त्याच्या गुणसामर्थ्याने लोकांच्या मनावर ठसलेले आहे. आपल्या काळातील सांस्कृतिक व राजकीय चाकोरीत रामाचे मानवीय व तरीही त्याच्या ठिकाणी असलेले दैवी व अवतारी सामर्थ्य याचे सुसंगत चित्र रेखाटले. तुळसीदासांच्या रामकथेच्या प्रत्येक कांडाच्या प्रारंभी रामाबरोबर सीतेचा उल्लेख आहे.

तुलसीदासांची ब्रजभाषा अतिशय गोड व रसाळ आहे. रामकथेचे कथानक सर्वांनाच परिचित आहे. पण तुलसीदासांच्या प्रसंगवर्णनात वाचकांच्या मनातील उत्कटता वाढती ठेवण्याचे कौशल्य त्यांच्या ठायी आहे.

श्रीरामचंद्र कृपालु भजु मन,हरण भव भय दारूणम...
भजु दीन बंधु दिनेस दानव दैत्य वंश निकंदनम।

हा त्यांचा रामकथा कथनाचा हेतू ते नादमधुर भाषेत सांगतात यावरून कथा कथनाची निवेदनशक्ती कळू शकते. कलियुगात पाप नाश करणारी नगरी म्हणजे अयोध्यापुरी, त्यांच्या कल्पनाविलासातून रामकथेचा गोडवा साखरेपेक्षाही गोड होत जातो.

तुलसीदासांचे 'रामचरित मानस' हे अशा रसाळ वाणीतून निवेदन करुन लोकांच्या मनात कायमचे स्थिरावले आणि एकनाथांच्या भावार्थ रामायणाने लोकांच्या भावार्थाला वळण

लावले. आज समाज आदर्शवादी होत आहे. माणूसकी जपावी लागत आहे. अशा काळात आदर्शाची वाट दाखविण्याचे कार्य या दोन्ही रामकथा अजूनही करत आहेत. निसर्गाचे वर्णन करतानांही त्यांच्या लेखनातील भक्तीयुक्त प्रबोधनाचा सूर हरवला जात नाही व राम हा देव अवतार असला तरी मनुष्यरुप धारण केल्यावर त्यासही प्रेम, विरह इत्यादी भावभावनांचा स्पर्श असतो हेही विसरत नाहीत. वर्षा ऋतुच्या काळात इतर प्रियकरांप्रमाणेच रामाच्या मनातील विरह भावनाही तुळसीदास खालील शब्दात लिहितात.

"नभ गरजत प्रिया बीन मन मोरा"

पावसाळ्यात अथांग पाण्यात जसे मासे सुखात (निर्धास्तपणे) वावरत राहतात, श्रीहरीला शरण गेल्याने आपणही अशाच मुक्तपणे संसारात वावरु शकतो. हा संदेश ते अनेक मार्गाने समाजाला परत परत देतात.

एकनाथांच्या भावार्थ रामायणाचा बाज खास मराठी आहे. कृतार्थ गृहस्थी जीवनाचा अनुभव घेत वारकरी संप्रदायात वावरणाऱ्या एकनाथांची लेखणी आयुष्याच्या उतारवयात रामकथेकडे वळली. हेतुपूर्वक त्यांनी रामाचा आदर्श समाजासमोर ठेवला. महाराष्ट्रात यवन सत्तेला जाब विचारणारा,शासन करणारा कोणीच उरला नाही, म्हणून त्यांचा नि:पात करुन पुनश्च या भूमीला पुण्यभूमीचे भाग्य प्राप्त करुन देण्याच्या समाजाच्या उत्कट तळमळीपोटी एकनांच्या 'भावार्थ रामायणाचा' अवतार झाला.

लोकांच्या मनात परकीय सत्तेबद्दल चीड उत्पन्न व्हावी असे अनेक बदल एकनाथांनी आपल्या रामायणात केले आहेत. मूळ रामायणातील राक्षसांना दाढ्या नाहीत, पण भावार्थ रामायणातील राक्षसांना दाढ्या आहेत. ते देवळे मठ यांची नासधूस करतात, गाई-म्हशी पळवून नेतात, स्त्रियांवर अन्याय करतात असे एकनाथकालीन अन्यायाचे चित्रण एकनाथ आपल्या रामायणात करतात. त्यांच्या रामकथेतील कौसल्या मातेचे डोहाळेही असेच रावणाचा नि:पात करण्याचे स्वप्न पाहणारे आहे. यामधून राम जन्माचा हेतू रावणवध हाच आहे हेच ते सुचवितात.

भावार्थ रामायणाची निवारण शैलीही खास मराठी भाषेचे सामर्थ्य दर्शविणारी आहे. त्यांच्या काळात संस्कृत जाणणारा पंडितवर्गही प्राकृतमध्ये लेखन करु लागला होता.

श्रीरामाच्या मंदिरापर्यंत जाण्याच्या दालनांचे वर्णनही असे अध्यात्माची वाटचाल करीत जाणारे आहे. त्यांची ही रचना समाजापर्यंत पोहोचविणाऱ्या कीर्तनकारांना ते सादर करायला आवडणारे आहे. त्यामुळे जीवनातील बारीक सारीक गोष्टीतही राम रुप कसे दडलेले आहे याचा ठसा ते लोकांच्या मनावर ठसवित असत. एक प्रकारे, साहित्यिक वर्गासमोरही त्यांनी लेखनाचा आदर्श-नमुना कसा असावा याचा नमुना ठेवला आहे.

तुलसीदासांचे 'रामचरितमानस' हे अशा रसाळ वाणीतून निवेदन करुन लोकमानसात कायमचे स्थिरावले आणि एकनाथांच्या भावार्थ रामायणाने लोकांच्या भावार्थाला वळण लावले. आज समाज आदर्शवादी होत आहे, माणूसकी जपावी लागत आहे. अशा काळात आदर्शाची वाट दाखविण्याचे कार्य या दोन्ही रामकथा अजूनही करु पाहात आहेत.या संस्कृत प्रेमी पंडित वर्गातील लेखकांना संस्कृतमधील सवय होती. त्यांपैकी रुपक या अलंकारावरतीच मराठी साज चढवून एकनाथांनी रुपकाला आध्यात्मिकतेचा रंग चढविला. भावार्थ रामायणाचे कोणतेही पान

उघडून पाहिले तरी त्यामध्ये अशी आध्यात्मिक रुपकाची उदाहरणे कितीतरी सापडतात.साध्या स्वयंपाकघरातील खाद्यपदार्थांच्या वर्णनातही त्यांचे रुपक अध्यात्म आणते. हे खालील उदाहरणावरुन लक्षात येईल.

वैराग्य कढे कढविली कढी । ती मागी माया मुरबडी ।
विरोनी स्वाद आली गाढी । तिची गोडी राम जाणे ।।

बाळकांडात तर उत्पत्ती, स्थिती व संहार करणारी, क्लेशहरण करणारी प्रकरणे आहेत. श्रीरामचंद्रजींची प्रियतमा सीताजी असाही उल्लेख तुळसीदासांनी केला आहे. अयोध्याकांडाच्या मंगल चरणात तर सीतामाईंचा उल्लेख ते करतात.श्रीरामांनी एक पत्नीव्रत स्विकारलेले पण दशरथाच्या मात्र तीन सहधर्मचारीणी आहेत. त्यांचे गुणवर्णन करतांना एकनाथांनी सहजपणे श्रीराम माता कौसलेचे आदर्श पत्नी व आदर्श माता असे दुहेरी चित्र रेखाटले आहे. ते भावार्थ रामायणात म्हणतात.

कौसल्या ते धर्मपत्नी । सुमित्रा वरिष्ठ साधु म्हणोनि ।।
कैकयी वरिष्ठ सुंदर म्हणोनि । रूपें यौवनी गर्विष्ठ ।।

अशा व्यक्तिरेखांच्या चौकटीत रामाची संसार कथा अचानक अधिक जवळ सरकते.भावार्थ रामायणांनी माणसाला वेड लावले तर 'राम चरित मानस'नी भारताला मोहिनी घातली. आजही ही काव्ये पारायणाच्या मार्गाने समाजाला मार्गदर्शन करतात. पवित्र ग्रंथ माणसाच्या जीवनातील संकटांशी सामना करण्याचे सामर्थ्य देतात .हे ग्रंथ त्यांच्या पारायणातून माणसाच्या वैयक्तिक जीवनात येतात

गोस्वामी तुळसीदासांचे 'रामचरितमानस'

ब्रज भाषेत आहे. तर एकनाथांचे 'भावार्थ रामायण' मराठीत आहे. या दोन्ही रामकथांचा कालखंडही एकच आहे.सोळावे शतक याच कालखंडात यवनी सैनिकांनी भारतात धुमाकुळ घातला होता.भारतीयांच्या हातात ना शस्त्र, ना सत्ता, सत्ताधीशांनी भारतीय राजसत्तेला गुलाम बनविले होते व जनतेतील बुद्धीजीवी वर्गाला लाचार व मिंधे करून ठेवले होते. जे मिंधे होत नव्हते. त्यांच्यावर शस्त्र उचलले जात असे. समाजात निर्माण झालेल्या या दहशतीच्या वातावरणासमोर टिकायचे असेल तर आपले आत्मबल जतन करणे हेच आपल्या हातात होते. या दोन्ही ग्रंथांनी तेच कार्य केले आणि यवनी सत्तेचा भारतीयांच्या धर्मावर असलेले आघात परतवून लावूना विश्वास लोकांच्या मनात निर्माण केला.

भारतीय समाजात कुटुंब हा एक महत्वपूर्ण घटक आहे. जन्माला येणारे बालक हे कुटुंबातील नाती जोडत जन्म घेत असते.अशा नात्यांच्या गुंफणीत लहानाचे मोठे होतांना नाती जपत कसे जगायचे याचेही भान येऊ लागते. तुलसीदासांच्या रामकथेत प्रथमदर्शनी तरी या नात्यांमधील भावबंधाचे हळूवारपणे चित्रण केलेले लक्षात येते. स्वतः तुळसीदासजी बालपणापासूनच या बाबतीत कमनशीबी आहेत. बालपणीचे प्रतिकूल जीवन आई वडिलांच्या प्रेमळ छत्राचा न मिळालेला आधार व तरूण वयात मनातील प्रेमभावनेचा पत्नीकडून अनवधानाने झालेला अव्हेर. यामुळे ते विरक्तीकडे वळले, स्वतः संन्यास जीवन स्वीकारून जगाच्या संसारासाठी त्यांनी श्री रामकथेतील विविध नाती, आदर्श म्हणून रेखाटली. त्यातलाच एक प्रसंग भरताच्या मनातील बंधुप्रेम व्यक्त करणारा प्रसंग रेखाटला आहे.

कैकेयीच्या मागणीनुसार राम वनवासाला जातो बरोबर सीता व लक्ष्मणही आहेत. त्यांना नदीपार घेऊन जाणारा निषाद राजा गुहक हा रामाचा एकनिष्ठ भक्त आहे. त्यांच्या राज्यात राम पोहोचलेले असतांना गुहकाला रामाचा पाठलाग करीत येणारे भरतादी नातेवाईक दिसतात.त्यांच्या बरोबर सैन्य आहे.म्हणून गुहकाच्या मनात पाल चुकचुकते व तो आपल्या सहकाऱ्यांना भरताशी युद्ध करण्यासाठी सज्ज राहण्याचा इशारा करतो.

पण पुढे होऊन वरिष्ठ मुनी जेव्हा भरताला हा निषद राजा, श्रीरामाचा मित्र आहे अशी ओळख करून देतात. तेव्हा भरत स्वतः रथावरून खाली उतरून त्याला आलिंगन देतो. तेव्हा निषादराजाला भरताच्या मनातील बंधुप्रेमाची उत्कटता जाणवते.

जाता जाता तुळसीदास आणखी एका गोष्टींकडे या प्रसंगी लक्ष वेधतात. ते निषादराजाच्या मनातील भावदर्शन निषदराजाला मनात वाटते, माझी जात पात कोणती हे लक्षात न घेता मला आलिंगन देणारा भरत मनुष्य म्हणूनही किती थोर आहे. कारण जाती जमाती मधील कुंपणे तोडल्याशिवाय हा भारतीय समाज खऱ्या अर्थाने एकत्र येऊ शकणार नाही हे मर्म तुळसीदासांनी लक्षात घेतले.

प्रा. डॉ. लीला नारायण गोविलकर
'व्यंकटेश', प्रोफेसर कॉलनी,
सावेडी रोड, अहमदनगर
भ्रमणध्वनी - ९४२२०८३६०२

बायबल
देवमानवाच्या प्रीतीची गाथा

फादर फ्रान्सिस दिब्रिटो

धर्म आणि संस्कृती ह्यांचे अनन्य साधारण नाते आहे. जगात धर्मविहीन अशी संस्कृती झालेली नाही. संस्कृतीच्या प्रांगणात धर्माचे वृक्ष बहरलेले आहेत. संस्कृतीचे संचित धर्मग्रंथात शब्दबध्द केलेले आहे. बायबल या महाग्रंथात ज्यू आणि ख्रिस्ती तत्वे धर्माची अंर्तभूत केलेली आहे.

बायबल ह्या शब्दाचा अर्थ 'ग्रंथसंग्रह' आहे. 'ता बिब्लिया' (Ta biblea) ह्या मूळ ग्रीक शब्दावरुन बायबल हा इंग्रजी शब्द प्रचारात आला आहे. 'ता बिब्लिया' म्हणजे अनेक लहान-मोठ्या पुस्तकांचा संग्रह. ही पुस्तके एकटाका किंवा एकहाती लिहिली गेलेली नाहीत, तर ख्रिस्तपूर्व १३०० ते इसवी सन १०० ह्या साधारण चौदाशे वर्षाच्या कालावधीत निरनिराळ्या साक्षात्कारी लेखकांनी लिहिलेल्या, संपादित आणि संग्रहित केलेल्या, विविध साहित्यप्रकारात मोडणाऱ्या, अनेक विषय असलेल्या पुस्तकांचे हे ग्रंथालयच आहे.

बायबलची निर्मिती क्रमाक्रमाने होत गेली आहे. ज्यू किंवा इस्त्रायली लोक इ.स. पू. १५००-१२५० या काळात इजिप्तमध्ये बंदिवासात होते. राष्ट्रपुरुष मोझेस ह्याच्या नेतृत्वाखाली देवाने त्यांना बाहेर काढले. प्रवासात असताना देवाने मोझेसकरवी त्यांना दहा आज्ञा व अन्य नियम दिले. जेनेसिस (उत्पत्ती) एग्झडस (निर्गम), लेविटिकस (लेवीय), नंबर्स (गणना) आणि ड्युटरोनॉमी (अनुवाद) असे ते पंचग्रंथ होते. 'तोराह' या नावाने तो ग्रंथ ओळखला जातो. धर्मशास्त्रात इस्त्राएलच्या कुलपुरुषांचा इतिहास तसेच त्यांच्या धार्मिक व सामाजिक जीवनासंबंधी नियमांचा अंतर्भाव आहे. पंचग्रंथाला पुढे ज्ञानविषयक साहित्याची व संदेष्ट्यांच्या लेखनाची जोड मिळाली. हा सर्व भाग हिब्रू बायबल म्हणून ओळखला जातो. (ख्रिस्ती लोक त्याला 'जुना करार' म्हणतात.)

प्रभू येशू ख्रिस्ताचा जन्म इ.स.४ ते ६ या दरम्यान झाला. वयाच्या तिसाव्या वर्षी प्रभूंनी आपल्या कार्याला प्रारंभ केला. तीन वर्षे कार्य केल्यानंतर, प्रभूंना बलिदान करावे लागले. त्यानंतर त्यांचे पुनरुत्थान झाले. पुनरुत्थानाच्या अनुभवानंतर येशूचे शिष्य प्रचार करु लागले. इ.स.३० ते ५० याकाळात प्रेषित मौखिकरित्या ख्रिस्ताच्या विचारांचा प्रचार करीत होते. इ.स.४९ साली जेरुसलेमची प्रसिध्द धर्मसभा झाली आणि बिगर ज्यूंसाठी ख्रिस्ती धर्माचे दरवाजे उघडले गेले. पॅलेस्टाइनच्या सीमा ओलांडून ख्रिस्ती धर्म पश्चिम आशिया, ग्रीस, रोमपर्यंत पसरत गेला. दूरस्थ नवख्रिस्ती लोकांना येशूची शिकवण लेखी रुपात देणे आवश्यक झाले. सुरुवातीला पॉलने पत्रे लिहून ती गरज भागवली.

हळूहळू प्रेषितही काळाच्या पडद्याआड जाऊ लागले. त्यामुळे येशूची शिकवण आणि आठवणी ह्यांचे लेखी संग्रह तयार होऊ लागले. उपलब्ध संग्रहातून साहित्याची निवड करुन चार शुभवर्तमानकारांनी आपली शुभवर्तमाने रचली. तसेच पाखंडी

मतांचा प्रतिवाद करण्यासाठी विपुल प्रमाणात लेखन झाले. ज्या लेखनाचे किंवा लेखनस्त्रोतांचे नाते प्रेषितांबरोबर व त्यांच्या गोतावळ्याबरोबर होते, ते अस्सल म्हणून स्वीकारण्यात आले. ज्यांचे असे नाते नव्हते, ते बाजूला सारण्यात आले. अशा प्रकारे नव्या कराराची जडणघडण झाली. नव्या करारात चार शुभवर्तमाने, प्रेषितांच्या कार्याचा अहवाल, प्रेषितांनी विविध नवख्रिस्ती लोकांना लिहिलेली पत्रे व शेवटी प्रकटीकरण अशा एकून २७ लहानमोठ्या पुस्तकांचा समावेश आहे.

जुन्या कराराची जी संहिता ख्रिस्ती लोकांकडे आपला पूर्व धार्मिक ठेवा म्हणून चालून आली होती त्याच्यात ६६ पुस्तकांचा समावेश आहे. मात्र कॅथलिक बायबलमध्ये आणखीन ७ पुस्तकांचा समावेश असून त्यात एकुण ७३ पुस्तकांचा अंर्तभाव आहे. काही प्रॉटेस्टंट बायबलमध्ये ही ७ जादा पुस्तके परिशिष्टात प्रसिध्द केलेली आढळतील.

नव्या करारातील २७ पुस्तकांबद्दल कॅथलिक, प्रॉटेस्टंट आणि ऑर्थोडॉक्स पंथाचे अनुयायी ह्यांच्यात एकमत आहे. ख्रिस्त्री धर्माचा उदय झाला तेव्हा ज्यू समाजात मोझेसचे धर्मशास्त्र, संदेष्टयांचे लेखन आणि अन्य धार्मिक साहित्य (Wisdom writing) प्रचलित होते. ख्रिस्ती लोकांसाठी ते पवित्र ग्रंथ होते. प्रारंभीच्या ख्रिस्ती पंडितांनी त्यांची संख्या ३९ ठरवली, हे वर आलेच आहे. मात्र ते त्यांना 'जुना करार' म्हणत नव्हते, कारण तेव्हा नव्या कराराच्या पुस्तकांचे लेखन, संपादन आणि संकलन पूर्ण झाले नव्हते. ते काम चौथ्या शतकापर्यंत पार पाडले. त्यानंतर ज्यूंची धार्मिक पुस्तके 'जुना करार' म्हणून ओळखली जाऊ लागली. ख्रिश्चनांनी आपल्या धर्मग्रंथात ज्यांच्या धार्मिक पुस्तकांचा समावेश केला. मात्र ज्यूंनी ख्रिश्चनांच्या पुस्तकांचा स्वीकार केला नाही. असो

बायबलचे सौंदर्य

साहित्य हे मोठ्या प्रमाणात ललितरम्य असते, काल्पनिक असते, (Much of literature is fiction) असे म्हटले जाते. बायबलमधील काही भाग ललित साहित्यात मोडतो. उदा. विश्वनिर्मिती आणि मानवनिर्मितीच्या कथा हजारो वर्षे प्रचारात असून त्यांची अवीट गोडी कमी झालेली नाही.

मोझेस आणि डेव्हिड ह्यांच्या जीवनकथा म्हणजे महाकादंबरीचे विषय आहेत.

"मऊ मेणाहुनि आम्ही विष्णुदास कठिण वज्रास भेदू ऐसे" असे मोझेसचे व्यक्तिमत्त्व होते. नेतृत्व ही अनेकदा सुळावरची पोळी असते, ह्याचा अनुभव मोझेसला आला. त्याची पाठची बहीण मिरियम हिनेही त्याच्या नेतृत्वाला आव्हान दिले, तरी त्याच्या अंतःकरणातील बहिणीविषयीची माया कमी झाली नाही. बहीणभावांतील हा संघर्ष हृदयाला चटका लावणारा आहे. चाळीस वर्षे अरण्यात भटकंती करुन मोझेस वतनभूमीच्या वेशीजवळ आला परंतु त्या भूमीत प्रवेश करण्याचे भाग्य त्याला लाभले नाही. कारण त्याच्या हातून आज्ञाभंगाचा शुल्लक वाटणारा प्रमाद घडला होता! त्या प्रसंगाचे वर्णन वाचताना आपल्याही मनाला चुटपूट लागते.डेव्हिडची कथा तर अतिशय रोमहर्षक आहे. पराक्रम, शौर्य, मुत्सद्दीपणा,भक्तिभाव, देवावरील अढळ श्रध्दा, बाहेरख्यालीपणा, पापाबद्दल पश्चात्ताप, पुत्राकडून झालेला विश्वासघात, पुत्रशोक, मित्रप्रेम, संगीतसाधना अशा अनेकविध पैलूंनी त्याची जीवनकथा रंगवली गेली आहे.

दुःखभोग ही मानवी जीवनातील एक प्रत्ययकारी अनुभूती आहे. निष्पाप माणसाच्या वाट्याला दुर्दैवाचे दशावतार का येतात, हे न सुटणारे एक कोडे आहे. त्या कोड्याची उकल करण्याचा प्रयत्न 'जोब' ह्या काव्यात केला गेला आहे. या पुस्तकात देवाच्या तोंडी घातलेले संवाद हे अभिजात साहित्याचे अप्रतिम नमुने आहेत.

बायबलमधील स्त्रोतांत मानवी आत्म्याची स्पंदने उमटली आहेत. ते भक्ताच्या अंतरीचे आर्त धावे आहेत.

बेचाळीसाव्या स्तोत्रात डेव्हिडने म्हटले आहे,

''हरिणी जशी पाण्याच्या प्रवाहासाठी

लुलपते तसा हे देवा,
माझा जीव तुझ्यासाठी लुलपत आहे.
माझा जीव देवासाठी,
जिवंत देवासाठी तान्हेला झाला आहे.
मी केव्हा देवासमोर येऊन
त्याचे दर्शन घेईन ? ”
(जुना करार, स्त्रोत संहिता, ४२:१-२)

माणसाला देवाचे पिसे लागलेले आहे. शाश्वत काळापासून माणूस चिरंतनाचा शोध घेत आहे. संत आगस्ती या महान पंडिताने म्हटलेले आहे, "Almighty God, you have made us for yourself, and you".

देवाच्या सर्वसाक्षित्वाचा अनेक संतांना साक्षात्कार झालेला असतो. स्तोत्रकाराला तसाच अनुभव आला होता. तो म्हणतो,

‘‘ हे देवा, तू मला पारखिले आहेस,
तू मला ओळखतोस.
माझे बसणे व उठणे तू जाणतोस,
तू दूरुन माझे मनोगत समजतोस....
तू मागून पुढून मला वेढिले आहेस
माझ्यावर तू आपला हात ठेविला आहेस...
मी तुझ्या आत्म्यापासून कुठे निघून जाऊ ?
मी तुझ्या समक्षतेपासून कोठे पळून जाऊ ?
मी वर आकाशात चढलो, तरी तेथे तू आहेस,
अधोलोकी मी आपले अंथरुण केले,
तरी तेथे तू आहेस.
मी पहाटेचे पंख धारण करुन समुद्राच्या

अगदी पलीकडल्या तीरावर जाऊन राहिलो,
तरी तेथेही तुझा हात मला चालवील....
(जुना करार, स्तोत्र संहिता १३९)

“चालविली हाती धरोनिया”ही संतांना जाणवणारी अनुभुती आहे. त्याची अनेक उदाहरणे बायबलच्या पानापानावर विखुरलेली आढळतात.

बायबलमध्ये इतिहास, भूगोल, प्राक्तकथा, भक्तिकाव्य, कोडी, सुविचार, ललित कथा, दृष्टांत कथा, विलापगीत, शृंगारगीतं ह्यांची रेलचेल झालेली आहे. ‘गीतरत्न’ हे बायबलमधील जगप्रसिध्द असे प्रेमगीत आहे. त्याची एक झलक.

आपल्या प्रेयसीचे वर्णन करताना विह्वळ प्रेमी उद्‍गरतो,

‘‘अगे, स्वप्नसुंदरी, राणी
माझे लाडके साजणी,
बुरख्याआडून करतात इशारे
तुझ्या नयनांचे लबाड तारे
तुझा केशसंभार जसा
पठारावरुन उतरणारा शेरडांचा कळप
जोडीजोडीने चालणाऱ्या शुभ्र रेषांगत
तुझ्या सलग दंतपक्ती
लवलवते तुझे लालस ओठ
गुलाबी गाल तुझे, जशी फुटलेली डाळिंबे.
तुझी गोलाकार गुळगुळीत मान
जशी डेव्हिडने बांधलेली कमान
तुझे उन्नत उरोजद्वय
जशी लिलीपुष्पांमध्ये चरणारी
पाडसांची गोंडस जोडी.”

तर त्याचे वर्णन करताना, तिला शब्द अपुरे पडतात. ती म्हणते,

गौरकांती वल्लभ माझा
लाखामध्ये शोभतो मोहरा
शिर त्याचे शुध्द सोन्याची खाण
झुलपे त्याची काजळकाळी छान
नयनद्वय त्याचे दुधात डुंबणारे
ओढ्यावरचे होले जसे
ओठांतून स्त्रवतो गंधरस मधूर

गालांवरती फुलली सुंदर सुमने
हात त्याचे जसे रत्नजडित स्तंभ
उदर नीलमण्यांचा हस्तिदंती कुंभ
पद शोभती सुवर्णाचे खांब
बांधा जसा डोलदार डोंगर
जिवणीवरुन पाझरे अमृताची धार
माझ्या सख्यांनो,
असा माझा साजण सुंदर. ”

बायबलमध्ये व्यवहारोपयोगी सुवचनांचा मोठा खजीना आहे. उदा.

जो खड्डा खणतो, तो त्यात पडतो.
जो कुंपण मोडतो, त्याला सर्प डसतो.
जो धोंडे फोडतो, तो जखमी होतो.
जो लाकडे तोडतो, तो धोक्यात येतो.

इस्त्राएलमध्ये Prophet नावाची मंडळी होती. त्यांच्यासाठी संदेष्टा हा शब्द वापरलेला आहे. कर्मकांडाच्या अतिरेकापासून समाजाला दूर ठेवणे, परमेश्वराचा संदेश निर्भिडपणे कथन करणे, धर्मसत्तेवर आणि राजसत्तेवर अंकुश ठेवणे हे त्यांचे कार्य होते. त्याची किंमतही त्यांना मोजावी लागली.

संदेष्टा इजिकिएल, आयजया हे कवी -हृदयाचे होते. उत्कृष्ट हिब्रू काव्याचे दर्शन त्यांच्या लेखनातून घडते. देवाच्या सामर्थ्याचे वर्णन करतांना संदेष्टा आयजया म्हणतो,

‘‘कोणी मोजमाप केले आहे जगातील जलाचे ?
कोणी घेतले आहे माप आपल्या वितीने आकाशाचे ?
कोणी मोजले आहे पृथ्वीवरील धूळमाती ?
कोणी तोलल्या आहेत टेकड्या नि पर्वतराजी ?
कोणी केले आहे नियमन देवाच्या आत्मायचे ?
कोण देतो त्याला सल्ला त्याचा बनून मंत्री ?
कोणाशी करतो सर्वसमर्थ सल्लामसलत ?
कोणी दिले आहेत त्याला पाठ नीतिमत्तेचे ?
कोणी दिले आहेत त्याला धडे विद्येचे ?
कोणी दाखवली आहे त्याला वाट सुज्ञतेची ? ”

(आयजया ४०:१२-१४)

मृत्यू ही अतिशय शोकदायक तितकीच रहस्यमय बाब आहे. कसा असेल तो मृत्यूचा दिवस आणि ती अखेरची घटका ? असा प्रश्न सर्वांना पडतो. मृत्यूच्या घटकेचे वर्णन करताना उपदेशक सूत्रांच्या लेखकाच्या प्रतिभेला नवनवे धुमारे फुटतात. तो सांगतो.:-

‘‘त्या वेळी सूर्य आणि प्रकाश, चंद्र आणि तारे अंधुक होतील,
पावसानंतर आकाशात पुन्हा अभ्रांची दाटी होईल.
त्यावेळी घराचे रखवालदार थरथर कापतील.
बळकट पुरुष वाकतील.
दळणाऱ्या बाया मोजक्याच उरल्यामुळे त्यांचे काम थंडावेल.
खिडक्यातून पाहणाऱ्या आंधळ्या होतील,
जात्याची घरघर मंदावली म्हणजे वेशीची दारे बंद होतील,
पाखराच्या सुरांनी त्यांना जाग येईल.
पक्ष्यांचा किलबिलाट शांत होईल.
माणसाला चढावाची भीती वाटू लागेल,
रस्ता धोक्यांनी भरला आहे, असा त्याला भास होईल.
बदाम फुलेल, टोळही जड वाटेल, वासना निमेल,
कारण मनुष्य आपल्या अनंतकालीन निजधामास निघाला आहे.
मग विलाप करणारे रस्त्यात दाटी करतील.
जोपर्यंत रुप्याची तार तुटली नाही
सोन्याचा कटोरा फुलला नाही
झऱ्याजवळचा घडा भंगला नाही
आडावरचा रहाट मोडला नाही
तोपर्यंत तू आपल्या निर्माण कर्त्याला आठव,
मग माती पूर्ववत मातीला मिळेल आणि देवाने दिलेला श्वास त्याच्याकडे परत जाईल.
व्यर्थ हो व्यर्थ! उपदेशक म्हणतो, सर्व काही व्यर्थ ”

शाश्वत आणि नश्वर, चिरंतनत्व आणि मृण्मयता ह्यांचं मिश्रण आहे माणूस. वाटतो तो नष्ट होतो, त्याची होते चिमूटभर राख किंवा माती. जे दृश्य आहे ते विलयाला जाते, परंतु त्याच्यात जे अमर आहे ते अनंताकडे निघून जाते.

नवा करार

नवा करार ग्रीक भाषेत लिहिला गेला असून इसवी सनाच्या पहिल्या शतकाच्या उत्तरार्धात त्याचे लेखन पूर्ण झाले. येशूच्या शिकवणीचा तो जसा अनमोल ठेवा आहे, तसेच भाषेच्या सौंदर्याचे

ते एक अभिजात लेणे आहे. उपदेश करताना येशूने दृष्टांत कथा सांगितल्या, मोजक्याच शब्दात फार मोठा आशय ह्या कथात सामावलेला आहे. उधळया पुत्राची गोष्ट (The prodigal Son) ह्या कथेने जागतिक साहित्यात वरचे स्थान पटकावले आहे. एका तरुण मुलाला वाटणारे भोगवादाचे आकर्षण, त्याचे घर सोडून जाणे, त्यातून त्याला आलेले रितेपण, त्याच्या मनाला लागलेली रुखरुख, एकटेपणा, अपराधीपणाची भावना, त्याचे स्वगृही परतणे, पुत्रत्वाच्या वियोगाने विव्हळणारे पितृहृदय, पुत्राचे अनपेक्षित आगमन, पित्याने त्याचे केलेले स्वागत, त्याचबरोबर थोरल्या भावाचे विचित्र वर्तन या सर्व गोष्टींचा कलात्मक आढावा संत लूकने २९२ (ग्रीक) शब्दांत घेतला आहे.

प्रभू येशूची प्रवचन करण्याची शैली लोकविलक्षण होती, सूत्रमय वाक्ये वाचकांच्या सहज ध्यानात राहतात, ह्याची जाणीव प्रभू ख्रिस्तांना होती. 'पर्वतावरील प्रवचन' ही येशूची शिकवण जगमान्यता पावली आहे. गांधीजीना ती खूप प्रिय होती. त्या प्रवचनातील काही महावाक्ये:

''जे वृत्तीने दीन, ते किती धन्य, कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे. जे शोकाकुल, ते किती धन्य। कारण त्यांचे सांत्वन करण्यात येईल.जे लीन, ते किती धन्य। कारण ते भूमीचे धनी होतील.

जे न्यायनीतीचे भुकेले आणि तहानलेले, ते किती धन्य। कारण ते समाधान पावतील.जे दयाळू, ते किती धन्य। कारण त्यांच्यावर दया केली जाईल.जे अंतरी निर्मळ, ते किती धन्य। कारण त्यांना देवाचे दर्शन घडेल. जे शांतीसमेट करतात, ते किती धन्य। कारण त्यांना देवाची मुले म्हणतील.सद्‌प्रवृत्तीने वागल्यामुळे ज्यांचा छळ होतो, ते किती धन्य। कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे.

बायबलचे सौंदर्य हे त्याच्या साधेपणात दडलेले आहे. कधीकधी एकेका वाक्यात जीवनाचे सार सामावलेले असते. व्यभिचार करताना पकडलेल्या अभागिनीवर दगडमार करण्यासाठी उतावीळ झालेल्या जमावाला ख्रिस्ताने सांगितले,

''ज्याने आजपर्यंत पाप केले नाही, त्याने तिच्यावर पहिला दगड मारावा '' हे वाक्य अजूनही मानवतेच्या कानी घुमत आहे. क्रूसावर असताना प्रभुंनी आपल्या शत्रूंना क्षमादान देताना म्हटले,

''हे पित्या, त्यांना क्षमा कर कारण ते काय करतात, तेच त्यांना ठाऊक नाही.'' ह्या एका वाक्याने मानवी इतिहासाला कलाटणी दिली आहे. कविश्रेष्ठ कुसुमाग्रज म्हणतात,

''हेच ते वाक्य, जे चिरंतन काळासाठी आभाळावर कोरले गेलेले आहे.'' मानवी जीवनाला दिशा देणारे असे कितीतरी प्रसंग आणि वचने बायबलच्या पानांपानांवर विखुरलेली आहेत.

'प्रीतीस नको तख्त, प्रीतीस नको ताजमहाल, वृथा खंत कशाला ? '' असा प्रश्न कवीनी विचारला आहे. संत पॉल हा प्रभू येशूचा परमशिष्य, वाल्याचा वाल्मिकी झालेला. त्याला निरपेक्ष प्रीतीचा साक्षात्कार झाला आणि त्याने प्रीतीचे स्त्रोत रचले. तो म्हणतो,

''मी माणसांच्या आणि देवदूतांच्या भाषेत बोलण्यात पारंगत असलो, पण माझ्या अंतःकरणात प्रीती नसली, तर मी ठणठणणारी थाळी आणि झणझणणारी झांज असा आहे. मला दैवी संदेश देण्याचे सामर्थ्य प्राप्त झालेले असले, मला सर्व गूढतत्त्वे उकलता आली, मी सर्व विद्या सपादन केल्या आणि डोंगर ढवळता येतील इतका माझा विश्वास दृढ असला, पण माझ्या हृदयात प्रीती नसली, तर मी शून्यवत आहे. मी माझ्या सर्वस्वाचे दान केले आणि माझे शरीर जाळण्यासाठी दिले, पण माझ्यामध्ये प्रीति नसली, तर मला काहीच लाभ नाही.

प्रीती सहनशील आहे, परोपकारी आहे, प्रीती हेवादावा करीत नाही, फुशारकी मरत नाही. प्रीती गर्वाने फुगत नाही, अयोग्य प्रकारे वागत नाही. ती स्वार्थात गुंतून पडत नाही. रागावत नाही. प्रीती अपकाराचे ओझे बाळगीत नाही, अनीतीत आनंद मानीत नाही, तर सत्याबद्दल आनंद मानते. ती सर्व काही सहन करते, सर्व काही खरे मानण्यास सिध्द असते. सर्वा विषयी आशा बाळगते, ती कधी धीर सोडत नाही.

बायबल : एक आर्षग्रंथ

पाशात्य संस्कृतीची पाळेमुळे बायबलच्या शिकवणीत खोलवर रुजली आहेत. जॉन गटेपासून डान्टे ॲलिगरीपर्यंत, विल्यम, शेक्सपियरपासून काऊंट लियो टॉलस्टॉयपर्यंत, बाथ-बिथोवनपासून मोझार्ट-हँडेलपर्यंत, मायकल अँजेलोपासून पाब्लो पिकासोपर्यंत, अँटिओखच्या इग्नेशियपासून इंग्लडंच्या थॉमस मोरपर्यंत, संत अगस्तीपासून पाबलो कोएल्लोपर्यंत, पहिल्या शतकातील प्रिसिल्लापासून विसाव्या शतकातील एडिथ स्टाईनपर्यंत शकडो लेखक, कवी, कलाकार, संगीतकार, चित्रकार, तत्त्वज्ञ, विचारवंत आणि संत ह्यांचा पिंड बायबलवर पोसला गेला आहे. सृजनशील प्रतिभावंतांची बायबलमधून प्रेरणा

घेऊन संगीत, चित्र, स्थापत्य, काष्ठशिल्प, साहित्य, अध्यात्म ह्यांची दालने समृध्द केली आहेत. आज पाश्चिमात्य समाज मोठ्या प्रमाणावर इहवादी होत आहे. तरीदेखील त्यांच्या सांस्कृतिक जीवनातील बायबलचे स्थान अढळ आहे. बायबलच्या नवनव्या आवृत्या आणि भाषांतरे मोठ्या प्रमाणात प्रसिध्द होत आहेत. थोडक्यात एमिली डिकिन्सन ह्यांनी म्हटल्याप्रमाणे,

The bible is and artiaque Volume
Written b y faded men...
\At thre suggestgion of Holy Spectres...
Had But the Table a Warbling Teller....
all th4e Boys would come
Orpheus sermon captivated
orpheus sermon captivated
it did not condemn.

बायबल आहे एक आर्ष ग्रंथ,
दैवी चैतन्यशक्तीच्या सुचनेनुसार
पुरातन मानवाने लिहिलेला....
ही कथा सांगायला कुणी गोड गळ्याचा असेल शाहीर.
तर येतील सारे ऐकायला....
ऑर्फेयसचे प्रवचन-संगीत मनोवेधी असे

कुणाचा धिक्कार बसत नव्हता त्यात.
(एमिली डिक्रिन्सन् - निवडक कविता, अनुवादः मधुकार नाईक, पृ. १३२)

फादर फ्रान्सिस दिब्रिटो
francisd43@gmail.com
संत थॉमस चर्च, सांडोर,
वसई (प) ४०१ २०१



दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !

'दिवाळी म्हणजे चैतन्याचा प्रकाश
दिवाळी म्हणजे सुखाचे आकाश
दिवाळी म्हणजे स्वप्नांची रांगोळी
दिवाळी म्हणजे ईश्वराचा सहवास'



श्रीमद्भगवतगीता आणि आजचे युग

अजित आचार्य

भारतीय तत्वज्ञानाचा आरंभ ऋग्वेदकाली काही प्रमाणात झाला. पुढे ते तत्वज्ञान द्वैत, अद्वैत इ. परस्पर विरोधी विचार प्रणालीमधून वृध्दिंगत होत गेले व शेवटी मध्ययुगीन काली त्याची परिणती अनुभूतिशास्त्रात झाली. उपनिषदकालीन व पुढे सर्वच भारतीय तत्त्वज्ञानविषयक विचारांवर या अनुभुतिशास्त्राचा अधिक प्रभाव पडू लागला. त्यामुळे मध्ययुगातल्या साधुसंतानी स्वर्गातला परमार्थ पृथ्वीवर आणला, हा ऋग्वेदकाळी व मध्ययुगातील अनुभूतीशास्त्रातील मुख्य भेद आहे.

एखाद्या खाजगी मालमत्तेप्रमाणे आध्यात्मिक अनुभव काही निवडक लोकांच्याच ताब्यात न राहता तो सर्वांच्या मालकीचा व्हावयाचा झाल्यास, त्यास आणखी एका अवस्थेतून जाणे जरुर असते. मधली अवस्था म्हणजे सार्वजनिक नैतिक जागृती व कर्तव्यनिष्ठा होय. ही निरपेक्ष कर्तव्यनिष्ठा केवळ तात्विक विचार व सामान्य लोकात अनुभूतीचा प्रसार या दोन्ही गोष्टीशी विसंगत नाही, हे पटवून देण्याचे अत्यंत महत्त्वाचे व कठीण काम ‘श्रीमद्‌भगवद्‌गीते’ने केले. ‘कर्तव्यासाठीच कर्तव्य करावे’ असा भगवद्‌गीतेचा आग्रह आहे. हे नैतिक तत्त्व म्हणजे भगवद्‌गीतेतील विविध तत्त्वांना एकत्रित करणारे सुत्रच होय.

भगवद्‌गीतेच्या दुसऱ्या अध्यायात आत्मा अमर असल्याचे प्रतिपादले आहे, तर पाचव्या अध्यायात सुसमाहित मनाने योगाभ्यास कसा करावा हे सांगितले आहे. नवव्या अध्यायात साधु, स्त्री-पुरुष व दुराचारी या सर्वांनाच आपल्या अत्याचारापासून उध्दार कसा करुन घेता येतो हे उपदेशिले आहे. ज्ञानमार्गापेक्षा भक्तिमार्ग श्रेष्ठ कसा हे बाराव्या अध्यायात सांगितले आहे. व शेवटच्या अध्ययात परमेश्वर अंतर्बाह्य सर्वव्यापी कसा आहे, हे ग्रंथित केले आहे, परंतु हे सर्व प्रश्न गौण असून ते कर्तव्यासाठी कर्तव्य या मूळ व मुख्य नैतिक तत्त्वास पोषक आहेत, ही गोष्ट निर्विवाद आहे. या नैतिक व्यवहाराचा परिपाक आध्यात्मिक अनुभूतीत येतो. भगवद्‌गीतीने तात्विक चर्चेस अद्यापि काही रामराम ठोकला नव्हता. पूर्वाच्यार्यानी आपल्या दर्शनात हाताळलेल्या प्रश्नांचा उहापोह करणे हे भगवद्‌गीतेचे आद्य कर्तव्य होते व या परस्पराविरोधी दर्शनाचा समत्वय उच्चत्तम आंत्यज्ञानात करता येतो, असे गीताकारांचे स्पष्ट मत होते.

या सर्व बाबतीत मध्ययुगीन व भगवद्‌गीतेतील अनुभूतीशास्त्र यांच्यामध्ये पूर्ण विरोध दिसून येतो. काही अपवादात्मक उदाहरणे सोडून दिली तर मानव्याचा उध्दार करावा हीच तिव्र मनोवृत्ती सर्व मध्ययुगीन संतश्रेष्ठांची होती हे निर्विवाद आहे. तात्विक प्रश्नाचा उहापोह करण्याकडे त्यांचे लक्ष मुळिच

नव्हते, इतकेच नव्हे तर केवळ तात्विक चर्चेने ब्रम्हज्ञान प्राप्त होत नाही असे स्पष्ट होते. भगवद्गीतेतील अनुभूतीशास्त्र स्वयंप्रतिष्ठित असल्यामुळे त्यास कोणत्याच तत्त्वज्ञानाची किंवा दर्शनाची मुळी जरुरी राहिली नव्हती.

श्रीमद्भगवतगीतेच्या तत्त्वज्ञानास आधारभुत असलेल्या श्रीकृष्णाच्या व्यक्तिमत्वासंबंधी प्राचीन वस्तुसंशोधक व इतर इतिहास संशोधक व टीकाकार यांनी साधार माहिती मिळविण्याची पराकाष्टा केली आहे. त्यांची ती माहिती वेदकालापासून पुराणकालापर्यंत मिळणाऱ्या पौराणिक बाडावर आधारलेली आहे.परंतु त्यांचा हा प्रयत्न फारसा यशस्वी झाला नाही, असे मोठ्या कष्टाने म्हणावे लागते. काही तज्ञ लेखकांच्या मते कृष्ण म्हणजे एक सूर्य देवता आहे. तर काहींच्या मते तो वनस्पतींचा देव आहे. भगवद्गीतेचा कर्ता श्रीकृष्ण व छांदोग्य उपनिषदांतील श्रीकृष्ण हे दोघेही देवकीपुत्र आहेत. एवढ्यावरुन ते दोघेही एक होते, असे तिसरे मत आहे, परंतु या दोघांच्या श्रीकृष्णांच्या शिकवणीत जमीन आस्मानाचा फरक आहे. मथुरेतील वृष्णी वंशातला सुप्रसिध्द राजपुत्र श्रीकृष्ण व शांती पर्वतातील एकांतिक भागवत धर्माचा प्रणेता 'वासुदेव' हे एकच होत ही गोष्ट एका अर्वाचीन पंडिताने मोठ्या खुबीने लोकांच्या नजरेस आणली आहे.

भगवद्गीता वेदरुपी खडकाळ पर्वतातून निघणारा हा भक्तिरसाचा झरा प्रथम वरुण देवतेकडून मुख्यतः वाहत असलेला दिसतो, पुढे तो उपनिषादांच्या तत्त्वज्ञानरुपी दाट अरण्यात लुप्त होतो व शेवटी भगवद्गीतेच्या काळी पुनः तो निर्मळ स्वरुपात वाहत असलेला दृष्टीस पडतो. उपनिषदात ध्वनीत

केलेला आत्मानुभवाचा सूर वासुदेव धर्मांतही ऐकू येतो मात्र या धर्मात भक्तीस विशेष प्राधान्य दिले आहे. वासुदेव धर्म व पंथ पाणिनीच्याकाळी प्रचलित होते. भगवद्गीतेतील दिलेले दम, त्याग, अप्रमादी सद्गुण एकच आहेत. भगवद्गीतेत व शांती पर्वात प्रतिपादिलेला धर्म तत्त्वतः एकच आहे व या दोन्ही ग्रंथात आत्मज्ञान शिकलेले आहे. म्हणून भागवत धर्मांचा पुरस्कर्ताही श्रीकृष्णच आहे. यात सुध्दा 'कर्मण्यवादिका' नित्य चांगले कर्म करण्यावरच भर दिला आहे.

कर्तव्यासंबंधी अशी एकच धारणा आहे की जि सर्व युगातिल सर्व संप्रदायांना आणि सर्व देशातील सर्व मातवांत मान्य आहे. आणि ती म्हणजे हीच की ''परोपकारः पुण्याय, पापाय, परपीठनम्'' कुणाला दुःख देऊ नका, दुसऱ्यावर उपकार करणे,सत्कर्म करणे हेच कर्तव्य होय. दुसऱ्याला पीडा देणे, हे असत्यकर्म, अकर्तव्य होय.

भगवद्गीता कर्तव्याचा वारंवार उल्लेख करते. आपण कोणत्या समाजात जन्म घेतला आहे. आणि कोणत्या अवस्थेत आपण आहोत यावरुनच जीवनातील विभिन्न कर्तव्यांकडे आपण कोणत्या वृत्तीते पाहू हे बहुतांशी ठरत असते. ह्या कारणास्तव स्वतःच्या सामाजिक अवस्थेशी सुसंगत मताची उन्नती करीत. असे कार्य करणे, करीत जाणे उचित आहे.

आजच्या युगात भौतिक सुखाला चटावलेल्या मानवी प्रवृत्ती स्वतःची कर्तव्य तर विसरलाच आहे. परंतु त्याचबरोबर आपण ज्या समाजात वावरतो, रहातो त्या समाजाचे ऋण, कर्तव्य भावनेने पार पाडावे हे भान विस्मरणातून कधिच निघून गेले आहे. प्रत्येकजण स्वप्रगतीसाठी तात्वीक विचार श्रेणीला बगल देऊन परिस्थितीजन्य बुध्दीचा वापर करुन आत्मकेंद्रीत झाला आहे. हे प्रत्येक युगात व्यक्तीगणिक किंवा सामुहायीक रुपाने जेव्हा जेव्हा घडले तेव्हा तेव्हा ऱ्हास किंवा विनाशाला सामोरे जावे लागले आहे. ज्यांनी ज्यांनी सत्कर्म व सद्सद्विवेक बुध्दीचे आचरण केले ते त्या युगातील श्रेष्ठ पुरुष किंवा समाज वाखानण्याजोगा आजता गायत राहीला आहे. रामायण - महाभारत यात व्यक्तीनिहाय किंवा कुटुंबनिहाय दाखले आपल्या समोर आहेत. जे जे स्वतःच्या किंवा कुटुंब किंवा समाजसाठी आवश्यक कर्तव्य करण्यात विसरली त्यांना त्यानुसार अंतिम फळ मिळाले.

आजच्या युगात वैज्ञानिक प्रगती अथवा वैज्ञानिक दृष्टीकोन

अमलात आनणारी जरी जीवन प्रणाली सुरु असली तरी स्व कुटुंब किंवा समाज याबाबतची कर्तव्य लोप पावली आहेत का ? नक्कीच नाही मात्र ती कर्तव्य पार न पाडण्याचा काळ वाढतच चालल आहे. म्हणून आजच्या युगातही 'भगवद्गीतेतील' तत्त्वज्ञान व त्यावर आधारित असलेले कर्म महत्त्वाचे ठरते. श्रीकृष्णाने अर्जुनाला भगवद्गीता व्यक्तीगत पातळीवर जरी सांगितले तरी त्यामागची भूमिका कुटुंब व समाजाच्या नित्यकर्मावर प्रकाश टाकणारी होती.

श्रेयान्सधर्मो विगुण : परधर्मत्स्वतुष्ठितात् ।
स्वधर्मे निधनं श्रेय : परधर्मो भयावह ।।

इतरांच्या कर्माचे उत्तम रीतीने पालन करण्यापेक्षा स्वतःच्या नियत कर्माचे, दोषयुक्त असले तरी पालन करणे अधिक श्रेयस्कर आहे. स्वतःचे कर्म करतांना जरी एकाद्याचा - विनाश झाला तरी दुसऱ्याचे कर्म करण्यापेक्षा ते श्रेयस्कार आहे. कारण दुसऱ्याच्या मार्गाचे अनुकरण करणे भयावह असते. म्हणून मनुष्याने इतरांचे नियत कर्माचे अनुकरण करण्यापेक्षा पूर्णपणे कृष्णभावनेमध्ये आपले नियत कर्म करावे. भौतिक दृष्ट्या प्रकृतीच्या गुणांच्या प्रभावाखाली मनुष्याच्या मानसिक आणि शारिरिक स्थितीला अनुसरुन सांगण्यात आलेली कर्मे म्हणजे नियत कर्मे होत.

भगवद्गीतेच्या अठराव्या अध्यायाच्या १९व्या चरणात भगवान श्रीकृष्णाने जीवनातील तीन महत्त्वाच्या मूल्यांचा विचार केला त्याचे विवेचन इतर अध्यायात सुध्दा येते परंतु शेवटच्या अध्यायात भगवान श्रीकृष्ण म्हणतात,

ज्ञानं कर्मच कर्ताच त्रिधैव गुणभेद्व : ।
प्रोच्यते गुणसङ्ख्याने यथावच्छुणू तान्यापि ।।

मानवी प्रकृतीच्या तीन गुणांना अनुसरुन ज्ञान, कर्म आणि कर्ता यांचे तीन प्रकार सदैव जीवनातील प्रत्येक घडामोडीत ठासून भरले आहेत, यातील सत्वगुण प्रकाशक आहे. रजोगुण भौतिकवादी आहे आणि तमोगुण आळस व प्रमाद उत्पन्न करणारा आहे. प्रकृतीचे सर्व गुण बंधनकारक आहेत, ते गुण मुक्तिदायक नाहीत. सत्वगुणातही जीव बध्दच असतो. सतराव्या अध्यायात प्रकृतीच्या निरनिराळ्या गुणातील निरनिराळ्या प्रकारच्या लोकांच्या निरनिराळ्या उपासना आढळून येतात.

भगवद्गीतेचे प्रमुख एक वैशिष्टय म्हणजे भगवान श्रीकृष्णाचे गीतेमध्ये परम सत्य म्हणून प्रतिपादन केले आहे. परम सत्याची अनुभूतीशी निर्विशेष ब्रम्ह, अंतर्यामी परमात्मा आणि पुरुषोत्तम भगवान श्रीकृष्ण या तीन रुपांमध्ये होते. परम सत्याचे परिपूर्ण ज्ञान म्हणजे श्रीकृष्ण कारण ते सदैव आपल्या अंतरंग शक्तीमध्ये स्थित असतात. भौतिक शक्तीशी चोवीस तत्त्वांमध्ये प्रकट होते. शाश्वत कालतत्त्वामुळे सृष्टी प्रकट होते.आणि बहिरंग शक्तीद्वारे हिची निर्मिती आणि प्रलय होतो. ही प्राकृतिक सृष्टी प्रकट आणि अप्रकट होत असते.

भगवद्गीतेमध्ये ईश्वर, प्रकृती, जीव, शाश्वत काल आणि कर्म या पाच मुख्य विषयांची चर्चा करण्यात आली आहे. ही सर्व तत्त्वे भगवान श्रीकृष्णांच्या अधीन आहेत. परम सत्याच्या सर्व संकल्पना निर्विशेष ब्रम्ह, अंतर्यामी परमात्मा आणि इतर कोणत्याही दिव्यत्वाची संकल्पना ही भगवंतांच्या ज्ञानामध्ये अंतर्भूत होते. वरकरणी जरी भगवान, जीव, भौतिक, प्रकृती आणि काळ हे भिन्न प्रतित होत असले तरी यापैकी कोणतेही तत्त्व परम सत्यापासून वेगळे नाही. परंतु परम सत्य हे सर्वापासून सदैव भिन्न असते. आजच्या युगात फक्त भौतिक सुख हेच सत्य दृढ होत चालल्याचे दिसून येते. त्यामुळे भगवद्गीतेनुसार ज्याची निर्मिती होते तेथे प्रलय हा अंत असतो हे अनेक युगात सुरु आहे. सजीव जेव्हा प्रकट होतो (जीव निर्माण होणे) तेव्हा त्याचा अंतिम कालावधी ठरलेला असून देखील तो सत्य व कर्म यांची विवंचना करतो व त्यामुळे कलायुगातील सद्-प्रवृतींचा ऱ्हास व दुश प्रवृत्तीचा विकास होत असल्याचे दिसून येते. मानव सोबत चांगल्या प्रवृत्ती, आचरण व कर्म यापासून दूर जाऊ लागला आहे. वैज्ञानिक प्रगती निश्चित चांगली आहे. परंतु ते योग्य तऱ्हेने वापरण्याची प्रवृत्ती किंवा सद्कर्माने त्याचा वापर ह्यात अंतर पडू लागले आहे. त्यामुळे भगवद्गीतेतील सार पुन्हा अनुसरायची वेळ आहे.

अजित त. आचार्य
१०१/१०२, कृष्ण गोकुळ हौ.सो. प्रा.लि.
अंब्रोल ग्रुप, बोळिंज नगरपालिका शेजारी,
बोळिंज, विरार (प.), जि. पालघार ४०१३०३
दूरध्वनी (०२५०) २५५०६०६
भ्रमणध्वनी ९३२२००७७४३

पवित्र कुरआन आणि मानवी मूल्ये

अे. के.शेख

पवित्र कुरआन ग्रंथ फक्त इस्लामी धर्मियांसाठी अवतरीत झाला नसून समस्त मानव जातीसाठी तो अवातरीत झाला आहे. आज परिस्थिती अशी आहे की प्रत्येक धर्माचे लोक आपला स्वतःचाच धर्म जाणत नाहीत. अशा बऱ्याचशा लोकांबद्दल म्हणता येईल. त्यामुळे ते स्वतःही त्रासात असतात आणि इतरांना त्रास देत असतात. यामध्ये इस्लामी धर्मी लोकही आलेच.

कुरआन हा एक मार्गदर्शक ग्रंथ आहे या ग्रंथाद्वारे आपल्याला कळते की, पृथ्वीतलावर जितके धर्मग्रंथ आणि प्रेषित आले. त्या सर्वांवर प्रत्येक माणसाने श्रद्धा ठेवली पाहिजे. त्यातून त्याला मार्गदर्शन प्राप्त हाईल. ज्याला तो जगण्याचा आधार बनवू शकेल.

२००९ मध्ये आम्ही हजयात्रा केली. सौदी आरेबिया मधील मक्का या पवित्र शहरात महिनाभर त्यानिमित्ताने राहण्याच योग आला मक्केची मस्जिद प्रचंड मोठी आहे. तेथे पन्नास लाख लोक एकाचवेळी नमाज अदा करू शकतात. ती वास्तू किती मोठी असावी हे पाहण्यासाठी आम्ही त्या वास्तूला एक प्रदक्षिणा धालायचे ठरवले आणि चालू लागलो. खूप प्रचंड अशी ९९ द्वारापैकी काही आम्ही ओलांडली. तीन चार तासात आम्ही थकून बसलो. समोरच एक भले मोठे इंडिकेटर होते. त्यातील अक्षरेही मोठी होती. अरबी आणि त्या वचनांचे इंग्रजीमध्ये भाषांतर त्यात दाखविले जात होते. बघता बघता त्यामध्ये एक वचन असे आले की अंगावर रोमांच उभे राहिले. ते वचन असे होते, की समोरच्या माणसाबरोबर असे वागा की तो तुमच्या शरीराचा एक भाग आहे. विचार प्रवृत करायला लावणार हे वचन वाचून तर आम्ही धन्य झालो आणि मनात आलं, की खरेच प्रत्येक माणूस जर असे वागू लागला तर? आपल्या शरीराच्या कोणत्याही भागाला इजा होईल असे आपण वागूचं शकत नाही. मग समोरच्या माणसाला आपण आमचा शरीराचा भाग मानले, तर त्याला आपण कोणालाच दुखवू शकणार नाही. एरवीच्या व्यवहारात असे. वागले तर भांडणतंटा होणारच नाही अगदी बँका पोस्ट आणि सरकारी कचेऱ्यातून ही गोष्ट पाळली तर? आपल्या इतके आपणच सुखी असू.

मानवी मूल्यांवर आधारित अशी अनेक वचने कुरआन ग्रंथात पाहायला मिळतात. या ग्रंथात प्रथमच स्पष्ट केले गेले आहे की, हा असा ग्रंथ आहे जेथे शंकेला वाव नाही. यातील काही मूल्यांचा आपण विचार करूया.

१) आपले आई वडिल, नातेवाईक, अनाथ, गरीब, लाचार शेजारी, जवळचे वा दुरचे, तुमच्या बसण्या उठण्यातले सहकारी प्रवासी, तुमचे नोकर-चाकर यांच्या बरोबर सद्वर्तन करावे.

२) अहंकारी आणि बढाई मारणाऱ्यांना अल्लाह पसंत करीत नाही.

३) घाणेरडे बोलणाऱ्यांना (बदजबानी) अल्लाह पसंत करीत नाही.

४) कोणाचेही भले करा मग ते उघडपणे असो वा गुप्तपणे. आणि कोणी आपले वाईट केले असेल तर त्यांना क्षमा करा.

५) पैशाची उधळपट्टी करू नका, अल्लाहला ही गोष्ट आवडत नाही.

६) निर्लज्जपणा मग तो उघड असे वा गुप्त अल्लाहला पसंद

नाही.

७) जे श्रद्धावंत आहेत त्यांना ना भय असेल, ना ते कधी उदास राहतील.

८) जमीन आणि आकाशाचा तोच एक मालक आहे. ज्याने फक्त सहा दिवसात या सृष्टीची निर्मिती केली तो मोठा दयाळू आहे.

९) प्रत्येकजण स्वत:साठीच कष्ट करीत असतो. अल्लहला त्यातून काहीच नको असते.

१०) त्याला हवे तसे तो कोणाला मुलगा तर कोणाला मुलगी प्रदान करतो. त्याची अमानत म्हणून त्यांचा सांभाळ करा.

११) त्यांच्याशी बोलणे प्रेषिता शिवाय इतर कोणालाच शक्य नाही.

१२) प्रत्येक वस्तूला त्यानेच एका ठराविक आकारमानात निर्माण केले.

१३) कुरआन या ग्रंथात कसल्याही शंकेला जागा नाही. हा असा ग्रंथ आहे तो परिपूर्ण आहे. ज्यामध्ये समस्त मानवजातीला मार्गदर्शन केले गेले आहे.

१४) या ग्रंथात अशा गोष्टी आहेत की ज्यामुळे श्रद्धावंतांना लाभ आणि अत्याचारी लोकांसाठी नुकसान आहे.

१५) या ग्रंथात तुमच्या सुख समृद्धीसाठी मार्गदर्शन केले आहे.

१६) हा ग्रंथ अरबी भाषेत अवतरीत झाला आणि त्यामध्ये पेच किंवा कोंडी नसून सरळ असा सर्वांना समतोल असाच हा ग्रंथ आहे.

१७) या ग्रंथातले प्रत्येक वचन स्पष्ट आणि खुलासेवार सांगितले आहे.

१८) सन्मार्गी आणि सदाचारी लोकांना या ग्रंथात आनंदाच्या वार्ता तर श्रद्धाहीन, अत्याचारी, जुलमी लोकांसाठी प्रकोपाची चेतावना आहे.

१९) जेव्हा तुम्हाला प्रार्थना (नमाज) करावायची असेल तर त्या अगोदर शुचिर्भूत व्हा हात पाय धुवा केसावरून पाणी फिरवा. असे स्वच्छ होऊनच नमाज अदा करा (नामाज पाच वेळा अदा केली जाते पहाटे, दुपारी, संध्याकाळी, सुर्यास्तानंतर आणि रात्री) पहाटेची नमाज पहाटे साडेचार-पाच वाजताचीच असते म्हणजे आपोआपच सूर्यादयापूर्वी उठणे होते) नमाजीमुळे प्रार्थनेमुळे माणूस वाईट गोष्टीपासून दूर राहतो. चांगूलपणा वाढीस लागतो.

२०) मेलेल्या प्राण्यांचे मास खाऊ नका. तसेच स्वत:ही खाऊ अगर पिवू नका, तसेच घाणीत फिरणाऱ्या जनावरांचे मांस खाऊ नका.

२१) हलाल केलेल्या जनावरांचेच फक्त मांस खा. गळा घोटून मारलेल्या जनावरांचे मांस किंवा खाली पडून मेलेल्या जनावरांचे मांस किवा एखाद्या प्राण्यांच्या हलाल शिंगानी घायाळ होवून मेलेल्या प्राण्यांचे मांस खाऊ नका.

२२) हिसक पशूंनी मारलेल्या जनावरांचे मांस खाऊ नका.

२३) आई वडिलासोबत नेकीने रहा. गरीबी हे कारण दाखवून आपल्याच मुलांना मारू नका. लाजीरवाण्या गोष्टीच्या जवळही जाऊ नका .

२४) सर्व स्वच्छ पवित्र गोष्टी तुमच्यासाठी वैध आहेत.

२५) सर्व मानवांना आदेश देण्यात येत आहे की मृत्यूपूर्वी मृत्यूपत्र तयार करा आणि आपल्या संपत्तीचा योग्य तो हिस्सा आपल्या आई वडिलांना आणि कुटुंबियांना द्या.

२६) पत्नी पतीची पोशाख आहे. पती पत्नीचा पोषाख आहे. (म्हणजेच पती-पत्नी एक दुसऱ्याची अब्रू आहेत त्यांनी एकमेकांना सांभाळावे.)

२७) मागील दाराने घरात कधीच प्रवेश करू नका. नेहमी समोरच्या दारानेच प्रवेश करा.

२८) लाचार, लोक, स्त्रिया आणि मुले यांच्या बाजूने उभे रहा लढा.

२९) तुमच्या संपत्तीमधून तुम्ही तुमच्या आईवडिलासाठी जवळच्या नातेवाईकांसाठी, अनाथासाठी, गरीब-दु:खी लोकांसाठी आणि प्रवाशांसाठी खर्च करा भलाईचा मोबदला तुम्हाला मिळेल.

३०) देणगी देताना उपकार केल्यासारखे दाखवू नका. तसेच त्यांना मदत कराल त्याच्याशी उपकार कर्त्याच्या भूमिकेत वागू नका. किंवा त्यांना दुखवू नका. तुमच्या कामांचा बदला तुम्हाला तुमच्या पालनकर्त्याकडून मिळेलच त्यांना कसलेही भय राहणार नाही आणि तो कधीही निराशेने ग्रासणार नाही.

३१) आपल्या देणग्याचे कधीही प्रदर्शन करू नका.

३२) मद्य आणि जुगार या दोघांतही फार मोठे पाप आहे. त्यात काही फायदे असेल तरी पाप आणि तोटे भयानक आहेत.

३३) हे मानवांनो मद्य, जुगार, फासे या सर्व शैतानी गोष्टी आहेत आणि वाईट गोष्टी आहेत. या सगळ्यापासून दूर रहा.

३४) मद्य आणि जुगाराचे व्यसन माणसांना लावून सैतान तुमच्या आपापसात शत्रुत्व आणि द्वेष वाढवू इच्छित आहे. तरी त्यापासून तुम्ही दूर रहा.

३५) अनाथांचा सांभाळ करणे ही अतिशय चांगली आणि नेक गोष्ट आहे ते तुमचे भाऊबंदच आहेत असे माना आणि आपल्या कुटुंबाचा त्यांना एक घटक मानून त्याचा सांभाळ करा, त्यांच्यासाठी खर्च करा यामध्ये तुमची भलाई आहे.

३६) अनाथाची संपत्ती सांभाळण्याची जबाबदारी जर तुमच्यावर आली. तर ती विश्वासाने पार पाडा. अनाथ सज्ञान झाल्यावर ती त्याच्या हवाली करा. त्याची संपत्ती आपल्या संपत्तीमध्ये मिसळून ती उडवू नका.

३७) अनाथ सज्ञान झाल्याची खात्री करा तो संपत्ती साभाळण्याच्या लायक झाल्याची खात्री करा आणि मगच ती त्याच्या हवाली करा. आणि ती परत करताना साक्षीदार ठेवा.

३८) अनाथाची संपत्ती हडप करणे म्हणजे आपल्या पोटात आग भरण्यासारखे आहे. तेव्हा अनाथाशी पूर्ण न्याय करा. अल्लाह कोणाच्याही खांद्यावर झेपेल तेवढेच ओझे टाकतो.

३९) अनाथ सज्ञान झाल्यावर त्याची संपत्ती त्याला परत करून आपला करार पाळा

४०) लग्न गुपचूपपणे ठरवू नका.

४१) लग्न झाल्यावर पत्नीशी करार केलेली मेहेरची रक्कम वा वस्तू त्यांना अगोदर द्या (लग्ना अगोदर आहेर ठरविला जातो पतीने तो ठरविलेला आहेर स्त्रीधन, लग्न विधीत किंवा लग्न झाल्यावर लगेच त्या स्त्रीया संबंध प्रस्थापित होण्याअगोदर द्यावे लागते. मग हा मेहेर पैशाच्या स्वरूपात किंवा पैसे आणि दागदागिने यांच्या स्वरूपात असतो. ह्या मेहेरचाही लिखित स्वरूपात लग्नविधीमध्ये करार केला जातो.

४२) तुमची माता, मुलगी, बहिण, आत्या, मावशी, भाची, पुतणी आणि तुम्हाला दूध पाजणारी स्त्री. सासू यांच्याबरोबर तुम्ही विवाह करू शकत नाही.

४३) तुमची पत्नी म्हणजे तुमची शेती आहे.

४४) पती-पत्नीमध्ये काही भांडण - तंटा असेल आणि परिस्थिती हाताबाहेर जाऊन संबंध तुटण्याची शंका असेल तर पतीकडून एक पंच आणि पत्नीकडून एक पंच नेमून दोघात समेटाच्या दृष्टीने मध्यस्थी करावी.

४५) जर पत्नीला पतीकडून त्रास होण्याची शंका असेल किंवा तिच्यावरून पतीचे मन उडाले असण्याची शंका असेल तर दोघांच्या संमतीने ते वेगळे होऊ शकतात. यातही काही कटुता नसावी.

४६) तुम्ही एक, दोन, तीन, चार स्त्रीयांबरोबर लग्न करू शकता. अट ही की सर्वांना सारखी वागणूक द्यायची. सर्वा बरोबर एक सारखे आचरण ठेवायचे. पण ते तुम्हाला कधीच शक्य होणार नाही.म्हणून एकाच स्त्रीबरोबर, पत्नीबरोबर आदर्श संसार करावे.

४७) विधवा स्त्रीने पुन्हा लग्न करण्यास काहीच हरकत नाही मात्र पती मृत्यू पावल्यानंतर चार महीने दहा दिवस तिने थांबावे. आणि मगचं दुसरे लग्न करावे याला इद्दत म्हणतात यानंतर लग्न करण्यात काहीच पाप नाही.

४८) ज्या स्त्रीया तलाक पीडित आहेत. आणि त्यांना दुसरे लग्न करावयाचे आहे. त्या दुसरे लग्न करू शकतात. मात्र तलाक झाल्यावर तीन एम्. सी (पाळी) पर्यंत त्यांनी थांबावे आणि नंतरच लग्न करावे.

४९) मातांनी आपल्या मुलाला दोन वर्षापर्यंत अंगावरचे दूध पाजावे.

५०) व्यापार करून नफा मिळविणे वैध आहे (तो न फाही इतका असावा जसे भाजीमध्ये मीठ) यात अधिक मात्र अवैध आहे.

५१) जेव्हा कधी तुम्ही उसनवारी उधारी कराल. तेव्हा त्याची लिखित स्वरूपात नोंद करा. कोणा विश्वासू माणसाकडून ही नोंद करून घ्या लिहिणाऱ्याने जे लिहिले आहे ते मोठ्या आवाजात दोघांना समजेल अशा पद्धतीने सांगावे. आणि आपल्यातीलच दोन माणसांना साक्षीदार करा किंवा एक

पुरूष आणि दोन स्त्रीयांना साक्षीदार करा प्रकरण लहान असो वा मोठे, लिहून घेण्यात सुस्ती करू नका हेच तुमच्यासाठी योग्य आहे. कारण नंतर शंकेला वाव नको. आणि लिहिणाऱ्याचा तसेच साक्षीदाराचा आदर करा. अशा तऱ्हेने व्यवहार स्वच्छ आणि पारदर्शी असावा जसे घेतले तसेच ते परत ही करायला हवे सर्वच्या सर्व कर्ज परत करा आणि अल्लाहचे भय बाळगा.

५२) अल्लाहने जे काही प्रेषित पाठविले ते ते त्या समाजाची भाषा बोलणारे असे होते. जेणेकरून अल्लाहचा संदेश त्यांना समजावा आणि तो त्यांनी समाजातील लोकांना चांगल्या तऱ्हेने समजून सांगावा.

५३) आई वडिलांनी मागे सोडून गेलेल्या संपत्तीमध्ये पुरूषांबरोबरच स्त्रीयांचाही हक्क आहे.

५४) एखादा अपराध हातून घडल्यानंतर लगेच त्याबद्दल पश्चाताप व्यक्त करून अल्लाहची क्षमा मागितली आणि पुन्हा तो न करण्याची हमी दिली तर त्याला क्षमा मिळते अल्लाह अत्यंत दयाळू आहे.

५५) तुम्हा स्त्री पुरूषात जी एकमेकावर श्रेष्ठता दिली आहे त्याबद्दल कोणाचा द्वेष करू नका - पुरूषाने जसे कर्म केले त्याबद्दल त्याला आणि स्त्रीने तसे कर्म केले त्याबद्दल तिला श्रेष्ठता मिळते

५६) जर कोणी तुमच्याकडे एखाद्याने काही अमानत ठेवायला दिली असेल तर ती जपून ठेवा. त्याचा विश्वासघात करू नका. आणि त्याने परत मागताच ती त्याला जशीच्या तशी परत करा जर एखाद्याचे भांडण तुम्ही मिटवित असाल तर न्यायाने वागा. योग्य तोच निर्णय द्या.

५७) हे श्रद्धावंतानो जेव्हा कधी साक्षीदार म्हणून साक्ष द्याल, ती न्यायाने द्या एखाद्याशी दुष्मनी काढायची म्हणून न्यायाची बाजू सोडू नका संयम बाळगा.

५८) मोजमाप करताना कमी तोलणे, दांडी मारणे हा गुन्हा आहे. तोलताना पूर्णपणे तोला. आणि हे नेहमी लक्षात ठेवा, की घेणाऱ्याचे नुकसान होऊ नये. आणि तोलताना तराजू सरळ ठेवा.

५९) हे श्रद्धावंतानो! तुम्ही अल्लाहचे आदेश पाळा, प्रेषितांचे आदेश पाळा, आणि आपल्या वरिष्ठांचे आदेश पाळा.

६०) जर तुम्हाला कोणी सलाम केला नमस्कार केला, तर त्याचे उत्तर द्या. त्याने ज्या प्रेमाने सलाम केला असेल तितक्याच किंवा त्याहून जास्त प्रेमाने त्याच्या नमस्काराचे सलामचे उत्तर द्या त्याला सलाम करा.

६१) मानवजात ही चंचल बनविली गेली आहे.

६२) माणसाचे हृदय मात्र कमकूवत हळवे बनविले गेले आहे.

६३) खोट्या शपथा घेऊ नका. आणि जर शपथ घेतली तर त्या गोष्टीवर दृढरहा.

६४) पाप आणि लाजिरवाणे काम यापासून दूर रहा. साधारण, सर्वसामान्य छोटे असे पाप नकळतपणे घडले तर त्याची अल्लाहकडे क्षमा मागा निश्चितच तो क्षमा करेल.

६५) जेव्हा इतरांच्या घरी जाल, तेव्हा मुख्य दरवाजातून जा प्रथम दार ठोठवा (नॉक करा) त्यांना सलाम करा. तीन वेळा दार ठोठावूनही ते उघडले गेले नाही तर परतून जा. ते जोपर्यंत परवानगी देत नाहीत तोपर्यंत आत घरात जाऊ नका. आणि सलाम उत्तर देऊन, दार उघडून त्यांनी आत येण्यास नाकारले तर परत जा संयम पाळा.

६६) श्रद्धावंतानो! आपली नजर खाली, जमीनीवर असू द्या आणि पूर्ण कपड्यात रहा आपल्या गुप्तांगाचे रक्षण करा ती झाकून ठेवा.

६७) स्त्रीयांनीही पूर्ण कपड्यांनी अवगुंठीत असावे. आपली नजर खाली ठेवावी. आपल्या अंगाचे प्रदर्शन करू नये. ते झाकून ठेवावे. आपल्या शृंगाराचे दागदागिन्याचे प्रदर्शन करू नका. आपले अंग नेहमी ओढणीने झाकलेल असावे. परक्या माणसासमोर पडदा करा. आपला पती, बाप, सासरे, आपली मुले - बाळे, पुतणे - भाचे आपल्या नातेवाईक स्त्रीया, दाई दासी यांच्यासमोर पडदा करण्याची गरज नाही.

६८) चालताना स्त्रीयांनी पाय आपटत चालू नये. हळुवार पावलांनी चालावे, लोकांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेऊ नये किंवा आपल्या दाग दागिन्याकडे लोकांचे लक्ष जाऊ नये

म्हणून

६९) चुकले तर माफी मागा, लोकांना भले काम करण्याचा सल्ला द्या आणि अडाणी माणसापासून दूर रहा.

७०) तुमची संपत्ती आणि मुले, बाळे म्हणजे अल्लाहची अनामत आहे आणि तुमची कसोटी आहे. नेहमी कसोटीला उतरा.

७१) आपल्या मुलाबाळांना मारू नका. तो अल्लाहचा मोठा गुन्हा केल्या सारखे आहे.

७२) आई-वडिलांसोबत नेहमी चांगले वागा अदबीने वागा ते खफा झाल्यावर ही त्यांना उलटून बोलू नका हूं की चू करू नका, त्यांना झिडकारू नका, त्यांच्याशी तिरस्काराने बोलू नका, टोमणे मारू नका कारण हे सर्व अल्लाहला अजिबात पसंत नाही.

७३) अतिशय प्रेमाने आई वडिलांशी वागा, छाती काढून नव्हे तर दोन्ही खांदे झुकवून त्यांच्या समोर अदबीने उभे रहा. आणि त्यांच्यासाठी प्रार्थना करीत रहा की, जसा त्यांनी लहानपणी माझा सांभाळ केला तशी सेवा माझ्याकडून घडू दे आणि हे पालनकर्त्या त्यांच्यावर कृपा कर.

७४) आपला हात इतका बांधून ठेवू नका की कोणाला एक पैसाही देऊ नये आणि इतका मोकळा ही ठेवू नका की आपण स्वतःच गरीब लाचार होऊन बसावे.

७५) व्यभिचाराचा जवळपासही जाऊ नका कारण ती गोष्ट अतिशय लाजिरवाणी आहे.

७६) जे लोक स्त्रीयांवर नाहक आरोप करतात आणि त्याचा काही पुरावाही असत नाही. अशा लोकांना शिक्षा करा आणि त्यांची साक्ष केव्हाही खरी मानू नका.

७७) दुसऱ्याच्या घरी विचारल्या शिवाय आणि सलाम केल्याशिवाय आत जाऊ नका. ह्यातच तुमची भलाई आहे.

७८) एखादी वस्तू मापाने देत असताना माप पुरेपूर भरा आणि वजनाने देत असताना सरळ तोला.

७९) ज्या गोष्टीचे तुम्हाला ज्ञान नाही त्या गोष्टीच्या मागे लागू नका.

८०) चालताना अहंकाराने, अखडून गर्वाने चालू नका.

८१) चांगले तेच बोला आणि गोष्टी अशा सांगा ज्या भलाईच्या असतील.

८२) काहीही काम कोणतेही काम करताना असे कधीच म्हणू नका की ते काम मी उद्या करीन.

८३) जे तुम्ही करू शकत नाही, त्या कामाचा तोंडाने उच्चार करू नका

८४) एकदा करू म्हणून सांगितलेली गोष्ट न करणे अल्लाहला नापसंत आहे.

८५) करू म्हटलेली गोष्ट न करणे अल्लाहला अगदीच नापसंत आहे.

८६) या जगात कोणीच अमर नाही म्हणून मृत्यूचे भय बाळगा.

८७) परंतु मरण कधी मागू नका.

८८) अन्याया विरूद्ध लढण्याचा तुम्हाला हक्क आहे.

८९) सर्वाबरोबर भलाई करा. न्याय मार्गावर चालणारे अल्लाह पसंत करतो आणि त्यांना मदतही करतो.

९०) पालनकर्त्याने प्रत्येक समाजाला आपापले धर्मशास्त्र ठरवून दिले आहे.

९१) परमेश्वराचा तोच खरा दास होय, जो जमीनीवरून चालताना नम्रपणे चालतो. आणि अडाणी माणसाच्या तोंडी लागत नाही.

९२) आणि तोच खरा दास होय, जो पैशाची उधळपट्टी करत नाही. आणि खर्च करताना, कंजूषीही करत नाही.

९३) कुटुंबियांचा, नातेवाईकांचा, लाचार गरीबांचा आणि अपंग दुबळे आणि प्रवाशांचा हक्क मारू नका, तर अदा करीत रहा. त्या पालनकर्त्याला प्रसन्न ठेवण्याचा हा एक चांगला मार्ग आहे.

९४) कवीच्या मागे जाऊ नका. कारण ते कसेही आणि काहीही लिहितात उटपटांग गोष्टी करतात आणि एकांतात फिरत राहतात (कवीने) जबाबदारीने वागायला हवे आणि लिहायला हवे.

९५) अन्याय जुलूम पालनकर्त्याला पसंत नाही. वाईटाचा बदला वाईटच आहे त्यातूनही तुम्ही क्षमा केली आणि तडजोड केली तर जास्त चांगले.

९६) कवी लोक अशा गोष्टी लिहितात ज्या ते स्वतः कधीच करीत नाहीत.

९७) ज्याने संयम पाळला आणि क्षमा केली, तर निश्चितच ही गोष्ट अत्यंत शौर्याची आणि धाडसाची आहे जी अल्लाहला

पसंत आहे.

९८) जकात म्हणून तुमच्या वैध कमाईतून पैसे बाजूला काढा कमाई फक्त वैध करा. अवैध काम करून संपत्ती जमवू नका आणि अशी जकात म्हणून बाजूला काढलेली रक्कम गरीब लाचार लोकांना वाटा कर्जदार लोकांनी त्यांचे कर्ज फेडण्यासाठी या रकमेतून मदत करा त्या रक्कमेवर त्यांचा हक्क आहे.

९९) तुमचा पालनकर्ता सांगत आहे की, तुम्ही मला पुकारा। हाक मारा, मी निश्चितच तुमच्या हाकेला ओ देईन.

१००)सर्वच कवी काही वाईट नसतात जे श्रद्धावंत आहेत. आणि सत्कर्म करीत आहेत. आपल्या शेरो शायरीतून परमेश्वराची प्रशंसा करीत आहेत. त्यांच्यावर झालेल्या अन्यायाला, अत्याचाराला आपल्या कवितेतून मांडून त्याचा बदला घेत आहेत आणि सत्य तेच मांडत आहेत अशा कवींना कधीही वाईट समजले जाणार नाही.

१०१)टोमणे मारणे, घालून पाडून बोलणे आणि मागे निंदा करणे हे अल्लाहाला अजिबात आवडत नाही.

कुरआन हा ग्रंथच मुळी अखिल मानवजातीच्या मार्गदर्शनासाठीच अवतरीत झाला आहे, ज्याचे आचरण केले तर माणसाचा जन्म यशस्वी सफल होऊ शकतो. वरीलप्रमाणे अशी अनेक मूल्ये या ग्रंथात आहेत. त्यातला हा काही अंश मी आपल्यासमोर ठेवला आहे. पृथ्वीतलावर जितके म्हणून धर्मग्रंथ आहे. आणि प्रेषित आले ते सर्व मानव प्राण्याच्या हितासाठीच एक विशाल दृष्टीकोन ठेवून या मूल्यांकडे पाहिल्यास यातून निश्चितच काही बोधप्रद आपणास मिळू शकेल.

अे. के. शेख
अ २, अंबर अपार्टमेंट, पाटकर वाडा,
उर्दु शाळेजवळ,पनवेल - ४१०२०६
मो. ९८६९२०२६५०

आदर्श जीवनाचं अधिष्ठान !

प्रकाश खरात

''ईश्वर व आत्मा या गोष्टींना सत्याचा आधार नसल्यानं भगवान गौतम बुध्दानं त्यांचं अस्तित्व नाकारलं. बुध्दाने दुःखाचं अस्तित्व स्विकारलं व दुःख मुक्तीचा मार्ग विश्वाला दाखवला. त्यांनी जगाला सामाजिक संदेश दिला. समता, स्वातंत्र्य, बंधुत्व या मानवी मूल्यांचा आद्य उद्‌गाता भगवान गौतम बुध्द होय. ही मूल्यत्रयी म्हणजे बुध्दानं अखिल मानवाला दिलेली देण आहे. भगवान बुध्द समतेचा महान पुरस्कर्ता होते. त्यानी समतेच्या तत्वाचे केवळ प्रतिपादन केले नाही तर ते तत्व कृतीत उतरवलं. त्याची अनेक उदाहरणं बुध्दचरित्रात आढळतात. जे पुरुष सुक्त चातुवर्ण्याचं उगमस्थान मानलं जातं, त्याचा बुध्द कट्टर विरोधक होते.''

बुध्दाला जातीव्यवस्था अमान्य होती. जातीव्यवस्थेचे समर्थक असणाऱ्यांच्या मतांचं त्यांनी खंडण केलं. बुध्दाचा संघ म्हणजे समतेचं मुर्तिमंत प्रतिक. त्यांच्या संघात यशस, काश्यप, सारीपुत्र, मोग्गलान, बिंबिसार, अनाथपिंडक, प्रसेनजित, जीवक, रठ्ठपाल, उपाली, सुनित, सोयाक, सुय्यीय, सुमंगल, अंगुलीमाल अशा वेगवेगळया जातीतील नि सामाजिक स्तरांतील राजापासून रंकापर्यंत सर्व प्रकारचे लोक होते. बुध्द धम्म हा सागराप्रमाणे विशाल असून ज्याप्रमाणे नद्या सागराला मिळाल्यानंतर हे गंगेचं पाणी, हे गोदावरीचं, कृष्णेचं पाणी असं ओळखता येत नाही तसंच बुध्द धम्माची दिक्षा घेतलेल्यांची जात विसर्जित होते.

बुध्द हे स्त्री-पुरुष समानतेचे पुरस्कर्ते होते. त्यांचा संघ सर्वसमावेशक होता. महाप्रजापती गौतमी, यशोधरा यांच्यासोबत शाक्य कुलातील पाचशे स्त्रीयांनी धम्मदिक्षा घेऊन संघात प्रवेश केला. आम्रपाली, पटाचारा, किसा, गौतमी, चंडालिका अशा अनेक स्त्रीयांनी धम्माचा आश्रय घेतला.

बुध्दांनी प्रतिपादिलेली धम्मतत्वे:-

बुध्द तत्वज्ञानात जीवन सुचितेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. शील हे धम्माचं महत्वाचं अंग आहे. सारनाथ येथील मृगदायवनात भगवान बुध्दानं पाच श्रमणांना धम्मोपदेश केला. ते पहिलं धम्मचक्र प्रवर्तन होय.आपल्या पहिल्या प्रवचनात बुध्दांनी श्रमणांना विशुध्दीमार्गाची शिकवण दिली.सुसंस्कृत व श्रेष्ठ प्रतीचं जीवन जगण्यासाठी पंचशीलाचं पालन करणं महत्त्वाचं आहे. पंचशीलेत पुढील तत्त्वांचा समावेश होतो.

१) कोणत्याही प्राण्यांची हिंसा न करणे व त्याला इजा न करणे
२) चोरी न करणे अर्थात दुसऱ्याच्या मालकिची वस्तू न बळकावणे
३) व्यभिचार न करणे ४) असत्य न बोलणे
५) मादक पेय ग्रहण न करणे.

भगवान बुध्दाच्या म्हणण्यानुसार जगात पतितांचे दोन वर्ग आहेत. ज्यांच्यासमोर काही आदर्श आहे, असे पतित आणि ज्यांच्यासमोर कोणताच आदर्श नाही, अशा पतिताला आपण पतित आहोत याची जाणीव नसते त्यामुळे त्याचे अध:पतन होतच रहाते. मात्र ज्यांच्यासमोर एखादा आदर्श आहे अशी व्यक्ती आपल्या पतित अवस्थेतून वर येण्यासाठी प्रयत्नशील असते. पंचशीलाची तत्व म्हणजे आदर्श जीवनाचं अधिष्ठान!

बुध्दाच्या तत्त्वज्ञानात अष्टांगिक मार्गांना मौलिक स्थान आहे. अष्टांगिक मार्गाचे आठ घटक पुढीलप्रमाणे - १) सम्यक दृष्टी २) सम्यक् संकल्प ३) सम्यक् वाचा ४) सम्यक् कर्मान्त ५) सम्यक् आजिविका ६) सम्यक् व्यायाम ७) सम्यक् स्मृती

८) सम्यक् समाधी

बुध्दाने सांगितलेले अष्टांगिक मार्ग ही सदाचाराची आशयसुत्रे आहेत. ती नीती मुल्यांची निदर्शक आहेत. नीतीमान मानव निर्माण करणं हे बुध्द धम्माचं ध्येय आहे. अन्य धर्मात ईश्वराला जसं महत्त्वाचं स्थान दिलं गेलं आहे तसंच स्थान बुध्द धम्मात नीतीला आहे.

समाजात आपल्याला अनेक अभद्र गोष्टी दिसतात. त्यांचं उगमस्थान आपल्या सदोष नीतीमूल्यांचा अभाव असलेल्या समाजरचनेत आहे. त्यासाठी बुध्दप्रणीत सद्धम्माचं राज्य म्हणजेच सदाचाराचं राज्य निर्माण होणं मानवाच्या कल्याणाच्या दृष्टीनं गरजेच आहे. भगवान गौतम बुध्दांचं वेगळेपण,धर्मात त्यांचं विशेष असलेलं स्थान इतर धर्मसंस्थापकांच्या तुलनेत बुध्दांच हे वेगळेपण उठून दिसतं. येशू ख्रिस्तानं स्वत:ला देवाचा पुत्र मानलं तर महम्मद पैगंबरानं स्वत:ला अल्लाहाचा प्रेषित म्हणविलं. आपल्या ठायी काही दैवी गुण आहेत असा बुध्दानं दावा केला नाही.

धम्म स्वत:च्या अंगभूत सामर्थ्यावर टिकला पाहिजे; अशी बुध्दाची धारणा होती. तसचं बुध्दानं मोक्षाचं आमिष कधीच दाखवलं नाही. "मी मार्गदाता असून मोक्षदाता नाही" अशी त्याची नि:संदिग्ध भूमिका होती. बुध्दाचा साक्षात्कारावर विश्वास होता. भगवान बुध्दाचा धम्म हा एक शोध आहे, कारण मानवी जीवनाच्या सखोल अभ्यासातून तो उद्‌भवलेला आहे. ज्या स्वाभाविक प्रवृत्तीत मनुष्य जन्म घेतो, त्यांच्या क्रिया, प्रक्रिया आणि इतिहास व परंपरा हयांच्यामुळे त्यांना मिळालेलं इष्टानिष्ट वळण हयांच्या संशोधनाचा परिणाम म्हणजे बुध्द धम्म होय.

प्रत्येक धर्मसंस्थापकानं आपली शिकवण दैवी असल्याचं म्हटलं. वेद हे अपौरुषेय असल्याचा दावा केला जातो. बुध्द विचार स्वातंत्र्याचा समर्थक असल्यानं आपले विचार म्हणजे निर्णायक सत्य असून त्यात कालत्रयी नुसार बदल होणार नाही, असं त्यांनी कधीच म्हटलं नाही. आपल्या आयुष्याच्या अंतिम टप्प्यात स्थविर आनंदला त्यांनी स्पष्ट शब्दात सांगितलं की, काळानुसार आपल्या धम्मात बदल होऊ शकतो.'अत्त दिप भव' म्हणजेच 'स्वयंप्रकाशित व्हा' असा अखेरचा संदेश त्यानी आपल्या अनुयायांना दिला. बुध्द धम्मात संशोधनाला, स्वतंत्र विचारांना पूर्ण वाव आहे. आपला तत्वविचार हा ठरीव सिध्दांत व्हावा, असं बुध्दाला कधी वाटलं नाही. उलट आपले विचार प्रवाहासारखे

ओघवते असावेत, अशी त्याची इच्छा होती.

धम्माचे पैलू : प्रज्ञा, शील, करुणा, मैत्री

भगवान बुध्दानं मानवी जीवनातील प्रज्ञेची आवश्यकता वेळोवेळी अधोरेखित केली. ज्ञानमार्ग हा सर्वांसाठी खुला असला पाहिजे, असा त्याचा आग्रह होता. चातुवर्ण्य व्यवस्थेत फक्त त्रैवर्णिकांनाच ज्ञानार्जन करण्याचा अधिकार होता. शुद्र व स्त्रीया ज्ञानापासून वंचित होत्या. ज्ञान मिळविण्याचा हक्क सर्वांनाच आहे, असं बुध्दांचं मत होतं बुध्दानी लोहिच्च ब्राम्हणाशी केलेल्या संवादात त्याच्या मताचं प्रतिबिंब दिसतं

शील हा बुध्दतत्वज्ञानाचा महत्त्वाचा घटक आहे. तो प्रज्ञेसाठी पूरक आहे. शीलाशिवाय प्रज्ञा अनर्थकारी ठरु शकते. म्हणून बुध्दानं शील श्रेष्ठ मानलं आहे. प्रज्ञा हा विचारधम्म; तर शील आचारधम्म होय. म्हणूनच भगवान बुध्दानी पंचशीलेला प्राधान्य दिलं आहे. प्रज्ञा, शील यांच्याप्रमाणे करुणा ही बुध्दधम्माची आधारशीला आहे. तथागत गौतम बुध्द हे स्वतः महाकारुणीक होते.

दुःखितांची, पिडीतांची, व्याधीग्रस्तांची त्यांनी मनोभावे सेवा केल्याची उदाहरणं बुध्दचरित्रात सापडतात. बुध्दानं स्वतः विषयी म्हटलयं की, या जगात जे गरीब आहेत, असहाय्य आणि अनाथ आहेत, त्यांचा तथागत मित्र आहे. शारीरीक व्याधींनी पछाडलेले आहेत, मग ते श्रमण असोत अथवा इतर कोणीही असोत, त्यांची सेवा करण्यासाठी, जे दरिद्री, अरक्षित आणि वृध्द आहेत, त्यांना सहाय्य करण्यासाठी आणि इतरांना आपल्यासारखेच करायला प्रेरणा देण्यासाठी तथागताचा जन्म आहे. तथागत भगवान बुध्दाची शिकवण करुणेपुरतीच सिमीत नाही. बुध्दानं प्रतिपादलेली मैत्री ही वैश्विक स्वरुपाची असून अवघ्या चराचराला कवेत घेणारी आहे.मैत्री संदर्भात बुध्द म्हणतात, 'भिक्खूंनो! मैत्री ही सतत आणि अप्रतिहत वाहत राहिली पाहिजे. आपले मन पृथ्वीसारखे खंबीर, हवेसारखे विमल आणि गंगेसारखे गंभीर ठेवणे हे तुमचे पवित्र कर्तव्य आहे. असे जर तुम्ही कराल तर कितीही दुःखद गोष्ट घडली तरी तुम्ही सहसा विचलित होणार नाही. तुमच्या मैत्रीचा परिसर विश्वासारखा अमर्याद असावा, तुमचे विचार भव्य आणि अपार असावेत, आणि त्यात द्वेषाचा लवलेश नसावा.

बुध्द धम्म आणि मानवी मन

मानवी मनावर बुध्दानं सखोल चिंतन केलं होतं मनाच्या(चित्ताच्या) अनेक कंगोऱ्यांवर त्यानी भाष्य केलं.

बुध्दाच्या शिकवणुकिनुसार मन सर्वांचे मूळ आहे, मन हे स्वामी आहे. मन हे कारण आहे माणसाचं मन सद्विचारांनी भरलेल असेल, तर त्याच्या हातून सत्कार्य घडतं. मनात दृष्ट विचार असणाऱ्या माणसाच्या हातून दुष्कर्मे होतात.

मनोपुब्बङ्गमा धम्मा मनोसेट्ठा मनोमया।
मनसा चे पसन्नेन भासति वा करोति वा।
मनोपुब्बङ्गमा धम्मा मनोसेट्ठा मनोमया।
मनसाचे पदुट्ठेन, भासति वा करोति वा।
ततो नं दुक्खमन्वेति चक्क व वहातो पदं।

धम्मपदाच्या यमकवग्गो मध्ये मानवी मनाविषयी तथागतानं ययार्थ विवरण केलं आहे. भावार्थ - मन सर्व प्रवृत्तींचे अग्र भागी आहे. मनच मुख्य आहे. सर्व प्रवृत्ती मनापासून उत्पन्न होतात. जर कोणी निर्मळ मनानं वचन बोलतो, किंवा काम करतो, तर सुख त्यांचं अनुसरण तसंच करतं, जसं कधीही सोबत न सोडणारी सावली. जर कोणी मलिन मनानं वचन बोलतो, किंवा काम करतो, तर दुःख त्याचं अनुसरण तसंच करतं, जसं गाडी ओढणाऱ्या बैलाच्या पायाचं अनुसरण गाडीची चाकं करतात. म्हणजेच बैलगाडीचं चाक जसं बैलाच्या मागं मागं लागतं, तसंच दुःख त्याच्या मागं लागतं.

अंगुलीमालासारखा अत्यंत क्रुर व रक्तपिपासू दरोडेखोराला सामोरं जातांना बुध्दांनीअंगुलीमालाला म्हटलं की, "तू कितीही दुष्ट असलास तरी तुझ्या मनाच्या कोपऱ्यात कुठेतरी चांगुलपणा वसत आहे.

अंगुलीमालानं धम्मदिक्षा घेवून भिक्खूचं पवित्र व श्रेष्ठ जीवन अंगिकारलं व पुढं तो अर्हतपदापर्यंत पोचला.

युध्द की बुध्द

बुध्द धम्म हा भारतभूमीतला प्राचीन धम्म. तो प्राचीन असूनही विज्ञाननिष्ठ आहे. अंधश्रध्दा, चमत्कार, अवतारवाद यांना बुध्दधम्मात यात्किंचितही स्थान नाही. मानवी कल्याण हे बुध्दधम्माचं अंतिम ध्येय आहे. बुध्दधम्म सर्वोत्तम जीवनमार्ग आहे. बुध्दानं दिलेला ज्ञाती व अहिंसेचा संदेश विश्वाला मार्गदर्शन करणारा आहे.

तरुण वयातच सिध्दार्थानं युध्दाला प्रखर विरोध केला. जेव्हा शाक्य व कोलिय यांच्यात रोहिणीच्या पाण्यावरुन तंटा झाला आणि युध्दजन्य परिस्थिती निर्माण झाली. शाक्यांच्या सेनापतीनं जेव्हा कोलियांच्या विरोधात युध्दाची घोषणा केली तेव्हा सिध्दार्थानं शाक्यांनी युध्दाचा टोकाचा निर्णय घेवू नये, शांततेच्या मार्गानं पाण्याचा वाद मिटवावा, असं शाक्यांना आवाहन केलं. तेव्हा सिध्दार्थानं अत्यंत मौलिक विचार मांडला. त्यानं म्हटलं, 'वैरानं वैर कधीच शमत नाही वैरावर प्रेमानंच मात करता येते'. जगात दोन जागतिक महायुध्दांतील महाभयानक संहार अनुभवला. आता जगापुढं युध्द की बुध्द हा एकमेव पर्याय आहे; आणि जगालाही बुध्दाचा शांततेचा व अहिंसेचा मार्ग पटतो आहे. जगाची पुनर्रचना बुध्द धम्मात अनुस्यूत आहे. बुध्द धम्म हा सद्धम्म आहे. गंगोत्रीच्या जलौघासारखा तो निर्मळ आणि पवित्र आहे.

बुध्दाच्या शिकवणूकीचं सार बुध्दगाथेतून व्यक्त करणं अधिक संयुक्तिक ठरेल.

'सब्ब पापस्य अकरणं। कुसलस्स उपसंपदा।
सचितयापरियोदपन एतान् बुध्दानं सासनं।'

प्रकाश खरात
सी-३६, हेमल अपार्टमेंट्स,
जनकल्याणनगर, खारोडी,
मार्वेरोड. मलाड (पं.), मुंबई - ९५
दूरध्वनी ९००४०७५२५७

गुरु अंतर्यामी

गुरु चरणाशी लिन होई तू
गुरुविण जीवन नाही हो।
गुरु ज्ञानाची अखंड सरिता
गुरु अंतरयामी ज्ञानी हो ।
ज्ञानाचे कण ज्यांनी वेचिले
जीवन त्यांना कळले हो
ते भवसागर तरले हो
बोल गुरुचे ज्यांनी गिळीले
जीवन त्यांना कळले हो
गंगौधासम शुभ गुरुवाणी
गुरु देवाच्या स्थानी हो ।
गुरुधन सारे वैभव अक्षय
कितीही त्याचे दान करा
गुरु नामाचा अगाध महिमा
निशिदिन त्याचे स्मरण करा ।।

शशिकांत तिरोडकर

धाव पाव नारायणा

देवा तुझी माया थोर
सारे ऋतू चमत्कार ।।१।।
दिन रात तुझा खेळ
नाही चुके तुझी वेळा ।।२।।
सूर्य, चंद्र येती जाती
तुझ्या दोन दीप ज्योती।।३।।
तुझे जग तूच माता
आणि पिता नाही चिंता।।४।।
सुख आले समाधान
दुःख आले समाधान ।।५।।
तुझे नाव माझा प्राण
तूच माझा नारायण ।।६।।
माझे इथे काही नाही
उमजले दुःख नाही ।।७।।
तुझे नाव तुझे ध्यान
त्यात रमे माझे मन ।।८।।
देह आता थकलेला
संसारात वाकलेला ।।९।।
तुझी ओढ लागे मना
धाव-धाव नारायणा ।।१०।।

सूर्यकांत मालुसरे

भगवान बुद्ध आणि त्यांचा विज्ञानवादी धम्म

डॉ. मंगेश बनसोड

जगाच्या तुलनेत भारताला मिळालेली महान उपलब्धी म्हणजे महाकारुणीक तथागत भगवान गौतम बुध्द आणि जगाला भगवान बुध्दाने दिलेला मानवतावादी, ओतप्रोत भरलेला, सबंध मानव कल्याणाचा विचार करणारा विज्ञानवादी 'बुध्द धम्म' होय. जगात भारताची ओळखच मुळी 'बुध्दाचा देश' अशी आहे.

कपिलवस्तुच्या राजा शुध्दोधन आणि महाराणी महामाया यांच्या पोटी इ.स. पूर्व ५६३ व्या वैशाख शुध्द पौर्णिमेला सिध्दार्थ गौतमाचा जन्म झाला. अत्यंत वैभवात आणि ऐश्वर्यात वाढलेल्या सिध्दार्थ गौतमाने आपल्या वयाच्या २९ व्या वर्षी सर्वसंगपरित्याग केला. आणि जगातील कलहामुळे घायाळ झालेला गौतम शांतता प्रस्थापित करण्यासाठी आणि दुःखाचे मूळ शोधण्यासाठी आत्मशोधाच्या दिशेने निघाला. प्रत्येक गोष्ट स्वतःपासून तपासून पाहण्याचा त्यांनी निश्चय केला. बुध्दाने आपल्या शिकवणुकीतून आणि अनुभवातून सर्वसामान्य माणसास धम्म सांगण्याचा प्रयत्न केला.

भगवान बुध्दाचा 'धम्म' हा पारंपारिक 'धर्म' या संकल्पनेहून भिन्न आहे. धम्म म्हणजे सदाचरण, याचा अर्थ असा की जीवनाच्या सर्व क्षेत्रात एका मनुष्याने दुसऱ्या मनुष्यास चांगली वागणूक देणे होय. भगवान बुध्दाचा धम्म सर्वांना 'स्वातंत्र्य' बहाल करतो. हे स्वातंत्र्य जीवन जगण्याचे आणि विचाराचे आहे. प्रज्ञा, शील आणि करुणेवर बुध्दाने भर दिला. प्रज्ञा काय आहे ? ती कशासाठी हवी ? प्रज्ञेचा अर्थ आहे बुध्दी. प्रज्ञेमुळे खोट्या प्रचारापासून आणि मान्यतेपासून मनुष्यास स्वतःला वाचवता येईल. शील मनुष्यास चारित्र्यवान बनवेल आणि करुणा म्हणजे दया, प्रेम, मैत्री ज्याशिवाय समाज जिवंत राहू शकणार नाही आणि समाजाची प्रगतीही होणार नाही. प्रज्ञा-शील-करुणा हे बुध्दाच्या धम्माचे तीन महत्त्वाचे स्तंभ आहेत.

प्रज्ञा आणि करुणेचे अलौकिक मिश्रणच तथागताचा धम्म आहे.

बुध्द धम्मात प्रार्थना, तीर्थयात्रा, कर्मकांड, रीतीरिवाज तसेच बळीप्रथा यांना कोणतेही स्थान नाही.उच्च - नीचतेला अजिबात स्थान नाही. कारण हा धम्म समानता मानणारा आहे. समानतेचा पुरस्कार करणारा आहे. बुध्द धम्मात 'आत्मा' या संकल्पनेला अजिबातच स्थान नाही. बुध्द धम्म पूर्णतः विज्ञानावर आधारित आहे. भगवान बुध्दाने प्रत्येक गोष्टीचा दाखला देऊन व अनुभव घेऊनच धम्माची रचना केलेली आहे. त्यामुळे खोट्या, थोतांड, पोथीनिष्ठ गोष्टींना बुध्द धम्मात कुठेही थारा नाही.

भगवान बुध्दाचा कर्म सिध्दांत

भगवान बुध्दाने सांगितलेला 'कर्मसिध्दांत' ब्राह्मणी धर्माने सांगितलेल्या कर्मसिध्दांताहून पूर्णतः भिन्न आहे. कारण ब्राह्मणी धर्माने सांगितलेला 'कर्मसिध्दांत' आत्म्याच्या मान्यतेवर आधारित आहे आणि बुध्द धम्मात 'आत्मा' च नाकारलेला आहे. ब्राह्मणी धर्माचा कर्मसिध्दांत हा 'वंशानुगत' मानला आहे, तो एक जन्मापासून दुसऱ्या जन्मापर्यंत चालत राहतो आणि बुध्द धम्म तर आत्माच मानत नाही.

बुध्दाने सर्वप्रथम सांगितले की 'जे पेराल, तेच उगवेल'. त्यांच्या मते कर्मसिध्दांत निश्चयपूर्वक जर मानला नाही तर नैतिक शिस्त टिकाव धरु शकणार नाही. बुध्दाच्या कर्मसिध्दांताचा संबंध केवळ 'कर्माशी' होता आणि तेही वर्तमान जन्माच्या कर्मावरुन. त्यामुळेच माणसाचा जन्म गरीब किंवा श्रीमंत घरात होणे, हे पहिल्या जन्माचे पाप किंवा पुण्य आहे. असल्या भ्रामक गोष्टींना बुध्द धम्मात अजिबात स्थान नाही.

बुध्दाची अहिंसा

'अहिंसा' अथवा जीव-हिंसा न करणे हे बुध्दाच्या शिकवणीतील महत्त्वाचे अंग आहे. त्याचा करुणा तसेच मैत्रीशी अत्यंत निकट्या संबंध आहे. एक गोष्ट इथे स्पष्ट करावी लागेल की बुध्द 'जीव-हत्या करण्याची प्रेरणा' आणि 'जीव-हत्या करण्याची आवश्यकता' यामध्ये भेद करतात. जीव-हत्या करणे जिथे आवश्यक आहे तिथे त्या हत्येला बुध्दाचा विरोध नाही. मात्र जीव हत्या करण्याच्या प्रेरणेला त्यांचा विरोध केला. त्यामुळे बुध्दांचा 'अहिंसे'चा मार्ग हा मध्यम मार्ग होय.

बुध्द जीवनमार्ग :

बुध्द जीवनामार्गात कुशल कर्माला महत्त्व आहे. जीवनात कुशल म्हणजे चांगले काम करा अकुशल किंवा वाईट कामाला थारा देऊ नका. किंबहुना कोणतेही असे वाईट काम करु नका ज्यामुळे पश्चाताप करण्याची पाळी येईल किंवा ज्याचे फळ रडत-रडत भोगावे लागेल. कारण कुशल कर्माची फळे ही कुशल व अकुशल कर्माची फळे अकुशल मिळतात व ती याच जन्मात मिळतात. त्यामुळे मनुष्याने कधीही चांगले व पवित्र काम करावे, पाप करु नये. कोणत्याही पापापासून दूर रहावे.

लोभ आणि तृष्णा

मनुष्याने लोभ आणि तृष्णेपासून स्वतःला वाचविले पाहिजे. कारण भगवान बुध्द म्हणतात की लोभ आणि तृष्णा हे दुःखाचे मूळ कारण आहे. धन दौलतीच्या वर्षावानेही मनुष्याच्या कामनेची पूर्तता होत नाही. बुध्दिमान माणसाला याचे ज्ञान आहे की धन-दौलत-पैशाने क्षणिक आनंद मिळू शकतो मात्र त्यात दुःखच अधिक असते. तृष्णा आणि लोभामुळे दुःख निर्माण होते. तृष्णा, भय निर्माण होते. जो तृष्णेपासून आणि लोभापासून मुक्त आहे त्याला ना दुःख आहे, ना भय आहे.

जो मनुष्य शीलवान आहे. जो प्रज्ञावान आहे, जो न्यायी आहे. जो सत्यवादी आहे तसेच जो आपले कर्तव्य पूर्ण करतो अशा माणसावर लोक प्रेम करतात.

क्लेश आणि द्वेष :

भगवान बुध्द आपल्या धम्माचा उपदेश करतांना सांगतात की, कुणाचाही द्वेष करु नका किंवा कुणालाही क्लेश म्हणजे दुःख देऊ नका. श्रध्दा, शील, वीर्य, समाधी, सत्य, विद्या, आचरण आणि स्मृती याद्वारे दुःखाचे निर्मुलन करा.

क्षमाशील असणे ही सर्वात मोठी तपश्चर्या आहे. 'निर्वाण' सर्वात मोठे सुख आहे. आपल्या शब्दाने कुणालाही दुखवू नका. कुणालाही कोणतेही दुःख देऊ नका. विनयाने आणि संयमाने राहणे ही बुध्दाची शिकवण आहे. स्वतःला क्रोधापासून मुक्त करा. शत्रुता विसरुन जा. आपल्या शत्रूंवर मैत्रीने विजय मिळवा.

भगवान बुध्दाची साधी सोपी शिकवण

सन्मार्गाने पुढे जाण्यासाठी मनुष्याचे मनच पहिले साधन आहे. त्यामुळे प्रत्येक बाबतीत माणसाचे मनच सर्वस्व आहे. माणसाने बुध्दिमान असले पाहिजे किंवा झाले पाहिजे. न्यायप्रिय असले पाहिजे आणि चांगली संगत ठेवली पाहिजे.

प्रत्येक कार्य करताना मनुष्याने जागरुक राहिले पाहिजे. प्रत्येक काम हे विचारपूर्वक आणि उत्साहाने केले पाहिजे. त्यात कुठलाही भेदभाव असू नये.

आम्ही जे काही आहोत तो सर्व आमच्या

विचारांचा परिणाम आहे. हे सर्व आमच्या विचारांवर आधारित आहे. ही सर्व आमच्या विचारांचीच निर्मिती आहे. जर मनुष्य वाईट विचार करुन एखादी कृती करत असेल किंवा बोलत असेत तर तो दुःखच भोगेल. आणि जर मनुष्य चांगल्या वा पवित्र विचारांनी बोलत असेल किंवा कृती करत असेल तर त्याला सुख मिळेल. म्हणून सदोदित पवित्र विचार मनात असणे महत्त्वाचे आहे. म्हणून भगवान बुध्द म्हणतात की विचारवंत बना.

कोणीही खोटे बोलू नये. कोणीही कुणालाही खोटे बोलण्याची प्रेरणा देऊ नये आणि कोणीही, कुणाच्याही खोटे बोलण्याचे समर्थन करु नये.

आयुष्यात सन्मार्गाने मार्गक्रमण करा. त्या मार्गावरुन विचलीत होऊ नका. आयुष्य पार करण्याचे अनेक मार्ग असतात मात्र सर्वच सन्मार्ग नसतात. सन्मार्ग हा ठराविकच लोकांना किंवा थोड्याच लोकांना सुखी करण्याचा मार्ग नसून तो सर्वांनाच सुखी करणारा मार्ग आहे.

जो मनुष्य खऱ्याला खोटे आणि खोट्याला खरे मानत असेल अशी खोटी दृष्टी ठेवणाऱ्यांना सत्याचा शोध कधीच लागू शकणार नाही. तेव्हा जगाकडे सम्यक दृष्टीने पहावयास शिका.

भगवान गौतम बुध्दाचा वैज्ञानिक दृष्टीकोन:

भगवान बुध्दाच्या बुध्द धम्मात (धर्मात नाही) वैज्ञानिक दृष्टीला अत्यंत महत्त्व आहे. बुध्द धम्म खोट्या, थोतांड गोष्टींवर विश्र्वास ठेवायला तयार नाही. बुध्द धम्मात ईश्वराला थारा नाही. देवाने ही सृष्टी निर्माण केली. ही गोष्ट बुध्द धम्माला मान्य नाही. त्याला कोणताही वैज्ञानिक आधार गवसत नाही. बुध्द धम्मात यज्ञ, कर्मकांड, ईश्वर पूजा, मूर्तीपूजा ई. गोष्टींना अजिबात थारा नाही.

बुध्द धम्म सर्व मानवजात समान आहे असे मानतो. बुध्द धम्मात स्त्री-पुरुष समानता मानली गेली आहे. कोणत्याही प्रकारच्या भेदाभेदाला बुध्द धम्मात थारा नाही. कोणत्याही पोथीनिष्ठ खोट्या गोष्टींवर बुध्द धम्म विश्वास ठेवत नाही. किंबहुना ज्या गोष्टी अनुभवाने किंवा बुध्दीच्या कसोटीवर घासून सिध्द झाल्या आहेत त्याच गोष्टींना इथे सत्य मानले गेले आहे. बुध्द धम्मात कोणतीही जातीव्यवस्था नाही. सर्व मनुष्यगात (स्त्री-पुरुष वा अन्य) ही एकच असून बुध्द धम्मात यायला व बुध्द धम्माचे आचरण करण्यास कुणालाही मज्जाव नाही.

बुध्दाने स्वतःला कधीही, कुठेही देव किंवा प्रेषित म्हटले नाही की, मानले नाही, त्यामुळे ईश्वराचे अस्तित्व नाकारणाऱ्या बुध्द धम्मात बुध्दालाही कोणीही देव किंवा प्रेषित मानत नाही तर बुध्द हा मार्गदाता आहे, असेच मानले जाते.

बुध्दाने आपल्या अनुयायांना प्रत्येक गोष्टीवर अनुभवाच्या व बुध्दीच्या कसोटीवर घासून सिध्द झाल्यावरच विश्वास ठेवावयास सांगितला आहे. त्यामुळे बुध्द धम्म हा पारदर्शक आणि शुध्द असा धम्म आहे.

थोडक्यात...बुध्द धम्म हा विज्ञानवादी धम्म आहे. समस्त प्राणीमात्रास दुःखापासून मुक्ती मिळवून देण्यासाठी व त्यांचे जीवन सन्मार्गाने चालून सुखी करण्यासाठी बुध्दाने घालून दिलेला उत्तम जीवनमार्ग आहे. जो या मार्गावरुन चालेल तो कोणत्याही चमत्कारिक व अध्दुत अशा खोट्या गोष्टींना न घाबरता निर्भयपणे, स्वतंत्रपणे आणि विचार व बुध्दीच्या जोरावर आपले मार्गक्रमण करु शकेल व आपले जीवन समृध्द व सुखी करु शकेल.

।। सब्बे सत्ता सुखी होन्तु ।।

डॉ. मंगेश बनसोड
इ-५, प्राध्यापक सहनिवास,
मुंबई, विद्यापीठ, विद्यानगरी, कालिना,
सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ९८
संपर्क : ९९२०४२०३८८

जीवन जगण्याची कला

विपश्यना एक अनुभव

धर्म न हिंदू बौद्ध है. धर्म ना मुस्लिम जैन।
धर्म चित्तकी शुद्धता. धर्म शांती सुख चैन।।

विपश्यनेचा उल्लेख ऋग्वेदात सापडतो. परंतु मध्यंतरीच्या काळात लुप्त झालेली ही विद्या २५०० वर्षापूर्वी गौतम बुद्धांनी पुन्हा जगासमोर आणली. ही संपूर्ण साधना गौतम बुद्धांनी दुःख मुक्तीसाठी शोधून काढलेला एक साधना मार्ग आहे. ही साधना अत्यंत शुद्ध स्वरूपात विपश्यनेत गुरू शिष्य परंपरेने जनत केली गेली. पुढे ती ५०० वर्षे भारतात राहिली व तद्नंतर ती हळुहळु आपल्या देशातून लुप्त झाली. मात्र आपल्या शेजारील एका देशाने ब्रह्मदेशाने तिचे शुद्ध स्वरूपात जतन केले. तेथील सयाजी उबा खिन यांचेकडून पूज्य श्री. सत्यनारायणजी गोयंका यांना तिची प्राप्ती झाली. गोयंकाचे पूर्वज हे ब्रह्मदेशात धंद्यासाठी गेले होते व नंतर ते तेथेच स्थायिक झाले. गोयंका यांनीही धंद्यात खूप लक्ष धातले व वयाच्या ४० वर्षीच अमाप धन कमावले. परंतु त्या बरोबरच ते मायग्रेन (अर्धशिशि) ह्या भयंकर असाह्य रोगाने पछाडले गेले. ह्या रोगाचा अटॅक दर १५ दिवसांनी यायचा व महाभयंकर वेदना व्हायच्या. त्यावर उपचार म्हणून डॉक्टर मॉरफीनचे इंजेक्शन देत व त्या औषधाच्या गुंगीत तो अटॅक जाईपर्यत रहावे लागे. डॉक्टरांनी पुढे चालून असे सांगितले की काही दिवसांनी मॉरफीनची शरीरास सवय लागेल व ते नियमीत घ्यावे लागेल. तेव्हा परदेशात यावर यापेक्षा काही दुष्परिणाम न होणारे औषध असल्यास पहा. तेव्हा त्यांनी अमेरिका, इंग्लंड, जपान व जर्मन अशा बऱ्याच ठिकाणी औषधोपचार केला. परंतु आजार बरा होण्याऐवजी वाढतच गेला. तेव्हा एका मित्राच्या सल्ल्यावरून ते सयाजी उबाखिन यांचेकडे गेले व ही साधना शिकविण्याची त्यांना विनंती केली. हिंदूचा एक नेता आपल्याकडे येतो खरी ही चांगली गोष्ट आहे. तसेच धर्म सर्वांसाठी आहे तेव्हा त्यांनी होकार दिला. परंतु बोलण्याच्या ओघात ते हे बोलले की त्यांना वरील आजाराने पछाडलेले आहे व त्यासाठी विपश्यना त्यांना शिकावी वाटली. त्यावर तात्काळ गुरूजी कठोर स्वरात उत्तरले की एक मामूली आजार दूर करण्यासाठीच ही धर्माची विद्या शिकायची असेल तर ती मी शिकविणार नाही. जेव्हा तूला खऱ्या अर्थाने धर्म शिकावा वाटेल तेव्हा ये. काही वेळाने मात्र मोठ्या प्रेमाने त्यांनी सांगितले की विपश्यना साधना (धर्म) मनाचे केवळ अनेक वर्षापूर्वीचे विकार काढून टाकीत नाही तर अनेक जन्माजन्मांतरीचे विकार काढणारी साधना आहे. एखादी व्यक्ती साखर कारखाना उभारतो तो साखरेचे उत्पादन करण्यासाठी मळीच्या उत्पदनासाठी नाही. मळी हे बायप्रॉडक्ट आहे. साखर हवी तर मळी ही मिळणारच. तद्धतचविकार उत्पन्न केले. मन मलीन केले की दुःख हे होणारच व त्यबरोबर वरील आजारासारख्या मनोशारिरीक व्याधी (Psycho-aometilo Disorder) ही मागे लागणार. मन शांत व निर्मळ झाले व जुन्या विकारांच्या गाठी व गुंते सुटले व नवीन विकारांच्या गाठी निर्माण होऊ नयेत ह्यासाठी धर्माचरण- म्हणजेच शील. सदाचार व मैत्री व करूणा ह्यांनी ते भरले की हा आजार (विकार) आपोआप निघून

जाईल कारण हा आजार मनाशी संबंधीत आहे व ही सर्व साधना म्हणजे तरी काय आहे तर मनाचे विकार काढणारी साधना आहे. गुरूजींचे हे म्हणणे त्यांना पटले व ते ही विद्या शिकले व तिचा त्यांना लाभ झाला. पुढे १४ वर्षापर्यंत त्यांनी तिचा अभ्यास केला व गुरूंच्या आज्ञेवरून भारतात व जगभर ह्या कल्याणारी विद्येच्या प्रसारात गेली ३० वर्षे त्यांनी आपले आयुष्य वाहून घेतले. तिचा आपणासही लाभ व्हावा व आपले मंगल व्हावे, कल्याण व्हावे, आपले जीवन दुःख मुक्त व्हावे तेव्हा जर आपणास प्रेरणा झाली तर ती आपण एखाद्या केंद्रातच प्रथम शिकून घ्यावी. विपश्यना इंटरनॅशनल अकॅडमी, इगतपुरी, जि. नाशिक येथे अत्यंत रम्य, पवित्र व शांत निसर्गसानिध्यात ह्या विद्येचा साधना विधी विनामुल्य शिकवला जातो. सर्व जाती, धर्म व पंथाच्या व श्रद्धेच्या लोकांना ते खुले आहे. ह्यासाठी आपणास आपली जाती, धर्म व पंथाचा वा श्रद्धेचा त्याग करावा लागत नाही. सदाचाराची शिकवण सोडून देऊन कर्मकांडानाच आपण धर्म समजतो. सदाचारी बनणे. शीलवान होणे व सर्वांशी मैत्री भाव ठेवणे, शांतीचे व विकाररहीत जीवन जगणे व दुःखापासून मुक्ती मिळवणे हाच खरा धर्म आहे. ही विद्या ह्याच धर्मावर आधारीत आहे. शील, समाधी व प्रज्ञा ह्या अंतर्गत अष्टांग मार्गाचे अनुसरण करीत ती दुःखापासून मुक्ती तसेच सुख, शांती व समाधान यांची प्राप्ती करून देते. ज्यांनी ज्यांनी ही विद्या धारण केली त्यांना तिचा लाभ झाला, ही विद्या आपणास खऱ्या व शुद्ध धर्माकडे जाण्याचा मार्ग दाखविते. खरा धर्म आपणास कोणत्याही सांप्रदायात अडकवून किंवा जखडवून ठेवीत नाही अशा सार्वजनिक व सर्वव्यापी धर्माची प्रचीती आपणास श्री. सत्यनारायजी गोयंका यांच्या पुढील दोह्यावरूनच होईल.

धर्म न हिंदू बौद्ध है. धर्म ना मुस्लिम जैन।
धर्म चित्तकी शुद्धता. धर्म शांती सुख चैन।।

विपश्यना ही साधना अंतर्बाह्य चित्ताची व शरीराची शुद्धता करते व असे झाले तरच तो धर्म धारण करता येतो. जसे एखाद्या स्वादीष्ट फळाचे केवळ वर्णन ऐकून ते फळ खाण्याची तीव्र इच्छा होईल परंतु प्रत्यक्ष ते फळ खाल्ल्याशिवाय त्याचा स्वाद आपणास मिळणार नाही. तद्वतच ही विद्या बौद्धिक पातळीवर केवळ समजावून घेऊन कोणताही लाभ मिळणार नाही ती धारण करण्यानेच खरा लाभ मिळतो. जो ही विद्या (धर्म) धारण करून भवसागर पोहायला शिकेल तोच भवसंसार तरेल. 'ध धारयती धर्म ' म्हणजे धारण केला तरच धर्म कल्याण करील.

अलीकडच्या काळात काही संत महात्मे उदा. संत गुरू नानक, संत ज्ञानेश्वर. संत एकनाथ आदिनी विपश्यनेचा अनुभव घेतला. त्यामुळेच ते परम सुख व शांतीचे धनी झाले व म्हणूनच सद्गुण व सदाचाराची, मैत्रीभावाची व व करूणेची शिकवण त्यांनी जगाला दिली, परंतु ज्या प्रकारे गौतम बुद्धाने इतरांना शिकविण्या इतपत ही विद्या प्राप्त झाली तशी त्यांना ती शुद्ध स्वरुपात मिळाली नाही व म्हणूनच त्याना ती इतरांना शिकविता आली नाही. आजही निरनिराळ्या धर्मात व पंथात वेगवेगळ्या स्वरूपात ही विद्या आपणास पाहावयास मिळते परंतु ती विपश्यनेत ज्या शास्त्रशुद्ध पद्धतीने जतन केली व शिकवली जाते त्या शुद्ध स्वरूपात राहिलेली नाही.

पूर्वीच्या काळी ऋषी-मुनिंनी आपल्या स्वतःच्या शरीरासच प्रयोगशाळा मानून निरनिराळे प्रयोग केले व त्यातूनच वेद निर्माण झाले. वेद...म्हणजे स्वतःच्या शरीराच्या वेदनांच्या साह्याने जे प्रत्यक्ष अनुभवले ते. तेच त्यांनी इतरांना सांगितले. परंतु कालातराने ती अनुभूती घेण्याएवजी लोक फक्त श्लोक पाठ करण्यात गुंतले व त्यामुळे ते अनुभूती पासूनच दूरच राहिले. काही चांगली अनुभूती मिळेना म्हणून तिच्यावरील लोकांचा विश्वास संपुष्टात आला. कोणीतरी अनुभव घेतला म्हणून आपण विश्वास ठेवू असा काळ आता नसून प्रत्यक्ष स्वतः अनुभवले तरच आपण एखाद्या गोष्टीचा स्विकार करू. विपश्यना साधना ही सुद्धा स्वतःच्या अनुभूतीवर उतरणाऱ्या सत्याचाच स्विकार करायची साधना आहे. ही सर्व साधना सत्य व निसर्गनियम (जो की खरा धर्म आहे) अनुभवावर समजावून घेऊन त्यापासून मिळणारे लाभ पदरात पाडून घेण्यासाठीचीच आहे.

सर्व चराचर सृष्टीस निसर्गाचे एकच शाश्वत नियम लागू आहेत. त्याचे पालन केल्यास आपण त्यांच्यापासून मिळणाऱ्या लाभांचे धनी होतो व जर त्या नियमांचे पालन केले नाही तर आपणास निसर्ग म्हणा की देव म्हणा लगेच दंडीत करतो. हे नियम सर्व प्राणीमात्रांना सारखेच लागू आहेत व मानव हाही ह्या सृष्टीचाच भाग असल्याने तो ही ह्यास अपवाद नाही. ही बाब बौद्धीक पातळीवर जरी माहिती असली तरी प्रत्यक्ष तिची अनुभूती आपल्या स्वतःस नसल्याने आपण ती स्विकारण्यास चालढकल करतो व नाहक लोभ, द्वेष, क्रोध, संताप व त्यामुळे येणाऱ्या दुःखाचे धनी होऊन बसतो.

विपश्यना या शब्दाचा अर्थ-विशेष रितीने पहाणे. विपश्यना साधनेच्या माध्यमातून आपल्या मनाचा व शरीराचा कसा संबंध आहे याचे ज्ञान होते. आपल्या मनास नेहमी एकतर भूतकाळातील बऱ्या वाईट घटनांचा विचार किंवा भविष्याबद्दल साशंक राहून वर्तमान दुःखी करण्याची सवय जडलेली असते. आपल्या जीवनाच्या दृष्टीने वर्तमानच महत्वाचा असतो. आपले अंतर्मन हे नेहमीच शरीर व त्यास होणाऱ्या वेदनांशी जोडलेले असते. तसेच ह्या वेदना फार काळ टिकण्याऱ्या किंवा कायम स्वरूपी राहणाऱ्याही नसतात. त्या अनित्य असतात.

सब्बे संकारा अनित्यः असे प्राचीन भाषेत गौतम बुद्धाने त्यास म्हटले आहे. एखादी चांगली किंवा वाईट गोष्ट पचेइंद्रियांद्वारे मेंदूला कळते तेव्हा प्रथम ती वेदना किंवा हल्लीच्या भाषेत संवेदनांचा अर्थ मेंदू पूर्वज्ञानावरून लावतो व मगच ती अनुभूती सुखद किंवा दुःखद असल्याचे आपणास समजते. स्वतः ही संवेदना सुखद किंवा दुखद नसते. तर मेंदू तिचा अर्थ कसा लावतो त्याप्रमाणे ती आपणास जाणवते. चांगल्या अनुभूतींची अधिकाधिक आशा आपण करीत राहतो तसेच दुःखद अनुभूतीची भिती वाटते व ती दूर लोटण्याचा आपले मन सतत प्रयत्न करीत रहते. ह्या दोहोंचाही परिणाम अंतिमतः दुख वाढविण्यातच होतो. त्यातूनच आपण सुख किंवा दुःखाचे वर्धन करीत असतो. त्याने सुख किंवा दुःखाची आवाजवी वाढ होते. सुख किंवा दुःख दोन्हीही अनित्य आहेत.

एका मागून दुसरे येते व तसेच जातेही प्रकाशमान दिवसामागून ठराविक वेळेनंतर काळ रात्र येतेच हा जसा सृष्टीचा नियम आहे तसेच सुख किंवा दुःखाचे आहे. कोणतीही एक स्थिती ह्या विश्वात अनंत काळ टिकणारी नाही. क्षण प्रतिक्षण बदल अव्याहतपणे चालूच असतो व म्हणूनच तर छोट्याशा रोपट्याचे कालांतराने मोठ्या वटवृक्षात रुपांतर झालेले आपणाला दिसते. जसे बीज आपण पेरू तशीच फळे धारण करणाऱ्या वृक्षात पुढे त्याचे रुपांतर होणार. बीज दुष्कर्माचे पेरले तर फळही तसेच येईल. परमेश्वराचे कितीही नामस्मरण केले, घोष केला, जप केला तरीही कडुनिंबाच्या बीजापासून आंब्याची मधूर फळे देणारा ईश्वर ह्या जगात नाही. तसेच बीज जर आंब्याचे लावले तर काहीही जपताप केले नाही तरी त्यास आंब्यांचेच मधुर फळ येईल हा जो निसर्गाचा नियम तो सर्वांना सारखाच लागू आहे. हे ज्यास समजले त्याला ईश्वर प्राप्ती झालीय. अन्यथा तो इतरत्र भटकत राहील.

आपले शरीरही या नियमास आपवाद नाही. म्हणूनच तो धर्म आपल्या शरीराच्या माध्यमातून आपण विपश्यना साधनेद्वारे समजावून घेतो. जे कधी ना कधी संपणारे आहे त्याचा हव्यास धरणे योग्य नाही ही गोष्ट जरी आपणास बौद्धीक पातळीवर चांगल्या प्रकारे समजली तरी ती आचरणात आणता येत नाही कारण आपले अंतर्मन हे नेहमी शरीरास जुटलेले असते व जो पर्यंत शारीरीक वेदनांच्या माध्यमातून अंतर्मनाचे पूर्व संस्काराचे विकार मुळासकट काढून टाकले जात नाहीत तो पर्यंत खरी शांती व चैन आपणास मिळत नाही. वैचारिक पातळीवर जरी काही काळ चिंतन व मनन करून आपण शांती प्राप्त केली तरी ती फक्त

वरवरची बाह्य अशी शांतीची अवस्था असते ती टिकावू असत नाही. विपश्यना साधना शारिरीक वेदनांकडे तटस्थपणे पाहण्यास शिकवते व त्या आधारे अंतर्मनात खोलवर रुजलेले लोभ, द्वेष, क्रोध संताप इ. विकार कायमचे काढून टाकून मन व शरीर शुद्ध व निर्मळ बनविते. विपश्यनेद्वारे आपणास हे कळते की सर्व शरीरभर फक्त कंपनेच कंपने असतात व विजेच्या गतीने ते निर्माण होतात व नष्ट ही होतात व पुन्हा निर्माण होतात हे चक्र अव्याहतपणे चाललेले असते. आपल्या मनात कोणताही विकार आपण जागविला की ही कंपने एकदम वाढतात व त्यांना जर आपण प्रतिक्रिया दिली तर त्यांचे वर्धन अनेक पटीने होते व आपल्या दुःखाची वाढच होते.

आपल्या संपुर्ण शरीरात काहीना काही जीव रसायनिक प्रतिक्रिया किंवा हालचाली सतत होत असतात. आपल्या मज्जासंस्थेचे सर्व शरीरावर नियंत्रण असते. शरीराकडून सतत संदेश मेंदूकडे येत असतात व वेळवेगळ्या अवयवांकडून आलेल्या संदेशांचा अर्थ समजावून घेऊन त्यांचे गरजेप्रमाणे त्यांचेकडे आवश्यक गोष्टीची पूर्तता करणे हे काम ही संस्था करीत असेत. परंतु ह्या कार्यात कालांतराने बिघाड निर्माण होतो व काही भागांचे भरण पोषण नीट होत नाही. ह्याचा परिणाम म्हणून मनोशारिरीक व्याधी व इतर व्याधिंचे आपण बळी पडतो. विपश्यना साधना करतांना वाढलेल्या वेदना व जीवशारिरीक विद्युत लहरी (Bio Electromagnetic waves) मुळे ह्या संदेशवहनात तयार झालेले अडथळे व बांध तुटू लागतात व ह्या लहरींचा मुक्त व सहज संचार संपूर्ण शरीरात होतांना आपल्यास अनुभव येतो ही संदेशवहन यंत्रना पूर्ववत होते व त्यामुळे निरनिराळ्या व्याधिंचे उच्चाटन होण्यास मदत होते. जुन्या सवयी सोडणे सोपे होते. विपश्यनेमुळे शरीर ही शुद्ध होते.

प्रत्येक घटनेकडे तटस्थपणे पहाणे हेच आपल्या सुखाचे गमक असल्याचे लक्षात येते व विपश्यना साधनेद्वारे हे आपण सहज साध्य करू शकतो. व ह्या साठीच आपण सदाचारी, शीलवान, क्रोध व द्वेष रहीत जीवन जगले पाहिजे. ते दुसऱ्यासाठी नाही तर आपल्यासाठीच. कारण आपण निसर्गाचे विरूद्ध कोणतीही गोष्ट केली तर लगेच निसर्ग शिक्षा करतो तसेच निसर्ग नियमांना धरून वागले तर तो त्वरीत पुरस्कारही देतो ही गोष्ट साधकास चांगल्या रीतीने समजते व तो आपोआपच तसे वागतो. निसर्ग नियमाप्रमाणे वागणे यालाच धर्म असे म्हणतात. तो कोणत्याही कर्मकांडात नाही ह्यासाठीच पंचशिलांचे पालन करून मध्यम मार्गाने जीवन जगणे हे महत्वाचे आहे. पूर्वी आपणास नाचविणाऱ्या मनास ह्या साधनेमुळे आपण आपल्या मर्जी प्रमाणे नाचवू शकतो. आपण नेहमीच बहिर्मुखी असतो. विपश्यना साधना म्हणजे अंतर्मूखी होऊन आपणच आपल्या साडेतीन हात कायेचे निरीक्षण एकाग्र चित्ताने व तटस्थ भावाने करायचे. आपणच आपल्या शरीराला आपल्या मनाने पहावयाचे विपश्यना साधना ही दोन विभागात विभागली गेलेली आहे. १० दिवसाच्या शिबीरात पहिले तीन दिवस आनापान शिकविले जाते व नंतर चौथ्या दिवशी प्रत्यक्ष विपश्यना शिकवली जाते. आनापान म्हणजे आपल्या शासोच्छवासाच्या आवागमनावर लक्ष केंद्रीत करून मनाची एकाग्रता वाढविणे व ते सूक्ष्म करणे. त्यानंतर नासीका व नासीकेजवळच्या वरच्या ओठाच्या भागावरील संवेदनांची जाणीव



करून घेण्याची सवय करणे विपश्यनासाधनेसाठी आपण ध्यान धारणेसाठी बसतो तसे आपल्याला जमेल तशी मांडी घालून बसावे लागते. डोळे बंद ठेवावेत शक्यतोवर मांडीची घडी मोडू नये किंवा मांडी हलवू नये. त्यामुळे शरीरात वेदना काही एक ठराविक क्षणापर्यंत वाढत जातात व त्या वेदनांकडे तटस्थतेने समता भावाने बघण्याचा अभ्यास म्हणजे विपश्यना. ह्या वेदनाद्वारे आपण आपल्या मनातील विकार काढून टाकू शकतो. डोक्याच्या टाळूपासून सुरूवात करून शरीराच्या सर्व अवयवांचे व संपुर्ण शरीराचे वरून खाली व खालून वर असे निरीक्षण शांत, स्थिर मनाने व एकाग्र चित्ताने करणे व हे निरीक्षण करीत असतांना होणाऱ्या वेदना - सवेंदनाकडे तटस्थतेच्या भावाने पहाणे. सुखद किंवा दु:खद वेदना संपूर्ण शरीरभर निर्माण होत व नष्ट होत असल्याची अनुभूती आपणास येईल. संवेदना कशी ही असली तरी ती अनित्यच असते हे आपणास चांगले कळून येते. कोणत्याही प्रकारची संवेदना टिकून रहात नाही. सुरूवातीस ह्या संवेदना फार कठीण व स्थूल भासतात व अधिक काळ टिकतात परंतु कालांतराने त्या ठिसूळ व सूक्ष्म होतात व फारच जलद गतीने उत्पन्न होतात व नष्ट होतात. त्यांच्या अनित्य स्वभावाची आपणास चांगलीच कल्पना येते. ह्या वेदनांना जर आपण चांगले समजून त्यासाठी अधिक हवे आधिक हवे असे किंवा वाईट समजून त्यांना दूर लोटण्याचा जर प्रयत्न केला तर आपल्या दु:खात आपण भरच टाकीत असल्याचे आपल्या लक्षात येते. म्हणूनच त्यांचेकडे तटस्थतेने पहाणे व त्यांच्या अनित्य स्वभावाची अनुभूती घेणे त्यातूनच दु:ख मुक्तीचा मार्ग दिसतो. जी गोष्ट अनित्य आहे. नश्वर आहे. क्षणभंगूर आहे तिचा ध्यास धरून जीवन दु:खी करून घेणे योग्य नाही ही गोष्ट आपणास स्वानुभवातून कळते. तसेच वेदनांकडे तटस्थ भावाने पाहिल्याने जुने संस्कार पुसले जातात व त्यांचे ओझे उतरल्याने मन शांत व निर्मळ होते. भूतकाळात किंवा भविष्यकाळात रमण्याऐवजी मन आता वर्तमानात राहायला शिकते. त्यामुळेच कामावरील एकाग्रता व कामाचा उरक वाढतो हे फायदे सर्वसाधारण साधकास तात्काळ दिसून येतात. मला स्वत:ला ह्याचा चांगला फायदा होत असल्याचा अनुभव आहे. मनाची शांती, एकाग्रता व प्रसन्नता वाढली. कामात लक्ष वाढले तसेच शारिरीक दृष्ट्याही अनेक फायदे दिसून आले.

ही अनुभूती बौद्धिक पातळीवर येऊच शकत नाही म्हणूनच विपश्यनेवर चर्चा करण्यापेक्षा एकदा दहा दिवसीय शिबीरात जाऊन प्रत्यक्ष तिचा स्वतः अनुभव घ्या व सुख शांतीचे धनी व्हा. आपण आपले व त्याचबरोबर इतरांचेही कल्याण करूया हीच मंगल कामना.

भवतु सब्ब मंगलम्

व्ही.व्ही. गुठे

दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !

"दिवाळी म्हणजे संस्कृतिची जोपासना
दिवाळी म्हणजे लक्ष्मीची उपासना
दिवाळी म्हणजे स्नेहाचा फराळ
दिवाळी म्हणजे पवित्र नात्याची आराधना"

सुंदर ते ध्यान

सौ. रेखा नार्वेकर

संतकृपा झाली । इमारत फळा आली ।
ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया ।
नामा तयाचा किंकर । तेणे केला हा विस्तार ।
जनार्दनी एकनाथ । स्तंभ दिला भागवत ।
तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ।।

संत बहिणाबाईने इमारतीच्या रूपकातून सांगितलेला हा वारकरी संप्रदायाचा चढता आलेख आहे. किंबहुना हा मराठी वाङमयाचा, मराठी संस्कृतीचा इतिहासच म्हणायला हवा. हा इतिहास घडवणारी संत मंडळी लोकोत्तर, अलौकीक अशी होती. संत ज्ञानदेवांनी भक्तिपंथाचा पुरस्कार केला. संत नामदेवांनी नित्य कार्यरत राहून भक्तिमार्गाचा प्रचार, प्रसार केला. आणि निवृत्तीनाथ, सोपानदेव, मुक्ताई, चांगदेव, परसा भागवत, सावतामाळी, नरहरी सोनार, सेना न्हावी, गोरा कुंभार, चोखा महार, एकनाथ या सर्व जाती पंथाच्या महान संतानी एकरूप होऊन भागवत धर्माची सेवा आपल्या साहित्यातून,अभंग ओव्यांमधून सतत करण्याचा प्रयत्न केला. मात्र संत तुकारामांनी या भक्तिपरंपरेचा गाठलेला कळस म्हणजेच सर्वसामान्य माणसानं संसारातील अडीअडचणींना तोंड देत, टक्केटोणपे खात स्वत:चा केलेला उद्धार म्हणायला हवा.

या सगळ्या संतानी आपल्या अभंगवाणीतून अखिल मानवजातीचं एकच कुटुंब आहे हे पुन्हा पुन्हा प्रतिपादन केलं. त्याच प्रमाणे जळी स्थळी काष्टी पाषाणी सर्वत्र एकच परमेश्वर स्वरूप सामावून राहिलं आहे. हा परमेश्वर प्रत्येक माणसात आहे, असं सांगून आत्मा-परमात्मा यांची एकरूपता, अव्दैत पटवून दिलं आहे. वर्षानुवर्षे मराठी मनाला प्रभावित करणारे हे संताचे अभंग खऱ्या अर्थाने शाश्वत ठरले आहेत.

श्रीविठ्ठल हे बहुजनांचं दैवत. या विठ्ठलाचं सगुण साकार रूप डोळ्यासमोर ठेवून विठ्ठल उपासना, नामस्मरण, पंढरपूर वारी याद्वारे जीवन सार्थकतेचा मार्ग संतांनी दाखवून दिला. त्यासाठी कीर्तन, अभंग, ओव्या, गौळण, भारूड यासारख्या माध्यमातून भक्तिचा मळा फुलवला.अंधश्रद्धा व धार्मिक क्षेत्रातल्या अवडंबराचा त्याग लोकांना करायला संगितला. मुख्य म्हणजे पंढरपुरच्या सावळ्या विठ्ठलाच्या, त्या सुंदर ध्यानाच्या प्रेमात हे सगळे संत पडले. संत ज्ञानदेवांनी रचलेला

रूप पाहता लोचनी सुख झाले हो साजणी ।
तोहा विठ्ठल बरवा । तोहा माधव बरवा ।

यासारखे अनेक अभंग या भक्ति प्रेमाची साक्ष देतात. आनंदाच्या ताटी अमृताची वाटी असं म्हणणाऱ्या ज्ञानेश्वरांनी

अवघाची संसार सुखाचा करीन
आनंदे भरीन तिन्ही लोके
जाईन गे माये तया पंढरपुरा
भेटेन माहेरा आपुलिया

अशी आपली इच्छा व्यक्त केली आहे. ती केवळ त्या पंढरीच्या सावळ्या परब्रम्हाची भेट धेण्यासाठी. संत ज्ञानदेवांच्या ९०० अभंगाच्या गाथेमध्ये संतांचे महात्म्य, पंढरीची महती, विठ्ठल उपासना, करूणा ज्ञान अशा वेगवेगळया विषयांवरची रूपकं,अभंग आणि गौळणींचा समावेश आहे. ७३७ ते ७६३ हे

२७ अभंग हरिपाठचे अभंग म्हणून ओळखले जातात. हरिपाठ हा वारकऱ्यांच्या नित्य उपासनेचा भाग मानला जातो आणि यासाठीच ज्ञानदेवांच्या हरिपाठास वारकरी संप्रदायात विशेष महत्व आहे.

देवाचिये द्वारी उभा क्षणभरी
तेणे मुक्तिचारी साधियेल्या
हरि मुखे म्हणा, हरि मुखे म्हणा
पुण्याची गणना कोण करी

या अभंगाने हरिपाठाची सुरूवात झाली आहे.या २७ अभंगामध्ये हरिभक्तिची श्रेष्ठता सांगितली आहे. हरिचं नामस्मरण 'रामकृष्णहरि' या मंत्रातून करावं. अनंत जन्माची पुण्य प्राप्ती त्यातून होते. संजीवनी मंत्र असलेलं हे नामस्मरण माणसाचं जीवन सुखसमृद्धीकडे नेते असंही ज्ञानदेवांनी या अभंगातून सुचवलं आहे. सुंदरता,परब्रम्हतेज,नीलवर्ण,नीजब्रम्ह,ज्ञानविज्ञान हरी, बापरखुमादेवीवरू, रामकृष्णबरवा, मदनमूर्ती या सारख्या विशेषणातून ज्ञानेश्वर माऊलींनी परमेश्वराचं दर्शन घडविलं.

रूणुझुणू - रूणुझुणू रे भ्रमरा
सांडीतु अवगुणू रे भ्रमरा

यासारख्या अभंगातून निसर्गात सहज आढळणाऱ्या भुंग्याचं उदाहरण घेऊन त्यांनी माणसाला उपदेश केला हे माणसा, तुला तुझी प्रगती, उन्नती करायची असेल तर कोणत्याही प्रलोभनात, आकर्षणात तू गुंतून राहू नकोस ? जणू थांबला तो संपला हेच त्यांना सुचवायचं होतं.

पैल तोगे काऊ कोकताहे शकून गे माये सांगताहे
किंवा धनुवाजे घुणघुणा वारा वाहे रूणझुणा
भवतारकु हा कान्हा मज वेगी भेटवा वो...

अशा अभंगातून ज्ञानदेवांनी भक्ताला भगवंत भेटीची लागलेली तीव्र ओढ योग्य रूपकातून प्रदर्शित केली आहे. ज्ञानदेव अभंगातून सांगताहेत रे काऊ तुला दही भाताची उंडी देईन, तुझे पाय सोन्यानं मढवीन. पण माझा पंढरीराया आता लवकर येऊ दे.

' धनु वाजे घुणघुणा' मध्ये चंदनाची चोळी शीतल वाटत नाही. गाणं मन रिझवत नाही. इतकंच काय समोर आरशात बघायला जावं तर तिथं सुद्धा विठूरायाचं प्रतिबिंब दिसतयं तर असं हे सुंदर वर्णन भक्त भगवंत म्हणजे जणू काही प्रियकर आणि प्रेयसी संत ज्ञानेश्वरांनी विठ्ठलावरची आपली प्रीती अशी हळुवार एकनिष्ठ आणि तरल, भावविभोर होऊन व्यक्त केली आहे. ज्ञानेश्वरांच्या अभंग रचनेतील विठ्ठल भक्ती ठायी ठायी अनुभवण्यातील आनंद काही वेगळाच. विठ्ठलाच्या रूपाने, प्रतिभेने, अस्तित्वाने भारावून ते एका अभंगात म्हणतात,

पांडुरंग कांती दिव्य तेज झळकती
रत्नकीळ फाकती प्रभा ।
अगणीत लावण्य तेजः पुंजाळले
न वर्णवे तेथीची शोभा
कानडावु विठ्ठलु कर्नाटकु।
तेणे मज लावियला वेधु ।

शब्दांना रूप, रस, गंध, नाद, स्पर्श असल्याचा उल्लेख करावा तो फक्त ज्ञानेश्वरानींच. त्यांचे अभंगातीलच नव्हे तर, ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेवपासष्ठी या सर्व साहित्य ग्रंथातील शब्द समर्थ तर आहेतच. परंतु त्यांना मधुरताही लाभली आहे. त्यांच्या शब्दांमध्ये समदृष्टी आहे, व्यापकपणा आहे, आणि आल्हादही आहे. संत ज्ञानदेवांना समकालीन असलेले संत नामदेव यांनी तर भगवत धर्माची पताका महाराष्ट्राबाहेर द्वारका, मारवाड, बिकानेर, मथुरा, हरिद्वार पंजाब पर्यंत फडकवली, पंढरपुरातील विठ्ठलाच्या परिसरात सिमित झालेल्या भक्तीकेंद्राला त्यामुळे व्यापक क्षेत्र मिळालं. खरंतर नामदेवांच्या नामामध्येच 'नाम हाची देव' आहे. नामदेवांचे गुरू संत विसोबा खेचर यांच्या सानिध्यात नामदेवांना दिव्य दृष्टी लाभली असं म्हणतात. विसोबांनी केलेला

नाम आणि रूप दोन्ही नाही जया
तोची देव पाही रे मिथ्या

जळ, स्थळ, काष्ट, पाषाण, पिंड, ब्रम्हांड, अणू रेणू सर्वस्वी आपण साक्ष असे हा उपदेश संत नामदेवांना पटला आणि पूर्वी असलेली त्यांची आंधळी भक्ति संपूर्णपणे डोळस झाली असं सांगतात. सर्व प्राणी मात्राच्या ठिकाणी भगवद्भाव मानणं हा जो भक्तियोग तोच भागवत धर्म.

जे जे भेटे भूत । ते ते मानिजे भगवंत ।

हा भक्तियोग निश्चित जाण माझा ।

संत ज्ञानेश्वरांनी एका ओवीत जे मूळ तत्व सांगितलं ते संत नामदेवांनी केवळ स्वीकारलं असंच नाही तर आपल्या साहित्यातून ते सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचवलं. संसाराची क्षणभंगुरता सांगताना,जळी बुडबुडे देखला देखला ।

क्षण न जगता दिसेनाती ।
तैसा हा संसार पहाता पहाता ।
अंतकाळी हाता काय नाही ।
नामा म्हणे तेथे काही नसे बरे
क्षणाचे हे सर्व खरे आहे ।।

मग अशा या संसारात माणसाचं कर्तव्य कोणतं ? नामदेव सांगतात,

संसारी असावे, असोनी नसावे ।
कीर्तन करावे वेळोवेळी ।नामा म्हणे,
विठो भक्ताचिए द्वारी । घेऊनिया करी सुदर्शन ।।

संसाराचा उपभोग जरूर घ्यावा. परंतु नित्य जागृत रहावं. अनासक्त असावं. वेळोवेळी ईश्वर भक्ती करावी. अशा या भक्ताच्या रक्षणासाठी साक्षात् विठ्ठल सुदर्शन चक्र घेऊन दारात उभा असतो. नामदेवांच्या तत्वज्ञानाचा गाभा म्हणजे नामस्मरण होय. नामाचं

महात्म्य नामदेवांनी जितक्या प्रकारे गायले आहे तितके कोणत्याही संताने गायले नसेल. हरिनामाची महती या विषयावर त्यांचे सुमारे दोनशे अभंग आहेत.

नाम तेची रूप, रूप तेची नाम,
नामरूप भिन्न नाही साधन

किंवा ज्ञान, ध्यान, जप, तप, साधना कोणा त्याच प्रमाणे नामाचा महिमा 'जेणेची पै ब्रम्हा' अशा या सगळ्या अभंगातून परमेश्वराच्या नामस्मरणात प्रपंचातील अडीअडचणी, संकटं, दुःख नाहिसं करण्यात सामर्थ्य आहे हेच विशद केलं आहे. ज्ञानेश्वरांनी ज्ञानभक्ति आणि नामदेवांची नामभक्ति याच्या परस्पर एकरूपतेने मराठी काव्यसरीता पावन झाली आहे. वास्तविक पाहता ज्ञान आणि नाम हे एकत्र झाले म्हणजे तिथे दुजाभाव राहत नाही आणि म्हणूनच,

नामयाचे भेटी ज्ञानदेव आले ।
लोटांगण घातले नामयाने
आणि तो तू आम्हा सन्मुख उभा केला
चरणासी लागला ज्ञानदेव ।।

अशी या दोघांची परस्पर आदराची भावना होती. कोणत्याही प्रकारचा अहंकार, द्वैतभाव, असमाधान मनात न ठेवता ईश्वराला अनन्यभावानं शरण जाणं ही नामदेवांच्या कवित्वामागील प्रमुख प्रेरणा आहे. यासाठीचा

बोलू ऐसे बोल जेणे बोले विठ्ठल डोले ।।

असं सहजपणे ते लिहून जातात. नामदेवाचं कवित्व हे विठ्ठलाच्या निमित्ताने त्यांनी पंढरीचं आणि संतांचं तितक्याच भाविकतेन अभंगारून वर्णन केलं आहे. विठ्ठल आवडी प्रेमभावे म्हणतानाच आधी रचिली पंढरी । मग वैकुंठ नगरी हे ते अभिमानाने सांगतात.

अमृताहूनी गोड नाम तुझे देवा गातांना ,
धन्य धन्य तो संसारी । जेणे देखली पंढरी ।

असा पंढरीचा महिमा पटवून देतात. देह जावो अथवा राहो माझे तीर्थ पंढरी, तू माझी माऊली, नाम गाऊ नाम घेऊ, अशा कितीतरी अभंगातून नामदेवाचा विठ्ठलाविषयीचा श्रद्धाभाव व्यक्त झाला आहे. जनाबाईने नामदेवांना लहानपणी सांभाळलं असलं तरी तिच्या ठिकाणी जी विठ्ठल प्रेमामुळेच भक्ती दाटून आली ती केवळ नामदेवांच्या अपरिमीत अशा विठ्ठल प्रेमामुळेच.संत जनाबाईचे नामसंकीर्तनाबरोबरच संतस्तुती, ज्ञानेश्वरस्तुती, नामदेवचरित्र अशा अनेक विषयांवरचे अभंग आज घरोघरी आवडीने गायले जातात. विठू माझा लेकुरवाळा. संगे गोपाळांचा मेळा, येगं येगं विठाबाई, संतभार पंढरीत । कीर्तनाचा गजर होतं, चला हो पंढरी जाऊ। अशा कित्येक अभंगातून विठ्ठलावरची भक्ती, वेळोवेळी विठूराया करीत असलेली मदत, त्याचं प्रेम, पंढरपूरची वारी, वारकरी या सगळ्यांचं रसाळ, लडीवाळ वर्णन जनाबाईनं केलं आहे. संत जनाबाई, मुक्ताई, तुकारामांची शिष्या बहिणाबाई आणि रामदासांची शिष्या विणाबाई अशा अनेक संत

कवयित्रींच्या अभंगरचनानी आत्म जाणीव जागवली आणि समाजापर्यंत पोहोचवली. मुंगी उडाली आकाशी या अभंगात मुक्ताबाई आपली श्रेष्ठ अध्यात्मिक अनुभूति आविष्कृत करताना दिसले आणि वाचकांना अलैकिक अनुभवाच्या प्रांतात घेऊन जाते. इथे अनुभव आणि आविष्कार यामधला अडसर गळून पडतो, दोन्ही एकरूप होतात. मुक्ताबाईने लिहिलेलं हे सगळं तिला श्रेष्ठ कवींच्या पंक्तीत नेऊन बसवणारं आहे.याच कालखंडात वारकरी पंथाचं एक वैशिष्ठ्य म्हणजे या स्त्रीयांच्या साहित्य प्रतिभेला कुणीही हरकत न घेता स्त्री-पुरूष समानतेला होकारचं दिला आहे आणि म्हणूनच त्या काळाच्या समाजात अभिप्रेत असलेल्या रूढ स्त्री प्रतिमा नाकारून संत स्त्रीयांनी मुक्त स्त्रीची नवी प्रतिभा उभी केली आणि ती जनमानसात बिंबवली. या संत स्त्रीयांनी इतर पुरूष संतांची कर्तबगारी,कार्य सुद्धा आपल्या साहित्यातून कौतुकानं सांगितलं. जनाबाईने ज्ञानाचा सागर, “सखा माझा ज्ञानेश्वर” म्हणून ज्ञानदेवांविषयीचा आपला अभिमान प्रकट केला. जनार्दन एकनाथांनी खांब दिला भागवत। या अभंग चरणातून बहिणाबाईने संत एकनाथांच्या कार्याचं महत्व लक्षात आणून दिलं.

संत एकनाथांनी वारकरी संप्रदायाच्या उद्धारासाठी अभंग, भारूडे, गौळणी अशा अनेक रचना केल्या. त्यात त्यांच्या वेगळेपणाचा आविष्कार घडतांना दिसतो. एकनाथ अतिशय बुद्धीमान होते. भागवतावर लिहिलेला त्यांचा टिकाग्रंथ ‘एकनाथी भागवत’ म्हणून सर्वपरिचित आहे. जवळ जवळ चार हजार अभंग रचना नाथांच्या नावावर आहेत. विठ्ठलाची भक्ती, संतांचा सहवास यातून जीवनाचा आनंद अनुभवावा हेच एकनाथांनी आवर्जून सांगितलं. संताच्या या मालिकेमध्ये ,काय करिशी काशी गंगा । भितरी चांगा नाही तो किंवा वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा। येरांनी वहावा भार माथा हे ठामपणाने सांगणारे संत तुकाराम या भक्तीपंथाचे, भागवतधर्माचे कळस म्हणून खरोखरच शोभून दिसतात. शुद्ध बीजापोटी। फळे रसाळ गोमटी म्हणतांना, मनावर चांगले संस्कार अतिशय आवश्यक असल्याचं ते सांगतात.

भेटीलागी जीवा लागलीसे आस, कन्या सासुरासी जाये, विठ्ठल टाळ विठ्ठल दिंडी, वण मेळवता जळे, आनंदाचे डोही आनंद तरंग अशा कितीतरी अभंगातून तुकारामांनी आपलं संपूर्ण जीवन विठ्ठलमय झाल्याचे व्यक्त केले आहे.

तुज मज नाही भेद, चित्त शुद्ध तरी, शत्रु मित्र होती जोडोनिया धन उत्तम व्यवहारे उदास विचारे वेच करी। असे हे अभंग भंग न पावणाऱ्या शाश्वत विचारांमुळे माणसाच्या जीवनाला अंतर्मुख करून सोडणारे आहेत आणि त्यामुळेच लोक क्षोभाच्या इंद्रायणीत बुडवूनसुद्धा सर्वसामान्यांच्या ओठावर आजही आहेत. काळ प्रवाहात खऱ्या अर्थानं तरंगले तरले आहेत. धर्म, जात, पंथ या सगळ्या भिंती तोडून टाकून वारकरी संप्रदायातले हे स्वतंत्र बाण्याचे सुधारक संत भक्तिरसामध्ये अगदी एकरूप होऊन गेले. त्यांनी लिहिलेली अभंगवाणी अमृतवाणी होऊन शेकडो वर्षानंतरही चिरंतन ठरली आहे. सर्वसामान्य माणसाच्या रोजच्या व्यवहारात या अलौकिक विभूतींच्या कितीतरी वचनांचा अंतर्भाव झाला आहे. संताचं हे देणं त्याची नित्य आठवण करणे म्हणजे आनंद तरंगाना अनुभवणं हे अगदी खरं आहे. तूर्तास एवढंच सांगते, ज्ञानेश्वरांनी इच्छिलेल्या विश्वाची माझ्या घरातील प्रत्येकाला जो जे वांछिल तो ते मिळण्याचे सामर्थ्य या अभंगवाणीमध्ये आहे एवढं मात्र निश्चित आणि हेच सामर्थ्य स्वत:मध्ये आणि समोरच्या व्यक्तिमध्ये सुंदर ते ध्यान ओळखण्यासाठी माणसाला उपयोगी पडणारं आहे.

सौ. रेखा नार्वेकर

३६ जळकिरण, ९ वा मजला,
कफपरेड, मुंबई ४००००५

दासबोध सांगे, चातुर्य लक्षण

गौरी कुलकर्णी

सागराप्रमाणे, अथांग असलेल्या दासबोधातून फक्त एक ओंजळ इथे आपण भरुन घेणार आहोत चातुर्यलक्षण या विषयाच्या माध्यमातून! (चातुर्य लक्षण-दशक चौदावा, समास सहावा) चातुर्यलक्षण या समासामध्ये समाजाच्या उद्‌बोधनार्थ समर्थांनी विशद केलेल्या अनेक गोष्टी निकोप आणि सुदृढ विचार-आचारांची भक्कम पायाभरणी करणाऱ्या आहेत.

प्राणीमात्रांच्या सर्व आशा आकांक्षा पूर्ण करण्याचे सामर्थ्य असलेला 'दासबोध ग्रंथ' म्हणजे सर्व लोकांना दिव्य जीवनाचा आदर्श दाखवणारी शाश्वत दिपीका आहे, एक अनमोल ऐवज या ग्रंथाच्या रुपाने समर्थांनी समाजाच्या हाती सोपविला असं निर्विवादपणे म्हणता येईल. आजच्या विज्ञान युगातही 'दासबोध' कालबाह्य न ठरणं हे समर्थ रामदासांच्या द्रष्टेपणाचं लक्षण आहे. अध्यात्म कोणत्या साधनांनी प्रत्यक्ष जीवनात आणता येईल यासंबंधीची समग्र आचारसंहिता मांडणाऱ्या या ग्रंथाला

'अध्यात्माचा मेरुमणी' म्हणून ओळखलं जातं.

जीवनातील नैराश्य दूर सारुन चैतन्य उत्पन्न करणारी दासबोधाची शिकवण आज या घडीला आपल्यासाठी नक्कीच नितांत गरजेची आहे. प्रपंच आणि परमार्थ या दोहोंमध्ये समन्वय साधण्याची उदात्त कामगिरी या ग्रंथाने बजावून जनमनात एक वेगळं स्थान निर्माण केलं. सागराप्रमाणे, अथांग असलेल्या दासबोधातून फक्त एक ओंजळ इथे आपण भरुन घेणार आहोत 'चातुर्य लक्षण' या विषयाच्या माध्यमातून! (चातुर्य लक्षण - दशक चौदावा, समास सहावा)'चातुर्यलक्षण' या समासामध्ये समाजाच्या उद्बोधनार्थ समर्थांनी विशद केलेल्या अनेक गोष्टी निकोप आणि सुदृढ विचार-आचारांची भक्कम पायाभरणी करणाऱ्या आहेत. आपण माणूस म्हणून ज्या जगात आयुष्य व्यतीत करीत असतो. ते जग मिथ्या आहे, क्षणभंगुर आहे हे मान्य करुनही त्याच जगात जगण्यावाचून दुसरा पर्याय आपल्याकडे नसतो. म्हणूनच स्वप्रयत्नाने निरनिराळ्या गुणांचा विकास करत आपले व्यक्तिमत्व प्रभावशाली बनवून कृतार्थ जीवन प्रत्येकाने जगावे यावर समर्थांनी विशेष भर दिला आहे. प्रत्येक माणसाने स्वत:मध्ये आवश्यक तो बदल घडवून आणायला हवा आणि त्यानंतर इतरांमध्येही बदल घडवून आणण्याचं व्रत त्याने स्विकारावं. अशा प्रकारच्या परिवर्तनातून स्वत:मध्ये आणि जगामध्ये कोणत्या प्रकारची सुधारणा करता येणे शक्य होते याचे सखोल विवेचन 'चातुर्यलक्षण' या समासाद्वारे रामदासांनी केले आहे. ते सजगतेने टिपून घेऊन त्यानुसार अंमल बजावणी करणे हे आपले नैतिक कर्तव्य ठरते, अगदी आज ही!

रुप लावण्य अभ्यासिता न ये। सहजगुणास न चले उपाये
कांहीतरी धरावी सोये । अगांतुक गुणाची ।।

रुप आणि लावण्य हे गुण अभ्यासाने साध्य होत नाहीत. ते जन्मजात असल्याने तसे आपल्याला स्वीकारावे लागतात. तिथे इलाज नसतो. म्हणून अभ्यासाने साध्य होणाऱ्या अगणिक गुणाची कास आपण धरावी. जन्मदात्यांकडून गुणसुत्रानुसार लाभलेल्या बाह्य रंगरुपाचा विचार करत न बसता आपले अंतरंग संपन्न करुन जगात मानाचे स्थान मिळवणे हे खरे चातुर्याचे लक्षण आहे.आंधळेपण, मुकेपण, बहिरेपण अशा प्रकारच्या न्युनत्वावर मात करुन चांगले गुण अंगी बाणविण्यासाठी शहाणपण-चातुर्य माणसाचे ठायी असावे लागते. मी कुरुप आहे असं रडत-कण्हत बसण्यापेक्षा माझ्या गुणवत्तेच्या सौंदर्याने अवघ्या जगाचं लक्ष मी वेधून घेईन असा चतुर-विवेकी बाणा आयुष्याला एक वेगळं परिमाण देऊन जातो. अवगुण प्रयत्नपूर्वक कटाक्षाने सोडून द्यायचे आणि उत्तम गुण अभ्यासपूर्वक निग्रहाने आत्मसात करायचे, हयालाच चातुर्य लक्षण म्हणतात!

समर्थांचे ठायी विलक्षण सूक्ष्म दृष्टी आहे. तिचा यथार्थपणे उपयोग करुन समाजहिताला पूरक ठरतील असे कितीतरी जीवनसिध्दांत त्यांनी अतिशय सहज-सोप्या भाषेत दासबोधात मांडले आहेत. त्यामुळेच माणसाला जीवनाभिमुख करण्याची ताकद या ग्रंथातील प्रत्येक विचारामधून सहजतेने प्रत्ययाला येते. 'चातुर्यलक्षण' या समासातील सर्वंकष विवेचनातूनही नेमकी अशीच प्रचिती आपण घेतो. समर्थांच्या बहुप्रसव प्रतिभेनं सामांन्यांच्या जगण्याशी अध्यात्माची घातलेली सांगड स्तिमित करणारी आहे. ते म्हणतात माणसाला मान मिळाला तर तो मनापासून आवडतो आणि तो मिळवण्यासाठी त्याने सन्मार्गाचा अवलंब केलं पाहिजे. हे सगळं घडून येण्यासाठी अंगी चातुर्य असणं तितकंच आवश्यक आहे.

मान्यता आवडे जीवीं । तरी कां उपेक्षा करावी
चातुर्येविण उंच पदवी । कदापि नाहीं ।।

चातुर्य अंगी नसेल तर कोणीही विचारणार नाही हे सर्वकालीन सत्य आहे.

बाह्य साजशृंगाराने शरीराला पुष्कळ सजविले, पण त्या व्यक्तिचे ठिकाणी शहाणपण नसेल तर निखळ देह सजविणे वाया जाते, हा खटाटोप व्यर्थ ठरतो. एखाद्या गुणहीन वेडयाला साजशृंगार केल्याने काय हाती येते ?

देहे नेटके श्रृंगारिले । परी चातुर्येविण नासलें।
गुणेविण साजिरे केले । बाष्कळ जैसें।।

समर्थांच्या या उक्तीचा अनुभव रोजच्या जगरहाटीत तसा वारंवार येत असतो. साधं गर्दभाचं (गाढवाचं) उदाहरण घेऊ या, मुर्खपणा, निर्बुध्दपणा यांना पर्यायीवाचक शब्द म्हणून 'गाढवपणा' हा शब्दप्रयोग सर्रास केला जातो. गर्दभाला रेशमी वस्त्रांनी सजवलं, मौल्यवान दागिन्यांनी मढवलं तरी त्याचा काही उपयोग होणार आहे का? त्याचा देह शृंगारला गेला, पण गुणवत्तेचं काय? बाहेरुन त्याला कितीही सुशोभित केलं तरी त्याचा मुळ अवगुण सोडणार नाही तो. बेसूर ओरडणंच त्याच्या मुखातुन आपल्याला वेदमंत्रांचा घोष ऐकू येणार नाही. शेवटी गाढव ते गाढवच !

चतुर माणसाला चातुर्याच्या अनेक खुणा ठाऊक असतात. आपण दुसऱ्यांशी जसे वर्तन करावे, त्याचे तसेच उसने लगेच फेडावे लागते. आपण लोकांना त्रास दिल्यास आपल्याला देखील तितकाच त्रास होतो. दुसऱ्याचं वाईट चिंतल्यास बूमरँग होऊन ते तसंच्या तसं आपल्याकडे येतं, हे जीवनतत्व सद्‌गुरु वामनराव पै यांनीही समाजात खोलवर रुजवलं आहे. सद्विवेक, सत्कर्म आणि सदाचार ह्या त्रयीच्या आधारे कृतार्थ जीवन जगण्याची क्षमता अंगी बाणवता येते ही समज चतुर व्यक्तीला असतेच त्यामुळेच त्या दिशेने त्या व्यक्तीची नेमस्तपणे वाटचाल सुरु असते. समाधानाने समाधान वाढत जाते. स्नेहाने स्नेह जुळतो. चांगलेपणा नाहीसा करायचा म्हटला तर तो क्षणात नाहीसा करता येतो याची पुरेपुर जाण असल्याने चांगलेपणाची जपणूक चतुर माणूस जिवापाड करीत असतो.

न्याये वर्तेल तो शहाणा । अन्याय तो दैन्यवाणा
नाना चातुर्यांच्या खुणा । चतुर जाणे ।।

निक्षून म्हणतात...

आळसें कार्यभाग नासतो ।साक्षेप होत होतो ।
दिसते गोष्टी कळेना तो । शाहाणा कैसा।।

मानवी कल्याण साधण्याच्या ध्यासातून समाजमनाचा, भोवतालच्या परिस्थितीचा अतिशय बारकाईने अभ्यास समर्थांनी केला आहे."चिंता करतो विश्वाची या भूमिकेशी ठाम राहात त्यांनी आपलं संपूर्ण जीवन व्यतित केलं. ही चिंता प्रत्यक्ष कार्यवाहित आणावयाची तर आपणास स्वतःचा परिग्रह उपयोग नाही हे लक्षात घेऊन मोह मायेपासून त्यांनी स्वतःला विरक्त ठेवलं. अध्यात्मज्ञानाखेरीज जीवनाला पूर्णत्व नाही हा त्यांचा सिध्दांत होता. एकीकडे त्यांनी प्रयत्नांची शिकवण दिली पण त्याच जोडीने ईश्वरी सामर्थ्यालाही कटाक्षाने प्राधान्य दिले प्रयत्न करणाऱ्याला परमेश्वर साह्य करतो यावर त्यांचा दृढ विश्वास होता. त्यांच्या दृष्टिने प्रयत्नाची कास आणि ईश्वरी सामर्थ्यावरील श्रध्दा या दोन्हींचा यथायोग्य मेळ घालणं ज्याला जमतं तो खरा चतुर शहाणा माणूस !

आपणास शाहाणें करु नेणें ।
आपले हित आपण नेणें ।
जनी मैत्री राखो नेणें ।वैर करी ।।
ऐसे प्रकारीचे जन । त्यास म्हणावें अज्ञान ।
तयापासी समाधान । कोण पावे ।।

शहाण्या - चतुर माणसाची ओळख करुन देताना अज्ञानी माणसाकडेही समर्थ सहजगत्या अंगुली निर्देश करुन जातात. आपण आपल्याला शहाणे कसे करावे, आपले हित आपण कसे साधावे, लोकांशी स्नेह कसा राखावा हे ज्याला कळत नाही त्या माणसाला अज्ञानी म्हणावे. हा असा माणूस उगीच वैर करतो, कोणालाही तो समाधान देऊ शकत नाही असे स्पष्ट प्रतिपादन त्यांनी केले आहे. स्वाभाविकपणेच याउलट ज्याचे आचार -

विचार चांगले आहेत तो शहाणा, हे त्यांनी वेगळेपणाने इथे सांगण्याची गरजच उरत नाही. वैरभावना टाळून लोकांशी स्नेहाने वागणे, अनेकांच्या अंत:करणात प्रेमरुपाने भरुन राहाणे आणि आपल्या उत्तम गुणांनी इतरांना विवेकी बनविणे अशी चातुर्य लक्षणं अंगी असणाऱ्या माणसामुळे समाज अधिक संपन्न, अधिक सुदृढ व्हायला मदत होते. "ज्योतसे ज्योत जगाते चलो, प्रेमकी गंगा बहाते चलो।" यासारखी जीवनमूल्ये म्हणूनच सदासर्वकाळ अनुकरणीय ठरतात.

अशा मूल्यांची रुजवण ज्यांच्या मनामध्ये झाली आहे अशी माणसं मात्र दुर्दैवाने अलिकडे दुर्मिळ झालेली दिसतात. वैर भावना त्यागून लोकांशी सहृदयतेने वागण्याचं शहाणपण जगातून हद्दपार होत चालल्याचं चित्र फारसं सुखावह नाही. अगदी रक्ताचं नात सुध्दा सूड भावनेनं पेटून उठतं, पराकोटीच्या स्वार्थापायी बिनदिक्कत दुसऱ्याच्या सुखावर घाला घातला जातो-असे नीतीमत्तेचे बुरुज एकामागून एक ढासळत असताना, संत रामदास यांच्या विचारधारेतील 'चतुर माणूस' बनून भोवतालच्या अविवेकी कारवायांना संघटितरित्या आपण निश्चितपणे लगाम घालू शकतो. 'दासबोध' हा केवळ पारायणासाठी नाही तर त्या ग्रंथातील तत्वप्रणाली प्रत्यक्ष अमलांत आणून आजची नकारात्मक स्थिती बदलण्याचा प्रयत्न त्याद्वारे जाणीवपूर्वक आपल्याला करता येईल तशी वेळ आता येऊन ठेपली आहे. अध्यात्म आणि प्रपंच यांचा मेळ साधणारी उपदेशाची जी शिदोरी संतांनी आपल्याला दिली आहे. तिचा उपयोग करुन समाजाची भ्रष्ट मानसिकता दूर करण्याची जबाबदारी आपल्यापैकी प्रत्येकाची आहे.

जो न्यायाने वागतो तो शहाणा आणि अन्यायाने वागतो तो दीनवाणा। ही गोष्ट उमगून घेऊन जो वागतो त्याच्या चातुर्याबद्दल शंकाच नाही. चातुर्याच्या लक्षणांचा साकल्याने ऊहापोह करणाऱ्या स्वत: रामदासस्वामींचे ठायी असलेलं कमालीचं वर्णनातीतच चातुर्य म्हणावं लागेल. ते मोजण्याचा वृथा प्रयत्न करायलाच नको. संस्कृतमध्ये एक सुंदर सुभाषित आहे -

हंस श्वेत: बक: श्वेत: ।को भेदो बकहंसयो:।
नीर-क्षीर विवेकेतु ।हंसो हंसो बको बक:।।

हंस आणि बगळा दोघंही वर्णाने शुभ्र असतात मग त्या दोघांमध्ये नेमका फरक कोणता आहे ? याचं उत्तर असं की, पाणी आणि दूध वेगळं करताना (नीरक्षीर विवेक) हंस अचूकतेने दूध टिपून घेतो, बगळयाला मात्र ते जमत नाही. हंस चतुर आहे आणि त्या चातुर्याच्या बळावरच नीरक्षीरविवेक तो करु शकतो. त्याची विवेकबुध्दी त्याला यथार्थ साथ देते.

समर्थ रामदासांनी वर्णिलेला चतुर माणूसही अशाच प्रकारचा आहे, जे योग्य आहे त्याची तो अचूकतेने निवड करतो. वस्त्राने केवळ शरीर शृंगारले जाते तर चातुर्याने- शहाणपणाने संपूर्ण अंतरंग शृंगारले जाते ही जाणीव त्याचे ठिकाणी असते. या दोन्हींतला मुलभूत फरक त्याला ठाऊक असल्याने जीवनाच्या प्रवासात सहसा त्याची फसगत होत नाही. अंगी चातुर्य असलेला माणूस जनसमूहाचे अनेक रीतीने रक्षण करु शकातो हा देखील एक महत्त्वाचा भाग आहे. तात्पर्य काय तर, जो माणूस शहाणपणाने आपले अंतरंग शृंगारतो तो दुसऱ्याचा कार्यभाग करु शकतो, तो जगाला सुखी करु शकतो म्हणूनच माणसाने चतुरपणे अनेक गुण अवगत करुन जगाच्या उपयोगी पडावे, अज्ञानी जनाला सज्ञान करावे आणि जगामध्ये भगवंताचे अनुष्ठान वाढवावे असा मौलिक संदेश श्री समर्थांनी समस्तांना दिला आहे. त्या संदेशावर आचरण करण्याचा जमेल तसा आणि जमेल तेवढा प्रयत्न आपण केल्यास, आहे त्यापेक्षा आपलं आयुष्य निश्चितपणे अधिक सुकर होईल ! समाज सुखी व्हावा, माणसाच्या मार्गातला अज्ञानाचा अंधार दूर होऊन ज्ञानाचा कवडसा त्याला दिसावा यासाठीच दासबोधाचा प्रपंच समर्थांनी केला आहे हे आपण सारेजण जाणतोच. पण जाणून घेणं एवढयाच पातळीवर न थांबता 'मी हे सारं व्रतस्थपणे अंगिकारीन' ही भूमिका महत्त्वाची ! एकावर एक रचलेली 'चातुर्य लक्षणांची' सुंदर उतरंड आपल्यासमोर ठेवताना रामदास स्वामी असंही म्हणतात शरीराने आणि मनाने लोकांसाठी झिजले तर लोकांमध्ये भलेपणा मिळतो. असे न करता जो उगीच कल्पना करीत बसतो त्याला पुढे कष्ट सोसावे लागतात-

तनें मनें झिजावें ।तेणें भले म्हणोन घ्यावें।
उगेचि कल्पितां सिणावें। लागेल पुढे।।

समाजाच्या कल्याणासाठी झटून काम केल्याने लोकांकडून आपल्याला दुवा मिळतो, लोक आपल्या चांगुलपणाची कदर करतात याची पुरेपूर कल्पना चतुर माणसाला असते. तेव्हा अशाच मानसिकतेतून समाजकार्याशी तो स्वत:ला अगदी मनापासून जोडून घेतो. समर्थांच्या ह्या विचारांमधून नकळत चंदनाची

आठवण माझ्या मनात जागी झाली, स्वतःचा देह झिजवून जगाला सुगंध देणाऱ्या चंदनाचा महिमाही लोक मानतात हे आवर्जून इथे लक्षात आलं. अर्थात लोकांसाठी झिजण्याची त्याच माणसाची तयारी असते, ज्याचं अंतरंग शुध्द असतं. अशा या शुध्द-सात्विक अंतरंगाला समार्थांनी सांगितलेल्या चातुर्य लक्षणांमध्ये एक महत्त्वाचं स्थान आहे.जेवढा व्याप तेवढे वैभव, हा नियम आहे. ज्या मानाने वैभव असते, त्या मानाने वागावे लागते. माणसाला हे समजले पाहिजे. वैभव प्राप्त करुन घ्यायचे तर प्रयत्नांची पराकाष्ठा करणे आवश्यक आहे. कोणतेही कार्य आळशीपणाने नासते, मात्र अविरत प्रयत्न करीत राहिल्यास क्रमाक्रमाने ते सिध्दीस जाते. प्रयत्नांती परमेश्वर हा बोध सर्वांनाच ज्ञात आहे. चतुर माणूस तर त्या बोधाप्रमाणे आचरण करीत असतो ज्याला हा बोध कळत नाही, त्याला शहाणा म्हणता येत नाही. समर्थ या संदर्भात म्हणतात -

शाहाणे करावे जन । पतित करावे पावन।
सृष्टिमधें भगव्दभजन। वाढवावे।।

"चातुर्य लक्षण" समासाच्या अखेरीस समर्थांनी उद्‌धृत केलेल्या या ओळी त्यांच्या एकूण विचारधारणेचे सार सांगणाऱ्या आहेत. "चातुर्य लक्षणे" आवर्जून कथन करण्यामागे रामदास स्वामींचा हेतू असाच आहे की, ही चातुर्य लक्षणे अंगीकारुन जास्तीतजास्त लोकांनी आत्मोन्नतीचा व त्याचबरोबर समाजोन्नतीचा मार्ग चोखाळावा. भगव्दभजनाची वृत्ती पृथ्वीतलावर वाढीस लावावी. श्री समर्थांच्या काळी भारतीय समाज स्वार्थाने बरबटलेला (जसा आज आहे!) होता. समाजाची ही अनुचित मानसिकता, संबंध भारतभर प्रवास करताना प्रकर्षाने समर्थांच्या ध्यानात आली. मार्ग चुकलेली असंख्य माणसे सभोवताली बघून ते अस्वस्थ झाले. कविवर्य ग.दि. मांडगूळकर यांनी म्हटल्याप्रमाणे -

"जग हे बंदिशाळा, कुणी न येथे भला चांगला,
जो तो पथ चुकलेला"

अशी समाजाची बिकट स्थिती त्याकाळी होती. त्या स्थितीमध्ये बदल घडवून आणण्याच्या प्रयोजनातूनच 'दासबोधा' चा प्रपंच समर्थानी केला. "पतित करावे पावन" अशा अमृतवाणीमधून सर्वत्र एक कृतीशील यज्ञ त्यांनी सुरु केला. हा असा यज्ञ आजही सातत्याने सुरु राहायला हवा. कारण आताशा समाजाची नैतिक पातळी दिवसागणिक जास्तच खालावत चालली आहे, ती उंचावेल कशी यासाठी हरतऱ्हेने प्रयत्न करणं ही प्रत्येकाची जबाबदारी ठरते.

एकंदरीत 'चातुर्य लक्षण' या समासाद्वारे समर्थ रामदासांनी केलेल्या उदबोधनातून आपलं जगणं निश्चितपणे संमृध्द होऊ शकतं. मानवी जीवनाला अर्थ प्राप्त करुन देणाऱ्या त्यांच्या उपदेशातील मर्म असे आहे "माणसाला शहाणपण शिकता येते, त्याने ते शिकून घेतले पाहिजे. अंगी नसलेल्या उत्तम गुणांचा अभ्यास करुन ते जाणीवपूर्वक जोपासावेत. मनाने व शरीराने दुसऱ्यांसाठी झिजण्याने आत्मिक समाधान लाभते. लोकांची ह्दयं प्रेमाने जिंकून तिथे स्वतःसाठी जागा निर्माण करावी. आपल्या उत्तम गुणांच्या बळावर लोकांना शहाणे करावे, विवेकी बनवावे, तसेच ह्या कोरडया-शुष्क जगामध्ये भगवंताची रसाळ भक्ती वाढवावी. प्रपंच व परमार्थ या दोन्हींचा मेळ घालण्याने जीवनाची यशस्वी सांगता होते. समर्थांनी आपल्या हाती दिलेली ही सद्‌विचारांची मशाल धगधगती ठेवून हरवलेल्या शांतीचा मार्ग आपण शोधू या. एकमुखाने, एकदिलाने असंही म्हणू या-

धरुनीया घट्ट, अध्यात्माचे बोट।
पार करु वाट प्रपंचाची।।

।। जय जय रघुवीर समर्थ।।

गौरी कुलकर्णी
१०१, आदित्य अपार्टमेंट,
आशानगर, ठाकुर कॉम्लेक्स,
कांदिवली (पूर्व), मुंबई - १०१
मो. ९८२०६३३७३४

मानवी कल्याणार्थ वेद आणि कुरआन



डॉ. सुनील सावंत

वेद आणि कुरआन दोन्ही धर्म ग्रंथ पवित्र आहेत. वेद हिंदू धर्मियांचा व कुरआन मुस्लिम धर्मियांचा ग्रंथ आहे. पौराणिक वैदिक विद्वान वेदांचे उगम स्थान ब्रम्हदेव असल्याचे मानतात. ब्रम्हदेवाने स्वतःच्या मुखाातून वेदांचे कथन केल्याचे मानले जाते. तसेच पौराणिक ऋषिनां वेदांचे ज्ञान प्राप्त झाले, असे ही मानतात. अथर्ववेद, ऋग्वेद, सामवेद व यजुर्वेद असे चार वेद संपूर्ण मानव जातीच्या हितार्थ परमात्म्याने दिलेले ज्ञान आहे, असे समजले जाते.

मानवाच्या जीवनातील अंधकार दूर करुन ज्ञानप्रकाश प्रदान करण्यासाठी ईश्वराने जे ग्रंथ अवतीर्ण केले त्यांमध्ये कुरआन हा सर्वांपेक्षा परिपूर्ण ग्रंथ आहे, असा उल्लेख 'कुरआन ए-हकीम'(मूळ अरेबिक कुरआनासह मराठी अनुवाद) या पवित्र ग्रंथात आढळतो. ह्या ग्रंथात असा ही उल्लेख आहे की ईश्वराने या ग्रंथास संहिता व आशय या दोन्ही दृष्टिने संरक्षित ग्रंथ म्हणून घोषित केले आहे. आज आमच्या वाचनात जे कुरआन आहे, ते कुरआन तंतोतत तेच आहे जे चौदा शतकांपूर्वी प्रेषित मुहम्मद (स.अ.स) यांच्याकडे प्रकट करण्यात आले होते.

संपूर्ण विश्व ईश्वराच्या अधीन असून मानवाची निर्मिती हा त्याच्या निर्मितीचा सर्वोच्च बिंदू आहे.

असा उल्लेख वेद आणि कुरआन या दोनही धर्म ग्रंथात आढळतो. मानवाच्या सद्‌गुणांच्या विकास होण्याच्या दृष्टिनेच ह्या धर्म ग्रंथांची निर्मिती झालेली आहे.

वेद आणि कुरआन ह्या दोन्ही धर्मग्रंथात मानवाने आपआपसात भेद भाव वाढवावा, असा कुठेही उल्लेख नाही. हे धर्मग्रंथ धर्म-भेद किंवा जाती भेद निर्माण करत नाहीत, हे सर्व मानव जातीने जाणून घ्यावे. आज संपूर्ण विश्वात वैमनस्य, भ्रष्टाचार, धर्मांधता व जातियतेचे विषारी काटे मानवी ह्रदयाला टोचत आहेत. संपूर्ण विश्व विविध समस्यांनी जखडलेले आहे. मानवी जीवनात अमाप पैसा महत्त्वाचा झालाय आणि त्यामुळे त्याच्या दैनंदिन जीवनातील सुख व मन शांती त्याने हरवलेली आहे. म्हणून आज प्रत्येक मानवाने आपले धर्म ग्रंथ वाचणे, आवश्यक असून धर्मांधता नष्ट केली पाहिजे. किंबहुना संपूर्ण जगात एकच धर्म प्रस्थापित केला पाहिजे. तो म्हणजे मानव धर्म, हिच शिकवण ह्या धर्मग्रंथाच्या वाचनातून आपल्याला मिळते.

वेद आणि कुरआन ह्या पवित्र धर्म ग्रंथामध्ये 'एकश्वरवाद' लोकांच्या कल्याणाचे साधन असल्याचे मत मांडले आहे.'एकेश्वरवाद' संकल्पनेवर आधारित जीवन व्यवस्था स्थापन करण्याचे ध्येय भारत देशात आवश्यक आहेत. विविध धर्म-प्रांत व विभिन्न जातीने व्यापलेल्या आपल्या भारत देशात एकता, समृध्दि व आनंद नांदण्यासाठी 'एकेश्वरवाद' मुक्तिसंगत, तर्कसंगत आणि बुध्दिसंगत ध्येय ठरेल. वेद आणि कुरआन ह्या

दोन्ही पवित्र ग्रंथांमधील समान सर्वसमावेशक विचार असा आहे की-''ज्याने हा संसार बनवला, ज्याने ही सृष्टि रचली, ज्याने मानवाची निर्मिती केली, जो संपूर्ण मानव जातीला आरंभापासून खाण्या-पिण्यासाठी अन्न धान्य-पाणी देत आहे. राहण्यासाठी निवारा व निसर्गापासून रक्षण करण्यासाठी विविध योजना राबवत आहे, त्या विश्व-शक्तिने (ईश्वराने) मानवास मार्गदर्शन करावे''

हे मार्गदर्शन प्राप्त करण्यासाठीच ह्या धर्मग्रंथांची निर्मिती झालेली आहे. या ग्रंथांमध्ये युगानुयुगातील सर्व मानवजातीच्या नैतिक, सामाजिक व धार्मिक गरजा भागवणाऱ्या सर्व गोष्टींचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे.

पवित्र ''कुरआन ए हकीम'', ह्या ग्रंथात प्रारंभीच असे म्हटले आहे की अल्लाह आम्हाला सन्मार्ग दाखव आणि पुढे पुढे तो ग्रंथ वाचताना सन्मार्गाच्या दिशेने नेणारी मार्गदर्शक तत्त्वे मनाला आदेश देत राहतात. मानवी जीवनाचं कल्याण होऊ दे. हा सूक्ष्म विचार मन उगम पावण्यासाठीच ह्या ग्रंथाचे वाचन आवश्यक आहे.

'वेदांचे' वाचन करताना सुध्दा हाच सूक्ष्म विचार मनात उगम पावतो. हा एकच विचार समस्त मानवांमध्ये निर्माण करण्याचे कार्य हे दोन्ही ग्रंथ करतात. किंबहुना हा एकच विचार म्हणजे विशुध्द एकेश्वरवाद' जो विभिन्न जातीत धर्मांना व समुदायांना एकत्र आणतो. एकमेकांच्या मनात एकमेकांबद्दल प्रेम निर्माण करतो. ह्या विचारामुळे वाईट कामांचे निवारण होते व सत्कर्मांचे प्रसारण होते.

हे सगळं आपल्या समजण्यावर अवलंबून आहे. त्यामुळे प्रत्येकाने ग्रंथ वाचताना तन्मयतेने ते वाचावेत, निश्चितच त्या प्रत्येकाला मार्गदर्शक तत्त्वे सापडतील. ह्यातूनच सत्यधर्माची स्थापना होईल. देशाचा विकास घडवण्यासाठी देशवासियांच्या मनातील धार्मिक कटुता नष्ट झाली पाहिजे. प्रत्येक माणसाच्या मनातील अंतर्भाग समाज-व्यवस्थेमुळे निर्माण झालेली जातीय. धार्मिक तेढ नष्ट झाली पाहिजे. ह्या मानसिक स्थितीला आपली राजकीय, सामाजिक व आर्थिक व्यवस्था जबाबदार आहे. आणि ह्या विभिन्न धर्मियांच्या

देशात युगानयुगे अस्तित्वात असलेल्या धर्म ग्रंथाचा प्रसार, एकता व समानता प्रस्थापित करण्यासाठी केला पाहिजे.

'कुरआन' या पवित्र ग्रंथाने आर्थिक शोषणाचा अंत केलाय, विश्व-भ्रातृत्व, सच्चरित्रता आणि पवित्रता राखण्याचा संदेश दिलाय. स्त्रीचा सन्मान करण्याचा उपदेश दिलाय. अनाथ, दीन आणि भिक्षूकांना सहकार्य करण्याचा उपदेश दिलाय. तसेच अतिथींचा सन्मान व स्वागत करण्याची आज्ञा केलीय.

हे सगळे करण्यासाठी रोजा (व्रत उपवास), नमाज (प्रार्थना), खैरात (दान-पुण्य) आणि हज यात्रा (तीर्थ यात्रा) चे प्रयोजन केले आहे.

कुरआनात एक महत्त्वपूर्ण संदेश आहे. मानवाच्या जन्माची पध्दत सगळ्या मानवांसाठी एकच आहे, सगळे एकाच वसुंधरे वरील अन्न खातात, वायु आणि पाणी सगळ्यांसाठी एकच आहे. प्रकाश व अंधार सगळ्यांसाठी सारखाच आहे. सूर्य-चंद्र सगळ्यांसाठी समान आहे. मग माणसा-माणसात भेदभाव का? विश्व-भ्रातृत्वची भावना साकार करण्याचा उद्देश मांडलेला आहे.

वेदांमध्येसुध्दा ह्याच आशयाचे संदेश आहेत. ''जे स्वतःचं जीवन निर्मळ आणि पवित्र बनवतात त्यांनाच ईश्वराचे ज्ञान, प्रकाश आणि मार्गदर्शन तत्त्वे लाभतात. असा सूक्ष्म विचार वेदांमध्ये व कुरआनात संपूर्ण मानव जातीच्या कल्याणासाठी मांडलेला आहे. पवित्र वेद आणि कुरआनात वैश्विक मानवाच्या सर्वांगीण विकासाची तत्त्वे रखाटलेली आहेत.

मुस्लिम धर्मियांचा ग्रंथ कुरआन व हिंदू धर्मियांचा वेद मानवी जीवनाच्या हितातीच तत्त्वे आपल्यासमोर ठेवतात. फक्त आपली वैचारिकता बदलून ती स्वीकारण्याची तयारी हवी. वेद आणि कुरआनाची निर्मिती विश्व शक्तिनेच मानवी हितार्थ केलेली आहे. हे पवित्र ग्रंथ माणसा-माणसातील भेदभाव नष्ट करण्यासाठी आहेत. विश्वशक्ति म्हणजेच ईश्वर, अल्लाह! (किंवा ज्या नावाने आपण हाक मारु ते.) सर्व धर्मियांच्या ग्रंथात मानवी उत्कर्षांचेच विचार असतील, ह्याबद्दल शंका नाहीय, फक्त मानवाने ते समजून घेतले पाहिजेत. हीच विश्वप्रार्थना आहे.

डॉ. सुनील सावंत
मो. ९८१०१८२३२९

आदि गुरू वेदव्यास

सीमा ओवळेकर

प्राचीन काळापासून गुरु-शिष्य परंपरा चालत आली आहे. गुरू म्हणजे ज्ञानरुपी सहस्त्र धारांचा अखंड झरा आहे. या भारत भूमीत हजारो संत, महंत मुनिश्रेष्ठ होऊन गेले. प्रत्येकाला जीवनात गुरू असावाच लागतो. जीवन नौका पार करण्याची शक्ती गुरुमुळेच मिळते. सद्‌गुरुनी डोक्यावर हात ठेवला की ईश्वरी कृपा प्राप्त झाल्याचा सात्विक आनंद होतो.

''ब्रह्मानंदम् परमसुखदम् केवलं ज्ञानमूर्तिम !" गुरुकृपा प्राप्त झाली की परमसुख देणारा ब्रम्हानंदच वाटतो. गुरु म्हणजे केवळ ज्ञानमूर्तिच असते. विरक्त आणि ईश्वरभक्त स्वच्छ, शुद्ध निर्मळ मन असणे ही गुरुची लक्षणे होत ही सारी लक्षणे महर्षि व्यासांकडे होती.

हिंदु संस्कृतीत दरवर्षी गुरुपौर्णिमा साजरी केली जाते. गुरुपौर्णिमेस 'व्यासपौर्णिमा म्हणतात. गुरुपौर्णिमा हा व्यासांचा जन्मदिवस.

आषाढ पौर्णिमेस मध्यान्हाच्या वेळी यमुनेच्या द्विपात व्यास ऋषि जन्मास आले. यमुनेच्या द्विपात सावळा वर्ण असलेले जन्मास आले म्हणून कृष्णद्वैपायन. पराशर महामुनिंचा पुत्र म्हणून पारशर्य. सत्यवतीच्या पोटी जन्मास आले म्हणून सत्यवतीसूत. बदरिकाश्रमात तपश्चर्या केली म्हणून बादरायणव्यास म्हणून ओळखले जाऊ लागले. वेदांचा विस्तार केला म्हणून 'वेदव्यास' ही संज्ञा लाभली.

भारद्वाज गोत्रात जन्मलेले व्यास ऋषि वसिष्ठांचा पणतु, शक्तिचा नातु होते, पराशरांचा पुत्र होते तर शुक्र मुनिचा पिता होते. तपोनिधि व्यास सर्व चराचराचे गुरु आहेत. धर्मगुरु आहेत. आध्यात्म गुरु आहेत. वाङ्मय गुरु धर्मगुरु आहेत. तत्वज्ञानिक गुरु आहेत. व्यवहार ज्ञान देणारे गुरु आहेत. प्रापंचिक ज्ञान देणारे गुरु आहेत.

व्यासांनी जगाचा उदंड अनुभव घेतला. मानवी स्वभावाचे बारकाईने निरीक्षण केले. या निरीक्षणातून पुढच्या पिढीने कसे वागले असता त्यांचे कल्याण होईल. याचे मार्गदर्शन केले आहे. राष्ट्राच्या उत्कर्षासाठी मानवी जीवन वैभवशाली व्हावे. यासाठी भगवतगीतेचा सुगंध घेऊन उमललेले पवित्र कमळ असे महाभारत लिहिले. महर्षि व्यासांचं महाभारत या कलाकृतीचं भावी पिढीसाठी एक आव्हान आहे. त्यातील व्यक्तिरेखा निरनिराळ्या स्वरुपात साकारल्या आहेत धृतराष्ट्राची बघण्याची नाही पण ऐकण्याची इच्छा पूर्ण होण्यासाठी व्यास ऋषिंनी संजयला दिव्य दृष्टी देऊन युगान्ताची दुश्चिन्हे पहावयास मिळतील याची कल्पना दिली. व्यास हे अंतरीचा दिवा होते.

द्रोणाचार्य, अश्वत्थामा, दुर्योधन, दुःशासन इत्यादी कौरवाच्या अस्वस्थ मनाची आंदोलने नाशकारक आहेत असे त्यांनी निक्षून सांगितले. अश्वत्थामा आणि अर्जुन एकमेकांवर ब्रह्मास्त्र टाकणार हे लक्षात येताच व्यासांनी अडविले. नाहीतर सारे विश्व पेटले असते. यावरुन व्यासांच्या अंतःकरणात खोल

आपल्याला प्रभावशाली व्यक्तिमत्वाचा पुर्णावतार असलेला जगत्गुरु श्रीकृष्ण दिला.

कर्ण व व्यास दोन्ही कुमारी मातेची मुले. कर्णाने आईला क्षमा केली नाही. पण व्यासांनी आपल्या मातेला समजून घेतले. इतके ते क्षमाशील होते. कौरव पांडवांचा हेवादेवा मिटण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले. सत्यवतीच्या वृद्ध डोळ्यांना या कलहामुळे होणारा सर्वनाश व्हाण्याची वेळ येऊ नये. म्हणून तिला तिच्या सुनांसह तपाचरणासाठी अरण्यात स्वतः घेऊन गेले. तिचा अंतकाळ जवळ आला आहे हे त्यांनी अंतर्ज्ञानाने जाणले होते. व्यास अतिशय सहनशील होते. सत्यवादी होते. 'सत्यमेव जयते'! हा जगाला संदेश दिला.

'यतो धर्मः ततो जयः (जेथे धर्म आहे तेथे जय आहे) या घोषवाक्यातून जगाला जागृत केले.

मानवानं धर्माचरणानं वागावं. राजधर्म म्हणजे राजकारण नव्हे. राजधर्म पाळला तर जनता सुखी होईल. 'राजा कालस्य कारणम् ! प्रजेला बरे वाईट दिवस येण्याला राजाच कारण असतो. अधर्माने वागणाऱ्याचा वध करणाऱ्याला वधाचाच दण्ड देणे हे निक्षून सांगितले. राजाने संयमी, प्रजाप्रेमी, सत्यवादी, सदाचरणी असणे अत्यावश्यक आहे.

द्रौपदी पाच पांडवांची झाली. पण हा दैवी संकेत आहे. असे सांगून व्यासांनी कुंती, द्रुपद आणि पांडव यांची शंका दूर केली. युधिष्ठिराचा राज्यभिषेक व्यासानेच केला. अशावेळी पांडवांना शाप देण्यास उदयुक्त झालेल्या गांधारीचे मन वळविले. युधिष्ठिराला अश्वमेध यज्ञ करण्यास सांगितले. या वेदव्यासांनी आपली अमूल्य वेदविद्या आपला पुत्र शुक्र मुनिंना शिकविली. त्यांच्या या उत्कृष्ट विचारांनी अवघे भारत व्यापले आहे.

व्यासांनी महाभारत लिहिले त्याचबरोबर परब्रम्हाच्या स्वरुपाचे वर्णन करणारी ब्रम्हसुत्रे लिहिली वेदांचे विभाजन केले. १८ पुराणे, १८ उप पुराणे, १८ महा पुराणे लिहिली. एकेका पुराणात ३ ते ४ लाख श्लोक आहेत. महर्षि व्यासांनी १७ पुराणे लिहिली तरी त्यांना मनःशांति नव्हती. या अवस्थेत हिमालयातील बद्रीनाथ येथील सरस्वती नदीच्या किनारी बसलेले असताना देवर्षि नारद आले. त्यांना व्यासांनी त्यांच्या उदासीनतेचे कारण सांगितले.

''हे देवर्षि, आतापर्यंत मनाला शांति नाही'' देवर्षि म्हणाले, ''तुम्ही फक्त ज्ञान सांगितले. पण त्याला भक्तिची जोड नाही. त्याचबरोबर कर्माचीही जोड नाही. नारद मुनिंच्या सूचनेवरुनच त्यांना १८ वे पुराण लिहिण्याची प्रेरणा मिळाली केवळ भगवंताचे भक्तियुक्त गुणगान करणारे पुराण लिहिले ते म्हणजे भागवत पुराण नुसतेच ज्ञान नको त्याला भक्तिची व कर्माची जोड असावी. असा संदेश देणाऱ्या व्यासांनी भक्तिचे नऊ प्रकार (नवविधा भक्ति) वर्णिले आहेत.

हिमालयाच्या उंचीपेक्षा अधिक आणि सागराच्या खोलीपेक्षा अधिक खोली असलेले ज्ञान व्यासांकडे होते. सर्व विश्वातील साहित्यिक लेखक, कवी यांचे लेखन एकत्र केले तरी व्यासांच्या लेखनापुढे बिंदू मात्र ठरेल. म्हणूनच तर त्यांच्या जन्मदिवसास गुरुपौर्णिमा, व्यासपौर्णिमा म्हणतात. ब्रम्हविद्या प्राप्त झालेल्या अलौकिक बुद्धिमत्ता, दूरदृष्टी, कवित्व, गगनाला भिडणारे साहित्य लेखन, आंतरिक कळवळा या गुणांमुळेच ज्या ठिकाणी उभे राहून व्याख्यान दिले जाते त्या स्थानास 'व्यासपीठ' म्हणतात. व्यासपीठावर उभे राहून व्याख्यान देणाऱ्या वक्त्याने व्यासांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून मंचावर विराजमान होण्यापूर्वी व्यासपीठास नमस्कार करावा. त्याचबरोबर 'व्यासोच्छिष्टं जगत्सर्वम् ध्यानात असावे.

व्यासांनी रचलेल्या व संपादित केलेल्या समग्र वाङ्मयास व्यासचर्या म्हणतात. धर्मकारण, राजकरण, अर्थकारण, समाजकारण, वाङ्मय, शिक्षण, कला आणि विज्ञान या संस्कृतीच्या अष्टांगावर व्यासांइतका प्रकाश कोणीही टाकलेला नाही. म्हणूनच व्यासांचे व्यासोच्छिष्टं जगत्सर्वम्' । ही म्हण पडली आहे.



शिष्याने शिष्यधर्माचा, योग्याने योगधर्माचा, तपस्वाने तपोधर्माचा, विद्यार्थ्याने विद्यार्थी धर्माचा, तसेच अवघड परिस्थितितूनही ध्येय सिद्धीचा मार्ग कसा काढावा? यासाठीच गुरु-शिष्य परंपरा दाखविण्यासाठी श्रीकृष्ण-अर्जुनाचे उदाहरण दिले आहे. भारद्वाज, विश्वमित्र, वशिष्ठ यांना तपोबलाने सिद्धी कशी प्राप्त झाली याचीही उदाहरणे दिली आहेत.

षड्‌रिपुंपासून दूर राहून, शुद्ध आचरण, शुद्ध वाणी व शुद्ध मन असावे. असत्याचा व अधर्मांचा पराभव झालाच पाहिजे. 'परोपकारः पुण्याय, पापाय परपीडानम् (परोपकार करणे हे पुण्यकर्म आहे. दुसऱ्याला त्रास देणे हे पापकर्म आहे) हे सूवचन ध्यानात ठेवावे. व्यासांनी सांगितलेल्या सूवचनांचे आचरण केल्यास माणसाचे पतन होत नाही.

व्यासांइतके जाज्वल्य व्यक्तिमत्व साऱ्या विश्व संस्कृतीत नाही. वेदोत्तर कालखंडापासून साऱ्या विश्व संस्कृतीत नाही. वेदोत्तर कालखंडापासून आजपर्यंत व्यासांचा प्रभाव सर्वाधिक आहे. वैराग्य, अंतर्दृष्टी, ज्ञानवंत, मानवी जीवनाकडे पहाण्याची परोपकाराची वृत्ती, धर्माचे यथार्थ आकलन, मातृ-पितृव्रत, अढळ भक्ति समाजाला आध्यात्मिक बनविण्याची जाज्वल्य निष्ठा, राष्ट्राच्या प्रगतीचा ध्यास या लोकोत्तर गुणांमुळेच महामुनी व्यास हे भारतीय संस्कृतिचा मानदण्ड आहे, महाप्राण आहे. या महामुनींचे दिव्य जीवन संपले असले तरी त्यांचे दिव्य संदेश आचरणात आणावे.

व्यासाच्या रुंदीवर वर्तुळाचा परिघ ठरतो. व्यास जितका मोठा तितके त्याच्या पराक्रमाचे, सत्कर्माचे वर्तुळ मोठे असे या महर्षिनी सांगितलेले आहे. त्याप्रमाणे मानवाने 'सत्कर्म योगे वय घालवावे' हे ध्यान्यात ठेवून जीवननौका पार करावी.

व्यासपरंपरेतील शिष्यांनी त्यांच्या वाङ्मयाचा (व्यासचर्येचा) प्रसार केला. व्यासांच्या पलिकडे जाऊन त्यांच्यापेक्षा अधिक ज्ञान शोधण्यासाठी दुसरा व्यास जन्माला यावा लागेल. वाट पाहिली पाहिजे. कुणी सांगावं? व्यासांचा वारसा पुढे नेणारा दुसरा व्यास याच मातीतून निर्माण होईल. या मातीत अजुनही तितकीच ताकद शिल्लक असेल. अलौकिक ब्रम्हविद्या प्राप्त झालेल्या 'व्यासोच्छिष्टं जगत्सर्वम्' हे सूवचन सार्थ करणाऱ्या या महान आचार्यांस सर्वांतर्फे वंदन असो.

'इति व्यासार्पणमस्तु।'

सीमा रमेश ओवळेकर
भ्रमणध्वनी ९३२२००७७४३

आध्यात्म प्रभू

रामकृष्ण परमहंस

- यशवंत बी. कदम

श्री रामकृष्ण परमहंस हे सद्‌गुरु आपल्या शिष्यांना, साधकास अध्यात्माचा विषय त्याच्या कुवतीप्रमाणे सांगत शब्दाचे अर्थ, समजेल, पचेल, अशा पद्धतीने सारे अगदी सोप्या भाषेत समजावून सांगत असत. त्यांचा सारा भर दृष्टांतावर असे. मतभेद झालेच तर ते कधी वाद घालीत नसत, उलट तो विषय एखादी साधी गोष्ट सांगून, उदाहरण देऊन शिष्यांच्या मनावर ठसवित असत. शेवटी ते सांगत, ''माझे काम झाले तुम्हाला पटेल तसे घ्या वा सोडून द्या.'' कधी कधी ते आपल्या शिष्यांची गिते, पदे आपल्या सुस्वर श्रोत्यांसमोर गाऊन दाखवीत व त्यांना मंत्रमुग्ध करीत असत.

रामकृष्णांचा पूर्ण श्रद्धा विश्वास कालीमातेवर होता. कालीमातेला ते आई म्हणून संबोधत असत. त्यांच्या प्रवचनात ते सांगत, तुमचा तुमच्या आईवर पूर्ण विश्वास हवा. तीच तुमची जन्मदात्री, उद्धारकर्ती पालनपोषण करणारी तीच तुमची मुक्तीदात्री होय. ती तुमच्यावर प्रसन्न असल्यावर तुम्हाला कशाची कमतरता नाही. तुमच्या ज्ञानाचे भांडार ओसंडून वाहील. हे रुप जसे सगूण भासते तसे ते निगुणही आहे. ती आई, माया, ब्रह्ममाया या सर्व भूमिकात तुमच्या जवळ वावरते आहे. पण त्यावर तुमचा विश्वास हवा.

तिच्या प्रसन्नतेसाठी अनंत कष्ट उपसण्याची तयारी हवी, व्याकुळता हवी, अष्ठोप्रहर तिचे ध्यान हवे व मुखी तिचे नाम हवे. हे करीत असताना आपल्या नित्य कामाची घडी विस्कटणार नाही नां! याची काळजी घ्यायला हवी आणि त्यामध्ये अतीव सावधानता हवी. ते एका प्रापंचीक बाईचे उदाहरण देताना सांगतात ''ती बाई कांडीत असते सारीत असते त्याचवेळी ती मुलाला दूध पाजीत असते त्याचवेळी आपला हात मुसळाखाली येणार नाही याची काळजी घेत असते.

विषय प्रतिपादनात रामकृष्ण चपकल अशी उदाहरणे देत त्यांच्या सूक्ष्म अवलोकन शक्तीचे लोक कौतुक केल्याशिवाय रहात नसत. सम्मत संख्याशास्त्रातील कठीण विषयासंबंधी विवेचन चालू असो किंवा प्रकृती व पुरूष याविषयी चर्चा चालू असो. रामकृष्ण म्हणत, ''खरेतर प्रकृतीच सारे काही करती असते, असे असेल तरी पुरूषावाचून तिला काहीही करता येत नाही. खरेतर पुरूष व प्रकृती यांच्या संयोगानेच हे विश्व बनले आहे. त्याच्यामध्ये होणारे बदलही या दोन गोष्टींच्या संयोगानेच घडत आहेत. पुढेही या विश्वाच्या अंतापर्यंत ते घडत रहाणार आहेत. हे सत्य शिष्यांनी आपल्या मनात ठसवून घेतले पाहिजे. ह्यात द्वैत काही नाही.

त्यांच्या प्रवचनाला येणारे लोकही त्यांच्या शिष्यांच्या व्यतिरिक्त व्यापारी , डॉक्टर, विद्यार्थी, शेतकरी तसेच अगदी सामान्यातले सामान्य लोकही असत. ते त्यांच्यावरील प्रेमापोटी

येत असत. जर रामकृष्णांना वाटले की आपण जे आपल्या श्रोत्यांना सांगितले आहे ते त्यांना समजले नाही असे त्यांच्या चेहऱ्यावर दिसले तर रामकृष्ण तो विषय असंख्य उदाहरणे देऊन सोप्या भाषेत पुनः सांगत व तेही सामान्यांना पटेल, रुचेल, अशी उदाहरणे देऊन आणि वर म्हणत ''यात न समजण्यासारखे काय आहे!'' या विश्वातल्या सगळ्या गोष्टी प्रकृतीलाच कराव्या लागतात. ते जरी ती करीत असली तरी पुरूषाशिवाय तिला हे करता येत नाही, हे मात्र खरे!

वेदांताच्या गोष्टी बऱ्याचवेळी चर्चेत येत त्याबद्दल सांगत, वेदांतात सांगितले आहे की ''ब्रह्म व ब्रह्मशक्ती हे एकच आहेत. ते दोन्ही वेगवेगळे पदार्थ नव्हेत. ते कधी पुरूष भावाने वा कधी स्त्री भावाने रहात असते. उदा. ''साप कधी वेटोळे घालून बसतो. असा स्वस्थ बसलेला साप म्हणजे पुरूष व तोच साप जेव्हा चालत असेल तो प्रकृतीभाव. तो स्वस्थ असताना प्रकृती त्याच्यात विलीन झालेली असते''. या ऊपर जर कोणी त्यांना विचारले की,

ही ईश्वरभक्ती ईश्वरामध्येच वास करते?

त्यावर ते म्हणत, ''ती ईश्वरामध्ये वास करते पण ईश्वर तिच्यामध्ये बध्द नाही''.

''ब्रह्म सत्य आणि जगत् मिथ्या '' यावर भाष्य करताना रामकृष्ण परमहंस म्हणत, ''हे एकदा ऐकून घेतले की श्रवण, मनन म्हणजे मिथ्या वस्तुचा त्याग व सत्य वस्तू ती ब्रह्म, तिच्या ध्यानात, मनाला लावले पाहिजे. आपल्या ज्ञानाने वस्तुलाभ होत नाही. त्यासाठी धारणा पाहिजे, त्याग पाहिजे. नुसत्या तोंडाने त्याचा उच्चार करून कहीही साधत नाही. दुसरे, वेदांताचे अनेक ग्रंथ वाचून ज्ञान मिळत नाही. गुरू मुखातून त्याचा उच्चार व्हायला हवा''.

'मन तितके मार्ग' त्यावर एका शिष्याने विचारले, ''मग आम्ही कोणता मार्ग पत्कारला पाहिजे? त्यावर रामकृष्ण म्हणाले, ''ज्याला जो मार्ग पसंत असेल तोच मार्ग त्याने पत्करला पाहिजे. दृढभावाने त्याचा पाठपुरावा करावा, जसा भाव तसा लाभ! भाव म्हणजे ईश्वराशी भक्तीचे नाते! '' त्या भावाचा पक्का अहंकार माणसाला हवा. पण आपण सर्वजण कच्च्या अहंकाराचे बळी आहोत. मी, माझे, यातच सर्वसामान्य लोक अडकले आहेत. त्यात परमेश्वरचा लाभ दुर्लभ आहे. देवाबद्दल ज्यास निस्सीम प्रेम, ओढ आहे त्यास, परमेश्वराला दर्शन द्यावेच लागते.

''ईश्वर सर्वत्र भरलेला आहे मग तो आम्हाला का दिसत नाही?'' यावर रामकृष्ण म्हणत,

''पाण्यावर शेवाळ आलेले असते, त्यामुळे त्या शेवाळाखालचे पाणी दिसत नाही. हे शेवाळ म्हणजे मायेचा पडदा, ही माया एकदा का तुम्ही ओळखलीत तर मग परमेश्वरामधला पडदा दूर करता येतो व तो आपणास दिसतो. त्या मायेला प्रथम दूर करा''. ईश्वर दर्शन झाल्यावर हजार जन्माचे पातक एकदम नष्ट होऊन जाते." मग एकदम प्रकाशच प्रकाश, अंधाराचा मागमुसही रहाणार नाही. त्यासाठी साधकाला व्याकूळ व्हावयास हवे. काम, क्रोध, अहंकार यांना पूर्णपणे गाडून टाकले पाहिजे तेव्हाच हे साध्य होईल. ही वाटते तितकी सरळ, सोपी गोष्ट नाही.

एकदा एक शिष्याने विचारले, ''ईश्वर साकार आहे, की निराकार?''

त्यावर रामकृष्ण म्हणाले, ''ईश्वर साकारही आहे. आणि निराकारही आहे! पाणी हे ईश्वरासारखे निराकार आहे, पण जेव्हा त्याचा बर्फ होतो तेव्हा ते साकार होते, ईश्वर आपल्या इच्छेप्रमाणे वेगवेगळे आकार घेत असतो, तरीही त्याचे मुळचे स्वरूप हे निराकाराच असते.''

दुसऱ्या शिष्याने विचारले, ''महाराज साधनेमध्ये सद्‌गुरूची आवश्यकता आहे काय?

तेव्हा रामकृष्ण म्हणाले, ''सद्‌गुरूशिवाय चालायला काहीही हरकत नाही पण सद्‌गुरू शिवाय त्याच साधनेचा मार्ग सुकर होणार नाही. त्याला पूर्णत्व येण्यास वेळ लागेल. एखाद्या मोठ्या जहाजाला लहान होडके बांधले तर ते त्या जहाजाबरोबर बांधल्याने इच्छीत स्थळी जाईल. पण जर नावाड्याने स्वतःच ते वल्हवायचे ठरवले तर त्या ठिकाणी पोहोचण्यास खूप वेळ लागेल. हे सत्य आहे की नाही! प्रत्येक माणसाच्या मनात ईश्वराला भेटावे असे असते. पण त्याच्यावर मायेचा दांडगा प्रभाव असतो व त्यामुळे तसे वाटूनही त्याला ते क्षणीक वाटते. पण दुसऱ्या क्षणाला तो पुनः प्रपंचात ओढला जातो व त्यातच रमतो. माणसाला प्रपंचाची गोडी फार, तरूण वयात काम सोडवत नाही पण उतार वयातही त्याच्या मतीत फारसा फरक पडत नाही. विधवांना नवऱ्याचा पाश नसतो. तरीही त्या परमेश्वर साधनेत रमत नाहीत, उलट दुसऱ्याच्या प्रपंच्यात लुडबुड करतात.

तेव्हा सर्वांनी त्या परमेश्वरावर प्रेम करा, त्याच्या भेटीची आस मनात बांधा. मायेला मागे रेटा व परमेश्वराचा ध्यास धरा. तुम्हाला तो भेटेलच यात शंका नाही. मायेच्या कचाट्यातून सुटका व्हायला ईश्वराची कृपा हवी म्हणून मनात सतत त्याला स्मरा. आपल्या मनात व्याकुळता यायला हवी तरच हे शक्य आहे. मनुष्याने संसारपाशात न गुंतता अखंड, ईश्वराचे चित्र मनात ठेवले पाहिजे. हे सांगताना रामकृष्ण म्हणतात, अंड्यातून पिल्लू बाहेर येते, पण मरणाच्या भितीने ते पिल्लू वरच्यावर पुनः उडू लागते. तेव्हा आपणही हा धोका ध्यानात घेऊन सदैव नामस्मरणात सतर्क असायला हवे आहे, तोच एक सोपा मार्ग आहे. मायेपासून सुटका झाल्याशिवाय स्वर्ग मिळणार नाही, परमेश्वर प्राप्ती नाही हे सत्य आहे.

अशा अनेक साध्या-साध्या गोष्टींपासून अध्यात्माच्या गहन विषयांपर्यंत सगळे विषय रामकृष्ण अत्यंत तन्मयतेने साधकाना शिकवीत असत. शिष्यांना सावध करीत असत. समाधी साधनेत काहीजण फसून जात, घाबरत त्यांना त्यावेळी सांभाळावे लागे, समाधी आपोआप उतरते, घाबरण्याचे कारण नाही. पण सद्‌गुरू आपल्या शिष्यांची काळजी घेत, समाधीच्या मार्गावर परमेश्वराच्या दर्शनासाठी जाताना सद्‌गुरू त्यांना सांभाळतात, कारण तो अनुभव त्यांना असतो. रामकृष्णांनी ते सगळे अनुभव घेतले होते. हा गुंता शंकाच्या रुपाने शिष्यांच्या मनात धोका निर्माण करू शकतो. म्हणून रामकृष्णांनी हे सारे, शिष्यांना समजविले होते.

अध्यात्म इतके सोपे नाही. वेदांच्या पुस्तकात वाचूनही ते समजणार नाही इतके ते गहन आहे. ते सद्‌गुरूंकडूनच समजावून घेतले पाहिजे. योग मार्ग, कुंडलीनी, षट्‌चक्रे, सप्तभूमी हे फार गहन वा गूढ विषय आहेत. तेही सारे विषय रामकृष्णानी आपल्या शिष्यांना अत्यंत सोप्या, सरळ भाषेत, अनेक उदाहरणे देऊन समजावून सांगितले होते.

योग मार्गाचे प्रबोधन करताना त्यांनी सांगितले, की कुंडलीनी ही सुषुम्नामार्गाने मस्तकाकडे जाते. तिच्या मूळ स्थानापासून निघाल्यावर ती षट्‌चक्राचे भेद करीत करीत सहस्त्रांर स्थानाकडे जाते व प्रत्येक चक्रावर कोणाकोणाचे दर्शन होते याचा अनुभव साधकाने घ्यायला हवा. वेदांतामध्ये सप्तभूमीचे वर्णन आहे. त्या त्या ठिकाणी कुंडलीनी आल्यावरचा अलौकीक अनुभव साधकाने घेणे हाही साधनेतला फार मोठा अनुभव आहे.

रामकृष्ण सांगतात, साधारण मनुष्याची गती ही पहिल्या तीन चक्रातच असते. गुत्य, लिंग व नाभी. ही तिन्ही स्थाने भोगाची आहेत. वेगवेगळ्या देवतांची ती अधिष्ठाने आहेत. तेथे खाणे, पिणे, भोग इ. असते. ह्या पुढची पायरी होय ते स्थान भगवान शंकराचे होय. तेथ पर्यंत पोहोचलेला साधक खालच्या तीन

स्थानातून उतरत खाली येण्याची शक्यता अधिक असते.

ह्रदयाच्या ठिकाणी साधकाला ज्योतीचे दर्शन होते. व त्याला परमेश्वर भेटीची ओढलागते. जर तो स्थिर असेल तर ओढीनेच खालच्या तीन चक्राचे संधान सुटते. तेथून म्हणजे 'ह्रदय भूमीच्या' वर जेव्हा साधक सरकतो तेव्हा त्याचे मन केवळ ईश्वराच्या ठिकाणीच रेंगाळत रहाते.

रामकृष्ण सांगतात माझेही असेच झाले होते. प्रत्यक्ष गुरू जेव्हा आपल्याला आलेला अनुभव सांगतात तेव्हा शिष्यांच्या मनात तो ठसतो व ते तो अनुभव घेण्याचा प्रयत्न करतात अशा साधकाला संसारात वावरणाऱ्या लोकांपासून दूर जावे असे वाटते एकांत हवासा वाटतो. समाधीत बसावे असे वाटते. कोणाचा सहवास नकोसा वाटतो, मन गुदमरते एकांत न मिळाल्यास. ती त्या परमात्याच्या भेटीची ओढ लागते. कुंडलीनी कंठापर्यंत गेली तरी खाली उतरण्याचा धोका असतो. त्यासाठी निरंतर सावध असायला हवे. एकदा का कुंडलीनी कंठापासून पुढे भ्रुकुटीकडे गेली की, मग ती खाली येण्याचा धोका नसतो. तेथे ईश्वराचे दर्शन होऊन समाधी सुखाचा अलौकिक आनंद साधकाला अनुभवायला मिळतो.

रामकृष्ण सांगतात ते स्थान व पुढचे 'सहस्त्रार' यांच्यामध्ये एक पारदर्शक पडदा असतो. तेव्हा परमात्मा इतका जवळ असतो की, आपण त्याच्याशी एकरूप झालोच असे वाटते पण अजून एकत्र झालेले नसते, येथून मन कधीच खाली उतरत नाही. ते फार तर ह्रदयापर्यंत जाते व पुनः वर येते. लोक येथून खाली कधीही उतरत नाहीत. म्हणजे इंद्रियाधीन होत नाहीत. मायेचा पडदा दूर झालेला असतो. मन, भोगापासून दूर गेलेले असते. स्त्री, कनक, व मी पणापासून ते दूर गेलेले असते.

यासाठी सातत्याने समाधीचा अनुभव साधकाने घेत रहाणे जरूरीचे आहे. साधकाला अंतिम सत्यापर्यंत म्हणजे परमात्म्याच्या दर्शनासाठी एकवीस दिवसाच्या समाधीचा अनुभव करायला हवा. तरच तो मधला पडदा दूर होतो म्हणजे फाटतो जीवात्म्याची परमात्म्याशी एकरूपता होते. सहस्त्राकार हीच ती सप्त भूमी होय. हेच ते अंतीम सत्य होय. यातच जीवनाचे सार्थक झाले. जीव मुक्त झाला असे समजावे.

हे प्रबोधन श्री रामकृष्ण आपल्या शिष्यांकडे त्यांच्या घरी जाऊन, त्याठिकाणी जमलेल्या शिष्यांना करीत असत. कधी केशव चंद्रांकडे वा त्याच्या इतर शिष्यांकडे जात असत, वा आश्रमात. त्यांची भजने , गाणे ऐकणे त्यांना फार आवडे.

श्री रामकृष्ण परमहंसांना जात, पात, धर्म हे मुळीच मान्य नव्हते. ते सर्वधर्माच्या लोकांच्या घरी जात, त्यांच्या सोबत जेवण घेत, कोणताही भेद नसे कारण भक्त ही एकच जात त्यांना अभिप्रेत होती, त्यांनी स्वतः अनेक धर्म स्विकारले व त्यात पूर्णपणे एकरूप झाले. त्यांना काहीही वर्ज नव्हते. त्याच्या धर्माच्या धर्मगुरूंच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी परमेश्वराची साधना केली. हे समजले की कोणताही धर्म असो मार्ग वेगवेगळे पण अंतीम ध्येय एकच आहे. ते साध्य करणे ही सर्व धर्मात एकच आहे. तोच परमेश्वर - परमात्मा आहे. त्याचे स्वरूप एकच आहे. तेथे द्वैत नाही म्हणून रामकृष्णांनी आपल्या शिष्यांना सर्व धर्माच्या पंथांच्या लोकांचा, गुरूंचा आदर करावा हे शिकवले. रामकृष्णांनी या विश्वाला दिलेली ही अलौकिक भेट होय. येथे त्यांचे वेगळेपण, मोठेपण आपणास मान्य करावयास हवे.

रामकृष्ण सांगत ''तो ईश्वर माझा आहे, आपला आहे ही भावना मनी जोपासा. तरच मनातले क्षुद्र विचार आपोआप दूर होतील. ईश्वराचे सतत चिंतन करा. त्यांच्यावर प्रेम करा, साधनेत ओढ हवी, उत्कंठा हवी, थोडक्यात भेटीसाठी माणूस वेडा व्हायला हवा. व्याकूळ व्हायला हवा तरच हे सहज साध्य आहे. अन्यथा परमेश्वर प्राप्तीचा खेळ सोपा नाही. त्यासाठी विषय वासनेचा, पैशाच्या ओढीचा त्याग करायला हवा. ह्या गोष्टी ईश्वर साधनेत मोठे अडथळे आहेत. तसेच अहंकार हे धोक्याचे इशारे रामकृष्ण सतत आपल्या शिष्यांना देत असत''.

रामकृष्णांना, अभिमान मुळीच नव्हता. ते अनेक विद्वान गृहस्थांना, साधुसंताना भेटत असत व त्यांच्यापासून मिळेल ते ज्ञान आत्मसात करीत असत. ते गुरूपदावर गेल्यावरही कोणत्याही प्रकारचा गर्व, अभिमान, अहंकार याचा अंशही त्यांच्याजवळ नव्हता. एकदा असा चमत्कार झाला की केशवचंद्रसेन यांच्याकडून काही ऐकावे म्हणून ते आपल्या काहीं शिष्यांना घेऊन गेले. त्यांना शिष्यांकडून भजन ऐकायला आवडे शिवाय केशचंद्रांचे व्याख्यानही आवडे. त्यात ते तल्लीन होऊन जात असत. एकदा ''जाने मन काली, के मन षड्दर्शन ना पाय

दर्शन हे गीत रामप्रसाद गात होते. रामकृष्णांना ते गीत असताना भावसमाधी लागली व त्यांच्या मुखकमलावर अपूर्व तेज दिसू लागले. अर्ध बाह्य दशा प्राप्त झाल्यावर ते सोपे सोपे दृष्टांत देऊन अध्यात्मिक विषय उकलून सांगू लागले. मंडळी देहभान विसरून तटस्थ झाली, तन्मय झाली. त्यांच्या प्रवचनात हे असे नित्याचेच होत असे. त्यानंतर केशवचंद्रांची रामकृष्णांवर भक्ती जडली. अखेरपर्यंत त्यांचे श्रेष्ठत्व त्यांना कळले व त्यांना त्यांनी गुरू मानले. त्यानंतर 'ब्राह्मसमाज'. हे रामकृष्णांच्या सर्व शिष्यांचे मुख्य स्थान ठरले व रामकृष्ण व केशवचंद्र यांचे प्रेम वृद्धींगत होत गेले. त्यांना एकमेकांशिवाय चैन पडत नसे. असे गुरूप्रेम पहायला मिळणे दुर्मीळ. तेवढेच प्रेम रामकृष्णांचे केशवचंद्रांवर होते.

रामकृष्ण शिष्यांना सांगत, काहीतरी आघात झाल्याशिवाय माणूस भगवत् भक्तीकडे ओढला जात नाही! केशवचंद्रांनी रामकृष्णांकडून ग्रहण केलेल्या ज्ञानाचा प्रचार प्रसार कलकत्यात केला, शेवटच्या श्वासापर्यंत. रामकृष्णांच्या उच्च आध्यात्मिक ज्ञानाचा प्रचार अनेक वर्तमान पत्रातून केशवचंद्रांनी केला होता. केशव चंद्रांच्या मृत्यूनंतर त्यांच्या ब्राह्मसमाजातील सर्व समर्थक रामकृष्णांच्या चरणी विलीन झाले व अनेकांना पूर्णत्त्व लाभले.

रामकृष्ण सांगत ईश्वर आणि तुमच्यात फरक नाही. तुम्ही त्यासाठी समान पातळीवर येऊन त्याची आराधना धरा. तो मोठा किंवा छोटा नाही. त्याच्या ऐश्वर्याचे वर्णन करू नका. आपणच ईश्वरमय आहोत त्याचेच अशं आहोत असे समजा कारण तेच खरे सत्य आहे. परमेश्वर चराचरात भरलेला आहे. अणू एवढी जागाही त्याच्या शिवाय या विश्वास नाही. तो तुमच्यातही आहे, माझ्यातही त्याच रुपात आहे. त्याला पहाण्याचे वेड लावून घ्या. तो तुम्हाला भेटेलच. हे सत्य मनी बाळगा. त्यासाठी आपल्या स्वतःवर दृढविश्वास ठेवा. हे खडतर आहे. पण प्रेमाने - परमेश्वर प्रमाने सोपे होणार आहे हे ध्यानात ठेवा! त्यासाठी ईश्वरासाठी भजन व साधना आली. विषय वासनेचा त्याग त्यावर त्यांचा अधिक भर होता व ते त्यांच्या मनात ठसवित असत. स्वतः लग्न करूनही पत्नीपासून ते अलीप्त राहिले. तिलाही त्याच मार्गाची दिक्षा देऊन पूर्णत्वास पोहोचविले. हेही उदाहरण ध्यानात ठेवण्यासारखे आहे. प्रपंचाचा मोठा अडसर भगवत् साधनेत येतो. यावर ते ठाम होते.

त्यांनी आपल्या शिष्यांच्या मनावर ठसविले की ईश्वर भक्ती साकार आहे. आणि निराकारही आहे. मूर्तीपूजेत तथ्यांश आहे. त्या मूर्तीतही परमेश्वराचा अंस आहे. त्या सगुण साधनेत निर्गुणाचा लाभ होतो. हे त्यांनी लोकांना पटवून दिले. कालीमातेवर रामकृष्णांची निस्सीम भक्ती होती. ती त्यांची आराध्यदेवता होती तिच्याशी ते बोलत असत. रामकृष्ण त्यांच्या साधनेमुळे ईश्वर प्राप्त तर झालीच त्याशिवाय त्यांना अनेक सिद्धी प्राप्त झाल्या होत्या. शेवटी त्यांनी त्या साऱ्या कालीमातेच्या चरणी अपर्ण करून तिच्याजवळ शुद्ध भक्तीची याचना केली. अहंकार रहीत जीवनाचा अंगीकार केला.

रामकृष्णांनी आपला कार्यकाळ संपत आला आहे. असे जाणून आपल्या सांप्रदायाची सगळी जबाबदारी नरेंद्र उर्फ विवेकानंद यांच्या खाद्यावर सोपवली. ते त्यांच्या शिष्यवर्गातील पूर्वपदाला पोहोचलेले. सत्पुरूष आहेत याची कल्पना रामकृष्णांना होती. त्यांची योग्यता अत्यंत उच्च प्रतिची व विद्वता ही प्रकांड होती. भविष्यात त्यांनी रामकृष्णांच्या विचारांचा ध्वज विश्वाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवला व आपल्या सद्‌गुरूंचे नाव अजरामर केले ह सर्वश्रुत आहे.

ॲड. यशवंत बाबूराव कदम
भ्रमणध्वनी - ९८९२०४६८६८

स्वामी विवेकानंद

रमेश यादव

अध्यात्म आणि विज्ञान यांचा ...
सुरेख संगम म्हणजे,

स्वामी विवेकानंदाचे अध्यात्म. हे वैज्ञानिक पायावर आधारित होते. त्यांनी आपल्या विचाराने आणि कृतीने जगाला दाखवून दिले की, भारत ही सर्वाधिक विकसित संस्कृती असलेली आणि परिपूर्ण तत्वज्ञान लाभलेली भूमी आहे. प्रागतिक विचारांची विशालता आणि उदार परंपरा यांच्या सुरेख संगम स्वामीजींच्या व्यक्तिमत्वात पहायला मिळतो. ते पूर्णपणे देशभक्त होते. विज्ञान आणि अध्यात्म यांचा सुंदर समन्वय त्यांच्या व्यक्तिमत्वात झालेला होता. आपल्या भाषणात ते म्हणतात की, ''भारताने पाश्चिमात्य देशाकडून विज्ञान शिकायचे आणि जगाला अध्यात्म व संस्कृती शिकवायचे आहे. अंधश्रध्दा आणि पुरातन रुढीतून भारताने मुक्त व्हायला हवे''.

स्वामीजींचे बुध्दिचातुर्य पाहून सर जमशेदजी टाटा यांनी १८९८ साली त्यांना पत्र लिहिले, ''भारतातील विज्ञान संशोधन संस्थेचे नेतृत्व स्वामी विवेकानंदानी करावे. यासाठी जो निधी लागेल त्याचा भार मी उचलीन पण स्वामीजींनी काही तांत्रिक कारणात्सव व आजारामुळे ही जबाबदारी स्वीकारली नाही. हीच संस्था पुढे ''इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स बंगळूर'' या नावाने प्रसिध्दिस आली.

राजयोगाची व्याख्या सांगतं असताना, स्वामीजी एका व्याखानात म्हणाले, ''जगातल्या इतर कोणत्याही शास्त्राप्रमाणे 'राजयोग' हेही एक शास्त्र आहे. आध्यात्मिक जीवन घडविण्याचं ते एक शास्त्र आहे. ' मी सत्य पाहतो आणि जाणतो' असा सर्व थोर आध्यात्मिक आचार्यांचा दावा होता. पण अध्यात्म सांगत की, हा अनुभव योगानं प्राप्त होतो. योग जडाला आपला गुलाम करण्यास शिकवतो. योग म्हणजे जोडणे म्हणजेच मनुष्याचा आत्मा परमात्याशी जोडणं. मनाची एकाग्रता हाच सर्व ज्ञानाचा उगम होय. ईश्वर हेच आपलं अंतिम लक्ष्य आहे. त्याच्यापर्यंत पोचण्यात अयशस्वी होणं हा आपला मृत्यू होय. ज्या साधकाला ईश्वर प्राप्तीचं अंतिम लक्ष्य गाठायचं असेल, त्यांनी योग साधना आणि अध्यात्म साध्य करायला हवे.

न भाजलेलं कच्चं मडकं जर फुटलं तर कुंभार ते पुन्हा नव्याने घडवू शकतो. पण पक्कं भाजलेलं मडकं जर फुटलं, तर कुंभाराला ते काही परत घडवता येत नाही. त्याचप्रमाणे अज्ञानी अवस्थेत मृत्यू आल्यास मनुष्याला पुन्हा जन्म घ्यावा लागतो. पण ज्ञानाग्नीनं परिपक्व झाल्यानंतर जर मृत्यू ओढवला, तर मनुष्याला पुनर्जन्म घ्यावा लागत नाही.

''मानव सेवा हीच जिवंत देवाची सेवा'' स्वामीजींचा हा एक जीवन मंत्र. आपल्या जीवनात सातत्याने त्यांनी या गोष्टीचा पाठपुरावा केला. मानवसेवा म्हणजे सर्वात मोठी भक्ती आणि यातूनच निर्माण होते ती आध्यत्मिक शक्ती. या शक्तीच्या बळावर

जग जिंकता येते. म्हणूनच त्यांनी संन्यासी जणांना मंत्र दिला की, ''संन्यासी हा लोकशिक्षक असावा स्वतःच्या मुक्ती ऐवजी अनेक जीवांच्या दैन्यमुक्तीसाठी त्याने कार्यरत राहावे.'' स्वामी विवेकानंदानी आपल्या मठातील सर्व संन्याशांना ही शिकवण दिली आणि प्रत्येकाला मठातून बाहेर पडायला सांगितले. त्यांना त्यांचे क्षेत्र वाटून दिले आणि आपआपल्या क्षेत्रात दुःखी पीडीतांची सेवा करण्यास सांगितले. हीच अपेक्षा त्यांनी जगातील सर्व साधू संन्यास्यांकडून केली. लोकांनी आपल्याकडे धाव घ्यावी. हा अट्टाहास त्यांनी कधी धरला नाही. लोकांपर्यंत जाऊन लोकसेवा साधावी हा कटाक्ष त्यांनी ठेवला. लोकांना स्वतः भेटून त्यांची दुःख हलकी करीत त्यांच्या जीवनात आनंद पेरण्याचं व्रत त्यांनी स्वतः अंगीकारलं.

स्वामीजी पुढे म्हणतात की, ''ज्याचा ईश्वरावर विश्वास नाही तो नास्तिक होय, असं प्राचीन धर्मानं म्हटलं आहे. पण माझा धर्म म्हणतो की, ''ज्याचा स्वतःवर विश्वास नाही तो नास्तिक होय'' स्वतःवर विश्वास म्हणजे आपली आंतरिक शक्ती जागृत करणे. आपल्या शरीरात आणि मेंदूत अनेक प्रकारच्या शक्तींचा वास आहे पण आपण कधीच आपल्या संपूर्ण शक्तींचा वापर करीत नाही. जर ह्या शक्तींचा वापर सकारात्मक कार्यात झाला तर जीवनाचा मार्ग आपोआप अध्यात्माकडे जातो. अध्यात्म ही शोधून सापडणारी वस्तू नसून ती एक प्रेरणा आहे. आंतरिक इच्छा शक्ती जागृत केल्यावर अंगीकृत होते. ''मी जे मिळवितो ते माझे एकटयाचे नाही. ज्यास काही काहीच मिळाले नाही, त्याच्यासाठी माझ्यातला घास राखून ठेवणे गरजेचे आहे. कारण हा देश, इथला प्रत्येक माणूस सुखी व्हावा ही माझी इच्छा आहे'' ही भावना स्वामीजींनी व्यक्त केली आहे. ''जर आपली तरुण पीढी घडली तर माझ्या राष्ट्राचे भविष्य उज्वल असणार'' असे ते मानीत. त्यांनी रुजविलेली, 'बंधु आणि भगिनीनों' ही भावना बंधु भाव शिकविते. यापेक्षा आध्यात्मिकतेचा मोठा मंत्र आणखी काय असू शकतं ? जर ही भावना प्रत्येकाच्या मनात रुजू लागली तर वैर वैमनस्य आपोआप संपतील 'स्त्री ही माते समान असतो' ह्या अस्तित्वावर त्यांचा ठाम विश्वास होता. प्रत्येक स्त्री बाबत आदराची भावना असली पाहिजे. त्यांनी फक्त आदेश न देता ते तत्वज्ञान आपल्या जीवनात प्रत्यक्ष उतरविले.

सर्वधर्म परिषदेसाठी स्वामीजी अमेरिकेत असतांना त्यांची विद्वत्ता, तेजपुंज चेहरा, बळकट आणि रुबाबदार शरीरयष्टी तसेच अमोघ वक्तृत्व पाहून अनेक धर्मगुरुंच्या पोटात दुखू लागले. ते स्वामीजींची बदनामी करु लागले. त्यांच्या चारित्र्याविषयी शंका व्यक्त होवू लागल्या. हे सारे काही अमेरिकेत वर्तमान पत्रात छापून येत होते. असाच एक कट रचला गेला. स्वामीजींना मोहात पाडण्यासाठी एका सुंदर फ्रेंच युवतीस त्यांच्याकडे पाठविले गेले. स्वामीजींना एकटे पाहून एके दिवशी ती फ्रेंच सुंदरी त्यांच्यावर प्रेमाचे जाळे टाकू लागली.

ती स्वामींना म्हणाली, ''मला तुमच्या सारखा एक तेजस्वी पुत्र व्हावा ही माझी इच्छा आहे, आपण ती पूर्ण कराल का ?''

स्वामीजी म्हणाले, ''अरे ह्यात असे विशेष काय माते ? मी तुझा पुत्र म्हणूनच तुझ्या समोर उभा आहे. तू माझी माता होणार ना ? मग खंत करु नकोस''.

स्वामीजींनी तिला वाकून नमस्कार केला. त्या सुंदरीचे डोळे उघडले. तिला त्यांचे विशाल हृदय कळाले.

पश्चाताप करीत ती म्हणाली, ''स्वामीजी आपण मला माफ करा मी तुमची बदनामी करायला आले होते, पण मीच बदनाम झाले, आपण महान आहात.''

हे कशामुळे शक्य झाले ! स्त्रियांविषयी असलेला आदर. ह्या आध्यात्मिक शक्तीमुळेच, अध्यात्म जागविण्यासाठी मनाचे शुध्दीकरण आवश्यक असते. आपल्या इंद्रियांवर आपले वश असावे लागते. संत तुकारामांचा एक अभंग याच विषयावर आहे, 'कस्तुरी भिजली जये मृत्तिकैसी । तया आणिकासी कैसी सरी ।। लोखंडाचे अंगी लागला परिस । तया आणिकास कैसी सरी । तुका म्हणे मी नवजें यातीवरी । पूज्यमान करी वैष्णवासी ।।

स्वामीजींच्या मते, वेदान्त पाप मानत नाही. ज्याची भीती बाळगावी, अशा ईश्वराचे प्रतिपादन करीत नाही. ईश्वर हा आपलाच आहे. कारण तो आपला आत्मा आहे. आपला आत्मा म्हणजेच ईश्वर म्हणूनच मी म्हणतो की ''स्वर्ग आपल्या आत्म्यात आहे, तो इतरत्र नाही. स्वर्ग आणि ईश्वर शोधण्यासाठी आपले आंतरिक मन शोधावे. हे जग स्वतःच ईश्वरच आहे. वेदांत

आपल्याला वैश्विक एकात्मता सांगतो. सारे एक आहेत, हे विश्व माझे शरीर आहे. सर्व मने माझीच आहेत. सर्व चरणांशी मीच वास करतो. या साऱ्यांची अनुभूती मला येत नाही, ही उणिव आहे. यासाठी आपल्या सत् स्वरुपाचे ज्ञान आवश्यक आहे. सर्वांशी एकात्मतेची जाणीव होणे, सर्व मनांच्याद्वारा अनुभव येणे, हेच अमरत्व आहे. याला सहअनुभूती म्हणतात. वेदांत म्हणतो, ''या साऱ्याचा पलीकडे जा. मी जेव्हा संपूर्ण विश्वाचा अनुभव घेतो, तेव्हा संपूर्ण विश्व मी होतो'', या विचाराने धडकी भरते, बऱ्याच जणांना हे पचत नाही. स्वामीजी त्यांना सांगतात, ''उदिष्ट, जागृतता'' तुम्ही ईश्वरी स्वरुपाचे आहात." तुम्ही ज्याचे स्वप्न पाहत असता तेच तुम्ही निर्माण करीत असता. तुम्ही वाईट स्वप्न पाहिले, तर नरक निर्माण होईल, चांगले स्वप्न पाहिले, तर स्वर्ग निर्माण होईल. तुम्ही आत्मा आहात, स्वतःच स्वतःला संकटातून बाहेर काढा ! स्वतःच स्वतःचा उध्दार करा. तुम्हाला मदत करायला कुणीही नाही, असे मानू नका. तुम्ही करीत असलेल्या कामात एक विशिष्ट शक्ती अभिप्रेत असते. वेदांताचे ईश्वर हे तत्व आहे, व्यक्ती नाही. तुम्ही आणि मी आपण सर्व व्यक्तिरुपातील ईश्वर आहोत. आपण सर्व त्याची रुपे आहोत.

विवेकानंदाना भव्यदिव्य गोष्टींचा ध्यास होता. लहानपणी त्यांना मूर्तीपूजा मान्य नव्हती. त्यांना निराकाराच्या ध्यानात खूप रस होता. त्यांचे गुरुदेव रामकृष्ण परमहंस यांनी त्यांच्यावर चुकून ही कधी बळजबरी केली नाही. स्वामीजी ब्रह्म समाजाचे सदस्य होते. असे असूनही ते श्री रामकृष्णांच्या प्रेमात पडले होते. कालांतराने जेव्हा त्यांना अदृश्य शक्तीची प्रचीती आली तेव्हा ते काली माँ चे भक्त झाले. स्वामीजींचा हिंदू धर्म हा अध्यात्मावर आधारीत होता. जगातील सर्व धर्मांना समाविष्ठ करण्याची ताकत त्या धर्मात होती. याच बळावर त्यांनी सर्वधर्म परिषद जिंकली होती.

श्रीरामकृष्ण आणि स्वामी विवेकानंद हे एकामेकांसमोर ठेवलेले दोन स्वच्छ निष्कलंक आरसेच आहेत किंवा एकामेकांसमोर ठेवलेले दोन दिवेच कोणत्या दिव्यानं कोणता दिवा पेटला हे सांगणे जरा कठिणच आहे. विवेकानंदाना जे काही सांगावसं वाटलं ते त्यांनी निर्भीडपणे सांगितले. सर्वांना वेदाभ्यासाचा अधिकार आहे. हे त्यांनी छाती ठोकपणे जगाला सांगितले. ''धर्माबिर्माच्या गोष्टी

इथं सांगावयाच्या असतील तर या देशातील लोकांच्या पोटापाण्याचा प्रश्न आधी सोडवावा लागेल", असं ठणकावून सांगणारे संत स्वामी विवेकानंदच होते. 'धर्मांतर न करता कुठल्याही पंथाचा, संप्रदायाचा माणूस वेदांती होऊ शकतो' अशी वेदवाणी देणारे स्वामीजीच होते. 'पूर्वीचे देव आता थोडे जुने झाले आहेत. आता आपल्याला नवा हिंदुस्थान, नवा देव, नवा वेद, नवा धर्म बनवायाचा आहे. ''मला माझ्यासारखे शंभर युवक मिळाले तर या देशाचे चित्र मी बदलून टाकीन'' असं प्रतिपादन करण्याचं धारिष्ट्य विपरीत परिस्थितीत आणि पारतंत्र्याच्या काळात स्वामी विवेकानंदानी दाखविले. 'स्थापकाय च धर्मस्य सर्वधर्मस्वरुपिणे, अवतारवरिष्ठाय रामकृष्णाय ते नमः' असे ते आपल्या गुरुजी विषयी मत व्यक्त करतात.

स्वामीजीचं अध्यात्म कबीराच्या वाणीत सांगायचं झालं तर असं म्हणता येईल. ''साधु कहाना बडा कठिन होता है । यह हर किसीके बस की बात नहीं । इस मार्ग में बड़े जोखिम होते है। मन को बहुत मजबुत करके चलना पडता है । तथा पग -पग पर त्याग करना होता है ।''

साधु कहावन कठिन है । लंबा पेड खजुर,
चढ़े तो चाखे प्रेम रस । गिरे तो चकनाचूर ।

वृक्ष कबहुं नहिं फल भुखे । नदी न संचय नोट ,
परमारथ को कारने । साधुन धरा शरीर

आपल्या राजयोगात स्वामीजी म्हणतात. ‘‘मुसळ स्वर्गात जरी गेलं तरी आपलं कांडायचं काम ते काही सोडत नाही. माझंही जवळ जवळ तसंच आहे. विस्तार पावणं हेच जीवन होय. संकोच हाच मृत्यू माझ्या गुरुदेवांनी ज्या कार्याचा स्फुल्लिंग माझ्यात जागवला त्या कार्याचा विस्तार करणं हेच माझं जीवन. गुरुजी म्हणायचे आत्महत्या करायची झाल्यास साधी सुई देखील पुरेशी असते. पण दुसऱ्याला मारण्यासाठी मात्र तलवारी बंदूका लागतात.

माझ्यातला आणि माणसातल्या ‘मी’ ला मारण्यासाठी माझं हे लेखन, वाचन आणि वाख्याने म्हणजे माझ्या तलवारी-बंदुका आहेत’’.

रमेश यादव
४८१-१६१ विनायक वासुदेव
एन.एम.जोशी मार्ग, चिंचपोकळी (पश्चिम)
मुंबई-४०००११. फोन : ९८२०७५९०८८
Email : rameshyadav0910@yahoo.com

निळा सावळा हरी

किती भोळा विठाई
गंध माळा कपाळी
वाट पाहे भक्ताघरी
निळा सावळा हरी
वाळवंटी पंढरी
संत करिती वारी
चंद्रभागेच्या ग तिरी
माझा सावळ हरी
पक्षी गाई अंबरी
देह देवाचे मंदिरी
पिल्ला बांधुनिया उदरी
नाम तुझे रे हरी
सांगे संत जनाई
तुझे नाम मुरारी
दुःखी जना तारी
तु बा सखा हरी
ज्ञानदेवाची माऊली
नामदेवाची सावली
गोरा सावताची आई
चोखा म्हणे श्रीहरी
वाट पाहे भक्ताघरी
निळा सावळा हरी

डॉ. पल्लवी बनसोडे - परूळेकर

तोल

सुखात आणि दुःखातही ‘आनंद’ शोधला पाहिजे
तराजूच्या काट्यसारखा ‘तोल’ साधला पाहिजे

आनंदाला पूर येईल, तेव्हा वळचणीला ठेवा ‘आसू
असह्य होईल दुःख तेव्हा, तागडीत टाका हसू

एक दिवस जगण्यासाठी फुले फुलत असतात
वाऱ्याच्या झुळूके बरोबर छान डुलत असतात

निरागस हसण्याचे मोल कळले पाहिजे,
तराजूच्या काट्यासारखा तोल साधला पाहिजे...

वादळे येतात, पडझड करतात, ठेवून जातात खुणा
उगीच लक्षात ठेवतो आपण, शब्द अधिक उणा

तरीही अंधार साक्ष ठेवून, तारे उगवत असतात
रोज नव्या उत्साहाने नक्षी काढत असतात

अंतर्यामी कौतुकाचा बोल जपला पाहिजे,
तराजूच्या काट्यासारखा तोल साधला पाहिजे...।

आनन्द श्रीधर सांडू

गंगोत्री स्वानंदाची

मला भावलेले ओशो-

संगीतकार पं. यशवंत देव





मला लोक विचारतात ओशो रजनीशांनी तुम्हाला काय दिलं ? सांगू....

स्वतःचा आनंद स्वतःमधूनच निर्माण करण्याची युक्ती दिली. ध्यानदीक्षा ही एक अशी अनोखी वाट आहे जीच्या मार्गाने आंतर्यात्रा करता येते या नरदेहातच सारं विश्व सामावलेलं आहे. हे ओशोंनी दिलेल्या 'ध्यानदीक्षा' मुळे समजले.

ओशोनीं आमुच्यावरी अनुग्रह केला
गंगोत्री स्वानंदाची दिली आम्हाला।।
आम्ही शोधित इथे तिथे आधार
स्वबळाचा ज्वालामुखीच जागृत केला।।

वरील ओळीतून आपल्या लक्षात आलेच असेल की ओशोंनी मला काय दिलं. त्यांनी जे दिलं ते चिरंतन अखंड आहे त्यामुळे कित्येक जन्मासाठी ईश्वराशी नातं जोडलं गेलं.

सन १९७० चा सुमार असेल त्यावेळी माझे वय ४४ वर्षाचे होते. मी आकाशवाणीच्या नागपूर केंद्रात कार्यरत होतो. तिथल्या विद्यापीठाच्या सभागृहात ओशोंचे व्याख्यान होते. व्याख्यानाची वेळ दुपारी तीनच्या आसपासची होती

"ओशोंच्या व्याख्यानास जाण्याची संधी मिळाली तर तू अजिबात सोडू नकोस" असे माझ्या एक हितचिंतक मित्राने सांगितले होते.

ओशोंचे मंचावर आगमन झाले, त्यांनी सर्वांच्या चेहऱ्यावर नजर फिरवली ती नजर मला अजूनही आठवते त्यांनी शांतपणे बोलायला सुरूवात केली,

"मेरे प्रिय आत्मन, एक कहानी से शुरूवात करता हुँ"..

त्या कहाणीचा सारांश असा.."एका बंद खोलीत अडकलेला एक आंधळा मनुष्य खोलीबाहेर पडण्याचा प्रयत्न करतो. तो भिंतीला हात लावत चाचपडत दाराचा शोध घेत पुढेपुढे सरकतो, नेमका उघड्या दरवाज्याच्या जवळ आला की त्याला खाज येते आणि भिंतीवरचा हात निसटतो त्यामुळे त्याच्या हाताला दरवाजा लागत नाही आणि तो पुढे सरकतो"

इथपर्यंत बोलून ते क्षणभर थांबले नि पुढे म्हणाले,

''हम सबका ऐसेही होता है। मुक्ती के क्षण में हम पिछे हटते है।"

हे एकूण मी अंतर्बाह्य हादरलो.त्यानंतर सन १९४८ नंतर मुंबईला जे.कृष्णमूर्ती यांची अनेक वेळा प्रवचने ऐकली. त्यांच्या प्रवचनाचाही मतीतार्थ असा होता की, माणसाने प्रगाढ शांतीसाठी आपला प्रवास मनाकडून मनापलिकडे असा करायला हवा. अन्यथा मुक्तीचे द्वार खुलणार नाही हे विचार मनात कुठेतरी खोल रूजत होते. ओशोंचे नागपूला ऐकलेले प्रवचन त्यामुळे मी आधीच हादरलो होतोच. त्यानंतर मला जीवनासाठी वेगळीच वाट खुणावू लागली.त्यानंतर १९७९ पर्यंत मी ओशोंची हिन्दी, इंग्रजी पुस्तके वाचली. अध्यात्म हा अतिशय गहन असलेला विषय ओशोंनी सहज कोणालाही समजेल अशा सोप्या साध्या सरळ भाषेत समजून सांगितला असल्यामुळे मला त्यांची गोडी आणि ओढ लागली. मी झपाटल्यासारखा ओशोंची पुस्तके वाचत होतो समजून घेत होतो त्या शास्त्रशुद्ध माहितीने मन, विचार स्वच्छ होत होते.

सनातन धर्म, तसेच इस्लाम, ख्रिचन, सुफी व इतर धर्मावर ओशोंनी चिंतन केले होते. अनेक भारतातील संत, उपनिषद, गीता व अनेक धर्मग्रंथाचाही त्यांनी अभ्यास केलेला होता. तसेच कुंडलिनी विद्याही ते जानत होते. त्यामुळे हजारो पुस्तकं आणि सी.डी.च्या मधून त्यांची अनेक प्रवचने प्रकाशित झाली आहेत.

त्यावेळी वर्तमानपत्रामधून ओशोच्या प्रवचनासंबंधीत माहिती इंग्रजी वर्तमानपत्रामधून यायची अनेक उलट-सुलट बातम्याही

छापल्या जात. त्यांच्याविषयी समाजात उठलेल्या वादळामुळे मी विचलित झालो होतो. त्यातच एक दिवस एक बातमी वाचली ओशोंचे अमेरिकेला पलायन.

हे वाचून मी अस्वस्थ झालो. मन सारखं म्हणत होतं ते पलायन करणारे नाहीत मी विचारात गढून गेलो. अगदी एकटं पडल्यासारखं वाटू लागलं. त्यामुळे मी त्यांना पत्र लिहिलं,

"बेचैन होता जा रहा हूँ क्या करू" ?

त्यांचं त्या पत्राला उत्तर आलं,

"अगर हो सके तो पूना आश्रम मे जाकर ध्यान शिबिर में सम्मिलीत हो जाओ" त्यानंतर १९ ऑक्टोबर १९८१ ला मी पुण्याच्या आश्रमात गेलो पाच दिवसांच्या शिबिरात दिवसभरात पाच वेळा ध्यानाला बसावं लागत असे नंतर शेवटच्या दिवशी नटराज ध्यानाच्या वेळी लाऊड स्पिकरवर संगीत वाजवलं जातं. त्या संगीतावर आपण मनसोक्त नाचायचं असतं मी संगीतकार असल्यामुळे तालावर नाचू

त्यावेळी लाऊडस्पिकरवर संगीत वाजवलं जातं. त्या संगीतावर आपण मनसोक्त नाचायचं असतं मी संगीतकार असल्यामुळे तालावर नाचू लागतो. बाहेरच्या तालावर नाचल्यामुळे दमायला होतं हे नंतर समजलं. आंतर्नादावर नाचलं की आनंद मिळतो. त्यानंतर नादब्रम्ह ध्यान असते श्वाच्छोश्वासावर मन शांत होत जातं. श्वासोच्छवासाने ऊर्जा निर्माण होते त्यामुळे आतून मी आनंदीत झालो माझ्यामध्ये खूप सकारात्मक बदल मला व इतरांना जाणवत होता.मला आलेला स्वअनुभव मी खालील शब्दात व्यक्त केला आहे.

ही आहे माझी आत्मगर्भ स्वर यात्रा
मी परतुन यावे मोजित मोजित मात्रा।
मज सुराआडचा तोच खुणावित असतो
मी म्हणतो,' माझे ऐक मौन' ये मित्रा।।

माझा स्वर मी मौनात ऐकतो तेव्हा कितीही वेळ आपण गात राहिले तरी दमत नाही.

This is a Journey from sound to silence अनेक अवस्थामधून आपण जात असतो प्रत्येक अवस्था प्रवाहाबरोबर बदलत राहते. त्यामुळे प्रत्येक क्षण वेगळा नवीन असतो. ध्यान

अवस्थेत येणारे अनुभव हवेहवेसे वाटतात.

मी व्याकुळ होतो निसटुन जाता ध्यान
दिसतात वस्तु अन् मन नुरते स्वाधीन
मग पुन्हा कधीतरी दृष्ये मावळताना
आसवे वाहती झर झर नेत्रातून

ओशोच्या विचारांची मुळे खोलवर रुतत चालली होती ते म्हणत असत परमेश्वराला हात तर सर्वच जोडतात, पुजाआर्चाही करतात परंतु परमेश्वराचा शोध माणसाला घेता आला पाहिजे.

ईश्वराविषयीचा ओशोनी अर्थ लावला आहे तो उपनिषदांपेक्षा वेगळा नाही. ते म्हणतात, ''समग्र वस्तुमात्राच्या मुळाशी सतत असणारे उर्जारूप चैतन्य म्हणजे परमेश्वर, अन्य काहीही नाही आणि त्यानी हेही अगदी ठामपणे सागितले आहे की, या चैतन्याचा शोध कुणालाही कुठलेही धर्माचरण करणाराला मिळू शकेल, कारण त्यासाठी करावे लागणारे प्रयत्न ज्याचे त्यालाच करावे लागणार आहेत. परमेश्वराला शोधण्याचा मार्ग म्हणजे 'ध्यान धारणा' आहे. कुठलेही धर्माचरण करणाऱ्याला मिळू शकेल. परमेश्वराचा शोध घेणारे मार्ग पूर्णपणे शास्त्रीय आहेत त्यात कोठेही अंधश्रद्धा नाही.''

ते कधीही कोणाला म्हणत नाहीत, ''बेटा बरं झालं तू माझ्याकडे आलास, आता तुझं भलं होईल.''
त्यांनी मलाही कधी आश्वासित केलं नाही, उलट ते म्हणायचे, ''मैं तुमको सत्य दे सकता हुँ, सांत्वना नही।

मी कितिक पाहिले गुरू, परंतु निराळा।
मज ऊर्जा अनुभव ओशोंपाशी आला।।
जुळलेत अचानक माझे दोन्ही हात।
अश्रूंचा पडदा डोळ्यावरती आला।।

ओशोंनी जगातील सर्व प्रस्थापित धर्मवाङमयावर व्याख्याने दिली. मोठ्या संख्येने त्यांच्या तत्वज्ञानावर पुस्तके आली त्यांच्यांवर केलेले अतिपारदर्शक विषयीचे घृणास्पद आरोप, यांनी माझ्या मनात काहीकाळ गोंधळ उडवून दिला होता खरा, पण थोड्याच कालावधीत माझे मन शांत झाले, विचार स्थिर झाल्यानंतर इरादा पक्का झाला. ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी आकाशवाणीच्या सेवेतून मुक्त झाल्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी मी पुण्याला जाऊन संन्यास दिक्षाही घेतली.

मी नियमानुसार भगवी वस्त्रे घातली सर्वांना दिसेल अशी ओशोंचा फोटो असलेली माळही घातली. ते माझं रुप पाहून माझे मित्र यशवंत देव वाया गेले असे समजत होते.

ओशोंनी सांगितलेल्या ध्यानक्रियेत मला रस होता ते सांगतात, "ध्यानाने मनुष्याच्या ठिकाणी अंतर्बाह्य क्रांती होते" गेली अनेक वर्ष दिक्षा घेतल्यापासून मी ध्यान धारणा करतो. मला खूप फायदा झाला आहे. काही गोष्टी अनुभवायच्या असतात त्या शब्दात सांगता येत नाहीत.

ओशो म्हणतात, "माझ्यावर श्रद्धा सुद्धा तुम्ही ठेवू नका श्रद्धा नेहमीच आंधळी असते मी तुम्हाला प्रयोग करायला सांगतो आहे. त्या प्रयोगाअंती जो निष्कर्ष निघेल तोच तुमचा आधार असेल. "

तू नको धरू भरवसा कधीच कुणाचा
सांगतात ओशो मीहि नसे कामाचा।
एकदा पेटता सदैव तेवत राहील
उपयोग तुला रे अशा ज्ञान दीपाचा।

ओशोंनी दिलेला ज्ञानदीपाचा मार्ग म्हणजे ध्यान धारणेचा मार्ग या मार्गाने गेल्यास अंर्तचैतन्याची सर्वांनाच अनुभूती येईल. मन एकाग्र झालं की विचार शांत होतील विचार शांत झाले की, आत्मसुखाचा अनुभव येईल. माझ्या रुबायातून मी माझे ओशो विषयीचे विचार, आणि आलेले अनुभव व्यक्त केले आहेत.

ओशो म्हणतात,"ध्यान अधिकाधिक गडद केल्यानेच आतला आनंद वाढेल आणि बाह्याकडची ओढ कमी होईल तू विनाकारण उतावीळ होऊ नको. भौतिक आकर्षणातून खरोखर मुक्त व्हावे असे आपल्याला वाटते का? असा प्रश्न वारंवार स्वत:ला विचरत राहा" 'Existence has its own time table'.

१९८४ मध्ये अमेरिकेतल्या ऑरिगॉनच्या वाळवंटातला ओशोंचा भव्य आश्रम मी आणि माझी पत्नी करूणा आम्ही दोघांनी पाहिला. तिथे दोन दिवस मुक्काम केला, तिथे आलेला अनुभव असा, तिथे राहणाऱ्या ५००० संन्याशांची दिनचर्या अशी, हसरे चेहरे, अपार कष्ट, नर्तन, गायन, शिस्त, समृद्धी सर्वच काही अचंबा वाटण्यासारखे होते.

ओशो जे जे बोलले त्याला त्यांनी घेतलेल्या अनुभवाचा ठोस आधार होता. म्हणूनच त्यांच्या वाणीत ओज आणि डोळ्यात तेज होते. त्यांनी लिहिलेली भक्तीगीतं आणि संताचे लिखाण दोन्हीची तुलनाच होऊ शकत नाही. फक्त संतांच्या लिखाणालाच अक्षर वाङ्मय म्हणतात ते उगीच नव्हे.

मिळवावे धन, मिळवावी दौलत मोठी
शोधून पहावे सुख आले का हाती।
भोगाचा घ्यावा अनुभव म्हणती ओशो
मग गौतम सगळे बुद्ध होऊनी जाती।।

गौतम बुद्धाकडे तर अमाप वैभव होते मग त्याचा भोग त्यांना का घ्यावासा वाटला नाही? का त्यांच्या मनात वैराग्य निर्माण झाले? मन शांतीसाठी का एकांत स्थळी जाऊनी बसावे लागले? याचे उत्तर ज्याने त्यानेच शोधावे.

गरिबाला शिकवू नका ध्यान करण्याला
सांगतात ओशो, धनिक होऊ द्या त्याला।
अधिकाची सरता हाव तोच सांगेल
या शिकवा आता मला ध्यान करण्याला।।

मनात जो पर्यंत अतृप्त इच्छा राहतील तो पर्यंत मन स्थिर शांत होणार नाही त्यामुळे आधी त्या इच्छांची तृप्तता करून घ्या, नंतर ध्यान धारणा करा. आंर्तयात्रा करण्यासाठी मन शांत करणे फार गरजेचे आहे. ते कधीच म्हणत नव्हते की संसार सोडून संन्यास घ्या, भगवी कपडे घाला. उलट ते म्हणत असत जो संसाराला घाबरतो तो संन्यासी कसला? तुम्ही संसारातच रहा मात्र संसार मनात घुसू देऊ नका!

जीवनी राहूनी जीवन समजून येते
पोथीत नसे ते पूजेतही ते नसते
ओशोंनी मौलिक सूत्र दिले जगताला
ध्यानीच जाणतो विश्वामधली गुपिते.

ध्यान करत असतांना विश्वाची गुपिते उलगडू लागतात असं मैलिक ज्ञान ओशोंनी दिलं जगताला.

ओशोंना समजून घेणं हे बुद्धीचं काम नाही तर्काचंही नाही ते आपल्याच ठिकाणी निर्माण होणारे निष्पाप स्पंदनाचं नातं आहे.

ओशोंची दीक्षा घेतल्यानंतर माझी नजर मी माझ्यात स्थिर केली. त्यामुळे मी माझा आधार बनलो इतर सर्व आधाराचे भास असतात हे चांगल्याप्रकारे समजले. माझी ध्यानात दिवसेंदिवस चांगली प्रगती होऊ लागली त्यामुळे आत्मविश्वास वाढू लागला.

रजनीश म्हणायचे, "मेरे साथ आना, संन्यास लेना यह काम एसेवैसे का नही है। इसके लिए साहस चाहिये...दुसाहस चाहिए" हे त्यांचं म्हणणं मला अनुभवायला येतं

एके दिवशी मला त्यांच्या आश्रमातून फोन आला की मला ओशोंच्या समोर गायचं आहे. आनंद आणि आश्चर्य मनात दाटून आलं माझ्या देवासमोर, गुरूसमोर मी कसं गाऊ? जे स्वतःच नानक, कबीर, महावीर, मीरा, बुद्ध आहेत त्यांच्या समोर मी काय गाऊ? त्यांच्यासमोर त्यांचीच भजनं कशी गायची?
दुसऱ्या दिवशी गाण्यासाठी मी हिंन्दी भजन लिहिलं ते खरं तर माझ्यासाठी आश्चर्यच होतं ते असं..

पाप हमारे, करूणा तेरी, इन दोनों का अंत नही
होश तेरा, बेहोशी अपनी, इन दोनो का अंत नही।

तो गाण्याचा अनुभव माझ्यासाठी अवस्मरणीय होता माझ्या गुरूसमोर गायल्यामुळे आत्मिक समाधान मिळाले. त्यानंतर लिहितांना भराभरा अक्षराबरोबर डोळे पानावत होते.

क्या पाया है ओशोंसे कैसे कहूँ
नया प्राण और एक ताजा लहू
न बदला है पानी न बदली है हवा
नजर का रवैया है बदला हुँ

यशवंत देव
शब्दांकन - **लता गुठे**

देखन आयो जगत तमाशा....

प्रा. अरविन्द दोडे

गुरु गोविंन्दसिंग! शीख गुरुंमधील सर्वात बहुश्रुत गुरु. हिंन्दूंचे प्राचीन धार्मिक साहित्य, संस्कृत काव्य, अरबी, फारसी वाङमय आणि इस्लामी धर्मशास्त्र यांचा त्यांनी उत्तम अभ्यास केला होता. व्रज, फारसी आणि पंजाबी भाषांमध्ये त्यांनी काव्यरचना केली. कला आणि साहित्य यांचे ते उदार आश्रयदाते होते. त्यांच्या राजसभेत सुमारे बावन्न असे उत्तम कवी होते. त्यांच्या आणि त्यांच्या आश्रयास आलेल्या अनेक कवींच्या कवितांचा 'दसम' या ग्रथांत समावेश केलेला आहे.

इसवी सन १६६६ ते १७०८ हा गुरु गोविंदासिंग यांचा काळ. केवळ ४२ वर्षांच्या आयुष्यात त्यांनी आध्यात्मिक श्रेष्ठत्व असे प्राप्त केले की, ते शिखांचे दहावे गुरु म्हणून मान्यता पावले. यांना आदराने 'संतसैनिक' असे संबोधले जाते.

गुरु तेग बहादूर हे त्यांचे वडिल आणि आईचे नाव गुजरी. बिहारमधील पाटणा या शहरात त्यांचा जन्म झाला. बालपणापासून त्यांची तिव्र बुध्दिमत्ता दिसून आल्याने हा सुपुत्र पुढे नाव कमावणार, असे अनेक जण म्हणू लागले. वयाच्या सातव्या वर्षापासून त्यांनी वेगवेगळया भाषांचा अभ्यास सुरु केला. काही वर्षात कित्येक पौराणिक ग्रंथ वाचून काढले. त्या काळातील प्रथेप्रमाणे त्यांचे लग्न सातव्या वर्षीच झाले. पुढे ते नऊ वर्षांचे असताना औरंगजेबाने त्यांच्या वडिलांचा वध केला. त्यामुळे शिखांचे गुरुपद आपोआप त्यांच्याकडे आले. मोगलांच्या क्रुर कारस्थानांनी आणि कारवायांनी त्रस्त झालेला समाज ते पाहात होते. 'राष्ट्रीयत्व' या एकाच ध्येयाने ते प्रेरीत झाले होते. सुसंघटित, एकजीव, एकरंग असा समाज निर्माण व्हावा म्हणून ते वाचन-मनन करीत होते. याच गोष्टीला त्यांनी प्राधान्य दिले आणि धर्मदीक्षेचा नवा प्रकार सुरु केला-

खंडे दा अमृत म्हणजे तलवारीच्या धारेचे पाणी हे त्याचे नाव! दीक्षा घेतलेल्या शिखबांधवांना 'खालसा' म्हणजे परमेश्वराचे खास शिष्य हे नाव दिले. त्या साऱ्यांना सिंघ-सिंग हे उपनाम दिले. शिवाय पाच 'क' कार धारण करायला सांगितले १. केस २. कंगवा ३. कच्छ (चड्डी) ४. कडे आणि ५.कृपाण हे पंच क कार होत. गोविंदसिंगच्या शिष्यांपैकी काही शिष्य त्यांना ईश्वरावतार मानत होते. ही गोष्ट धर्मबाह्य आहे म्हणून गोविंदसिंगांनी स्वतःच निषेध केला आहे, तो काव्यखंड असा आहे...

जो हमको परमेसर ऊचन्हे ।
त सब नरक कुंडमें पन्हे ।।
माको दास तवानका जानो ।
या में भेदना रंच पछानो ।।
में हो परम पुरखखो दासा ।
देखन आयो जगत तमाशा ।।

जे मला परमेश्वर म्हणतील ते सगळे नरककुंडात पडतील, मला त्याचा दासच समजा, यात मुळीच संशय बाळगू नका, मी प्रभूचा केवळ दासच असून या जगाचा खेळ पाहण्यासाठी आलो आहे, असे विचित्र नाटकात (६.२२.३) म्हटले आहे.

त्यांनी सत्य, शुध्दता यांच्या जोडीने शूरतेलाही मानाचे स्थान दिलेले दिसते, त्यामुळे 'खालसा' हा पंथ कर्तव्यकठोर बनला. पंजाबी समाजातील तळागाळातले लोकही गोविंदसिंगांच्या प्रेरणेने कडवे योध्दे बनले. त्यांच्या नेतृत्वाखाली अनुयायांनी दिल्लीच्या मोगल सत्तेविरुध्द चौदा लढाया लढून दाखवल्या! त्यात बारा युध्दांमध्ये त्यांनी मोगल सेनेचा दारुण पराभव केला!

खालसा पंथांच्या निमित्ताने स्वार्थशून्य आणि देशभक्त समाज त्यांना निर्माण करायचा होता. एक नवे राष्ट्र स्वप्नातून सत्यात आणण्याचा प्रयत्न होता, परंतु काही आपलेच वैरी होते. शिवालिक पर्वतातील हिंदू राजे आणि दिल्लीवाले मोगल यांनी सतत कडवा विरोध केला. मोगल सेना अफाट होती. तेराव्या लढाईत ते आनंदपूर सोडून, सतलज नदी पार करुन खाली दक्षिणेत ते माळव्यात आले.

त्यांचे दोन सुपुत्र चमकीरच्या फितुरीचा शाप आहेच! तो इथेही दिसून आला. गंगू नामक त्यांच्या जुन्या सेवकाने विश्वासघात केला. त्यांचे सुपुत्र जोरावरसिंग आणि फतेसिंग हे सरहिंद सुभेदाराच्या हुकुमानुसार भिंतीमध्ये चिरडून मारले गेले. औरंगजेब मेला त्याचा मुलगा बहादुरशहा हा चांगला होता. त्याची बाजू गोविंदसिंगांनी उचलून धरली. त्याला दिल्लीची गादी मिळवून दिली. २३ जुलै १७०७ रोजी दरबारात त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. त्याच काळात बहादूरचा धाकटा भाऊ कामबक्ष याने बंड पुकारले, तेव्हा तो दक्षिणेत होता.त्या बंडाचा बीमोड करण्यासाठी गुरु गोविंदसिंगांना सोबत घेऊन बहादूर सैन्य घेऊन निघाला. मध्ये नांदेडला मुक्काम घडला, तेव्हा एक दुर्दैवी घात झाला! तहाच्या वाटाघाटी पूर्ण होण्या आधीच, सरहिंद नवाबाच्या एका हस्तकाने अचानक हल्ला केला आणि गोविंदसिंग तिथेच गतप्राण झाले. इ. स. १७०८ मध्ये ७ ऑक्टोबरला हा धोका झाला आणि नशिबाने दगा दिला.

गुरु गोविंदसिंग हे अष्टपैलू विद्वान होते. त्यांची लेखन शैली ह्रदयस्पर्शी असून ओघवती आणि ओजस्वी आहे.

कमरेस तलवार लावून, हाताशी धनुष्यबाण तयार ठेवून, ते आपल्या सैनिकांना रणादेश देत असत. तेव्हा रणभूमिवरच त्यांना कविता सुचत असत. उत्तरेत त्या काळात फारशी, पंजाबी, व्रज आणि अरबी भाषा वापरल्या जात. ते यातील कोणत्याही भाषेत काव्य करीत. एक सच्चा संतकवी म्हणून ते पूजले जातात. एकेश्वर मताचा सिध्दांत आणि श्रध्दा यांचे प्रतिपादन करणारी आणि परमेश्र्वराच्या स्तुतीची अनेक कवने करणारी त्यांची प्रतिभा अखेरपर्यंत ताजी टवटवीत होती. दुसरे असे की, त्यांनी पुष्कळ धार्मिक साहित्य अनुवाद केले. एवढेच नाही, तर विचित्र नाटक हे आत्मचरित्र सुध्दा लिहीले आहे. 'दशमग्रंथ' या नावाचे सुमारे १३०० पाने असलेले पुस्तक भरतील इतके लेखन त्यांचे उपलब्ध आहे. मंदिर आणि मशीद, पूजा आणि नमाज यांतला फरक केवळ बाहेरचा आहे, हे त्यांचे मत अनेक काव्यांतून व्यक्त केले आहे.

गुरु गोविंदसिंगांनी शिख समाजात राजकीय जागृती निर्माण केली. राष्ट्रभक्तीच्या दृढ बंधनाने समाज एकसंध केला. जनसामान्यांच्या एकतेतून स्वधर्म आणि स्वदेश प्रेम निर्माण करुन सर्वस्व अर्पण करण्यासाठी तरुणांना स्फूर्ती दिली. अगणित शूर-वीरांची परंपरा सुरु केली.असा योध्दा गुरु लाखात एखादाच! त्यांना प्रणाम!!

- प्रा. अरविन्द दोडे
१०२, श्रीहरी सोसायटी, पांडुरंगाशेजारी,
साकेत मार्ग, बाळकुम नं.२, ठाणे (प.) ४०० ६०८
भ्रमणध्वनी-९८१९१९५५९२
E-mail: arvinddode@gmail.ocm

समईतील दिपकळ्या

देवीदास पोटे

भारत ही संतांची भूमी आहे असे म्हटले जाते. संतांच्या संदर्भात एक समान सूत्र आपल्याला आढळून येते. त्यांच्यामध्ये प्रांत-भेद, भाषा-उच्च-कनिष्ठ-भेद असे कुठल्याही प्रकारचे भेद किंवा भिन्नता आढळत नाही. काश्मीर ते कन्याकुमारी अशा भारतातील विविध प्रांतांतून संत निर्माण झाले. मराठी, हिन्दी, बंगाली, गुजराती, कानडी, तेलगू अशा अनेकविध भाषांमधून संतसाहित्य निर्माण झाले. ज्ञानेश्वर, तुकाराम, नरसी, बसवेश्वर, तुळसीदास, तिरुवल्लुवर या संतांबरोबरच मुक्ताबाई, जनाबाई, मीराबाई, आंदाळ, वेणाबाई अशा संत कवयित्रींनीही आपल्या काव्यरचनांद्वारे परमेश्वराची आराधना केली आहे.

आपल्या 'स्त्रीत्वाचा' आणि 'स्व' चा शोध घेण्याचा स्त्रीचा प्रयत्न पुराण काळापासून सुरु आहे. या जाणीवांच्यामुळे इतिहासाच्या प्राचीनतम कालखंडात सापडतात. भारतीय संत परंपरेत स्त्रियांचे भक्तीविषयक लेखन महत्त्वाचे आहे. अभंग, ओव्या, पदे, दोहे अशा विविध काव्यांद्वारे ईश्वराची आळवणी करीत असतांना त्यांना आपल्या स्त्रीत्वाची जाण होती. समाजाने लादलेल्या अनेक व्याप, कटकटी त्यांना सहन कराव्या लागल्या. त्यावेळच्या श्रेष्ठ कनिष्ठत्वाच्या तत्वावर आधारीत जातीव्यवस्थेच्या अनिष्ठ अशा प्रथेमुळे त्या व्यवस्थेमध्ये तथाकथित हीन जातीकुळात जन्मलेल्या अनेक कवयित्रींना

आपल्या हीन जातीची असहाय जाणीव होती व त्यामुळे आलेल्या बंधनांशी त्यांना कठोरपणे मुकाबला करावा लागला.

आपल्या परंपरेने कनिष्ठ जातींप्रमाणेच स्त्रियांनाही मोक्ष नाकारलेला होता. या कवयित्रिंनी भक्तीभावाच्या माध्यमातून या रुढीग्रस्त समाजबंधनांवर मात केली. आध्यात्मिक आणि धार्मिक क्षेत्रात उच्च प्रतीचे स्थान मिळवले. परंपरेने स्त्रियांना शिक्षणाचा अधिकारही नाकारलेला होता. तरीही त्यांनी निर्माण केलेले काव्य साहित्यिक दृष्टिने आणि आध्यात्मिक पातळीवरही अतिशय दर्जेदार आणि साहित्यगुणसंपन्न होते. आध्यात्मिक चळवळीतल्या या कवयित्रिंचे वैशिष्टये असे की, त्यांचे विचार पारंपारिक धर्मनियमांच्या चौकटी ओलांडून जातीधर्माच्या पलीकडे गेले होते. कुणाची तरी पत्नी, बहिण, मुलगी वा सून या नात्याने ह्या जगात वावरल्या नाहीत. तर त्यांनी आपले व्यक्तिमत्व स्वतंत्रपणे घडविले. उदाहरणार्थ, अध्यात्मश्रेत्रातला मुक्ताबाईचा तेजस्वी वावर, प्रसंगी नामदेवांनाही त्या म्हणाल्या...

अखंड जयासी देवाचा शेजार।
परि अहंकार नाही गेला ।।

असे म्हणून त्यांचे कच्चेपण दाखविण्याचा त्यांचा रोखठोक बाणेदारपणा, प्रापंचिक आयुष्यातले सर्व ताप, अनुताप सहन करुन तुकारामांच्या भावविश्वाशी एकरुप झालेल्या संत बहिणाबाईची उत्कटता किंवा घरादाराचा त्याग करुन रामदासस्वामींचे शिष्यत्व धारण करुन मठाधिपती या पदाची धुरा सांभाळणारी वेणाबाई म्हणजे स्त्रीमनाच्या स्वयंभू हुंकारांची काही उदाहरणे आहेत. स्त्री ही जात्याच सहनशील असते. स्त्रीमन हे पुरुषाइतके आत्मकेंद्रीत नसते. मात्र पुरुषप्रधान संस्कृतीत जीवनाच्या अनेक अंगात स्त्रीला प्रवेश नाकारण्यात आला. मुख्य समाज प्रवाहापासून त्यांना बाजूला ढकलण्यात आले.

"न स्त्री स्वातंत्र्यं अर्हति" असे प्रतिपादन तत्कालीन स्मृतीकारांनी केले. तथापि आपल्या अंगभूत सोशीकतेने स्त्रीने या सर्व पारंपारिक बंधनांवर मात करुन जीवनातील सर्व क्षेत्रात महत्त्वाचे आणि वैशिष्ट्यपूर्ण स्थान मिळवले आहे. संत कवयित्रिंच्या आध्यात्मिक भक्तीमार्गाच्या केलेल्या अभिव्यक्तितून परमेश्वराची आळवणी केली आहे. आयुष्याच्या दर्शनाचा वेध घेण्याचा प्रयत्न आहे. एका बाजूला स्त्रीजन्माचे भोग म्हणून

समाजातल्या अन्याय, जुलूमास सामोरे जातांनाच हळूहळू तिने आपल्या स्वत्वाचा जाणीवपूर्वक आणि प्रगल्भ शोध घेण्याचा प्रयत्न दिसून येतो. सध्याच्या स्त्रीमुक्तीच्या चळवळीत संत कवयित्रिंच्या जाणीवांचे मोठे योगदान आहे.

आपल्या स्त्रीने संघर्ष करुन संस्कृतीचे संवर्धन केले. माणूसपणाच्या वाटेवरचा प्रवास करतांना पुढच्या शतकातल्या

स्त्रीला मागच्या संघर्षाच्या, समन्वयाच्या कार्याचे ऋण मान्य करावे लागेल. स्वतःच्या अस्मितेसाठी, आत्मशोधासाठी धडपडणाऱ्या स्त्रिया संत परंपरेने घडवल्या. आपलं करियर करायचं पण संसाराकडेही दुर्लक्ष करावयाचं नाही असा विचार करणाऱ्या स्त्रीची पिढी संत साहित्यानं, सामाजिक चळवळीनं घडवली. हा विचारांचा आदर्श कालही होता व आजही आहे. जनाबाईसारख्या संत कवयित्रीने घरातील आपल्या कामाची जबाबदारी सांभाळून भक्तीचाही प्रपंच सांभाळला. स्त्रियांनी पुरुषांची मानसिक गुलामगीरी नाकारली पाहिजे तसेच पुरुषांनींही स्त्रीच्या स्वतंत्र आस्तित्वाचा आदर केला पाहिजे. संत कवयित्रींनी व्रतस्थ रहाणं म्हणजे काय हे आपल्या उदाहरणाने सिध्द केलं आहे. त्याचं संतजीवन हलाहल पचवलेलं होतं जनाबाई, सोयराबाई, बहिणाबाई यांनी शारीरिक कष्ट करुन यशस्वीपणे आध्यात्माची वाटचाल केली होती. स्त्रीचा ध्येयवाद तिने निश्चय करुन प्रत्यक्ष जगला पाहिजे. संत कवयित्रींची आयुष्ये म्हणजे या तत्त्वाची मूर्तिमंत उदाहरणे आहेत. वेदकाळात गार्गी, मैत्रेयी या विदुषींना शास्त्रार्थ करण्याचा अधिकार होता. इतिहासाच्या मध्यकाळात कर्मठपणामुळे आजच्या स्त्रीला तिच्यावर आलेली कृत्रिम बंधने तोडून हा अधिकार स्वप्रयत्नांनी मिळवावा लागला आहे. आपल्या मुक्तीचे सामर्थ्य तिला कमवावे लागले आहे. प्रसंगी पुरुषप्रधान समाजाशी संघर्षही करावा लागला आहे. संत कवयित्रिंनी कधी स्वतःच्या बळावर तर कधी संतसज्जनांच्या मदतीने आपल्या प्रगतीची वाटचाल साध्य केली त्यासाठी त्यांच्याकडे भावभक्तीचा ठेवा होता. स्वतःचा स्वतःवर विश्वास होता.

भारतातील विविध भाषातील संत कवयित्रिंनी त्यांच्या पिढीला वाङमयीन जाण दिली.भक्तीचे अधिष्ठान दिले.भक्तीमार्गाच्या माध्यमातून त्यांनी समाज प्रबोधन घडवले.स्त्रीचा त्याग, आत्मगौरवाची दिलेली शिकवण, भावभक्तीचे संस्कार हे संत कवयित्रिंनी पुढील पिढीतील स्त्रियांकरीता मागे ठेवलेले संचित आहे.त्यांचे जीवन भावी पिढयांकरीता दीपस्तंभासमान प्रकाश दाखवित राहिल. निरपेक्ष प्रेमाचा, स्नेहभावाचा वर्षाव करणारी संत कवयित्रिंची लेखणी नव्या जाणीवांचे अनुबंध निर्माण करील ईश्वरभक्तीच्या श्रध्देतून जनसामान्यांची मने घडवण्याचे त्यांचे कार्य अतिशय महत्त्वाचे आहे. उंबरठ्याच्या आतल्या स्त्रीला वारीच्या निमित्ताने बाहेर पडण्याचे स्वातंत्र्य देणारे वारकरी संप्रदायाचे कार्य अतिशय मोलाचे आहे.

संत कवयित्रिंच्या आध्यात्मिक माध्यमातून घेतलेला स्त्रीमनाचा मागोवा हा स्त्री स्वातंत्र्याचा एक महत्त्वाचा टप्पा आहे. अभंगरचनांनी मराठी साहित्य संपन्न केले. संत कवयित्रिंनी तळागळातील स्त्रीला आत्मभान दिले, ते त्यांचे मोठे सामाजिक योगदान आहे.एक प्रसिध्द विचारवंतांनी 'भारतीय संत कवयित्री ह्या शांत तेवत असणाऱ्या समईतील दीपकळ्या आहेत' असे म्हटले आहे. ते अगदी यथार्थ आहे.संत कवयित्रिंची अभंगवाणी हा एक मौलिक राष्ट्रीय ठेवा आहे.

देवीदास पोटे

३१, प्रोग्रेसिव्ह व्हिला - आय प्लॉट नं.७७
सेक्टर १९, सीबीडी बेलापूर
नवी मुंबई - ४०० ६१४
९८२०३३२१२८

हरीचे आम्ही दास

अनुराधा नेरुरकर

आजच्या समाजस्थितीबद्दल बोलायचे झाले तर विज्ञानाने आपली परिसीमा गाठलेली दिसते. Everythng on your fingertips हे विधान शब्दशः खरे झालेले पाहण्याची वेळ आलेली आहे. बँक व्यवहार, गुंतवणूक, पत्रव्यवहार, संपर्क (मग तो कुठल्याही प्रकारचा व कुठल्याही माध्यमातून असो) देवाण-घेवाण, प्रसार, प्रचार, अधिकार, खरेदी, विक्री सर्व काही संगणकाच्या/फोनच्या माध्यमातून साधले जात आहे. पूर्वीची पायपीट, शोधाशोध, वणवण आता जवळ-जवळ इतिहासजमा झाली आहे. याचा अर्थ असा नाही की कष्ट किंवा प्रयत्नांची आवश्यकता उरलेली नाही. सर्व काही तेच आहे पण मार्ग बदललेले आहेत शिवाय हे मार्ग अवलंबविण्यासाठी स्वतःची क्षमता वाढविण्याची मोठी जबाबदारी आजच्या समाजावर पडलेली आहे. प्रत्येक जण नवी क्षितिजे आत्मसात करण्याचा प्रयत्न करताना दिसतो आहे. आपले ज्ञान विकसित करताना विज्ञान, यंत्र आणि तंत्र ह्या सर्व गोष्टींचा समन्वय प्रत्येकाला साधावा लागतो आहे. जग निश्चितपणे जवळ आले आहे परंतु सर्व काही एकदम मिळविण्याच्या शर्यतीत माणसं मात्र दूर जात आहेत. माणसामाणसातील संवाद लोपतो आहे. वागण्यात एक प्रकारचा भावनिक कोरडेपणा येऊन आत्मकेंद्रित वृत्तीकडे कल वाढताना दिसतो आहे. पंचेइंद्रियांना सुख देणारी अनेक साधने निर्माण झाल्याने मानवी संवेदनक्षमता कमी होत आहे. मने बोथट होत आहेत. एक प्रकारचे हृदयशून्यतेचे राज्य पसरताना दिसते आहे. अशा परिस्थितीत आपली अध्यात्मिक क्षमता वाढविण्याची आज गरज आहे. आज-काल एखाद्याची बौद्धिक चाचणी घेताना I-Q(Intellietual quotient), S-Q (Spiritual quotient) सुद्धा जाणून घेण्याची गरज भासू लागली आहे. हे नक्की काय दर्शवते ? बौद्धिक गुणांक, आणि अध्यात्मिक गुणांक हे तिन्ही घटक माणसाच्या माणूस म्हणून जगण्याला आणि प्रगती करण्याला आवश्यक आहेत. खरे तर संत साहित्याने हे काम केव्हाच सुरू केले आहे परंतु भौतिक प्रगती साधताना आपले त्याकडे दुर्लक्ष होत गेले. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी तिच्यावरही मात करून प्रयत्नांती परमेश्वरपदही मिळू शकते हे संतांनी स्वतःच्या उदाहरणांनी दाखवून दिले आहे.

धर्म, जाती, उच्च-नीच, गरीब-श्रीमंत, स्पृश्य-अस्पृश्य अशा भेदा-भेदांना चिकटून बसलेल्या सामाजिक व्यवस्थेला त्यांनी समर्थपणे तोंड दिले. परंपरेच्या नावाखाली अवडंबर माजवून आपले वर्चस्व प्रस्थापित करू पाहणाऱ्या तथाकथित उच्च वर्गाला आपले प्रभुत्व मान्य करायला भाग पाडले. वर्णाश्रमाचे भूत समाजाच्या मानगुटीवरून उतरविण्याचे आणि समाजाला स्वस्वरूपाचे ज्ञान देण्याचे महान कार्य ह्या संतांनी केले. महाराष्ट्रातील संतांच्या संदर्भात न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी त्यांच्या Rise of Maratha Power ह्या आपल्या इंग्रजी पुस्तकात मांडलेले विचार इथे उद्धृत करावेसे वाटतात. ते लिहितात.

''ह्या साधू-संत मेळाव्यात काही स्त्रिया, काही मराठे, काही कुणबी, शिंपी, माळी, कासार, सोनार पश्चातापाने शुद्ध झालेल्या

वेश्या, दासी व अतिशूद्र महार आणि निम्मेशिम्मे ब्राह्मण अशी मंडळी होती. याबरोबर असे आढळून येईल की ह्या अध्यात्मिक उन्नतीचा परिणाम केवळ एकाच जातीवर पडला नसून लहानापासून थोरांपर्यंत सर्व समाज तिने वेडा करून टाकला होता. उच्च-नीच, अज्ञ-सुजाण, स्त्री-पुरूष, आदी सर्वच लोक धर्मानंदात नाचू लागले होते. अशा प्रकारची धर्मजागृती इतर देशांच्या इतिहासात क्वचितच सापडेल.''

इथे न्या. रानडे यांनी संताचा उल्लेख न करता त्यांच्या जातींचा उल्लेख केलेला आढळतो. उदा. नामदेव-शिंपी, माळी-सावता माळी, अतिशूद्र महार/चांभार-चोखा मेळा, रोहिदास, वेश्या दासी-कान्होपात्रा, जनाबाई, सोनार-नरहरी सोनार, कुणबी-तुकाराम स्त्रिया -मुक्ताबाई, बहिणाबाई, सखुबाई इत्यादी वर्गीकरण करता येते. समर्थ रामदास, ज्ञानेश्वर भावंडादिकांचा निम्म्याशिम्म्या ब्राह्मण वर्गात समावेश होत असावा. हे वर्गीकरण कालसापेक्ष नसून कार्यसापेक्ष आहे हे लक्षात घ्यायला हवे.

समाज जागृतीच्या ह्या काळात तथाकथित खालच्या जातीत एक तरी संत निर्माण झाला व त्यामुळे ती जात वा समाज यांचा स्तर अधिक उंचावला. आजही विशिष्ट जाती त्या-त्या जातीतील संताच्या नावाने ओळखल्या जाता. उदा. नामदेव शिंपी समाज, सावता माळी समाज, रोहिदास चांभार समाज वगैरे. कदाचित संताच्या नावाने समाज ओळखला गेल्याने समाजातील लोकांना एक वेगळीच प्रतिष्ठा प्राप्त झाल्याचे समाधान मिळत असावे. संत स्वतः जात-पात मानीत नसले तरी त्या काळातील वर्ण व्यवस्थेच्या काळात विशिष्ट समाजाला दिली गेलेली वागणूक सर्वसंमत होती नव्हे तो समाजव्यवस्थेचा भाग होता. आणि म्हणूनच त्याबद्दल विषाद जरी असला तरी त्याविरूद्ध कोणी बंड करताना दिसत नाही. चोखा मेळा यांचीच रचना पहा-

अबीर गुलाल उधळीत रंग।
नाथा घरी नाचे माझा सखा पांडुरंग ।।१।।
उंबरठ्यासी कैसे शिवू आम्ही जाती हीन।
रुप तुझे कैसे पाहू त्यात आम्ही लीन।
पायरीशी होऊ दंग गावूनी अभंग।।२।।
वाळवंटी गावू आम्ही वाळवंटी नाचू।
चंद्रभागेच्या पाण्याने अंग अंग न्हाऊ।
विठ्ठलाचे नाम घेऊ होऊनी निःसंग ।।३।।
आषाढी कार्तिकी भक्तजन येती।
पंढरीच्या वाळवंटी संत गोळा होती।
चोखा म्हणे नाम घेता भक्त होती दंग।।४।।

उंबरठ्याशी कैसे शिवू आम्ही जाती हीन, पायरीशी होऊ दंग गावूनी अभंग असे म्हणताना आपण जातीने हीन असणे त्यांनी मान्य केलेले आहे आणि आपली जागा विठ्ठलाच्या पायारीशीच आहे याबद्दल त्यांची तक्रारही नाही.

परंतु समाजाने दिलेल्या वागणुकीचं दुःख मनात आहे. कारण ते म्हणतात.

देहासी विटाळ म्हणती सकळ। आत्मा तो निर्मळ शुद्ध-बुद्ध।।
देहाचा विटाळ देहीच जन्मला। सोवळा तो झाला कवण धर्म।।
विटाळा वाचोनि उत्पत्तीचे स्थान। कोण देह निर्माण नाही जागी।।
म्हणून पांडुरंगा वानितसे थोरी। विटाळ देहांतरी वसतसे।।
देहाचा विटाळ देहीच निर्धारी ।म्हणतसे महारी चोखियाची।।

खरे तर कुठल्याही देहाची उत्पत्ती ही विटाळातूनच होते मग अशा देहाला विटाळ तो कसला ? देहाचा विटाळ हा समाज निर्मित आहे. आत्म्याची शुद्धी महत्वाची आहे. हे त्यांनी ओळखले होते आणि म्हणूनच देहाच्या विटाळाचे देहासोबतच निर्दालन व्हावे असे चोखा नव्हे तर त्याची महारी म्हणजे त्यांच अस्पृश्य असणं हे सांगत आहे अशा अर्थचा हा अभंग. यात समाजाने अस्पृश्य ठरविण्याचा किती विषाद, किती दुःख यात भरलेले आहे त्यांच्या शुद्ध -बुद्ध आत्म्याला देहाचा विटाळ मात्र चुकला नव्हाता. समाजाला त्याचा विटाळ होत होता परंतु पांडुरंगाला मात्र त्याला आत्मज्ञान देण्यासाठी कसलेच बंधन नव्हते.

नामस्मरणाच्या सामर्थ्याने त्याचा देहरूपी विटाळाचे जाळे तुटले आणि देहाच्या अनुषंगाने आलेले वासना, मोह यातूनही मुक्ती मिळाली. म्हणूनच तो पुढे म्हणतो.

नाही उरली वासना। तुम्हा नारायणा पाहता।.
उरला नाही भेदा-भेद ।झाले शुद्ध अंतर।।
विटाळाचे होते जाळे। तुटले बळे नामाच्या।
चौदेहाची तुटली दोरी। म्हणे चोखियाची महारी।।

संत चोखा मेळा हा महार होता त्याचा जन्म विठ्ठलभक्त

माता-पित्याच्या पोटी, चमत्काराने किंवा विठ्ठलाच्या कृपेने झाला होता असे म्हणतात. कोरेगावच्या पाटलांचे आंबे पंढरपुरात विठ्ठल मंदिरात नेऊन देत असताना एका भुकेल्या वृद्धाला (तो वृद्धरुपातील विठ्ठल होता असा समज आहे) त्यातीलच एक आंबा ह्या जोडप्याने खाण्यास दिल्यावर त्याने तो आंबट आहे म्हणून परत दिला. आंबे मोजताना कमी पडले आणि हा प्रकार उघड झाला. वेगळया ठेवलेल्या त्या आंब्याच्या जागी अर्भक दिसले तोच चोखा मेळा होय. कदाचित तो उष्टा आंबा चोख्याच्या मातेने खाल्ल्यावर तिला दिवस जाऊन चोख्याचा जन्म झाला असेल. चोखलेल्या आंब्यापासून झालेला म्हणून तो चोखा. गोरा कुंभार, जनाबाई, सखुबाई, नरहरी सोनार ह्या संताच्या बाबतीतही अशा चमत्कारांचा उल्लेख आढळतो.

त्या काळी सर्व समाजात, विशेषत: बहुजन समाजात विठ्ठलभक्तीची परंपरा दिसून येते. आजच्या काही संशोधनातून विठ्ठलाच्या विष्णू रुपाला जरी आव्हान दिले गेलेले असले तरी सद्यस्थिती प्रमाणे त्या काळी सुद्धा विठ्ठलाला विष्णुरूप मानणारा व स्वत:ला वैष्णव म्हणणारा वर्ग फार मोठ्या प्रमाणात आढळतो. तुकारामासहित कितीतरी संतांनी स्वत:ला वैष्णव म्हणवून घेतलेले आहे. त्याकाळी शैव आणि वैष्णव हे दोनच पंथ प्रामुख्याने होते. ह्या दोन्ही पंथामध्ये अतिशय चुरस आणि तेढ होती. त्या काळात होणाऱ्या परकीय आक्रमणांमुळे विशेषत: मुस्लीम धर्माच्या कडवेपणामुळे हिंदू धर्माला धोका उत्पन्न झाला होता. हिंदूंनी आपली एकजूट राखणे अतिशय आवश्यक होते आणि म्हणूनच शिव आणि विष्णू ही दोन्ही एकाच देवाची रुपे आहेत हे पटवून देऊन संत नामदेवांनी भागवत धर्माचा झेंडा रोवला. विठ्ठल ह्या एका देवासाठी, हरिनामाचा महिमा त्यांनी लोकांना पटवून दिला आणि त्याचाच प्रचार व प्रसार केला.

नरहरी सोनार हा तर कट्टर शिवभक्त, विठ्ठलाचे दर्शनही नाकारणारा. देवाच्या कंबरपट्याच्या मापासाठी गाभाऱ्यात गेला तोही डोळ्यांना पट्टी बांधून. ह्या प्रसंगातूनही शैव-वैष्णव वादाचे कट्टरपण दिसून येते. विठ्ठलाच्या मूर्ती ऐवजी त्याला स्पर्श झाला तो शिवलिंगाचा, प्रसंगाची पुनरावृत्ती झाल्यावर त्याला शिव आणि विष्णू एकच असल्याची प्रचीती येणे आणि त्याने विठ्ठलाला शरण जाणे यातील भोळा भाव सोडला तरी तार्किक निकष लावूनही काही गोष्टीचे समर्थन करता येत नाही. शेवटी प्रचीतीची व्याख्या करता येत नाही हेच खरे आहे. आजच्या काळातही आपण ज्याचे समर्थन करू शकत नाही अशा कितीतरी गोष्टी अनुभवास आल्याचे आपण पाहतो. नरहरी सोनार म्हणतात.

देवा तुझा मी सोनार । तुझे नामाचा व्यवहार ।।
मन बुद्धीची कातरी । रामनाम सोने चोरी ।।
नरहरी सोनार हरीचा दास । भजन करी रात्रदिवस ।।

नरहरी सोनारांच्या फारशा रचना अस्तित्वात नाहीत. त्यावेळी संताची चरित्रे बखरीच्या स्वरूपात उपलब्ध नव्हती त्यामुळे त्यांच्या कालखंडाबाबतही अचूक माहिती क्वचितच मिळते. तसेच त्यांचे साहित्यही बहुधा मौखिक स्वरूपातच उपलब्ध असल्याने व नंतर त्याचे लिखित स्वरूपात संपादन झाल्याने त्यांच्या कालखंडासोबत त्यांच्या रचनाही जशाच्या

तशाच उतरलेल्या असतील की नाही याबद्दलही शंका आहे. स्वतः लिहू न शकणाऱ्या संताबद्दल तर ही शक्यता जास्त संभवते.

बहुजन समाजतील आणि मागासवर्गातील संतांची विठ्ठलभक्ती चालू असताना मंदिरात बडव्यांचा जाच होता तिथे अस्पृश्यांना प्रवेश नव्हता. संत नामदेवांनी चोखा मेळा यांचा त्यांच्या गावी अपघाती मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या अस्थी सन्मानाने पंढरपुरात आणून मंदिराजवळ त्यांची समाधी बांधण्याचे धाडस केले. सर्व वारकरी पंथाच्या पाठबळाशिवाय हे शक्य नव्हते. हे पाठबळ मिळण्यासाठी नामदेव, नामदेवादिकांनी सामान्यजनांच्या बौद्धिक विचारसरणीत आमूलाग्र बदल घडवून सर्वधर्मसमानत्वाचे विचार रुजविले होते. त्यांना कृतीचं खत पाणी घालून भागवताची पताका फडकविली होती. आपण तेराव्या शतकातील बडव्यांच्या जाचाबद्दल बोलत असताना त्यांच्या जाचातून खऱ्या अर्थाने सुटका होण्यासाठी एकविसावे शतक उजाडावे लागले याची नोंद घ्यायाला हवी. १९४७ साली पूज्य साने गुरूजींनी पंढरपूरचे मंदिर मागासवर्गीय जाती जमातीसाठी खुले करण्यासाठी आमरण उपोषण केले आणि त्यानंतरच मंदिरात दलितांना प्रवेश खुला झाला. अर्थात हे सनातनी उच्चवर्णी लोकांना मान्य होण्यासारखे नव्हते. मुजोर बडव्यांनी तर अजूनपर्यंत आपला मंदिरावरील कब्जा सोडला नव्हता जणू काही विठ्ठलाला त्यांनी खऱ्या भक्तांपासून वंचितच ठेवले होते तेव्हा विठ्ठलालाही म्हणावेसे वाटले असेल.

शोधतो मी आज खरा भक्ती भाव
लागे ना तो ठाव अंतरीचा ।
अर्थार्जनासाठी नको ते गोडवे
राऊळ बडवे नासविती ।।
करिता व्यापार देवाच्याच नावे
देव ना आठवे कोणासही

ह्या पार्श्वभूमीवर आज पंढरपूरच्या मंदिरात विठ्ठल रखुमाईच्या पूजेसाठी स्त्रिया आणि ब्राह्मणेतर जातीतील पूजाऱ्यांची झालेली निवड ही बाब निश्चितच अभिमानास्पद आहे. आतापर्यंत जातीभेदाचे चटके सोसलेल्या कितीतरी संत महात्म्याच्या समाधिस्त आत्म्यांना आता खऱ्या अर्थाने समाधान लाभले असेल.

संताचे साहित्य पाहता तेराव्या शतकातील संतांच्या साहित्यातून, आहे त्या परिस्थितीशी जुळवून घेण्याचा कल दिसतो. संत तुकारामांच्या साहित्यात दिसून येणारी समाज व्यवस्थेविरूद्ध बंडखोरी ह्या संताच्या साहित्यात दिसून येत नाही. बहुतेक संत आपला प्रपंच सांभाळून विठ्ठलभक्तीचा परमार्थ साधताना दिसतात. आपल्या सर्व शक्ती, कौशल्य आणि तन-मन-धन अर्पून आपण स्विकारलेले काम निष्ठापूर्वक केले. यश, कीर्ती, वैभव आपल्या पायाशी लोळण घेण्याची आसच ठेवली नाही. जास्त उहापोह न करता जे काम स्वीकारले आहे, त्यालाच दिव्यत्वापर्यंत नेण्याचा चंग बाधला, आणि सर्व शक्ती व मन एकवटून त्यावरच लक्ष केंद्रीत केले, तर कोणत्याही व्यवसायातून अद्भूत वाटावे असे चमत्कार घडू शकतात. हे आपणही करू शकतो ही भावना मनात जागी झाली. तर स्वकर्मात रत राहूनही दिव्यत्वाची प्रचिती येऊ शकले. सर्व संतांनी अगदी हेच केले. अर्थात प्राप्त झालेल्या संतपदाची अपेक्षा मात्र त्यांनी कधी केलेली दिसत नाही

संत सावता माळी यांना तर आपला भाजीचा मळा पिकविताना भाजीतच ठायी विठ्ठलाचं दर्शन होत होतं. त्यांनी कधी पंढरपूला भेटही दिली नाही. असे म्हणतात की विठ्ठल स्वतःत्यांच्या भेटीला आला होता.

आमुची माळीयाची जाती। शेत लावू बागायती ।। असे ते आपल्या पेशाबद्दल बोलतात. आपल्या अभंगात ते म्हणतात.

कांदा- मुळा भाजी।
अवघी विठाबाई माझी।।१।।
लसुण-मिरची-कोथिंबिरी।
अवघा झाला माझा हरी।।२।।
ऊस-गाजर-रताळू
अवघा झालासे गोपाळू।।३।।
मोट-नाडा-विहीर-दोरी।
अवघी व्यापिली पंढरी।।४।।

आहे त्या परिस्थितीत समाधानाने जगण्याची प्रवृत्ती त्यांच्याठायी होती आणि आपले काम हीच विठ्ठलभक्ती आणि त्या कामाचे फलित म्हणजे विठ्ठलदर्शन हेच त्याचे जगण्याचे ब्रीद होते.

त्यांचे साधारण २५ अभंग उपलब्ध आहेत. पंढरपूरजवळ अरणभेंडी येथे वयाच्या पचेचाळीसाव्या वर्षी त्यांनी संजीवन समाधी घेतल्याचा उल्लेश आढळतो.

संत गोरा कुंभाराच्या बाबतीत तर चमत्कारांची मालिकाच दिसून येते. विठ्ठलाचे नाव घेत माती मळताना त्यात स्वतःचे मूल रांगत त्यात आलेलेही त्यांना कळले नाही. त्यांच्या मृत्यूला जबाबदार ठरवत त्यांच्या पत्नीने विठोबाला बोल लावल्याने ते तिला काठीने मारायला धावले आणि तिने उद्वेगाने मला स्पर्श करू नका असे म्हणताच त्यांनी तोच शब्द विठ्ठलाला शब्द दिल्याप्रमाणे पाळला. पत्नीने उपाय म्हणून आपल्याच धाकट्या बहिणीशी त्यांचा विवाह लावून दिला परंतु सासऱ्याने दोघींना सारखी वागणूक द्या असे सांगताच ते पहिल्या पत्नी प्रमाणेच दुसरीशी वागू लागले. त्यावर उपाय म्हणून दोन्ही पत्नीने ते झोपेत असताना त्यांना हातांना स्पर्श करण्याचा घाट घातला. गोरोबांच्या ते लक्षात आल्यावर त्यांनी आपले दोन्ही हातच कोपरापासून तोडून टाकले. दोन्ही बहिणींना काय करावे तेच सुचल नव्हते. एकदा मंदिरात नामदेवराय कीर्तन करीत असताना त्यांनी सर्वांना आपल्यासोबत टाळ्यांनी ताल धरायला सांगितले. आपल्याला हात नाहीत याचे भान न राहता गोरोबा टाळ्या वाजवू लागले आणि आश्चर्य म्हणजे त्यांचे दोन्ही हात त्यांना परत मिळाले. हा चमत्कार पाहून त्यांच्या पत्नीने विठ्ठलाला आपले मूल परत देण्यासाठी साकडे घातले आणि बाळाला हाक मारताच ते मूलही धावत परत आले. नंतर विठ्ठल - रखुमाईने गोरोबांना दोन्ही स्त्रियांसोबत संसार करण्याबद्दल समजावले. त्यांचे खालील अभंग रुढार्थाने अशिक्षित असलेल्या व्यक्तीचे आत्मज्ञान कोणत्या प्रतीचे असते याचेच द्योतक आहेत.

निर्गुणाचा संग धरिला जो आवडी।
तेणें केले देशोधडी आपणियाशी।।१।।
अनेकत्व नेले अनेकत्व नेलें।
एकलें सांडिलें निरंजनी, मायबाप।।२।।
एकत्व पाहतां अवघे लटिकें।
जें पाहें तितुके रुप तुझें मायबापा।।३।।
म्हणजे गोरा कुंभार सखया पांडुरंगा
तुम्हा आम्हां ठावा कैसे काय, मायबाप।।४।।

निर्गुणाचे भेटी आलो सगुणासंगे। तव झालो प्रसंगी गुणातीत।। असे म्हणताना अभंगात ते सगळे श्रेय नामदेवांना देताना दिसतात.

निर्गुणाचे भेटी आलो सगुणासंगे।
तंव झालों प्रसंगी गुणातीत।।१।।
मज रूप नाही नांव सांगू काई।
झाला बाई काई बोलू नये ।।२।।
बोलतां आपली जिव्हा पै खादली।
खेचरी लागली पांहता पाहतां ।।३।।
म्हणे गोरा कुंभार नाम्या तुझी भेटी।
सुखासुखी मिठी पडली कैसी।।४।।

आपल्या संताचे साहित्य हे बहुतेक अभंग स्वरूपातच उपलब्ध आहे. शिवाय त्या अभंगाचा त्या-त्या काळचा दस्तावेज उपलब्ध नसल्याने आणि ह्या साहित्याचे जतन हे सुरूवातीला मौखिक स्वरूपाचे असल्याने त्यात कधी कधी शब्द किंवा संदर्भ बदलताना दिसले तर नवल नाही. अभंग हे विठ्ठलभक्तीचा महिमा सांगणारे आणि भक्तीरसाने ओथंबलेले आहेत. त्यात भक्तीरसाला प्राधान्य जरी असले तरी त्यावर त्या त्या काळातील सामाजिक परिस्थितीचा उल्लेख, टिप्पणी, रोष थोडी तक्रार, थोडे स्वतःलाच आणि समाज व्यवस्थेला घेतलेले चिमटे याचाही समावेश दिसून येतो. अभंगाची रचना अतिशय साध्या, सोप्या आणि रसाळ भाषेत केलेली दिसते कारण त्याच बहुधा बोलीभाषेतीलच शब्द वापरलेले आढळतात. रोजच्या व्यवहारातील रुपके, प्रतिमा यांचा सर्रास वापर केलेला आढळतो. बहुतेक सर्व संतांच्या अभंगात त्यांच्या व्यवसायाचा जातीचा किंवा त्या अनुषंगाने येणाऱ्या काही वस्तूंचा व त्यांना समाजाकडून मिळणाऱ्या वागणुकीचा उल्लेख आढळतो आणि ह्या साध्या सोप्या शब्दांतूनच संतांना झालेले आत्मज्ञान आपल्याला एक दिव्यत्वाची प्रचीती देऊन जाते.

ज्याला भंग नाही तो अभंग ही व्युत्पत्तीतच शतकानुशतके टिकून राहिलेल्या आणि त्याच ताजेपणाने मनाला आनंदच नव्हे तर आत्मज्ञानाचा अनुभव देणाऱ्या संत साहित्याचे रहस्य आहे.

समाजजागृती करण्यामध्ये आणि विषमता हटविण्या संबंधी प्रयत्न करण्यात संतनामदेवांचा फार मोठा वाटा आहे हे आपल्याला

ज्ञात आहेच. संत नामदेव, संत गोरा कुंभार, संत चोखा मेळा, नरहरी सोनार संत सावता माळी हे साधारण समकालीन समजले जातात. त्यांचा कार्यकाळ हा संत ज्ञानेश्वरांसोबतच आहे. ज्ञानेश्वर, त्यांची भावंडे संत निवृत्तीनाथ, सोपान नाथा आणि मुक्ताबाई, नामदेव, गोरोबा, चोखा मेळा ह्यांच्या एकत्र असण्याचे बरेच संदर्भ सापडतात. संत नामदेवांनी ह्या संतांना भागवताच्या झेंड्याखाली एकत्र आणले होते. त्यांना ज्ञानेश्वर आणि त्यांच्या भावंडाचे उचित मार्गदर्शन लाभले. ज्या काळात जातीभेदाच्या आणि सनातनी विचारांच्या भिंती अभेद्य होत्या, त्या काळात वारकरी संप्रदायात हरिनामाच्या एका मंत्राने बहुजन समाजातील संतांनी उच्चनीच भेदाला खिंडार पाडले होते. पंढरपुरात ह्या संतांचे वास्तव्य तसेच येणे - जाणे असे. नामदेव तर विठ्ठल मंदिरातच किर्तन करीत. त्यांच्या रसाळ वाणीची व अर्थपूर्ण अभंगाची महती सांगणाऱ्या किती तरी कथा प्रचलित आहेत. तसे, एकदा हे सर्व संत एकत्र बसले असताना ज्ञानेश्वरांनी गोरोबांना उपस्थितांचे मडके (डोके) कच्चे की पक्के हे तपासायला सांगितले, मुक्ताईने ते म्हणणे उचलून धरले. संत गोरोबांनी नामदेवांचे डोके ठोकून ते मडके कच्चे असल्याने सांगण्याचा संदर्भ मिळतो. इथे मडके कच्चे असणे म्हणजे अहंकाराचे समूळ उच्चाटन न झाल्याने अध्यात्मिक प्रगतीसाठी क्षमता कमी असल्याचा अर्थ आहे. रागावलेल्या नामदेवाला विठ्ठलानेच विसोबा खेचराचे शिष्यत्व पत्करण्याचे मार्गदर्शन केले आणि त्यानंतर नामदेवाने सर्व संतांना, लोकांना भागवताची शिकवण दिली. ह्या प्रसंगाची मालिकाच, विठ्ठल केवळ भक्ती आणि भक्तधार्जिणा असल्याची ग्वाही देते. नामदेवांनी नंतर भारतभर प्रवास करीत हरिभक्तीचा प्रसार केला. गुरदासपुर जिल्ह्यातील घुमान ह्या गावी त्यांचे वीस वर्ष वास्तव्य होते. आजही शीख बांधव त्यांना आपले मानतात आणि त्यांच्या रचना गातात. त्यांनी हिंदीतून लिहिलेल्या १२५ अभंगापैकी ६१ अभंग गुरू ग्रंथसाहेब ह्या शिखाच्या पवित्र ग्रंथात 'नामदेवकी मुखबानी' म्हणून समाविष्ट केलेले आहेत. नामदेवांच्या गाथेतही २५०० अभंगाचा समावेश आहे. त्यांनी आदिसमाधी हे ज्ञानेश्वरांचे चरित्रही लिहिले आहे. नामदेवांचे हे कार्य खरेच अचंबित करणारे आहे आणि ह्या संतश्रेष्ठाला मानवंदना म्हणून पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात पहिल्या पायरीला नामदेवाची पायरी म्हणून मान असावा. भारतभर भागवताची पताका फडकविणाऱ्या नामदेवाला आणि त्यांच्या झेंड्याखाली येऊन समाजाने केलेली उपेक्षा सहन करूनही विठ्ठलभक्तीच्या परंपरेचा आदर्श घालून सर्वधर्मसमभावाने समाजजागृती करणाऱ्या सर्व संताना अभिवादन।

अनुराधा नेरूरकर

भ्रमणध्वनी - ९८१९१०००६९

प्रबोधनकार
संत नामदेव

जोत्स्ना दिलीप पाटील

भागवत धर्माची पताका महाराष्ट्रापासून पंजाबपर्यंत फडकवित नेणाऱ्या संत नामदेवांचे कार्य विशेष उल्लेखनीय असे आहे. कारण तेराव्या शतकात म्हणजेच सातशे वर्षापूर्वी दळणवळणाचे कुठलेही साधन नसतांना, अत्यंत प्रतिकुल व अस्थिर अशा राजकीय,सामाजिक परिस्थितीमध्ये हजारो कि.मी. चा प्रवास करुन, भाषेचा बाऊ न करता किर्तनाद्वारे साऱ्या जगाला ज्ञानामृत पाजणाऱ्या संत नामदेवांचे कार्य निश्चितच स्वागतार्ह व कौतुकास्पद आहे.

“शिंपियांचे कुळी जन्म मज झाला” असे स्वतःनामदेवांनी म्हटले असून त्यांनी त्यांच्या जन्मकाळाची व जन्मपत्रिकेची रचना अभंगाद्वारे केली यावरुन संत नामदेवांच्या अंतरंगात कवित्व ठायी ठायी वसलेले दिसून येते.

नामदेवांचे मूळ गाव, नरसीबीमणी व कल्याणी हे आजोळ असून त्यांचे वडील दामाशेट श्रीविठ्ठलाचे भक्त होते. गोणाई ही नामदेवांची आई, नामदेवांची विठ्ठलभक्ती पाहून अस्वस्थ होत असे ती नामदेवांना म्हणते,

नवमासवरी म्यां वाहिलासी उदारी ।
आस केली थोरी होसी म्हणोनी ।।
कां रे नामदेवा, जाहलासी निष्ठूर ।
न बोलसी उत्तर मजसी काही ।।

माता गोणाईची अस्वस्थता जाणूनही नामदेव श्रीविठ्ठलापासून दूर होण्यास तयार नाहीत तेव्हा गोणाई हट्टाने पेटून उठते आणि नामदेवांना म्हणते,

तुज नेल्याविण नच जाय येथून ।
पंढरी गिळीन विठोबासहित ।।

आपल्या मुलांसाठी कोणतीही आई वाट्टेल ते धाडस करायला तयार असते आणि येथे तर गोणाईने विठोबासहित पंढरी गिळण्याचे धाडस करणे यातूनच गोणाईचे पुत्रप्रेम किती अगाध आहे याची प्रचिती येते.

आता बरवें विचारी, अगा ये श्रीहरी ।
माझा नामा करी, मज आधीन ।।
नाही तरी जीवित्व वेचीन तुझ्या पायी ।

विनविते गोणाई केशिराजा।।

आज संपत्तीवरून वडीलांशी भांडणारी मुले समाजात पाहतो तेव्हा संत नामदेवांच्या चारही मुलांची आठवण आल्यावाचून राहत नाही. फक्त भक्तीचा महिमा व विठ्ठल नामाचा वारसा देणाऱ्या वडिलांविषयी आदर बाळगणाऱ्या संत नामदेवांच्या पुत्रांची पितृभक्ती आज का पाहायला मिळत नाही? संतांच्या वैराग्य वृत्तीला दारिद्र्याचे डोहाळे म्हणून हिणवणाऱ्यांना एवढेच सांगावेसे वाटते की, ऐहिक व सुखलोलूप जीवन उपभोगून आज माणूस सुखी आहे का? ढोंगीपणाचा आव आणूनही आज जगातील युद्धसदृश्य स्थिती, अशांतता व

दहशतवाद इ. गोष्टींचे निराकरण करायचे असेल तर संतांच्या शिकवणूकीशिवाय पर्याय नाही आणि हीच शिकवण संत नामदेवांनी महाराष्ट्रापासून ते पंजाबपर्यंत नेऊन पोहचवली. संत नामदेवांनी गुजरात-सौराष्ट्र-राजस्थान-पंजाब असा प्रवास करीत किर्तनाद्वारे जनतेचे प्रबोधन केले. राजस्थानातील जयपूर, भरतपूर, बीकानेर, अलवर अशा मोठया शहरातून नामदेवांची मंदिरे आहेत. तसेच त्यांच्या नावाच्या शाळा आहेत तसेच, बाजारपेठ राजस्थानमध्ये आढळते तसेच तेथील शिंपी समाजाला "नामदेव वंशी छिप्पा दर्जी" म्हणून ओळखले जाते. राजस्थानात अठरा जिल्ह्यातील बावन्न गावांतून नामदेवांची मंदिरे आजही पाहायला मिळतात. सातशे वर्षापूर्वी राजस्थानमध्ये एका मराठी संतांने मोठे धर्मकार्य करुन ठेवले. ही मंदिरे म्हणजे संत नामदेवांच्या कार्याची खरी साक्ष होय.पंजाब प्रांतात संत नामदेवांनी भरपूर प्रवास केला. पंजाबातील गुरुदासपूर जिल्ह्यात फिरत फिरत एका शांत स्थळी नामदेव पोहचले तेव्हा त्याठिकाणी मनुष्यवस्ती नव्हती. नामदेवांना विठ्ठलाशी एकरुप होण्यास तेथील शांतता भावली त्यांनी तेथे पंधरा वर्षे वास्तव्य केले. या पंधरा वर्षाच्या कालावधीत त्यांचा पारमार्थिक अधिकार आसपासच्या लोकांच्या ध्यानी आला आणि तेथे गाव वसले. नामदेव घुमत घुमत (फिरत) या ठिकाणी पोहचले त्यामुळे या गावाला 'घुमान' असे नाव पडले. आज या गावाला 'नामदेव' की घोमानी, असे म्हणतात. 'पंजाबमधील पंढरपूर' असा या गावाचा महिमा आहे. योगायोगाने या वर्षी 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन' घुमानला होणार आहे आणि हा मराठी माणसाचा संत नामदेवांना खऱ्या अर्थाने मानाचा मुजराच ठरणार आहे.भागवत

धर्माची पताका उत्तरेत नेणारे नामदेव हे पहिले संत होते. नामदेवांनी पंजाबमध्ये भक्तिमार्गाचा शुभारंभ केला आणि रामानंद, कबीर व नानक अशा संतजनांना प्रेरणा मिळाली. शीख बांधवांच्या 'श्री गुरुग्रंथसाहेब' या

धर्मग्रंथात संत नामदेवांच्यावर एकसष्ट हिंदी पदे आहेत त्यांस "बाबा नामदेवजी की मुखबानी" म्हणून ओळखले जाते त्यात ते म्हणतात.

कहाँ करुं जाती, कहाँ करुं पाती।
रामको नाम जयो, दिन और राती।।

संत नामदेवांच्या कार्याचे वर्णन करताना आचार्य हजारीप्रसाद त्रिवेदी लिहितात, "नामदेवजी की सीधी-सादी, सहज-सत्य वाणी देश और काल की सीमाओं को भेदकर, सारे देश में नई चेतना जगा

सकी थी", संत नामदेवांचे द्विवेदींनी केलेले वर्णन सर्वस्वी सार्थ आहे. नामदेवांनी विठ्ठलभक्ती बरोबरच व्यावहारीक व प्रापंचिक जीवनावरही अभंगांद्वारे भाष्य केले आहे. चंचल मनाविषयी ते म्हणतात..मन केले तैसे होय,

धावडिले तेथे जाय।

गोणाईने पुत्रप्रेमापोटी विठ्ठलासच धारेवर धरले तर याउलट नामदेवांच्या पत्नीने पतीसाठी रुक्मिणी मातेची विनवणी केली. नामदेवांची पत्नी राजाई रुक्मिणीला विनविते, दोन प्रहर पाहोनी एकान्ता राजाई वृतान्त सांगे माते।।

अहो रखुमाबाई विठोबासी सांगा।
भ्रतारासी कां गा वेडे केले ?
बरा मार्ग तुम्ही उमगोनि सांगा।
नामरायाची राजाई भली नव्हे।।

दिवसाढवळ्या चार लोकात बभ्रा होऊ नये याची दक्षता घेत रात्रीच्या प्रहारात राजाई रुक्मिणी मातेजवळ आपले दु:ख व्यक्त करावे. व्यवहारातले शहाणपण असणारी राजाई "नामरायाची राजाई भली नव्हे" असा इसाराही देते नामदेवांच्या पुण्याईमुळे विठ्ठलाच्या श्रीमुखाचे राजाईला दर्शन घडते तेव्हा राजाईला नवऱ्याच्या परमार्थातला अधिकार मोठा आहे याची जाणीव होते आणि ती समाधानाने म्हणते,

आता ये संसारी मीट धन्य जगी।
जे तुम्हां अर्धांगी विनटले।।

प्रपंच करताना मी जगात धन्य झाले. तुमची मी पत्नी झाले, याचे खरोखर सार्थक झाले. सातशे वर्षापूर्वी राजाई आणि आजच्या मंदाताई आमटे, राणी बंग या एकच होत.संत जनाबाई, संत नामदेवांच्या कुटुंबातील करुन देतात.

गोणाई, राजाई दोघी सासू-सुना।
दामा, नामा जाणा वाय-लेक।
नारा, विठा, गोंदा, महादा चौघे पुत्र।
जन्मले पवित्र, त्यांचे वंशी।।
लाडाई, गोडाई, येसाई, साखराई।
चवघी सुना पाही नामयाच्या।।
लिंबाई ती लेकी, आऊबाई बहिणी।
वेडीपिशी जनी, नामयाची।।

संत जनाबाई यांच्यासह पंधरा माणसांचे कुटुंब एकत्र नांदत होते. तीन पिढ्यांचा संगम नामदेवांच्या कुटुंबात पाहायला मिळतो आणि त्यांच्या कुटुंबातील तीन्ही पिढयांनी विठ्ठल भक्तीचा महिमा अभंगाद्वारे सांगितला आहे. नामदेवांच्या चारही मुलांना वडिलांच्या भक्ती प्रेमाबद्दल अतिशय आदर होता. नामदेवांचा मुलगा नारायण म्हणतो,

नारा म्हणे, नाम्याने सांगितले बीज,

नामदेवांनी आपल्याला नामभक्तीचा बीजमंत्र शिकवला, असे नारायण याने म्हटले आहे. नामदेवांचा लहान मुलगा महादेव म्हणतो,

नामयाच्या महादा बळकट झाला।
विठोबा आणला चौबारांत।।

श्री विठ्ठलास वश करुन घेतल्यामुळे महादेव या मुलाला भक्तीचे बळ लाभले आहे. तर त्यांच्या दुसरा मुलगा विठा म्हणतो,

नामयाच्या चरणीचे रज। आपण त्यांच्या पायाला लागलेला धुळीचा कण आहोत त्यांचा तिसरा गोंदा म्हणतो,नामा विठ्ठलाशी नाही द्वैतपणे।

आपले वडिल नामदेव आणि विठ्ठल हे एकरुपच आहेत.

जोत्स्ना दिलीप पाटील
फ्लॅट नं. ६, सुलक्षण अपार्टमेंट
दादोजी कोंडदेव नगर,
गंगापुर रोड, नाशिक - १२
९३२५२३४११८

तुका झालासे कळस

साधना कळवणकर

संत कृपा झाली । इमारत फळा आली ।
ज्ञानदेवे रचिला पाया । उभारले देवालया ।
नामा तयाच किंकर । त्याने केला हा विस्तार ।
जनार्दनी एकनाथा न दिधला भागवत ।
तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ।
बहिणा फडकते हो ध्वजा । निरूपन झाले वोजा ।।
(बहिणाबाई)

श्रीक्षेत्र आळंदीहून पश्चिमेस १६ किमी वर पुण्याहून ३० किमी इंद्रायणीच्या तीरावरच हे छोटेसे गाव. देहू गावी तुकोबांचा जन्म झाला. देहूगावीच तुकोबांचे पूर्वज राहत असत.

तुकोबांचे मोरे (आंबिळे) घराणे भगवदभक्त होते. तुकोबांपूर्वी आठ पिढ्यांपासून विठ्ठलाची उपासना त्यांच्या घराण्यात परंपरेने चालत आली होती. पंढरीच्या पांडुरंगावर बोल्होबाची परमनिष्ठा होती. त्यांच्या पत्नीचे नाव कनकाई. कनकाई विठोबाची निष्ठवंत भक्ती होती. या दांपत्याला बरेच वर्ष मूल नव्हते. बोल्होबांनी चोवीस वर्षे अखंड वारी केली. श्रीहरिकृपेने त्यांना तीन पुत्र झाले. सावजी, तुकाराम, कान्होबा.

शुचि श्रीमंत घरात । योगभ्रष्ट मुक्त ।।

तुकोबांचा जन्म देहूच्या पावन भूमित शके १५३० म्हणजे इ.स १६०८ साली झाला. तुकोबांचे कुळ मोरे आडनाव आंबिले. ते जातीने मराठा कुणबी, त्यांचा वाण्याचा व्यवसाय होता. भगवंताने ज्याचा अंगीकार केला तो अखिल विश्वाला व त्रैलोक्याला पावन करणारे महात्मे ज्या कुळात जन्म घेतात ती जात, ते कुळ, तो देश अत्यंत पवित्र करतात.

म्हणोनि कुळ जाति धर्म । हे अघवेचि अकारण ।
ऐक अर्जूना माझेपण । सार्थक एक ।।

अभंगवाणीत बालपणीच्या केवळ खुणाच उमटतात. त्यांच्या अभंग रचनेत त्यांनी अनेक खेळांवर रूपके केली आहेत. प्रेम देवाशी सलगीने बोलतांना ते म्हणतात,

आम्ही आळीकरे । प्रेम सुखाची लेकुरे ।।

त्यांच्या जीवनात जरी प्रखर वैराग्य असले तरी त्यांचा संसार निरस होता. नित्यनवा कळवळा असणारी माता आणि सदैव सांभाळ करणारा पिता अशा हितकारक वातावरणातच तुकोबांचा प्रतिपाळ झाला. कपडेलत्ते, दागदागिने या बाबतीत या

भावंडाचे चांगलेच कौडकौतुक झाले. वडिल संपन्न सावकार आणि त्यांची महाजनकी होती मग तेथे काय कमी असणार ? खेडेगावातील मुलांच्या आवडीच्या खेळांची विस्तृत यादीच त्यांनी दिली.

बालपणी ऐसी वरूषे गेली बारा । खेळता या पोरा नाना मते ।।
विटीदांडू चेंडू लंगोऱ्या वाघोडी । चंपे चेंडू खडी एकी बेंकी ।।
हमामा हुंबेरी पकवळ्या बारे । खेळे जंबी भोवरे चुंबाचुंबी ।।
सेडेरा आणि निसर भोंवडी । उचली बाळे धोंडी अंगबळे ।।
तुका म्हणे ऐसे बालपण गेले । मग तारूण्य आले गर्वमूळ ।।

त्याकाळी वेद विद्या शिकणे सर्वांनाच शक्य नव्हते. गावातील पंतोजीकडून तुकोबांना प्रत्यक्ष अक्षरांची ओळख घडली. व्यवहारास लागणारे, लिहिण्या वाचण्याचे व गणिताचे शिक्षण त्यांनी बालपणी घेतले. शिवाय घरातील नित्यपाठ व गावातील कथा कीर्तन श्रवणाने ते बहुश्रुत झाले असावेत. घरी तुळशी वृंदावन, देवळातील विठ्ठलमूर्ती, नित्य व नैमित्तिक भजने, पूजने-पुराणे-कीर्तन, नित्यनेमाने वडीलांची पंढरीची व पंढरीला जाणारा वारकऱ्यांचा मेळावा या सर्व गोष्टींचे सुसंस्कार त्यांच्या बालमनावर खोलवर रूजले होते. लहानपणापासून गीता भागवताचे श्रवण घडल्यामुळे या ग्रंथाची देववाणी तुकोबांच्या परिचयाची झाली होती. ज्ञानदेव, नामदेव, जनाबाई , एकनाथ या संताचे अभंग त्यांनी ऐकले. गीता त्यांच्या नित्यपाठात होती. भक्तीचे काव्य श्रवणद्वारा व कुळाचार आचरणद्वारा तुकोबांच्या चित्तात संचारू लागले. एकादशी, सोमवार व्रत, श्री विठ्ठलाची पूजा नित्यनेमाने पंढरीची वारी या संस्कारानी तुकोबांना परंपरेने प्रेम जडले.

सावकारी महाजनकी व्यवसाय :-

तत्कालीन वयामानाप्रमाणे तुकोबांनी तेराव्या वर्षीच तारूण्यात प्रवेश केला. जेष्ठ बंधु सावजीने घेतलेल्या कर्मसंन्यासाने स्वधर्म पालन करण्याची जबाबदारी तुकोबांच्या शिरावर आली. तो स्वधर्म कौशल्याने करून त्यांनी नकळत कर्म योगाचा भक्कम पाया घातला. तेरा ते सतरा हा चार वर्षाचा काळ तुकोबांना अनुकुल होता. वय लहान असुनही अनुभवी पित्याच्या नियंत्रणाखाली संसाराची व व्यवहाराची जबाबदारी सांभाळण्यात ते तरबेज झाले. सर्वार्थी निपुण तुकोबांना पाहून एकाग्रतेने काम करण्याचे कौशल्य व अंगाची दक्षता पाहून बोल्होबांनी व्यवहार ज्ञानाचे गाठोडे तुकोबांच्या हवाली केले. आता सर्व लोक त्यांना तुकाशेट म्हणून संबोधू लागले. वडीलांच्या थोर उपकाराची कृतज्ञता व्यक्त करताना ते म्हणतात,

''प्रेम देवाशी सलगीने बोलताना आम्ही आळीकरे । प्रेम सुखाची लेकुरे ।। हे त्यांच्या बालपणाचे यथार्थ वर्णन वाटते. त्यांनी बायको मुले, ग्रामस्थ या सर्वावर प्रेमामृताचा वर्षाव केला. लेकरा आयते पित्याची जतन । दावी नीजधन सर्वजोडी । याचे त्यांनी मोठे व्यावहारीक वर्णन केले आहे.

बापकरी जोडी लेकराचे ओढी । आपुली कुरवंडी वाळवुनी ।।
एकाएकी केला मिराशीचा धनी । कडिये वामवूनि भारवांदी ।।

तुकोबा दुकानात बसून वाणिज्य व्यवसाय करू लागले खरे, ''हाती घेऊनी बैसलो श्रवण मनन करावे सत्य माप द्यावे खोटे बोलु नये'' या मनोवृत्तीच्या वागण्याने व्यापाराची भरभराट झाली. व्यापारात हिशोब जमण्यासाठी रात्री जागून काढाव्या, सावकारी धंद्यात व्याजी लावलेले पैसे परत कसे व केव्हा येतील याची प्रतिक्षा करावी लागते. वजन – मापे तपासण्याचे काम करावे लागे. सरकारी कर, जकात वसुली सर्व कामे वडिलांच्या नजरेखाली करताना त्यांना चांगला अनुभव आला. घरी शेतीवाडी गुरे ढोरे होती. महिपती म्हणतात,

मातपिता बंधु सज्जन । घरी उदंड धनधान्य ।।
शरीर आरोग्य लोकात मान । एकही उणे असेना ।।

अशा प्रकारे तुकोबांनी केवळ तेराव्या वर्षी संसाराची धुरा खांदयावर घेतली. मातापित्याच्या छत्राखाली धनवंताचे कुलवंताचे आणि मानमान्यतेचे सारे ऐश्वर्य उपभोगले प्रापंचिक व्यवसायाचे कष्टही केले. या ऐहिक जीवनात मानवी मनाला जे भावणारे होते ते गाठले. हा चार वर्षाचा काळ म्हणजे तुकोबांच्या जीवनातील नंदनवनच होय.

संसाराचा अनुभव :-

त्याकाळच्या रिवाजाप्रमाणे तिन्ही मुलांचे बालपणीच लग्न झाले. तुकोबांची पत्नी लोहगावच्या मोझे घराण्यातीलच. आता बोल्होबा थकले होते. तुकोबांच्या संसारात आई, वडिल, थोरला, भाऊ, भावजय, धाकटा भाऊ, त्याची बायको, स्वतःची पत्नी शिवाय इतर दोन चार पाहुणे शिवाय दास दासी, नोकर चाकर, गुरे ढोरे, धन धान्य अशा सर्व बाजूंनी संपन्न घरात कुळधर्म यथासांग

चालू होता. रखूमाई पत्नीला दम्याचा विकार म्हणून आई वडिलांनी पुण्याचे आप्पाजी गुळवे या थोर धनवंत सावकराच्या मुलीशी तुकोबांचा दुसरा विवाह लावून दिला. हिचे नाव आवडी ऊर्फ जिजा ऐहिक सुखसमृद्धीने संपन्न असलेली तुकोबांची जीवन नौका संसार सागरात डौलाने डोलत होती. काही काळ ती प्रवाहाच्या गतीने संथ होती. पण ते मान्य नव्हते देवाला पाहता पाहता ही आभ्र छाया निघून विविध प्रकारच्या प्रचंड वादळाने नाना आपत्तींच्या लाटा उसळू लागल्या. दैवाला हेवा वाटावा अशी सुस्थिती तळागळाला बुडाली आणि त्या नौकेचा एकएक सुखद उपभोगाची वस्तू हळूहळू नाहीशी होऊ लागली. पण त्याक्षणी मात्र त्यांना कळून आले. मानवी जीवनाचे मर्म संसार बंधनातून मुक्त करून तुकोबांना लोकोद्वाराच्या महाकार्याला लावले. ही देवाची इच्छा म्हणूनच त्याने तुकोबांवर दुःखाचा डोंगर आणि संसारात अधिकाधिक गुंतविणारा स्नेहबंध तोडून टाकला. त्यात सावजीची पत्नी निवर्तली. सावजीनी घराचा त्याग केला. माता, पिता, वडिल बंधु-भावजय यांच्या वियोगामुळे तुकोबा अगदी उघडे पडले. भांबावलेल्या मनाला अंतर्मुख करत पूर्ववत व्यवहार चालविण्यास प्रारंभ केला. संसारातील उदास वृत्तीचा परिणाम व्यवहारावर झाला. धंद्यात मंदी आली. ऋणकोनी रक्कम बुडवली तर धनकोनी तगादा लावला. वडिलोपार्जीत धनाची वाताहात झाली. संसार चालवण्यासाठी एक वाण सामानाचे दुकान चालवले. मुखाने विठ्ठल भजन करावे, खोटे बोलू नये, कोणाला फसवू नये, सर्वांना सढळ हाताने माल दयावा, पैशाची जिकर करू नये असा व्यवहार चार वर्षे चालला. या वृत्तीने व्यापार बसला. सावकार घरात घुसला. घरात होती ती चीजवस्तू मोडली. सुखसमृद्धीत वाढलेल्या जिजाईने माहेरून काही भांडवल दिले. २०० रूपयाचे मीठ भरून दूर देशी नेले. त्यात ५० रूपयाचा फायदा झाला. पण वाटेत, एका ब्राह्मणाने गयावया केल्याने दया येऊन तेही देऊन टाकले. रिक्त हस्ते ते घरी आले. जिजाईने पुन्हा एकदा कर्जाऊ रक्कम आणली. त्याच्या मिरच्या घेऊन गोण्या भरून त्या विक्रिसाठी ते कोकणात गेले. त्यांच्या सात्विक वृत्तीचा फायदा घेऊन समाजकंटकांनी त्यांना लुटले. सर्व पैसे बुडाले. पण देवदयेने काही वसुली झाली. एकदा रात्री बैलावर धान्य घेऊन येत असता एक गोणीच घाटात पडून गेली. घरात चार ढोरे होती ती रोगाने मरून गेली. जो जो उपाय करावा तो तो अपायच होऊ लागला.शेवटी त्यांचे दिवाळे निघाले. गावकरी हिणवू लागले.

शके १५५० साली पहिल्या पत्नीला मुलगा झाला. संताची शके १५५१ ला काळाची वक्रदृष्टी झाली. त्यांना धंदयात प्रचंड मोठा तोटा झाला. म्हणजे वयाच्या २१ व्या वर्षी प्रचंड मोठा दुष्काळ पडला. घर फिरले की घराचे वासे फिरतात या म्हणी प्रमाणे दुष्काळाच्या तांडव नृत्यामध्ये अन्नान्न दशा झाली. त्यातच पहिल्या पत्नीचे निधन झाले. मुलगा ही वारला. एकुण घरादारावर दुःखाची कळा आली.

''जन हे सुखाचे दिल्या घेतल्याचे, अंत हे काळीचे नाही कोणी'' असा तुकोबांना अनुभव आला. अशा जीवनानुभवातून होरपळून निघून तुकोबा एका निश्चित विचाराने ईश्वराकडे ओढले गेले. भक्तीभाव त्यांच्या मनात सूप्तपणे नांदतच होता. त्याला वाट मोकळी झाली. एकट्या पांडुरंगाशिवाय या जगाचा कोणी त्राता नाही. ही ईश्वरभावना त्यांची दृढ झाली. त्यांना वैराग्य प्राप्त झाले. ते भंडाऱ्याच्या डोंगरावर जाऊन आपला सर्व वेळ ईश्वर चिंतनात घालवू लागले. या सर्व बिकट परिस्थितीकडे ते मोठ्या निसंग भावनेतून पाहतात. आपणास संसार कसा वमन झाला हे त्यांच्या अभंगावरून आपणास कळते.

बरे झाले देवा निघाले दिवाळे । बरी या दुकाळे हीडां केली ।।
अनुतापे तुझे राहिले चिंतन । जाता हा वमन संवसारा ।।
बरे झाले देवा बाईल कर्कशा । बरी ही दुर्दशा जनामध्ये ।।
बरे झाले जगी पावलो अपमान । बरे गेले धन ढोरे गुरे ।।

बोल्होबांच्या मृत्यूने प्रारंभ झालेले पंचक संपले. संसाराच्या साऱ्या भावनांना मूठमाती देण्यास उभ्या राहिलेल्या तुकोबांच्या जीवनाचा पूर्वार्ध येथेच संपला.

भयानक दुष्काळ संपले. जन जीवन पुन्हा स्थिर झाले. अशा परिस्थितीत चार जीवांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह तुकोबा उत्तम रितीने करू शकले असते. पण दृढ वैराग्याच्या व्यासपीठावर उभे असलेले तुकोबा म्हणतात,

आता काही सोस न करी आणिक । धरोन ते एक हे दृढ ।।
जोडीन ते आता देवाचे चरण । अविनाश धन परमार्थ ।।

शके १५५३ मध्ये त्यांनी सावकारी हिशोबाच्या वह्या बुडविल्या. संसारावर पाणी सोडले, त्यांनी आपल्या परंपरागत

विठ्ठल मंदीराचा जिर्णोधार केला व अहोरात्र नामसंकीर्तनात मन राहू लागले. भामनाथ डोंगरावरून खाली आल्यावर त्यांच्या सर्व वृत्ती निमाल्या होत्या. समःसर्वेषु भूतेषू, ही अवस्था त्यांना प्राप्त झाली. प्रत्यक्ष पांडुरंगाने त्यांना सर्पाच्या रूपात दर्शन दिले. परंतु त्यांना सगुण रूपाचे दर्शन हवे होते. म्हणून त्यांनी कडकडीत उपास करून भामनाथावर तपश्चर्या केली. तेथे त्यांची तळमळ पाहून पांडुरंगाने त्यांना सगुण रूपात दर्शन दिले. भगवंताची पाऊले तेथे पाहायला मिळतात. शके १५५४ मध्ये माघ शुद्ध दशमी गुरूवार या दिवशी त्यांना गुरूपदेश झाला. १५५६ मध्ये कवीत्व स्फुर्ती झाली मुखातून अभंग वाहू लागले.

तुकोबांनी आपल्या विवेकपूर्ण आचरणाने आपले सर्वस्व अशा भक्तीकडे जाणीवपूर्वक लावले. भगवदगीतेने सांगितलेल्या महात्म्याची सर्व चिन्हे तुकारामांनी जणू आत्मसात केली. महात्मा हा एकांत सेवन करणारा, मितहारी, विरक्त, ध्यानयुक्त, काया, वाचा व मन ताब्यात ठेवणारा , अहंकार ,बल, दर्प, काम, क्रोध, , परिग्रह यांचा त्याग करून समत्वरहित झालेला व चिरशांती प्राप्त केलेला असाच असतो. आपल्या डोळ्यांनी तो आपलेच पूजन बघत नाही. कानांनी स्तुतीही ऐकत नाहे. तो चातुर्य लपवतो, महत्त्व हरवतो, पिसेपण वरवर मिरवतो. असा हा महात्मा मान सन्मानाविषयी विरक्त असतो. उदास असतो म्हणून उपासकाची दशा असावी उदास असे म्हटले आहे. संसारा विषयी लोलुपता त्याने टाकुन द्यावी , निद्रा कमी करावी, परिमित भोजन घ्यावे . एकांतात किंवा जनसमुदायात साधकाने स्त्रियांबरोबर संभाषण करू नये. सज्जनांची संगत ठेवावी. वाणीने हरिनामाचा उच्चार करावा. रात्रं दिवस किर्तनाचा घोष करावा. त्यालाच साधक म्हणतात. तुकोबांनी उपासकाच्या या सर्व खुणा प्रयत्नपूर्वक अभ्यासपूर्वक आपल्या ठायी बाणवल्या त्यासाठी वैराग्याच्या धारेवर आपले शरीर धरले.

तुकाराम महाराज स्वतः वाणी असले तरी भगवदभक्त होते. त्या काळाची सामाजिक परिस्थिती म्हणजे ब्राह्मणवर्ग अपला स्वधर्म विसरले होते. ते कर्मकांडात अडकले होते. समाजा मध्ये अनाचार बोकाळला होता. फसव्या रूढी अंधश्रद्धा, उच्च नीचपणा यांना अनाठायी महत्व प्राप्त झाले होते. ''जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती'' या उक्ती प्रमाणेच तुकोबांचे जन्म प्रयोजन होते. त्यांनी आपल्या अभंगातून आपले विचार परखडपणे मांडले.

वेद ही एक व्यवहार व्यवस्था म्हणून मान्य केल्यानंतर वेद न मानणाऱ्यांवर टीका करणे ओघाने आलेच. संत तुकामारांचा जगलेल्या जीवनातील जिवंत अनुभव आपल्या अभंगवाणीची उस्फुर्त रचना करावयाला उपयोगी पडला. त्याच प्रमाणे थोर संताचे वाङमय अभ्यासूनी त्याचे मनन व चिंतन त्यांना आपल्या अभंगवाणीला उपयुक्त ठरले. संत तुकारामांची अभंगवाणी ही मोठ्या प्रतिभावंताची, उत्स्फूर्त, उत्कृष्ट असा आविष्कार आहे. त्यांच्या अभंगवाणीला मराठी मातीचा वास व गंध आहे. त्यांची भाषा लोकमुखातील रोजची बोली भाषा आहे. तुकाराम हे दया, क्षमा, शांती या सदगुणांची मुर्ती असून ते समाज व्यवहाराच्या अग्निपरिक्षेतून तसे म्हणाल तर तापून सुलाखून बाहेर पडलेल्या सर्व सदगुणांचा मुर्तिवंत जिवंत पुतळा होय. त्यांची अभंगवाणी रोखठोक होती.

महारासी सिवे । कोपे ब्राह्मण तो नव्हे ।।
नातळे चांडाळ । त्यांचा अंतरी विटाळ ।।

भक्तीमार्गाच्या क्षेत्रात महाराचा स्पर्श झाला, विटाळ झाला असा भक्तीमार्ग ब्राह्मण मानत असेल, तर त्याला खरा ब्राह्मण म्हणता येणार नाही. वास्तविक समाजातील उच्च नीच जातीभेदामुळे स्पृश्यास्पृश्यतेमुळे माणसाच्या मनात विटाळाने स्थान मांडलेले आहे. वास्तविक भक्तीमार्गात देवाच्या भक्तीत विटाळ चांडाळ, शिवा-शिव यांना स्थान नसतेच. परोपकाराची साधना ही तुकोबांच्या पारमार्थिक साधनेचे उच्चतम शिखर आहे. ही साधना करताना त्यांनी देहाभिमान घालवून भूती भगवंत हा तो जाणतो संकेत ।। सर्वाभूती परमेश्वरचा अनुभवाचा दिव्यआनंद प्राप्त केला. त्याकरिता जे जे भेटेभूता ते ते मानीजे भगवंत ।। हे भक्तीयोगाचे सारस्वत अवलंबिले. विश्वाचा स्वामी पांडुरंगाला सकळा ।। म्हणून भूतांची सेवा ही परमात्म्याची सेवा होय हे वर्म जाणून त्यांनी देह लेखना असार । सत्य परउकार ।। जीवभावाने परोपकार केला. (परोपकार म्हणजे ज्यांचा आपल्या अर्थार्थी काहीच संबंध नाही त्यांच्यावर उपकार करणे) आणि उपकार तरी कसा तर धन्यतेच्या प्रतिशब्दाचीही अपेक्षा न करता निरपेक्षतेने देवकार्य समजून काया वाचा मने चंदनाप्रमाणे देह झिजवून सेवा करणे. तुज व्हावा आहे देव । तरी हा सुलभ उपाव ।। तुका म्हणे

फार । थोडा तरी पर उपकार ।। या प्रमाणे तुकोबांनी देवप्राप्तीच्या उपासनेत परोपकार साधनेचा अंतर्भाव केला आहे. इंद्रायणीत संसार सोडला आणि चित्तास परमार्थ जोडला.

विठ्ठल मंदीराचा जीर्णोध्दार :-

विश्वंभर बुवांनी आंबेवनात सापडलेल्या श्रीविठ्ठल मूर्तीची स्थापना करून देऊन बांधले होते. आषाढी कार्तीकीला या मंदीरात भाविकांची गर्दी व्हायची दुष्काळाच्या काळात या मंदीराकडे दुर्लक्ष झाले आणि ते मोडकळीस आले. तुकोबांनी या मंदीराचा जीर्णोध्दार केला. भक्तीभावाचा उद्धार केला. कीर्तन भजन-पूजन-चिंतन यासाठी त्यांना जागा हवी होती. त्यानिमित्ताने तुकोबांनी दगड चिरवल माती पाणी आणुन स्वकष्टाने काम केले. गावातील महादजी पंत व इतर भाविक मंडळी यांनी त्यांना सहकार्य केले. देवळाचे काम पूर्ण झाल्यावर तुकोबांनी मूर्तीची नव्याने प्राणप्रतिष्ठा केली. मोडकळीसआलेल्या संसारात जोडण्यापेक्षा भंगलेल्या मंदिराचा तुकोबांनी जीर्णोध्दार केला.

वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे । पक्षीही सुस्वरे आळविती ।
येणे सुखे रूचे एकांताचा वास । नाही गुणदोष अंगा येत ।।

भंडारा डोंगरावर लाभलेल्या एकांत वासाचा सुखाचा अनुभव त्यांनी याप्रमाणे सुंदर शब्दात वर्णन केला आहे.

टाकला तो काही उपकार । केले हे शरीर कष्टवुणि ।।

आत्मचरित्रपर अभंगात या सूत्राचा उल्लेख आहे. महिपती बुवांनी त्यांच्या चरित्र वर्णनात बऱ्याच गोष्टी कथन केल्या आहेत. उदा. ओझे घेऊन एखाद्या पांथस्थ जात असेल तर त्याचे ओझे स्वतःच्या शिरावर घ्यायचा त्याला विसावा दयायचा. पावसाळ्यात एखादा पांथस्थ आसऱ्यासाठी ठिकाणा शोधत असेल तर तुकोबा त्याला चावडी किंवा देऊळ दाखवित नाही तर लगेच घरी नेत. यात्रेला जाणाऱ्या यात्रेकरूचे पाय चालून चालून सुजले असतील तर गरम पाण्याने पाय शेकून तेलाने रगडून देत असत. ज्या गाई बैलांना निर्दयपणे निर्बल म्हणून घालवून देत त्या गुरांना हातांनी कुरवाळुन चारापाणी घालत. साखर तुप एकत्र करून मुंग्यांना घालत. कोणी आजारी पडले तर त्याची सेवा करत. अशा प्रकारच्या सौजन्याने तुकोबा सर्वांना प्रिय होते. भुतदयेच्या उज्वल भावनेत त्यांनी एका अनाथ बाईला स्वतः पत्नीचे लुगडे ही देऊन टाकले. एकदा एका म्हाताऱ्या बाईने सांगितल्या वरून तुकोबांनी तिला दुकानातून तेल आणून दिले. ते नेहमी पेक्षा खूप दिवस पुरले. ही वार्ता गावात पसरली. तेव्हा लोकांनी आपआपले तेलाचे भांडे त्यांच्या गळ्यात अडकविले.

एकदा कोंडाजी नावाच्या शेतकऱ्याने तुकोबास आपल्या मळ्यात उसाचा रस घेण्यास आमंत्रित केले. त्याने तुकोबाचा आदर सत्कार केला आणि मोठ्या शक्ती भावाने त्यांना पोटभर रस पाजला बरोबर नेण्यास उसाची मोठी मोळी त्यांच्या डोक्यावर दिली. गावात प्रवेश करताच मुले त्यांना वेढून उस मागू लागली. डोक्यावरील उसाची मोळी खाली ठेऊन त्यांनी प्रत्येक मुलाला एक एक तुकडा वाटून दिला. राहिलेले तीन तुकडे घरी आणले. ते पाहून जिजाबाईने झालेला प्रकार ओळखला.तिच्या मुखावरील भाव पाहून तुकोबा म्हणाले अग ती सारे मुले आपलीच आहेत. तुला तीन मुले म्हणून पांडुरंगाने ही तीन कांडे शिल्लक ठेवली. तुकोबांचा अपार भाव मावळला. भूतदया हे त्यांचे भांडवल. रामेश्वर भटांकडून छळ झाला. त्यांच्या सांगण्यावरून तुकोबांच्या गाथा बुडू दिली नाही. एकदा शिवरायांची आणि तुकोबांची भेट झाली. त्यांनी तुकोबांसाठी छत्री, घोडे भेट पाठवली. पण हा नजराणा न पहाताच परत पाठवला आणि ते लिहीतात की उदार परंतु आमचा खरा ठेवा विठ्ठल आहे आणि तुका म्हणे धन आम्हा गोमांसा समान मुंगी आणि रवा आम्हाला सारखेच आहेत. तुकोबांचा छळ करणाऱ्या व्यक्ती विविध भूमिकेच्या असून त्यांनी विविध प्रकारे छळ केला. पण आकाशासारख्या व्यापक मनाच्या तुकोबांनी त्या बद्दल मुळीच क्षोभ केला नाही. प्रभंजनात मोठमोठी झाडे उमळून पडतात. परंतु पर्वताची बैठक स्थिर असते. श्रीतुकोबारायांच्या जिवनात जे काही चमत्कार घडले आहेत . ते सहजगत्या घडले. याला त्यांच्या अभंगाची साक्ष आहे. इंद्रयणीच्या डोहात दगडासह अभंग वह्या तरल्या हा मोठा चमत्कार । दुसरा चमत्कार म्हणजे तुकोबांचे सदैह वैकुंठगमन । या गोष्टीला तत्कालीन आधार आहे. गुरू कसा असावा. भोळ्या भाविकांनी गुरूंची पारख करूनच गुरू करावा. भोंदुगुरूंपासून सावध रहावे असे तुकोबा सांगतात.

तुकोबांना पांडुरंगाचे वेड लागले. अखंड हरिनाम चिंतनाने त्यांची काया दिव्य झाली. विश्वात्मक विश्वदेवाच्या विश्वरूपात

तुकोबा पूर्णत्वाने मिळून गेले. आपुल्या माहेरा जाईन मी आता। निरोप या संताहाती आला ।। त्याचि पंथे माझे लागलेसे चित्त । वाट पाहे नित्य माहेराची ।। तुका म्हणे आता येतील न्यावया ।। अंगे आपुलिया मायबाप ।। वैकुंठीच्या सनकादीकांनी श्रीहरीचा निरोप आणला. मायबाप स्वतः न्यायला येणारय प्रत्यक्ष अंगी चिन्हेही तशीच उमटू लागली.

पैल आले हरि । शंख चक्र शोभे करी ।।
तुका झालासे संतुष्ट । घरा आले वैकुंठपीठ ।।

श्रीहरी भगवान तुकोबांच्या घरी गरूडावर बसून आला. तुकोबा सामोरे गेले. देवाच्या पायावर लोटांगण घातले. श्रीहरीने मोठ्या प्रेमादराने तुकोबांना आपल्या बाहुत आलिंगन दिले. देव मिळोनिया

भक्त । तुका झालासे सनाथ ।।
याचवेळी तुकोबांची काया दिव्य झाली.
आम्ही जातो आमुच्या गावा ।
आमचा रामराम घ्यावा ।।
रामकृष्ण मुखी बोला । तुका जातो वैकुंठाला ।।

शके १५७१ फाल्गुन वद्य द्वितीया शनिवार दिवस उजाडला. हा होता देवभक्त संकल्पिक दिवस ही प्रातःकाळ तुकोबांच्या जीवनातील अखेरची होती. आज ते तेजोमय वलय, चालते बोलते परब्रह्म, आपल्या मुळ स्वरूपात पूर्णपणे विलिन होणार, ब्रह्मरूप होणार याची कोणालाही चाहूल नव्हती. हा शांतीचा सागर, ममतेची शितल छाया करणारा कलंकरहीत चंद्र, भक्तीचा महामेरू, अज्ञान अंधकाराचा नाश करून ज्ञानाचा प्रकाश देणारा प्रतिसूर्य, करूणेचा मेध आता आपल्यातून अदृश्य होणार हे कोणालाच कळले नाही. देहुला गोपाळपुरी नांदुरगीच्या वृक्षाखाली किर्तनाला प्रारंभ झाला. अवतीभोवती असंख्य जनसमुदाय जमला होता. तुकोबांनी नामसंकिर्तन भक्तीची पराकाष्टा केली. प्रेमामृताच्या भोजनाने उपस्थित सकल संत सज्जनांना तुकोबांनी तृप्त केले. अंतरीच्या कळकळीने त्यांनी सर्वांचा अखेरचा निरोप घेतला. आम्ही आज वैकुंठाला जाणार तुम्हीपण आमच्या बरोबर चलावे. असा निरोप जिजाबाईला पाठवला नित्याप्रमाणे ते जवळच जात असतील या कल्पनेने मी गरोदर, मुले लहान मी कशी येणार ? असे जिजाबाईने उत्तर पाठविले. कीर्तनात त्यांनी सर्वांना एक विनंती केली.

सकळही माझी बोळवण करा ।
परतेनी घरा जावे तुम्ही ।।
तुका म्हणे आम्हा हेचि भेटी ।
उरल्या त्या गोष्टी बोला वया ।।

मला निरोप देऊन आपआपल्या घरी परत जावे. तुम्ही आपले विहित कर्तव्य कर्म करा. तुमचे कल्याण होईल. हा माझा आशीर्वाद आहे. मला आता देवाबरोबर जाणे आहे. माझ्या वियोगाने तुम्हाला दुखः होईल पण स्थिर बुद्धीने शांत रहा. आता तुमची आमची ही शेवटची भेट आहे. दोन प्रहरपर्यंत कीर्तन झाले.

महाराजांचा शेवटचा अभंग –

आम्ही जातो तुम्ही कृपा असो द्यावी ।
सकळा सांगावी विनंती माझी ।।
वाढवेळ झाला उभा पांडुरंग ।
वैकुंठ श्रीरंग बोलवितो ।।
अंतकाळी विठो आम्हासी पावला ।
कुडीस हीत झाला गुप्त तुका ।।

विठ्ठल नामाच्या जय घोषात तुकोबाराय विठ्ठलमय झाले. त्यांची ब्रह्मानंदी टाळी लागली. किर्तनात जमलेली मंडळी नाम चिंतनात मग्न होती. इतक्यात तुकोबा कुडीसहित गुप्त झाले. श्रीहरीने आपल्या हातांनी त्यांना गरूडावर उचलून घेतले. हा दिव्य सोहळा इतरांना दिसला नाही. आवाज बंद झाला. सर्व मंडळी स्वप्नातून जागे झाल्यासारखी पाहू लागली. पण तुकोबा गुप्त झाले होते. दिव्य झाली त्यांची काया या दिव्य देहानेच तुकोबा दिव्यत्वाशी एकरूप झाले. भक्तीप्रेमाचा ज्ञानभास्कर मावळला. सुखाचा परमठेवा हरपल्याची जाणीव सर्वांना झाली. धन्य...धन्य...धन्य...तुकोबाराया ।

तुकोबाराय सदैव वैकुंठाला गेले ही वार्ता वाऱ्यासारखी देहू गावात व आजूबाजूला पसरली. सर्वांना गहिवरून आले. गोपाळपूरी इंद्रायणीच्या काठी सर्व आबालवद्ध धावत आले. जिजाई आली तिचे चित्त दुःखाने फाटून गेले. तिच्यावर जणू आकाशच कोसळले. मुलांना पोटाशी धरून ती रडू लागली. कान्होबाने अनावर शोक केला. कुठे माझा देवपिसा म्हणून जिजाईने आकांत केला. या माय लेकरांचा आकांत पाहून सर्वांना

अश्रू आवरत नव्हते.

गंगेच्या दिव्य स्वरूपाला मुर्तरूप देऊन स्वर्गातून मृत्यूलोकात आणले. भागीरथीने आणि मुर्तदेहाला दिव्यरूप बनवून मृत्यूलोकातून वैकुंठात नेले. तुकोबारायांची ही क्रिया, ही साधना, ही भक्ती, ही तपश्चर्या साधारण नाही. विज्ञानाने बरेच साध्य केले. पण ही किमया त्यापलीकडची आहे. आधुनिक भौतिक क्षेत्रात गेल्या साडे तिनशे वर्षापासून कोणी प्रति तुकोबा होण्याचा प्रयत्न केला नाही.

तुक्या सम तुकाची म्हणवावा ।

तुकोबांची अभंग गाथा (पंचम वेद) हेच त्यांच्या जिवनाचे सत्य स्वरूप. विश्वासाने आणि प्रेमाने या अभंग गाथेचं अध्ययन करू. त्यातच देव जोडण्याचा साधा, सोपा, स्वानुभवी उज्वल मार्ग दाखविला आहे. तुकोबांनी देवाला मागितलेले पसायदान आपण देवाबरोबर तुकोबांनाही मागू.

हेचि दान देगा देवा । तुचा विसर न व्हावा ।।
गुण गाईन आवडी । हेचि माझी सर्व जोडी ।।
न लगे मुक्ती धन संपदा । संत संग देई सदा ।।
तुका म्हणे गर्भवासी । सुखे घालावे आम्हासी ।।
।। ज्ञानोबा माऊली तुकाराम ।।

।। समाप्त ।।

साधना कळवणकर
फ्लॅट नं. ११-१२ एव्हरस्टाईल अपार्टमेंट
महात्मा नगर नासिक ४२२ ००७

दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !

दिवाळी म्हणजे दिपोत्सव प्रेमाचा
दिवाळी म्हणजे साजश्रृंगार देवीचा
दिवाळी म्हणजे आदर परंपरेचा
दिवाळी म्हणजे सण मुहुर्ताचा

भिऊ नको

मी तुझ्या पाठीशी आहे

वृषाली वि. देशमुख

आजकालचा काळ हा अतिशय धकाधकीचा धावपळीचा आहे. आशा, आकांक्षा, जबरदस्त, चढाओढींनी आपल्या आयुष्याला सर्पाकृती वेटोळे घातले आहे. आपल्या आयुष्यात आपण किती प्रगती केली, कोणता हुद्दा गाठला, किती दौलत संग्रहित केली, किती व्यवसायिक उंची गाठली या सर्व प्रश्नांच्या भोवती आपले आयुष्य गिरक्या मारत, मानवी आयुष्याच्या यशाचे मापदंड ठरवण्यात निघून जाते. या सर्व कोलाहलात आपण कोण आहोत ? कुठून आलो आहोत ? आपले शाश्वत निजधाम कोणते आहे ? याचा विचार करायला क्षणभरसुद्धा वेळ आपल्यापाशी नाही. खरंतर मनुष्यजन्म ही परमेश्वराने आपल्याला दिलेली सुवर्णसंधी आहे. ८४ लक्ष योनींतून भ्रमंती करून आल्यावर आपल्याला पूर्वपुण्याईने मिळालेल्या नरदेहाचे सार्थक करून घेण्याची जन्मजन्मांतरीच्या जन्म-मृत्युच्या चक्रातून मुक्त करून घेण्याची हीच मंगलमय संधी आहे. परंतु त्यासाठी गरज आहे अध्यात्माची.

अध्यात्मिक प्रवास म्हटले तर हा अतिशय खडतर आणि म्हटले तर तितकाच सोपा व सुंदर आहे. हा एक प्रकारचा लढा असून तो प्रत्येकाने स्वतंत्रपणे लढायचा आहे. त्यासाठी जोड लागते ती परमनिष्ठेची, अथक प्रयत्नांची, नित्यनैमित्तिक साधनेची आणि ईश्वरी अधिष्ठानाची. हे ईश्वरी आधिष्ठान असते सद्‌गुरूंचे. ही सद्‌गुरू माऊली म्हणजे श्री स्वामी समर्थ. आपल्या भक्तांवर आईसारखे प्रेम करणारे, लक्ष ठेवणारे सद्‌गुरू आज समाधिस्थ असले तरीही जगदोध्दाराच्या कारणास्तव स्थूल वा सूक्ष्मरूपात आजही भक्तांना दर्शन देतात व त्यांना आपलेसे करून टाकतात, तेव्हा स्वामींचे वचन आठवते.

"हम गया नही जिंदा है। श्री स्वामी समर्थ म्हणजे भगवंताची मानवी देहातून प्रकट झालेली चिरंजीव ज्योत आहे. स्वामींच्या नामस्मरणात भक्त आपला प्रारब्ध भोग विसरून जातात. स्वामी हे प्रत्यक्ष शिवच असून अगम्य, अतर्क्य अशा ब्रम्हांडाचे सूत्रधार आहेत. ज्यांना कुणी वाली नाही अशा अनाथांचे नाथ आहेत. अशा या करूणासागर कारूण्यसिंधू सद्‌गुरूंची कृपा होण्यासाठी व अध्यात्मिक आयुष्य संपन्न होण्यासाठी अथक प्रयत्न व दैवही म्हणजेच पूर्वसुकृत उदयाला यावे लागते. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात,

पूर्वसुकृताची जोडी। म्हणुनि विठ्ठल आवडी।

पूर्वपुण्याई, सद्‌गुरूंचे नामस्मरण आणि परमेश्वरी कृपा या त्रिवेणी संगमावरच भक्ती व शुद्ध ज्ञानाची प्राप्ती होते. स्वामींच्या कृपेनी भक्तीची प्राप्ती झाली की भक्तीप्रेमाची धारा भक्ताच्या

हृद्य गाभाऱ्यातून अखंड प्रवाहित होत असते. स्वामींच्या नामावर जो निरतिशय प्रेम करतो त्याला ब्रम्हरसाची प्राप्ती होते. भक्ती ही अमृतस्वरूपा असून चिरंतन वृद्धिंगत होणारी आहे. स्वामींच्या प्रेमस्वरूप भक्तीतरंगून जाऊन भक्त आनंदभरित होतो. शांत आणि तृप्त होऊन अंर्तयामी परमात्यस्वरूपाची प्राप्ती करून घेतो. स्वामी आपल्या परमभक्ताला सद्-चिद् आनंद स्वरूपात एकरूप करून टाकतात. परंतु त्यासाठी आवश्यकता असते ती सद्‌गुरूंच्या चरणांशी लीन करून टाकणाऱ्या अनन्य शरणागतीची.

साधक किंवा परमशिष्य जेव्हा सद्‌गुरूंना शरण जातो तेव्हा त्याच्या साऱ्या वासनांचे निर्मूलन होते.9मी" माझे" व 9मला" या तीन गोष्टी जाणीवेच्या पातळीवरून हद्दपार झाल्याशिवाय सद्‌गुरू कृपेचा वर्षाव कधी होतच नाही. 9 मी " पणाचे कवच सर्वांगाला घट्ट वेढलेले असते.ह्या कवचातून बाहेर काढून सद्‌गुरू शिष्याच्या जीवनात साधनेचा नंदादीप अलगद तेवत ठेवतात. भक्ती व ज्ञानाच्या शांत, प्रसन्न ज्योती आपल्या अंतरंगात आनंदाची उधळण करतात. आपण करीत असलेली नामसाधना, उपासना यांचे पर्यावसन ज्ञानोत्तर भक्तीत होते. त्यासाठी गुरूंच्या चरणांशी लीन व्हावे लागते.ईश्वराचे प्रगट रूप म्हणजेच गुरू. आत्मस्वरूपाशी ऐक्य पावलेले संतच गुरूपदाचे अधिकारी असतात.गुरूकृपा झाल्यावर अंतर्मनात चैतन्याचा मोरपिसारा फुलून ब्रम्हानंदाची बरसात करणारे सद्‌गुरू स्वामींच्या रूपात ईश्वरीकृपेनेच लाभतात.विश्वव्यापी उत्तुंग असलेल्या आत्मारामाचे दर्शन फक्त तेच करून देऊ शकतात.

अशा या महान श्रेष्ठ संतांच्या संगतीमुळे भगवद्‌भक्ती निर्माण होते. संतकृपा हेच ईश्वरभक्तीचे मुख्य साधन आहे. भगवत कृपेनेच सत्संग लाभतो. भगवंताच्या कृपेनेच महापुरूषाचा संगही मिळतो. श्रद्धा ठेवून जो संतांना शरण जातो त्यालाच शुद्ध ज्ञानाची प्राप्ती होते. गीतेत देखील भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात "श्रद्धावान लाभते ज्ञानम्"। आपल्या बौधिक ज्ञानाने उदय पावलेली भक्ती आपल्याला आत्मानंदाची प्राप्ती करून देणार नाही. त्यासाठी मनाला अखंड नामस्मरणात गर्क ठेवावे लागते. अखंड नाम संकीर्तनाने प्रेमशक्ती उत्पन्न होते. एकनाथ महाराज भागवतात सांगतात.

"भक्तीपाशी नित्य तृप्ती भक्तिपाशी नित्य मुक्ती। भक्तीपाशी भगवतप्राप्ती। माया निवृत्ती हरिभजने"। जो शिष्य आपले सर्वस्व सद्‌गुरूंना अर्पण करून आपला मी पणा पूर्णपणे विसर्जित करतो त्यालाच खऱ्या अर्थाने सद्‌गुरूंकडून नामाची प्राप्ती होते.त्यासाठी साधकाने परमार्थसाधनेचे महत्व विषद करणाऱ्या ग्रंथाचे श्रवण, मनन, चिंतन, निदिध्यास या वृत्ती सर्वांगात मुरण्यासाठी सतत साधनेमध्ये रत व्हावयास हवे. अष्टौप्रहर सद्‌ग्रंथांच्या सहवासात राहिल्यामुळे भगवंताच्या नामाची गोडी आपोआप जागृत होते.आपल्या मनोवृत्ती नामाशी संलग्न झाल्यामुळे मुखातून परमेश्वरी कृपेने नामाच्या घंटा आपोआप वाजू लागतात. सद्‌गुरू चरणांवर निष्ठा ठेवल्यास नामाचे अनुसंधान अखंड रहाते. नामाच्या स्पंदनानी देह व्यापला की विषयांकडे वळणाऱ्या वृत्तींना विवेकाचा लगाम घालून देहबुद्धीची जाणीव आत्मबुद्धीत परावर्तित होते.

मन अखंड नामस्मराणात रंगले की घरात, घराबाहेर, लोकांतात, एकांतात, प्रपंचात, परमार्थात सर्वत्र नामाच्या अनाहत नादाने साधकाचा देह पुलकित होतो. स्वामी आपल्या परमभक्तांवर प्रेमामृताचा वर्षाव करण्यासाठी सदैव तप्तर असतात. म्हणूनच ज्ञानेश्वर माऊली म्हणतात

एकतत्व नाम दृढधरी मना।
हरीसी करूणा येईल तुझी ।।१।।
ते नाम सोपे रे रामकृष्ण गोविंद ।
वाचेसी सद्‌गद जपा आधी ।।२।।
नामापरते तत्व नाही रे अन्यथा।
वाया आणिक पंथा जशी क्षणी ।।३।।
ज्ञानदेव मौन जपमाळ अंतरी ।
धरूनी श्रीहरी जपे सदा "।।४।।

सर्व विश्वाच्या मुळाशी चैतन्यस्वरूप असलेल्या नामाचीच शक्ती व्याप्त आहे. या विराट विश्वाचा निर्माता सर्वांच्या अंतर्यामी ह्रदयसिंहासनावर विराजमान आहे. परंतु स्वयं अदृश्य

असल्यामुळे सद्गुरूपाने दुःख व क्लेशाने पिडित जीवांचा उद्धार करण्यासाठी भूतलावर अवतरतो, नामाच्या योगे मुमुक्षु साधकास स्वानंदाच्या डोहापाशी पोहचवतो. म्हणूनच सद्गुरूंना शरण जाऊन जीवन मंगलमय करण्यात खऱ्या यशाची व समृद्धिची गुरूकिल्ली आहे. परमेश्वरी दर्शन म्हणजेच नामाचा साक्षात्कार. नामरूपी अमृताच्या गंगेत स्नान केल्यानेच जीव निर्मळ होऊन त्याची चित्तशुद्धी होते. स्वामीनामामुळे अनंत जन्मीच्या देहाला जखडलेले विकारांच्या पाशाचे आवरण हळूहळू सैल होते. वासनांचे निर्मूलन होऊन जीव शांत होतो. नामच केवळ मनुष्याचा उद्धार करते. नामस्मरणामुळे परमभक्तांची सद्गुरूंच्या चरणांशी अनन्यता व प्रतिकूल विषयांबाबत उदासिनता असते. अशी दृढभक्ती ईश्वराला वश करून घेते. भक्तीस ज्ञानआश्रय व ज्ञानास भक्ती आश्रय आवश्यक असून दोन्हीही परस्परपूरक आहेत. दृढभक्तीविना ज्ञानप्राप्ती होत नाही. म्हणून भक्ती हेच साध्य आहे व साधन आहे. नामाबद्दल तुकाराम महाराज म्हणतात,

नाम घेता मन निवे । जिव्हे अमृत स्त्रवे ।
होताती बरवे । ऐसे शकुन लाभाचे ।

परमेश्वरी कृपेचा पाऊस, सद्गुरूंची गाठभेट व पूर्वसुकृत असेल तरच जीवाला खऱ्या अर्थाने नामाची ओढ लागते. नामाशिवाय मुक्ती नाही व सद्गुरुंशिवाय नाम नाही. केवळ भगवंताचे नामच परमभक्ताला अज्ञान अंधःकारातून बाहेर काढून मायेचा भवसागर तरून जाण्यास मदत करते. नामाचे शस्त्र हातात घेऊनच विवेक व वैराग्याच्या बळावर जीवात्म्याचा मनुष्यजन्माचा प्रवास सुखरूप मार्गाने होतो. साक्षात्कारी सद्गुरू जे नाम शिष्याला देतात ते आत्मशक्तियुक्त असते अशा नामाच्या चिंतनाने जाणीव ईश्वराशी एकरूप होऊन जाते. अंतरी नाम भरणे म्हणजे डोळ्यांत व हृदयात भगवंताला भरणे. त्यामुळे विषयांनी भरलेले मन उन्मन होऊन आत्मचिंतनात मग्न होऊन स्वस्वरूपाला पोहोचते. आपल्या हृदयामध्ये सद्गुरूंचे ध्यान करण्याने अष्टसात्विक भावाची दशा प्राप्त होते व मन भावसमाधीत रंगून जाते. अंतरात निःसीम प्रेमाचा उद्भव झाला तरच हे भाव निर्माण होतात. तुकाराम महाराज म्हणतात,

कंठी प्रेम दाटे । नयनी नीर लोटे ।
हृद्यी प्रगटे रामरूप ।

अखंड नामस्मरणाने वृत्ती तल्लिन होते. नामधारकास उन्मनी अवस्था प्राप्त होते. स्वामीनामाचा ठसा भक्ताच्या अंतःकरणात ठसल्यावर त्याला दाही दिशा आत्मारामय दिसावयास लागतात. अखंड नामानुसंधानात निमग्न असणाऱ्या भक्तास भगवंत ज्ञान देतात. सद्गुरू चरणांवर निष्ठा ठेवल्याने परमभक्ताच्या मनातल्या सर्ववृत्ती विराम पावून मन हळूहळू निर्विकार होण्याच्या मार्गाला लागते. सद्गुरूकृपा झालेला असा हा परमभक्त स्वानंदाच्या डोहात मनसोक्त डुंबत राहतो व गुरूचरणकमली रूंजी घालीत राहून आत्मज्ञानाचे अमृत प्राशन करतो. मन सर्वस्वी नाममय झाल्याने त्याच्या सर्व क्रिया नामरूपच होतात. स्वतःच्या अंतरंगात ऐकू येणाऱ्या नादब्रम्हाची

अनुभूती त्याला चराचरात येते. अशा शांत चित्तानं परमभक्ताला भगवंताच्या बासरीचा सुमधुर स्वर सदैव ऐकू येतो.

चराचरात दाटलेले गुरूतत्व त्याला जाणवते.सद्‌गुरूंच्या चिन्मयस्वरूप ज्ञानचरणांची ह्दयात मानसपूजा करून अविरत स्वामींच्यात मनरूपी भ्रमराला गुंतवले तर जीवनातील प्रत्येक दिवस नित्यनूतन अनुभवास येतो. असे हे अभेद भक्ती, अव्दैतातून साकारणारे गुरूप्रेम म्हणजे परमभक्ताच्या आयुष्यातील ज्ञानपोर्णिमाच असते. ज्ञानेश्वर माऊली सद्‌गुरूंचे वर्णन करतांना म्हणतात,

मज ह्रदयी सद्‌गुरू। जेणे तारिलो हा ।

संसारपुरू। म्हणोनी विशेष अत्यादरू विवेकावरी।

अशा ब्रम्हानंदी तल्लीन झालेल्या परमभक्ताचा योगाक्षेम सद्‌गुरूच सांभाळतात. योग म्हणजे आत्म्याची प्राप्ती व क्षेम म्हणजे त्या प्राप्तीचे संरक्षण. अनन्य भक्तीचे ज्ञानदीप अंतरंगात उजळवून सद्‌गुरू परमभक्ताला मोक्षश्रीचा अधिकारी करतात.गुरूप्रेमाने बहारलेला जीवनातील वसंतऋतु परमभक्ताला आनंदरसात चिंब भिजवून टाकतो. त्यामुळे तो जीवनात निःशंक व निर्भय होऊन आत्म्याच्या साक्षीने जीवन जगतो.जीवनातील प्रत्येक घटनेकडे तो साक्षित्वाच्या भूमिकेतून पहातो.जीवन पहाण्याची एक विशाल, नाविण्यपूर्ण दृष्टी सद्‌गुरू अशा नामधारकाला बहाल करतात. चैतन्याच्या परिसस्पर्शाने आणि गुरूकृपेने देह भावनाक्षम होऊन आत्मभावना जागृत होते. सर्व विश्व ही त्या परमात्म्याचीच लीला असून आपणही त्या लीलेमधील एक चैतन्याचा स्फुल्लिंग आहोत हे प्रकर्षाने जाणवते. सद्‌गुरूंप्रती प्रेमाने त्याचे एकच कर्तव्य उरते ते म्हणजे जगदीशाचे भजन अखिल विश्वात अखंड, अव्याहत चालत रहावे यासाठी प्रयत्नशील रहाणे.ज्या गुरूकृपेच्या सावलीत आपण आनंदस्वरूप झालो तीच सावली ज्ञानोत्तर भक्तीचे निर्लेप कार्य करून पुढे अविरत चालू ठेवण्यासाठी निष्काम कर्मयोगाच्या दिशेने वाटचाल करणे हीच गुरूप्रेमाची खऱ्या अर्थाने सांगता असते.

मला मिळालेला हा मनुष्यजन्म केवळ भगवंताच्या नामासाठी आहे. चौऱ्याऐंशी लक्ष योनींतून मिळालेला मानवी जन्म हा भगवंताच्या प्राप्तीसाठी आहे, त्यामुळे मी सर्वस्वी नामासाठी जगेन ही भावना ज्या दिवशी अंतरंगात गुरूकृपेने मूळ धरेल तो दिवस सर्व साधक भक्तांच्या आयुष्यातला सोनियाचा दिवस असेल. अशी स्वामींची कृपादृष्टी सर्वांना प्राप्त होवो व सकलजनांचा जीवनप्रवास आत्मिक कल्याणाच्या मार्गाने होवो हीच सद्‌गुरूचरणी प्रार्थना.

हेचि दान देई गुरूराया, पडा हे गा काया
सेवेमाजी। स्वरूपात मन लागो रात्रंदिन, अहंकार पूर्ण
जाळोनिया। कायावाचा मने मज घडो सेवा,
आत्मभाव व्हावा सर्वांठायी।सकल जीवांसी
लागो हरिध्यान, करिताची जाण सेवा तुझी ।।

सौ. वृषाली विनोद देशमुख
राधानगर सोसायटी १०१ अे विंग,
तळमजला, विशाल हॉलच्यामागे,
गावदेवी मंदिराजवळ, मानपाडा रोड,
डोंबिवली (पूर्व).



गोपाला..गोपाला...
देवकीनंदन गोपाला..

अशोक लोटणकर

जीवन म्हणजे अनुभव, विचार आणि श्रद्धा यांचे घनफळ आहे. अनुभवांमुळे जीवनाला संपन्नता प्राप्त होते. विचारांमुळे अर्थपूर्णता प्राप्त होते आणि श्रद्धेमुळे अढळता प्राप्त होते असे 'आचार्य विनोबा भावे' यांनी म्हटले आहे. तर पाखरं आकाशात हिंडतात त्या वेळी वाटा पडत नाहीत.प्रत्येक पाखराला त्याची वाट अंत: प्रेरणेनेचे शोधून काढावी लागते असं 'खलील जिब्रान' यांनी म्हटलं आहे. मानवी मूल्यांचं अगदी सुस्पष्ट असं विश्लेषण या दोन विचारातून प्रकट होते. माणसाची वैचारिक बैठक पक्की असली म्हणजे इच्छित ध्येयापर्यंत स्वकर्तृत्वाच्या बळावर माणूस पोहचू शकतो. यासाठी श्रद्धा महत्वाची पण श्रद्धेला देखील बुद्धीची जोड असायला हवी. तिची अंधश्रद्धा झाली की ती नष्ट होते.

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. ज्ञानदेवांनी ज्याचा पाया रचला, नामदेवांनी ज्याचा विस्तार केला, एकनाथांनी ज्याला चिरस्थायी बनविले आणि तुकाराम ज्याचा कळस म्हणून शोभले, ते भागवत धर्माचे अथवा वारकरी संप्रदायाचे महामंदिर महाराष्ट्रात गेली अनेक शतके संकटांचे वादळवारे आणि तडिताघात पचवून उभे आहे, अगदी भक्कमपणे. लाखो वारकऱ्यांची पावले विठ्ठल नामाचा गजर करत आजही पंढरपूरच्या दिशेने जातात. पंढरीच्या वारीचा अनुभव आणि आनंद वारकरी घेतात. वारीचे अध्यात्म हा खरं तर स्वतंत्र विषय आहे. परंतु सगुण निर्गुण ईश्वराचं त्या पांडुरंगाचं माणसाला खरोखर दर्शन होतं का ? पांडुरंग भेटतो का ? हा प्रश्न संत गाडगेबाबांना पडला होता. गाडगेबाबांना माणसामध्ये, कर्मामध्ये, स्वच्छतेमध्ये देवाचं दर्शन होत होतं.

पंढरीची वारी करणाऱ्या एका वारकऱ्याला गाडगेबाबांनी

विचारलं होतं,का रे बाबा, पंढरपूरला गेलास, तो विठोबा तुला भेटला का? तुझी चौकशी केली का? तू काय करतोस, कसा आहेस, तुला विचारलं का ?

व्यवहारिक दृष्या वारकऱ्याकडे उत्तर नव्हतं. गाडगेबाबांच्या प्रश्नाचे वास्तव स्वरूपात वारकरी उत्तर देऊ शकला नाही. उलट गाडगेबाबाच त्याला म्हणाले,"अरे बाबा, देवाला निर्माण कुणी केला. माणसानंच ना? मग त्याचं एवढं अवडंबर कशाला करता. त्या पेक्षा माणसा माणसावर प्रेम करा, दीन दुबळ्यांची सेवा करा, ईश्वर चराचरात आहे त्याचा शोध घ्या.

कधी कधी गाडगेबाबा लोकांना स्पष्टपणे सांगायचे तुमचा देव स्वतः आंघोळ करू शकत नाही, कपडे बदलू शकत नाही, आता तर स्वतःच्या दागिन्यांचेही रक्षण करू शकत नाही. मग तुमचे रक्षण कसे करणार ?

असे सडेतोड प्रश्न करणारे गाडगेबाबा यांनी जीवनात मानवीमुल्यांना प्राधान्य दिले. माणसांमध्ये ईश्वर शोधला. राष्ट्रसंत गाडगे महाराज यांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी तालुक्यातल्या 'शेणगाव' या ठिकाणी झाला. त्यांचे मूळ नाव डेबुजी झिंगराजी जानोरकर असे होते. आणि गाडगेबाबांचा मृत्यू २० डिसेंबर १९५६ रोजी पेढी नदीच्या काठावर 'वलगाव' अमरावती येथे झाला. गाडगेनगर अमरावती येथे त्यांचे स्मारक आहे.

गाडगे महाराजांनी कीर्तनाद्वारे आपले लोक शिक्षणाचे कार्य विदर्भातल्या 'ऋणमोचन' या गावापासून सुरू केले. ऋणमोचन येथे त्यांनी लक्ष्मीनारायणाचे मंदिर बांधले. १९०८ मध्ये पूर्णा नदीवर त्यांनी घाट निर्माण केला १९२५ मध्ये 'मुर्तीजापूर' येथे गो रक्षण धर्मशाळा व विद्यालयाची स्थापना केली. सन १९१७ मध्ये पंढरपूर येथे चोखामेळा धर्मशाळेचे निर्माण गाडगेमहाराजांनी केले.

शिक्षण हा माणसाच्या आयुष्यातला अत्यंत महत्वाचा आणि अविभाज्य घटक असत्याने समाजात शिक्षणाबाबतची जागृती होणं. ती खेड्यापाड्यापर्यंत पोहचवणं महत्वाचे असल्याचे गाडगेबाबांनी जाणलं. या साठीच दि. ०८ फेब्रुवारी १९५२ रोजी श्री गाडगेबाबा मिशन ची स्थापना करून त्यांनी महाराष्ट्रभर

शिक्षणसंस्था व धर्मशाळा स्थापन केल्या. सन १९५४ मध्ये जे.जे हॉस्पिटल मुंबई येथे बाहेर गावाहून येणाऱ्या रूग्णांच्या आणि त्यांच्या सोबत असणाऱ्या नातेवाईकांच्या सोयीसाठी त्यांनी धर्मशाळा बांधली. १९३१ साली 'वखंडे' येथे गाडगेबाबांनी समाजात मोठी जागृती केली. पशु प्राणी या मुक्या जीवांबद्दलचं प्रेम, त्यांचं मानवी जीवनातील स्थान आणि महत्व यावर गावोगावी फिरून प्रबोधन केलं. परिणामःत गाडगेबाबांच्या प्रबोधनातून पशुहत्या बंद झाली.

जनसेवा हीच ईश्वर सेवा मानणाऱ्या गाडगेबाबांनी मानवतेची महान शिकवण समाजाला दिली. कीर्तनाद्वारे लोकजागृतीचा मार्ग त्यांनी अवलंबिला. लोकांमध्ये मूलभूत हक्कांची जाणीव तयार केली, आणि अन्यायाचा प्रतिकार करायला शिकविले. लोकांनी कार्यरत रहावे. कार्यमग्न रहावे. कर्म हाच ईश्वर..इच्छित ध्येयासाठी आपले प्रामाणिक प्रयत्नच कामी येतात ह्याची जाणीव निर्माण करून लोकांना प्रयत्नवाद शिकवला.

गाडगेबाबासारख्या राष्ट्रसंतांनी समाजातील दोष घालवून

राष्टीय चारित्र्य निर्माण केले. स्वतःच्या आचारातून विचारातून व उच्चारातून जनतेला प्रखर राष्ट्रनिष्ठेचे धडे घालून दिले. आपले आचार विचार चांगले असतील, निकोप असतील तर त्यातून चांगलेच निर्माण होणार हे पटवून दिले. लोकशाही समाज व्यवस्था आणि राष्ट्राबद्दलचे प्रेम, निष्ठा याचे महत्व सांगितले. गाडगेबाबांच्या कीर्तनाला लोकांची गर्दी होत असे. गर्दीचं मानसशास्त्र गाडगेबाबांना चांगल्या प्रकारे अवगत झाल्याने ते उत्तम प्रबोधन करत असत. एवढं करून सुद्धा गाडगेबाबांनी मी पणा ठेवला नाही आणि शिष्यत्व कोणाला बहाल केलं नाही. त्यांचं वैशिष्ट्य म्हणजे, "मी कुणाचा गुरू नाही व माझा कुणी शिष्य नाही" असे म्हणून त्यांनी कुठल्याही संप्रदायाला समर्थन देण्याचे नाकारले.

गोपाला... गोपाला देवकीनंदन गोपाला... हे गाडगे बाबांचे आवडते भजन होते. आचार्य अत्रे गाडगेबाबांबद्दल म्हणायचे - सिंहाला पाहावे वनात... हत्तीला पहावे रानात, तर गाडगेबाबांना पाहावे कीर्तनात.

गाडगे महाराज जातीने परीट व गोधडे महाराज म्हणून ओळखले जात होते. त्यांनी डॉ. पंजाबराव देशमुख व कर्मवीर भाऊराव पाटील यांना त्यांच्या कार्यात मदत केली होती. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ज्ञानाची गंगा खेड्यापाड्यात पोहोचवली आणि स्वावलंबी जीवन हेच आमचे ब्रीद. या ब्रीदवाक्यातून सुजाण आणि जबाबदार नागरिक घडविले. शिक्षण क्षेत्राशी संबंधीत या कार्यात गाडगेबाबांनीही समाजाच्या तळागाळात राहून प्रबोधनाच्या माध्यमातून शैक्षणिक कार्य केले.

गाडगे बाबा समाजाचे सच्चे मार्गदर्शक होते. संत केवळ उपदेश न करता स्वतःच्या आचरणाचे आदर्श समाजापुढे ठेवून समाजाला सन्मार्ग दाखवतात. आधी केले मग सांगितले या उक्तीप्रमाणे वागतात... गाडगे बाबांनी ही तत्त्वे आयुष्यभर पाळली.

माणसाचे निसर्गाशी असलेले नाते जुने आणि अतूट आहे. निसर्गाच्या सहवासात माणसाच्या वृत्ती फुलून येतात. प्रपंचातील चिंता, व्यथा यांची अभ्रे निवळून जातात. गाडगेबाबांना पशुपक्षी, प्राणी या जीवितांबद्दल जेवढी ओढहोती तितकीच ओढआणि आवड निसर्गाबाबत होती. त्यांनी स्मरण गाथेत म्हटलं आहे - ''देवानं हे इतकं मोठं पुस्तक लिहिलं, ही पिरथिमी, हे आभाळ, थो पाऊस पाडतो, शेतं पिकवतो हे पुस्तक वाचावं मस्त फरावं... निसर्गाशी तादात्म पावावे, निसर्गाचे भान... सर्जनशील कवी, लेखकांपेक्षाही गाडगेबाबांना अवगत झाले होते, ते त्यांच्या अनुभवातून. काल प्रवाहात समाज बदलतो पण सत्य, सदाचार, सेवा, नीती, चारित्र्, मानवता, कर्मयोग, व्यवहार, प्रेम, बंधुभाव, दीन दुबळ्यांची सेवा ही संतांची तत्त्वे त्रिकालावधित व अविनाशी रहातात। अगदी गाडगेबाबांसारखी. मानवी मूल्ये आणि अध्यात्म यांचा सुरेख मेळ साधणारे तत्त्वज्ञान आहे.

अशोक लोटणकर
बी-६०१, साई रिजेन्सी सोसायटी, द्रप्रस्त पार्क,
भोईर नगर, ९० फूट रोड, मुलुंड (पूर्व), मुंबई-४०० ०८१.
भ्रमणध्वनी - ९२२४३७०१२४

रामभक्त तुलसीदास

रवींद्र आवटी

चित्रकूट के घाट पे, भई संतन के भीर ।
तुलसीदास चंदन धिसै । तिलक देत रघुबीर ।।

वरील ओळी वाचतांना सुध्दा माणसाचं मन पवित्र होतं अशा ह्या सद्‌गुणांची खाण असलेल्या तुलसीदासाचा जीवनपट उलगडतांना मला अतिशय आनंद होत आहे. "जो धारण करतो तो धर्म" अशी धर्माची साधी, सोपी व्याख्या आहे. ज्याचे तन, मन, विचार पवित्र झालेले आहेत त्याचे आचारही पवित्र असतात.

"बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले" असे संतांनी म्हटले आहे या उक्तीत बसणारे तुलशीदास आयुष्यभर दु:ख, दारिद्र्य, पिडा घेऊन जगले. रामावर नितांत श्रध्दा हाच त्यांच्या सुखाचा मार्ग होता. कितीही संकटे आली तरी माझा राम मला दूर करणार नाही असा ठाम विश्वास ठेवून ते नित्यक्रम करत होते. जप, तप, ध्यान, धारणा याद्वारे मन निर्मळ करुन प्रभूरामचंद्राचे दर्शन मिळण्यायोग्य त्यांचे कार्य पवित्र झाले होते.

दया धर्म का मूल है, पाप मूल अभिमान ।
तुलसी दया न छोड़िये, जब लग छट में प्राण ।।

याचा अर्थ तुलसीदास सांगतात ''माणसाने दया कधीही सोडू नये. दया हे धर्माचे मूळ आहे आणि अहंकार सर्व पापाचे मूळ कारण आहे. दया हा धर्म धारण करुन अहंकाराचा त्याग करणे म्हणजेच पापापासून मुक्ती मिळवणे होय. अहंकारी व्यक्तिला धर्म अधर्म काहीच कळत नसल्यामुळे त्याच्या हातून पाप घडते.

माणसाचे आचरण जसे असेल त्यानुसार मनुष्य सुख दु:ख भोगत असतो असे तुलसीदास म्हणतात. मानवी मुल्ये पेरण्याचे काम तुलसीदास करतात.

तुलसीदासाचे जन्मापासूनच वेगळेपण जाणवते. बारा महिने आईच्या गर्भात राहिल्यानंतर त्यांचा जन्म झाला तेव्हा ते इतर मुलांसारखे रडले नाहीत तर राम हा पहिला शब्द ते बोलले म्हणून त्यांचे नाव रामबोला हे ठेवण्यात आले. सन १५५४ मध्ये श्रावण महिन्यात मुळ नक्षत्रात त्यांचा जन्म झाला. आईचे नाव तुलसी व वडिलांचे नाव आत्माराम दुबे होते. पुत्रजन्माचा आनंद व्यक्त करेपर्यंत तुलसीदासाच्या जन्माच्या दुसऱ्याच दिवशी त्याची आई मरण पावली. दोन दिवसाच्या मुलाचा सांभाळ कसा करायचा? हा त्यांच्या पुढे यक्षप्रश्न होता. अकस्मात झालेल्या पत्नीच्या निधनाने त्यांचे मन सैरभैर झाले. मनात वैराग्य निर्माण झाल्यामुळे चुनियाॅं नावाच्या एका स्त्रिच्या स्वाधीन तुलसीदासाला करुन ते निघून गेले. चुनियाँनेच तुलसीदासाचे नाव रामबोला ठेवले. ते सहा वर्षाचे झाले तेंव्हाच चुनियाँचेही निधन झाले. त्यानंतर तुलसीदास आवारा मुलासारखे गल्लोगल्ली भटकू लागले.

उत्तर प्रदेशातील चित्रकूट जिल्ह्यामध्ये रामपूर या गावी त्यांचा जन्म झाला व तेथेच बालपण गेले. हा सहा वर्षाचा अद्‌भूत बालक प्रचंड हुशार, तल्लख बुध्दीचा मुलगा होता. रामशैल येथे राहणारे श्री आनंद महाराज यांनी त्या मुलाचे तेज पाहीले. त्यांनी नरहरी बाबा या शिष्याला पाठवून रामबोला यांना घेऊन यायला सांगीतले. आनंदानंद यांच्या सानिध्यात आल्यानंतर मुळातच हिरा असलेल्या या हिऱ्याला पैलू पाडण्याचे काम सुरु झाले. त्यांनी रामबोलाचे नाव तुलसीदास ठेवले. तुलसीदास यांना आनंदानंद अयोध्या येथे घेऊन गेले तेव्हा ते १० वर्षाचे होते सन१५६१ माघ शुक्ल पंचमीला अयोध्या येथे यज्ञाचे आयोजन केले होते. त्या पवित्र यज्ञाच्या साक्षिने तुलसीदासांनी शिष्यत्व

स्विकारले. त्या दिवशी अतिशय स्पष्ट उच्चारात गायत्रीमंत्र ते म्हणाले. त्या आधी त्यांनी कधीही गायत्रीमंत्र गायला नव्हता. तेथे आलेल्या सर्वांनाच ऐकून आश्चर्य वाटले. त्यानंतर नरहरी बाबांनी तुलसीदास यांना राम मंत्राची दिक्षा दिली. अयोध्येमध्ये राहून त्यांनी विद्याध्ययन सुरु केले. अतिशय तल्लख बुध्दिचे असल्यामुळे गुरुजींनी शिकवलेले त्यांच्या लगेच लक्षात राहात असे. नरहरी बाबा त्यांना नित्य नियमाने रामकथा ऐकवत असत. रामकथेमुळे त्यांचे चंचलमन एकाग्र होऊ लागले. संपूर्ण अर्थासहित त्यांनी रामकथा ग्रहण केली. हळूहळू रामभक्ती त्यांच्या मनात रुजू लागली. त्यांच्या जीवन काळात तुलसीदासांनी बारा ग्रंथ लिहिले. सन १५०० ते १६२३ या कालावधीतील ते सर्वश्रेष्ठ संत झाले.

२९ वर्षाचे असतांना १५८३ ला जेष्ठ शुक्ल त्रयोदशीला रत्नावली या मुलीशी त्यांचा विवाह झाला. परंतु गौणा न झाल्यामुळे पत्नीला तिच्या माहेरी ठेऊन तुलसीदास काशीला वेदांचा अभ्यास करण्यासाठी गेले. वेदांचा अभ्यास करत असतांनाच एक दिवस त्यांना पत्नीच्या भेटीचा विवेग असह्य झाला. तिच्या आठवणीने ते व्याकूळ होऊ लागले. या मनस्थितीत त्यांनी गुरुजींची परवानगी घेतली आणि पत्नीला भेटायला तिच्या माहेरी गेले. तिला एकांतात भेटून समागमाची इच्छा प्रकट केली परंतु गौणा न झाल्यामुळे लोक काय म्हणतील या भितीने तिने तुलसीदासांना झिडकारले तरीही त्या क्षणी तिला त्यांच्याबरोबर घेऊन जाण्याचा हट्ट ते करु लागले तेंव्हा ती म्हणाली...

अस्थि धर्म मम देह यह। ता सों ऐसी प्रीती ।।
नेकु जी होती राम से, तो काहे भव भीत ।।

माझा हा नश्वर देह हाडा मासांनी बनलेला त्यावर प्रेम करण्यापेक्षा रामावर प्रेम केलं तर तो हा भवसागर पार करेल, मनाची अवस्था अशी विकल होणार नाही. पत्नीचा दोहा ऐकून त्याच क्षणी आलेल्या पाऊली ते परत फिरले. त्यानंतर ते रामपूरला स्वतःच्या घरी गेले तेव्हा त्यांना समजले त्यांच्या वडिलांचे काही वर्षापूर्वी निधन झाले आहे. घरही सर्व पडले होते. त्या उध्वस्त वास्तूमध्ये त्यांचे मन लागेना. तुलसीदासांनी शास्त्रोक्तपध्दतीने वडिलांचे श्राध्द केले आणि काशीला निघून गेले.जे भेटले त्याला गावोगावी जाऊन ते रामकथा ऐकवू लागले त्याच काळात त्यांना एक प्रेत दिसले त्या प्रेताने तुलसीदासांना हनुमानाचा पत्ता सांगीतला. हनुमानाचे दर्शन झाले तेंव्हा तुलसीदासांनी रामदर्शनाची इच्छा प्रगट केली आणि रामभेट केंव्हा होईल अशी विचारणा केली असता हनुमानजी म्हणाले"चित्रकूट येथे घाटावर रामप्रहरी रामाची भेट होईल" एक दिवस शहरात फिरत असतांना दोन सुंदर तरुण हातात धनुष्यबाण असलेले घोड्यावरुन येतांना त्यांना दिसले परंतु तुलसीदासांनी त्यांना ओळखले नाही.काही क्षणात ते नाहीसे झाल्यानंतर मात्र तुलसीदासाला रामभेट होऊनही आपण असावध असल्यामुळे तो क्षण हातातून निसटला याचा खूप पश्चाताप झाला. तो पाहून हनुमान तुलसीदासांना म्हणाले "परत राम तूला भेटतील इ.स. १६०७ मध्ये मौनी आमावस्येच्या दिवशी श्रीराम परत लहान मुलाच्या वेषात येतील" एके दिवशी सकाळीच तुलसीदास घाटावर नामस्मरणात तल्लीन असतांना राम समोर उभे राहिले हनुमानाला वाटले या वेळेलाही तुलसीदासाने रामाला नाही ओळखले तर दर्शन मिळणार नाही तेंव्हा हनुमंताने पोपटाचे रुप धारण केले आणि खालील ओळी म्हणाले -

चित्रकूट के घाट पर, भइ संन्तन की भीर ।
तुलसीदास चंदन घिसे, तिलक देत रघुबीर ।। "मला चंदन हवे आहे"असे म्हणाले. तुलसीदासाने चंदन उगाळायला घेतले त्याच चंदनाचा तिळक रामाने तुलसीदासांच्या मस्तकावर लावला.

रामाचा स्पर्श होताच तुलसीदासाला समजले
रामाच्या चेहऱ्याकडे पहाता पहाता ते भाव विभोर होऊन स्वतःला विसरुन गेले. रामाचे दर्शन झाल्यानंतर

इ.स. १६३१ मध्ये रामनवमीच्या शुभमुहुर्तावर सकाळीच श्री राम चरित्र मानस ह्या सुप्रसिध्द ग्रंथाची रचना करायला सुरुवात केली आणि १६३३ मध्ये मार्गशीर्ष महिन्यामध्ये रामाच्या विवाहाच्या दिवशी सात खंड असलेला श्री राम चरित्र मानस हा ग्रंथ लिहून तयार झाला. इतक्या सुंदर, तरल भाषेत त्यांनी रचना केलेली आहे. रामाच्या जन्माचे वर्णन पहा किती देखण्या शब्दात केलेले आहे.नवमी

तिथी मध्य मांस पुनीता
सुकल पच्छ अभिजित हरीप्रिता।
मध्य दिवस अतिसीत न धामा

पावन काल लोक पिसाना ।।

चैत्र मास शुक्ल पक्ष नवमी तिथी मध्यान्ह समयी श्रीराम पृथ्वीतलावर अवतरले. पुढे ते अनेक निसर्गाचे दाखले देतात. श्रीरामाच्या जन्माने सर्व देवगण आनंदित व उल्हसित झाले. निसर्गाचा उर आनंदाने भरुन आला. वने - उपवने अधिक प्रफुल्लित झाली. पर्वत समुदाय जणू रत्नांनी प्रकाशीत झाले. सर्व नद्यांमधून अमृतमय जल प्रवाह वाहू लागले. वृक्ष फांद्या डोलावून रामाचे स्वागत करु लागले. इतके सुरेख वाक्य रचना भावपूर्ण शब्दात केलेले वर्णन वाचता वाचता भक्त राममय होऊन जाणार नाही ते नवलच. पुढे ते म्हणतात "रामाचे मुख पाहून सूर्याचे उधळणारे अश्व जाग्यावरच थांबले. त्यामुळे दिवस अस्ताला जायचाच विसरला आणि त्यामुळे रात्र झालीच नाही."आणखी एका प्रसंगाचे वर्णन त्यांनी अतिशय मोहक शब्दात केले आहे.

कौतुक देखी पतंग भुलाना
एक मास तेई जान न जाना
भास दिवस कर दिवस मा भरम
न जाने कोई रथ समेत रवि धाकड
निसा कवन विधि होई ।।

तुलसीदासांचे श्रीराम चरितमानस ग्रंथ म्हणजे झुळझुळ वाहणारी प्रेमळ पवित्र गंगाच, तो ग्रंथ त्यांनी त्यांचे गुरु भगवान विश्वनाथ व अन्नपूर्ण यांना वाचून दाखवला. काशी येथे शंकराच्या मंदिरात तो ठेवला. रात्री त्यावर लिहिले होते "सत्यम् शिवम् सुंदरम्" या शब्दांचा नादध्वनी तिथे उपस्थित असलेल्या सर्वांनी ऐकला अन् ही बातमी सर्व शहरभर वाऱ्यासारखी पसरली. अगोदरच तुलसीदासांचे कौतुक ऐकून ब्राम्हण वर्गात ईर्षा निर्माण झाली होती. या बातमीनंतर तर आणखीनच आग भडकली. श्रीराम चरित मानस हा ग्रंथ चोरण्यासाठी चोर त्यांच्या झोपडीकडे पाठवले. चोर झोपडीच्या जवळ जाताच त्यांनी पाहिले दोन देखणे तरूण हातात धणुष्यबाण घेऊन पहारा देत आहेत. त्या तरुणांचे दर्शन होताच चोराचे विचार परिवर्तन झाले. त्यांनी हात जोडले क्षमा मागीतली, खाली हाताने निघून गेले. दुसऱ्या दिवशी ही बातमी तुलसीदासांना समजली तेंव्हा त्यांना खूप वाईट वाटले. "माझ्या प्रभूला रात्री जागून माझ्या झोपडीच्या दारात पहारा द्यावा लागतो" या प्रसंगानंतर तो ग्रंथ त्यांनी त्यांच्या एका मित्राकडे सुपुर्त केला. आजही हा ग्रंथ उत्तर प्रदेश व इतर प्रांतातही भक्तीभावाने वाचला जातो. त्यानंतर तुलसीदासांनी विनय पत्रिका या नावने एक महत्वपूर्ण काव्य रचना केली. यामध्ये त्रेतायुगातील राम, रावण युध्दाचे रसभरीत वर्णन लिहिलेले आहे. समाज प्रबोधन करण्याच्या हेतूने अनेक दोहे त्यांनी रचले त्यामध्ये माणसाचा वर्तणूक धर्म कसा असावा, काय वाईट। काय चांगले. माणसाचा धर्म काय आहे ? यावर भाष्य करणारे काव्य लिहिले...

रामु राम को कल्पतरु कलि कल्याण निवासु।
जो सिमरज भयो भाँग ते तुलसी तुलसीदास ।।

रामाचं नाव हे कल्पतरु प्रमाणे साधकाला हवे ते फळ देते. रामाचं सानिध्य म्हणजे मुक्तिधाम आहे. तुलसीदासाने रामाचे स्मरण केल्यामुळे (क्षुल्लक) तुलसीदास पण तुलसी समान पवित्र झाला.

किती सोप्या, साध्या, सरळ शब्दात जीवनाचे तत्वज्ञान गोस्वामी सुलसीदास यांनी सांगीतले आहे. ते म्हणतात.

तुलसी मीठे वचन ते सुख उपजन चहुँ ओर ।
वसीकरन एक मंत्र है, परिहक वचन कठोर वाणी गोड असेल तर सर्व वश होतात म्हणजे आपले ऐकतात त्यामुळे कठोर शब्द ते दुसऱ्याला पिडा करतात. अशा शब्दाचा त्याग करुन सर्वांनी गोड बोलले पाहिजे. यावरुन तुलसीदासाचा मृदू स्वभाव आपल्या लक्षात येतो दया, क्षमा, करुणा या गुणांमुळे माणसांच्या ठिकाणी असलेले वाईट विकार दूर होतात. पुढे तर किती सुंदर ते सांगतात पहा -

तुलसीदासाच्या ठिकाणी वैराग्य येण्याचे कारण म्हणजे आई वडिलांचा सहवास त्यांना मिळाला नाही. अनाथ बालपण गेले. तरुणपणी पत्नीने समजून घेतले नाही. ना घर ना संसार यामुळे त्यांचे मन उदास झाले. म्हणून संसाराची आसक्ती कमी होऊन रामचरणी ध्यान लागले ते म्हणतात.

दुखित देखि संतान कह्यो, सोचै जनि मन मोहू

तोसे पसु पातकी परिहरेन सरन गए रघुविर ।।

या दोह्यावरुन त्यांच्या मनाची स्थिती लक्षात येते ते सतत फिरते राहिले काशी, चित्रकूट, अयोध्या, हरिद्वार, प्रयाग, मिथिला इत्यादी ठिकाणी ते राहिले. वेद पुराणाचा अभ्यास केला. अनेक ग्रंथाची रचना केली. रामकथा सांगण्याचे काम ते करु लागले. त्यांची वाणी अतिशय सरळ आणि गोड होती त्यामुळे त्यांच्या तोंडून रामकथा ऐकण्यासाठी लोक जमत असत.विषय वासना कमी करुन परमेश्वरला शरण जा म्हणजे तुमच्या जीवनातील दु:ख कमी होईल असे ते सांगत.

शरणागत कहुँ जे जरहि निज अनहित अनुमति ।
तो नर पाँवर पापमय तिन्ह हि विलोकति हानि ।।

जो मनुष्य आपले हित जाणत नाही तो स्वत:च क्षुद्र आणि पापमय जीवन जगतो. शरण आलेल्यांना शरणागती देत नाहीत ते व परमेश्वराला शरण जात नाहीत त्यांची तिन्ही लोकात हानीच होते असे तुलसीदास म्हणतात.

तनु धन महिमा धरम, तेहि विनु जेहि अभियान ।
तुलसी जिअत विटम्बना परिणामहु गत जान ।।

सौदर्य सतगुण, धन, प्रतिष्ठा आणि धर्मभाव अंगी नसतील तर त्या व्यक्तिमध्ये अहंकार उत्पन्न होतो. अहंकारी व्यक्तिच जीवन हास्यस्पद होते अशा व्यक्तिची गत वाईट होते.

तुलसीदास एक श्रेष्ठ कवी होते, तितकेच श्रेष्ठ ते भक्त होते. अखंड जीवनभर परमेश्वराचा शोध घेता घेता स्वत:चाही शोध घेतला आहे. स्वत:शी एकरुप झाल्यामुळे त्यांना चांगल्या वाईटाची चांगली पारख झालेली आहे. धर्म अधर्म ज्या माणसाला समजतो त्या माणसाचे विचारही बदलतात. विचार बदलले की जीवनाची दिशा आणि दशा बदलते. एका दोह्यामध्ये ते सांगतात दुसऱ्याची निंदा करुन आपल्याला कधिच प्रतिष्ठा मिळत नाही. दुसऱ्याला बदनाम करुन स्वत:ची स्तूती करणे मुर्खता आहे अशा व्यक्ति कधिच यशाच्या शिखरावर जात नाहित. वाईट संगत असेल तर ती आपल्यातल्या सद्गूणांचा नाश करते. वाईटाच्या संगतीत आपणही बदनाम होतो त्यामुळे सत्संग हे महत्वाचे आहे.

तुलसीदासांचे विचार अतिशय सकस व उच्च दर्जाचे आहेत त्यांचे आचार, विचार, धर्म श्रेष्ठ असल्यामुळे भक्त शिरोमणी म्हणून त्यांची गणना होते. अनेक संकटाशी झुंज त्यांनी दिली, तरीही त्यांनी परमेश्वराचा हात कधीही सोडला नाही. त्यांच्या स्वभावात कडवटपणा आला नाही. अध्यात्माचा प्रचार, प्रसार त्यांनी केला तरीही त्यांचा उत्तारार्ध म्हणजे वृध्दत्व अतिशय क्लेश दायक गेले. शेवटच्या दिवसात त्यांना खूप शारिरीक पिडा सोसावी लागली.

धिरे लिखो रोगानि कुजोगनि कुलोगनि
बासर जलद घन घटा छाई है
बरसन बाई पोर जरिये जवासे जस
रोष विनु दोष, घूम मूल मलिनाई है ।

आयुष्यभर रामकथेचे रसपान करणाऱ्या तुलसीदास यांची जीवन यात्रा गंगेच्या किनाऱ्यावर श्रावण शुक्ल सप्तमीच्या दिवशी त्यांची प्राणज्योत मालवली.

अशा या महान कविला सर्वश्रेष्ठ रामभक्ताला शब्दपुष्पाची ओंजळ अर्पण करतो.

असाच आणखी एक प्रसंग घडला अकबर बादशहाच्या कानावर तुलसीदासची ख्याती गेली. बादशहाने आपल्या दरबारात तुलसीदासांना बोलवलं व काही चमत्कार करायला सांगीतले ते ऐकून तुलसीदास नम्रपणे म्हणाले तुमचा काहीतरी गैरसमज झाला आहे. मी असे काही चमत्कार वैगरे दाखवत नाही. त्यांनी सरळ नकार दिला तेंव्हा बादशहाला राग आला. बादशहाने तुलसीदासांना बंदिस्त बनवलं आणि नजरकैदेत ठेवलं. त्याचा परिणाम असा झाला की राज महालात व संपूर्ण राज्यात वानरांनी थैमान घातले. ते पाहून अकबराला कोणीतरी सांगीतले तुलसीदास हा राम भक्त आहे. हा हनुमानजीचा क्रोधाचा परीणाम आहे. तुलसीदासांना सोडून द्या नाहीतर अनर्थ होईल हे ऐकून अकबराने लगेच तुलसीदासांना सोडण्याचा हुकूम दिला.

असे एक ना दोन अनेक प्रसंग तुलसीदासांच्या बाबतीत घडत होते.

राम दूरि माया बढती ,घटती जानि मन मांह।
भूरी होती रबी दूरि ,लखि सिर पर पगतर छांह ।

रवींद्र आवटी

कहत कबीर सुनो भाई साधो.....

श्री. वामनराव अच्युत देशपांडे

संत कबीर हे भारतीय संतमालिकेतले एक अत्युच्च असे शिखर आहे. कर्मकांडाच्या विळख्यात सापडलेल्या भक्तांना आणि सर्वसामान्य माणसांना कबीरांनी ज्ञानमार्गावर आणण्याचा आयुष्यभर प्रयत्न केला. पंडित आणि मुल्ला-मौलवी यांना तोंड देत आपल्या शुध्द तत्त्वज्ञानाची शुभ्रधवल गंगा त्यांनी अखंडपणे वाहती ठेवली.

शास्त्राचा पुस्तकी अभ्यास केलेले पढत पंडित आणि कुराणाचा अभ्यास केलेले मुल्ला-मौलवी ऐकीव माहितीवर आयुष्यभर आपले गुजराण करतात. परमेश्वरी अनुभूतीपासून हे कित्येक योजने दूर असतात. अशा दांभिक लोकांविरुध्द त्यांनी आपल्या अभंगवाणीतून सडेतोडपणे विचार मांडले आणि लोकांपुढचा अंधार नाहीसा करण्याचा प्रयत्न केला. कुठल्याही विरोधाला न जुमानता परमेश्वराच्या प्राप्तीचा अध्यात्ममार्ग प्रत्येक संवेदनशील परमभक्ताला दाखवत, सहज सोपा उपदेश केला. संत कबीर हा पंधराव्या शतकातला सर्वात मोठा दैवी चमत्कार होता.

कबीरांनी आयुष्यातले शाश्वत सत्य मांडले. त्यांचे वैर व्यक्तींशी नव्हते - अंधश्रध्दा, अविचार, कर्मकांड, व्रतवैकल्ये याद्वारे समाजाला पोखरणाऱ्या प्रवृत्तींशी होते. त्यांना हितसंबंधी लोकांचा छळ सोसावा लागला. त्यांनी तो सहन केला पण आपला सत्याचा मार्ग चुकूनही सोडला नाही. समाजातली अंधश्रध्दा दूर करीत कबीरांनी सर्व पंथ, धर्म यांना ज्ञानमार्ग खुला केला.

माझ्या बालपणीची रंगलेली ही एक स्वरकहाणी आहे. अगदी पहाटे माणिक वर्मांच्या मधाळ स्वरातले. ग.दि. माडगूळकरांचे एक भक्तीगीत वारंवार आकाशवाणीवरुन प्रसारित व्हायचे.

कबिराचे विणतो शेले, कौसल्येचा राम...
भाबड्या ह्या भक्तासाठी, देव करी काम

ह्या भक्तीगीताची मोहिनी माझ्यावर एवढी जबरदस्त पाझरत होती की कबिराचे मिळतील तेवढे अभंग मी माझ्या शालेय वयातच वाचून काढले. पुढे तरुण वयात पंडित कुमार गंधर्वांच्या 'त्रिवेणी संगम' मधून कबीराची स्वरमाध्यमातून सुखद भेट झाली. त्याच भारलेल्या अवस्थेत असताना आचार्य रजनीश म्हणजे ओशो ह्यांच्या अमृतभरल्या वाणीतून झंकारत बाहेर पडलेली कबीराची जीवन कहाणी आणि त्यांची अद्‌भुत अक्षरसृष्टी प्रत्यक्ष ऐकण्याचा भाग्ययोग जुळून आला. त्याच उत्साही तरुणपणात डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी यांचे 'कबीर' हे पुस्तक हाती आले. लहान वयात पाठ्यपुस्तकांमधून झालेले कबीराचे धूसर दर्शन नंतर हळूहळू लख्ख होत गेले. पन्नाशी उलटली आणि माझ्या लक्षात आले की कबीराच्या अप्रतिम अशा तत्त्वज्ञानभारल्या अभंगओळींनी आपल्याला पूर्णपणे वेढून टाकलेले आहे. माझा ज्ञानमार्ग जसा ज्ञानदेवांनी लख्ख उजळून टाकला तसाच तो कबीरानेसुध्दा उजळून टाकला आहे. कर्मकाण्डांच्या पलिकडच्या तीरावर माझी आयुष्यनौका नेण्यात जेवढा ज्ञानदेवांचा वाटा होता तेवढाच तो कबीराचा सुध्दा होता, ह्याचे भान मला आता आले होते.

१९९७ साली कवीश्रेष्ठ मंगेश पाडगावकरांचा 'कबीर' प्रगट झाला आणि माझ्या अंतःकरणातल्या कबीराला गरुडपंख फुटले. पाडगावकरांची साक्षेपी प्रस्तावना आणि त्यांनी केलेल्या समवृत्त

अनुवादामुळे कबीराची अक्षरमोहिनी अधिक घट्ट बसली. संपूर्ण पंधराचे शतक व्यापून बसलेल्या संत कबीरांना एकशे वीस वर्षांचे प्रदीर्घ आयुष्य लाभले. कबीराचा कालखंड आहे. इ.स. १३९८ ते इ.स.१५१८ केवळ आपल्या हिंदुस्थानातीलच नव्हे तर जगभरातल्या सर्व संत-साधु पुरुषात कबीराएवढे प्रदीर्घ आयुष्य कुणालाच लाभलेले नाही आणि कबीराएवढी लोकप्रियता फार क्वचितच इतर संतपुरुषांना लाभली असेल. कबीराचा जन्म नेमका कधी झाला ह्याचा ऐतिहासिक पुरावा उपलब्ध नाही. अभ्यासकांनी विविध अंदाज आपल्या केलेल्या संशोधनाद्वारे मांडले. त्या अभ्यासकांपैकी बऱ्याच लोकांनी जे आग्रही मत मांडले त्यानुसार संवत १४५५ ते संवत १५७५ म्हणजेच इ.स.१३९८ ते इ.स. १५१८ हा कबीराच्या आयुष्याचा कालखंड आहे. आश्चर्य म्हणजे कबीराच्या जन्मासंबंधीच्या दंतकथांना पंख फुटले. कल्पना आणि निखळ वास्तव ह्यांची ह्या दंतकथांमधून भेसळ झाली. त्यामुळे कबीराच्या अवतारी जन्माची कहाणी खूपच धूसर झाली. कबीराच्या समकालीनांनी ह्या अद्भुत संताच्या व्यक्तिमत्त्वावर वा त्याच्या अलौकिक जन्माबद्दल नोंदच घेतलेली दिसत नाही.

कबीराच्या महानिर्वाणानंतर जवळ जवळ सत्तर वर्षांनी नामादास यांच्या 'भक्तमाल' ह्या ग्रंथात कबीराविषयी उल्लेख सापडतो. कबीराच्या जन्मतिथीविषयी वा त्याच्या मातापित्याविषयीची किंवा त्याच्या धर्माविषयी वा जातीविषयी कुठलाही उल्लेख त्या ग्रंथात नाही. कबीराच्या वृत्तीविषयी, त्याच्या एकूण स्वभावाविषयी मात्र नामादास आपले सच्चे भाव प्रकट करतांना दिसतो.

कबीर कानि राखी नहीं वर्णाश्रम षट् दरसनी ।
भक्ति विमुख जो धरम ताहि, अधरम करि गायो ।
जोग जग्य व्रत दान भजन बिनु, तुच्छ दिखायो ।
हिंदू तुरक प्रमान...।।

नामासादासाने कबीराविषयी आपले जे सत्यदर्शनी विचार प्रस्तुत 'भक्तमाल' ह्या ग्रंथातून मांडले आहेत ते मात्र कबीराच्या एकूणच जीवनपध्दतीवर आणि स्वभावावर, वृत्तीवर प्रकाश टाकतात. कबीराने कधीच जातीपातीचा वा वर्णश्रमपध्दतीचा चुकूनही पुरस्कार केला नाही. षट्दर्शनांना मान्यता दिली नाही. जिथे परमभक्तीचा झिरपणारा स्त्रोत नाही, प्रेमाचा गंध नाही तो अधर्म, आणि जिथे विलक्षण अशी परमेश्वरी अस्तित्वाविषयी भक्ती दाटून आलेली आहे. चराचराविषयी प्रेम वाहाते आहे, तोच धर्म आहे, ह्यावर कबीराची श्रध्दा होती. यज्ञयाग, व्रतवैकल्ये, दानधर्म, योगसाधना ह्या मानवी जीवनातल्या गोष्टी जर ईश्वरी भजनाशिवाय, अखंड नामसाधने-शिवाय घडत असतील तर ह्या सर्व क्रिया फोलच आहेत हे कबीराने आपल्या जीवनपध्दतीतून समाजाला दाखवून दिले. हिंदू आणि मुसलमान ह्या दोन्ही धर्मांना कबीराच्या तत्त्वज्ञानाने सामावून घेतले. कबीराचा उपदेश संपूर्ण मानवाला उद्देशून होता. कबीराने सर्वांनाच एकमेव श्रेष्ठ संदेश दिला की,

हिंदू कहूँ तो मैं नही, मुसलमान भी नहीं ।
पाँच तत्त्व का पुतला, गैबी खेलैं माहि ।।

'मी हिंदू नाही की मी मुसलमानसुध्दा नाही. मी तर पंचतत्त्वाने भरलेला आणि भारलेला देहधारी माणूस आहे. मानवी आकारातला जीवंत पुतळा आहे. माझ्या हृदयात आत्मतत्त्व वास करुन आहे.'कबीरांनी हे वारंवार सांगितले आहे की, 'मी आत्म्याच्या साक्षीने जगतो. संपूर्ण मानवी विश्वाशी वागताना जात-पात-धर्म ह्यांच्या भिंती पाडून एक माणूस म्हणून प्रेमाने संवाद साधतो.

आये हैं सो जायेंगे, राजा रंक फकीर ।
एक सिंघासन चढि चले, इक बाँधे जात जंजीर ।।

कबीराने प्रस्तुतच्या दोह्यातुन जे सत्य सांगितले, ते फार महत्त्वाचे होते. ह्या विश्वात मानवी आकार धारण करुन जे आलेले आहेत. ह्यात कुणी राजा आहे तर कुणी रंक आहे, कोणी फकिर आहे. जे जे ह्या विश्वात जन्म घेतात त्या सर्वांना ह्या विश्वातून एक

ना एक दिवस जायचेच आहे. एखादाच भाग्यवान परमभक्त की जो परमेश्वराच्या दरबातल्या सिंहासनावर आरुढ होईल. मुक्तीचा अनुभव प्रत्यक्ष अनुभवेल. बाकीचे सर्व प्रपंचाच्या बेड्यात अडकून मर्त्य जीवन जगातील आणि पुन्हा पुन्हा गर्भवासाचे दुःख भोगतील. स्वतः कबीर मात्र परमेश्वराच्या दरबारातल्या भव्य सिंहासनावर आरुढ झाला.

संत कबीर हे भारतीय संतमालिकेतले एक अत्त्युच्च असे शिखर आहे. अत्यंत निर्भिड वृत्तीचे कबीर आपले अध्यात्मभारले विचार स्पष्टपणे मांडत असत. कर्मकाण्डांच्या विळख्यात सापडलेल्या भक्तांना आणि सर्वसामान्य माणसांना कबीरांनी आयुष्यभर ज्ञानमार्गावर आणण्याचा प्रयत्न केला. बनारसमधल्या पंडितांना आणि मुल्लामौलवींना तोंड देत कबीरांनी आपल्या शुध्द तत्त्वज्ञानाची शुभ्रधवल गंगा अखंडपणे वाहती ठेवली. कर्मकाण्डात दंग असणाऱ्या लोकांच्या संदर्भात आपली भूमिका मांडताना कबीर म्हणतात,

ज्ञानी से कहिये कहा, कहत कबीर लजाय ।
अँधे आगे नाचते, कला अकारथ जाय ।।

शास्त्राचा पुस्तकी अभ्यास केलेले पढत पंडित आणि कुराणाचा अभ्यास केलेले मुल्ला-मौलवी आपल्या केवळ वाचनात आलेल्या धर्मग्रंथांच्या आधारे आणि परंपरागत ऐकीव माहितीवर आयुष्यभर आपला पुस्तकी अनुभव सांगतात. बोलत राहतात. परमेश्वरी अस्तित्वाची चवच त्यांनी चाखलेली नसते. अशा पढत पंडितांच्या अनुनभवी भाष्याच्या संदर्भात बोलायला लाज वाटते असे कबीर म्हणतात. मन संकोचून जाते ही कबीराची भूमिका आहे. अशा अर्धवट ज्ञान असणाऱ्या लोकांसमोर अनुभवी भाषेत बोलणे म्हणजे ठार आंधळ्यांसमोर अप्रतिम नृत्य करण्यासारखेच आहे. ह्या आंधळ्यांपुढे नाचून आपले नृत्यकलेतले नैपुण्य प्रगट करायला गेला तर आपली कला फुकट जाईल. आंधळ्यांच्या गावात पैठणी विकायला जाण्यासारखे होईल.

ज्यौं अँधेरे को हाथिया, सब काहू को ज्ञान ।
अपनी अपनी कहत हैं, का कों धरिये ध्यान ।।

आंधळ्यांना आपण जर महाकाय हत्तीबद्दलचे मत प्रदर्शित करायला सांगितले ते तर आंधळे हत्तीला स्पर्श करुन, त्यांच्या अंध बुध्दीला जेवढे आकलन होईल तसे आणि तेवढेच सांगतील, त्यांच्या नजरेसमोर हत्तीची आकृती येणार नाही. कारण त्यांना दृष्टीच नाही. ते त्यांचे दुर्दैव. त्याप्रमाणे कर्मकाण्डांमध्ये गुंतलेले, ऐकीव माहितीच्या आधारे बोलणारे शास्त्रीपंडित केवळ आपल्या वाचिक अनुभवावर आधारित तेवढे बोलणार... परंतु परमेश्वरी अनुभव कधीच न घेतलेले एकूणच परमेश्वरी अस्तित्वावर अनुभवाशिवाय बोलणार कसे ?

आपले अनुभवसिध्द विचार मांडणाऱ्या स्पष्टवक्त्या कबीराचे आयुष्य सर्वसामान्य जनतेला अंधाऱ्या अध्यात्मगुहेतून सोडवण्यासाठीच जणू होते. त्यामुळे मुल्ला-मौलवींना आणि पंडित वर्गाला हादरे बसू लागले. ह्या पंडितवर्गाच्या क्षोभाला तोंड देत कबीरांनी आपल्या अभंगवाणीतून सडेतोडपणे अध्यात्म - विचार मांडत, समाजापुढचा अंधार नष्ट करण्याचा प्रयत्न केला. कुठल्याही विरोधाला न जुमानता परमेश्वराच्या प्राप्तीचा अध्यात्ममार्ग प्रत्येक संवेदनशील परम भक्ताला दाखवत, सहजसोपा उपदेश करीत राहणारे संत कबीर हा पंधराव्या शतकातला सर्वात मोठा दैवी चमत्कार होता.

परमभक्ताला दाखवत, सहजसोपा उपदेश करीत राहणारे संत कबीर हा पंधराव्या शतकातला सर्वात मोठा दैवी चमत्कार होता.

कबीराच्या जन्मकथा ज्या सांगितल्या जातात त्यात एकवाक्यता नाही. अठराव्या शतकापासून कबीराच्या जन्माबद्दल ज्या चमत्कारिक गोष्टी सतत सांगितल्या गेल्या आहेत त्या विलक्षणच आहेत. काही विद्वान अभ्यासक म्हणतात की, बनारस शहरात रामानंद स्वामी नावाचे एक सिध्द पुरुष होते. त्यांना नमस्कार करणाऱ्या एका ब्राह्मण विधवेस, ते समाधी अवस्थेत स्थित असताना अचानकपणे 'पुत्रवती भव' असा आशीर्वाद दिला गेला. तो आशीर्वाद फलद्रुप होऊन त्या स्त्रीस पुत्ररत्न झाले तो 'कबीर'. वास्तविक निंदानालस्ती होऊ नये म्हणून त्या विधवा स्त्रीने आपल्या पोटी जन्म घेतलेल्या ह्या बालकाला मध्यरात्री बनारस शहराजवळ जो लहरतला नावाचा तलाव होता. त्या तलावाच्या कडेला ठेवून ती आपल्या घरी गुपचूप परतली होती. नीरु आणि त्याची पत्नी निमा ह्या गरीब विणकर दांपत्यास पहाटे हे तेजस्वी बालक तलावाच्याकाठी दिसले. अपत्यहीन असलेल्या नीरु आणि निमा ह्या दांपत्याने त्या तेजस्वी बालकाला प्रेमाने घरी आणले आणि त्याचे नाव त्यांनी कबीर असे ठेवले, कबीर म्हणजे सर्वोच्च.... काही विद्वान अभ्यासकांच्या मते कबीराला माता-पिता नव्हतेच. काही विद्वानांच्या मते नीरु आणि निमा हे गरीब विणकर दांपत्य नदीकाठावरुन रात्रीच्या वेळी घरी जात असतांना

आकाशातून एक तेजस्वी किरण आला आणि त्या तेजस्वी किरणाने निमाच्या गर्भात प्रवेश केला, तो हा कबीर, म्हणून हे अवतारी पुरुष आहेत. काहींच्या मते कबीराने एका विणकर स्त्रीच्या पोटी जन्म घेतला होता. त्याचे माता-पिता मुसलमान होते. ह्या विविध जन्मकथांमधून एक सत्य शिल्लक राहाते ते हे की, कबीराला लहानाचे मोठे केले, ते त्याचे माता-पिता म्हणजे नीरु आणि निमा हे गरीब विणकर दांपत्य. कबीराचा एक दोहा आहे की,

अब तो हम कंचन भये, तब हम होते कांच ।
सत्गुरु की किरपा भई,दिल अपने का साच ।।

कबीर म्हणतात, ''जन्माच्या वेळी मी एक साधी काच होतो. परंतु माझे सद्‌गुरु स्वामी रामानंद हयांच्या असीम कृपेने मी कांचन म्हणजे, लखखणारे तेजस्वी सोने झाले. केवळ सद्‌गुरुंच्या कृपेमुळेच माझ्या ह्दयात अंतीम सत्याचा शाश्वत प्रकाश पसरला. हे सत्य काय तर, मी हिंदू नाही, मी मुसलमान नाही, मी माणूस आहे आणि माणूसकी हाच माझा धर्म आहे.

जा की साची सुरत है, ता का साचा खेल ।
आठ प्रहर चौसठ घरी, साई सेती मेल ।।

ज्याचे ह्रदय सत्य विचारांनी गच्च भरलेले आहे, ज्याच्या अंतःकरणातून सत्याचाच प्रकाश सतत पाझरतो आहे, तो सत्वनिष्ठ आहे, जो अष्टौप्रहर सत्याशीच, म्हणजे परमेश्वरी अस्तित्वाशी रममाण झालेला असतो तोच परमेश्वराच्या अत्यंत निकट असतो. कबीराच्या विचारांचे हे मूर्त रुप होते. गरीब विणकर कुटुंबात वाढलेला असा हा संतवृत्तीचा कबीर हा मूलतः धार्मिक वृत्तीचाच होता. कबीराला उर्दु वा संस्कृत भाषा येत नव्हत्या, त्यामुळे मुसलमानांचे वा हिंदूचे धर्मग्रंथ ह्यांचा अभ्यास त्याने केलेला नव्हता. परंतु कबीर जात्याच कुशाग्र बुद्धीचे होते. लहानपणापासून कबीरांनी आपल्या वडिलांना विणकामात साथ दिली. त्या विणकामात कबीर अत्यंत निष्णात होते. परंतु त्यांचा कल धंद्याकडे नव्हता तर आत्मिक चिंतनातच त्यांचा बराचसा वेळ जायचा. कबीर अखंड रामनामात दंग असायचे. भूतदया आणि विलक्षण औदार्य त्यांच्यपाशी होते. त्यामुळे वडिलांच्या व्यवसायात त्यांचे मन रमत नसे. कापड विकायला बाजारात गेल्यावर एखाद्या अत्यंत गरीब माणसाने जर वस्त्र मागितले तर कबीर पुढचा मागचा कुठलाही विचार न करता कापड देऊन टाकत. कबीरांच्या ह्या स्वभावाचा मातापित्यांना अत्यंत त्रास तर व्हायचाच, परंतु त्यांना काळजीसुद्धा वाटायची. घरी येणाऱ्या साधुसंन्याशांना तर कबीर कधीही उपाशी पाठवित नसत. घरात जे काही असे ते सर्व वाटण्याकडे त्यांचा कल असायचा. एका रामनामापलिकडे कबिरांनी स्वतःकडे काहीच ठेवले नाही. बरेचसे आयुष्य काशीक्षेत्री गेल्यामुळे तिथल्या शास्त्रीपंडितांची ज्ञानवाणी कबिरांच्या कानावर पडायची. ज्ञानाची विलक्षण ओढ असणाऱ्या कबीरांनी मूळाक्षरे जरी गिरवली नाही, कुठल्याही स्वरूपात शिक्षण जरी घेतले नाही, तरी केवळ ज्ञानचर्चेच्या सहवासात सतत वावरणाऱ्या कुशाग्र बुद्धीच्या कबिरांनी, सत्याचा शोध घेतच आयुष्यपट विणला. कबीर म्हणतात

मसि कागज छुओ नही,
कलम लग्यो नहीं हाथ।

''मी शाईलाही स्पर्श केला नाही की, कागदाला कधी स्पर्श केला.. मी हातात कधी लेखणी धरली नाही. केवळ रामाच्या कृपेने मी अज्ञाताचा शोध घेत परमेश्वरी अस्तित्वाला अनुभवण्याचा प्रयत्न करतोय." पाठशाळेत वा मदरशात जाऊन जरी कबिरांनी शिक्षण घेतले नव्हते तरी, कबीर अत्यंत ज्ञानी होते. एकपाठी होते. ज्ञान मिळविण्यासाठी कबीरांनी खूपच कष्ट सोसले. नाथयोग्यांच्या सहवासात राहून प्रेमसाधना केली. वैष्णव साधूंविषयी कबीरांच्या अंतःकरणात केवळ प्रेमभावच होता. जे अनुभवाने पटेल, तेवढेच स्वीकारायचे हा तर कबीरांचा स्वभाव होता. कबीर कुठल्याही संप्रदायाला चिकटून राहिले नाही. जे जे उत्तम आहे, जिथे केवळ सत्याचीच पूजा केली जाते, तेवढेच त्यांनी स्वीकारले. अंधश्रद्धा, अंधविश्वास, ढोंगबाजी याविषयी कबीरांना विलक्षण तिटकारा होता. ज्ञानसाधना करतांना कबीरांना सद्‌गुरू भेटावे अशी आस लागली होती. त्यांनी गुरूला शरण जायचे ठरविले होते. सद्‌गुरूंच्या चरणांशी बसूनच ज्ञानाची आराधना करायची असे कबीराने ठरविले आणि तो क्षण त्यांच्या आयुष्यात आला.

कबीरांनी स्वामी रामानंदांना गुरू करायचे मनोमनी ठरविले, परंतु आपल्यासारख्या, एका मुस्लीम विणकराच्या मुलाला हे कसा उपदेश करतील असा कबिरांना प्रश्न पडला. परंतु बुध्दीमान कबिरांना एक छान युक्ती सुचली. अगदी पहाटे कबीर एका घाटाच्या पायरीवर अंगाचे मुटकुळे करून पडून राहिले. स्वामी रामानंदाचा गंगेत स्नान करायला जाण्याचा तो नेहमीचा रस्ता होता. स्वामी रामानंदांचा पाय अंधारलेल्या वाटेवर पडून

असलेल्या कबिराला लागला. स्वामी रामानंद चटकन बोलून गेले, ''राम, राम, कोण झोपलेय इथे वाटेत ? " कबीर चटकन उठला आणि आपल्या सद्‌गुरूंना वाकून नमस्कार करून म्हणाला, ''सद्‌गुरूराय, मला रामनामात मिळाले," आणि आनंदाने निघून गेला, त्याने रामानंदाचे हृदय जिंकून घेतले. त्या दिव्य क्षणापासून कबीर रामानात अखंड दंग झाला. कबीर हा खालच्या जातीतला तर होताच, परंतु तो मुसलमान होता म्हणून स्वामी रामानंदांनी आपल्या ह्या शिष्याला काहीसे दूरच ठेवले होते. पंधराव्या शतकातल्या समाजव्यवस्थेचा विचार करता, ते फारसे अयोग्य होते, असेही नव्हते. समाजाचा क्षोभ कधी उफळून येईल हे त्या रूढी - परंपरेने ग्रासलेल्या समाजात वावरताना, कुणालाच सांगता येत नव्हते. परंतु कबिराच्या वागण्यातला नम्र भाव, त्याची संतवृत्ती, कुशाग्र बुद्धी ह्याची मोहिनी स्वामी रामानंदावर पडलेली होती. गुरूशिष्य नाते बहरू लागले होते. कबीर म्हणतात.

शिश तो ऐसा चाहिये, गुरू को सरबस देय।
गुरू तो ऐसा चाहिये, शिश का कछू न लेय।।

गुरू-शिष्य नातेसंबंध कसे असावेत तर, त्या नातेसंबंधांना पवित्र्याचा विलक्षण स्पर्श हवा. शिष्याने तर गुरूला आपले सारसर्वस्व अर्पण करायला हवे आणि गुरूसुद्धा अत्यंत प्रेमळ वृत्तीचा हवा. शिष्याकडून कणभरही स्वीकार न करणारा हवा. मुख्य म्हणजे दोघांमध्ये हवे-नकोचा पूल असता कामा नये हे कबिराचे ठाम मत होते.

गुरू साहिब करि जानिये, रहिये सबद समाय।
मिले जो दंडवत बंदगी, पल पल ध्यान लगाय।।

सद्‌गुरू हे परमेश्वराचे मूर्त रुप आहेत. सद्‌गुरूंच्या पवित्र सुखातून जे अंतिम सत्य प्रगट होत असते ते शब्द परमेश्वरी कृपेने झंकारलेले असतात. आपले सद्‌गुरू हे साक्षात परमेश्वर आहेत हे प्रथम जाणून घ्या आणि त्यांना भेटल्यावर साक्षात दंडवत घालून त्यांचे आशीर्वाद घ्या. त्यांची सेवा करा. त्यांच्याच नाम-चिंतनात रहा. प्रत्येक क्षण त्यांनाच अर्पण करा...

सब धरती कागद करूँ, लेखनि सब बनराय।
सात समुँद की मासि करूँ, गुरू गुन लिखा न जाय।।

कबीर म्हणतात की, ''आपल्या सद्‌गुरूंचे वर्णन करायला मजपाशी शब्दच नाहीत. संपूर्ण पृथ्वीचा कागद करून, संपूर्ण जंगलांतल्या वृक्षांच्या लेखण्या केल्या आणि सातही समुद्रांची शाई करून सद्‌गुरूंचे वर्णन करायला मी जरी बसलो तरी माझ्या सद्‌गुरूंचे वर्णन करणे मला शक्य होणार नाही. शाई संपेल, लेखण्या संपतील, कागद अपुरा पडेल, माझे शब्द संपतील, परंतु सद्‌गुरूंचे वर्णन पूर्ण करता येणार नाही. सद्‌गुरू हा शब्दांचा विषयच नाही " हे सत्य कबीर सांगत आहेत...

साचे गुरू की पच्छ में, मन को दे ठहराय।
चंचल ते निःचल भया, नहिं आवै नहिं जाय।।

सद्‌गुरूंची एकदा का प्राप्ती झाली की मन निर्मोही होते. त्रिविध तापांपासून सुटका होते. सुख दुःखांच्या पलिकडल्या तीरावर सद्‌गुरू आपल्याला घेऊन जातात. आपले एकूणच अस्तित्व एकदा का सद्‌गरूंमध्ये विलिन झाले की, प्रापंचिक जीवनात होरपळणारे मन चंदनासारखे शीतल गंधभारले होते. म्हणून कबीर म्हणतात की,

''आपले मन, आपले चित्त सद्‌गुरूचरणी स्थिर करावे. सद्‌गुरूंच्या प्रेमळ छत्राखाली, त्यांच्या शाश्वत बलदंड पंखाखाली आपण सुरक्षित राहतो. चंचल मनाला शांत करण्याची अपूर्वशक्ती केवळ सद्‌गुरूपांशीच असते. बाह्य विश्वात सुखेनैव भटकणारे मन स्थिर होईल. त्याचे भटकणे थांबेल. "

मानवी जीवनात सद्‌गुरूची आवश्यकता काय? हे आवर्जुन सांगताना कबीर म्हणतात.

बिन सत्‌गुरू बाचै नही, फिरि बूडै भव माहिं।
भवसागर के त्रास में, सत्‌गुरू पकरैं बाँहिं।।

सद्‌गुरूंचा अखंड प्रेमभारला सहवास लाभला तरच ह्या करीत असलेल्या प्रपंचातून सुखरूपणे सुटका होईल. सद्‌गुरूंच्या कृपेशिवाय या संसारसागरातून सुटका होणे केवळ अशक्य आहे. माणूस ह्या संसारसागरात गटांगळ्या खात असतो. हा भवसागर तरून जाणे त्याला केवळ अशक्य असते. परंतु त्याच्या भाग्याने जर सद्‌गुरूंची कृपा झाली, त्यांचे प्राण भारले आशीर्वाद त्याला जर लाभले तर ह्या भवसागरात बुडत असताना, तेच आपल्या शिष्याला हात देतात आणि त्याला भवसागरातून बाहेर काढतात. त्याचा सांभाळ करतात आणि भवसागराच्या पलिकडल्या किनाऱ्यावर नेऊन सोडतात. जे आपल्या सद्‌गरूंच्या चरणांशी विलिन होतात, तेच हा भवसागर पार करून जातात.

तीन लोक नव खंड में, गुरू तें बडा न कोई।
करता करै न करी सकै, गुरू करै सो होई।।

कबीरांनी आपले अनुभवसिद्ध मत मांडले आहे की, ‘‘त्रैलोक्यात तसेच नवखंडात सद्‌गुरूंसारखा आणि सद्‌गुरूंपेक्षा श्रेष्ठ दुसरा कोणीही नाही. परमेश्वरापेक्षा आपला सद्‌गुरू अधिक मोठा आहे. परमेश्वर एखादी अशक्य गोष्ट करू शकेल किंवा नाही, परंतु सद्‌गुरूंची एकदा का आपल्या परमशिष्यवर केवळ कृपादृष्टी जरी वळली तरी अशक्य वाटणाऱ्या गोष्टीसुद्धा शक्य होतात. सद्‌गुरूच केवळ आपल्या सत्‌शिष्याचे कल्याण करू शकतो. त्याच्या सर्व इच्छा पूर्ण करू शकतो.

चार खानि में भरमता, कबहूँ न लहता पार।
सो तो फेरा मिटि गया, सत्‌गुरू के उपकार।।

परमेश्वराने निर्माण केलेली अवघी जीवसृष्टी चार खाणींमध्ये म्हणजेच उभ्दीज, जारज, अंडज आणि श्वेदजमध्ये विभागली गेली आहे. एकूण चौऱ्याऐंशी लक्ष योनींमधून प्रवास केल्यावर हा मानवी भाग्यवान जन्म प्राप्त होतो. मुक्तीचा प्रवास केवळ मानवी योनीलाच करणे शक्य आहे. त्यासाठी सद्‌गुरू लाभावा लागतो. कबीर म्हणतात की,

‘‘मी ह्या चार खाणींमधून आजपर्यंत भटकत होतो. भवसागर पार करणे मला केवळ अशक्यच होते. परंतु ह्या भाग्यवान मानवी योनीमध्ये सद्‌गुरूंची प्राप्ती झाली. त्यांच्या कृपाप्रसादामुळेच माझी प्रगती झाली. जन्ममृत्युच्या येरझाऱ्या संपुष्टातच आल्या.” कबीरांनी सद्‌गुरूचे महत्व फार प्रभावीपणे आपल्या दोह्यांमधून मांडलेले आहे.

पारमार्थिक आयुष्याची विलक्षण ओढ कबिरांना अगदी लहान वयातच लागली होती. कबीर आपला सर्व वेळ आत्मिक चिंतनात आणि अध्यात्मभारल्या विचारात मग्न होण्यात घालवतो ह्याची चिंता नीरू आणि निमाला लागली होती. विणकामात अत्यंत निपुण असणाऱ्या कबीराची दृष्टी धंद्यातल्या नफा-तोट्याशी कधीच स्थिर झाली नव्हती तर रामनामातच दंग होऊन शेले विणणारा कबीर बाजारात शेले विकायला गेल्यावर पैसे मिळवून आणीलच ह्याची खात्री आई-वडिलांना वाटत नव्हती. कबीर आता तरूण झाला होता. त्याचे लग्न करून दिल्यावर हा प्रपंच नीट मांडेल की नाही ह्याची त्या दोघांना काळजी लागली होती. पुढे कबीराचे लग्न झाले. त्याच्या पत्नीचे नाव लोई. लोईने कबीराचा अनुग्रह घेतला होता. कबीराला दोन मुले झाली. मुलाचे नाव होते कमाल, मुलीचे नाव होते कमाली. घरातील वातावरण भक्तीमय होते. अध्यात्मविचाराने परिपूर्ण होते. लोई तर कबिराच्या सान्निध्यात वाढत होती. कबीराच्या विचारांचा पगडा तिच्यावर जबरदस्त पडला होता. कबीराची ती गुरू म्हणून खूप सेवा करायची. गुरुअज्ञा पाळायची. घरी आलेल्या साधुसंतांची सुद्धा लोई सेवा करायची.

एके दिवशी एक विलक्षण घटना घडली. सायंकाळची वेळ होती. कबीराकडे काही संतसाधु आले. दिवस पावसाळ्याचे होते. कबीरांना त्या दिवशी शेले विकायला बाजारात जाता आले नव्हते. कारण बाहेर पाऊस मुसळधार पडत होता. साधु मंडळींना भोजन द्यावे असे कबिराच्या मनात होते. परंतु घरात तर अन्नाचा कण नव्हता की पैसेसुद्धा नव्हते. कबिराने आपली पत्नी लोईला सांगितले की ‘‘बाजारात जाऊन कुणी उधार धान्य देते का ते पहा.... उद्या शेले विकल्यावर आपण पैसे परत करू. ”

लोई लगेच बाजारात गेली. कुणीही उधार धान्य द्यायला तयार नव्हते. एक वाणी तयार झाला. परंतु त्याने लोईला एक अट घातली की त्या दिवशी रात्री लोईने त्याच्या घरी त्याच्याबरोबर झोपायला यायचे. वाण्याचे हे बोलणे ऐकून लोई विचारात पडली. हा तिच्या पातिव्रत्यावरच घाला होता. ती गप्प बसली. वाण्याला वाटले, तिचे मौन हीच संमती आहे आणि त्याने लोईला पुरेसे धान्य दिले. लोई घरी आली, स्वयंपाक केला. साधु मंडळींना जेवायला वाढले. साधु मंडळी तृप्त झाली.जाताना आशीर्वाद देऊन सर्व माघारी गेले. रात्र कोंदाटू लागली. लोई रडू लागली कबिराला काहीच कळेना. खोदून खोदून विचारल्यावर लोईने रडत रडत कबीराला सर्व हकिगत सांगितली. वाण्यालाच सन्मार्गावर आणण्याचे कबिराने ठरविले आणि त्याने आपल्या पत्नीला वाण्याकडे जायला सांगितले. कबिराने आपल्या पत्नीच्या भोवती कांबळे गुंडाळले. पत्नीला खांद्यावर घेऊन कबीर वाण्याकडे आला. लोई वाण्याच्या घरात गेली. वाण्याला खूपच आनंद झाला. त्याची वासना आता पूर्ण होणार होती. परंतु बाहेर एवढा पाऊस कोसळत असताना लोई एवढी कोरडी कशी राहिली ह्याचे वाण्याला आश्चर्य वाटले. त्याने लोईला विचारले की ‘‘तू ओली कशी नाही झालीस ? बाहेर तर पाऊस कोसळतोय... ”

लोईने सर्व हकिगत सांगून, बाहेर कबीर उभा आहे असे

सांगितले. कबीर स्वतःच आपल्या पत्नीला घेऊन आले हे ऐकून वाणी थक्क झाला. त्याला आपल्या नीच कृत्याची लाज वाटली. तो बाहेर आला आणि त्याने कबीराची क्षमा मागितली. त्याच्या चरणांवर लोटांगण घातले. कबीराने वाण्याला क्षमा केली. वाणी कबीराचा शिष्य झाला.

कबीराचे अवघे व्यक्तिमत्व अत्यंत प्रभावशाली होते. पावित्र्य हा त्याच्या एकूणच जीवनाचा विशेष होता. त्याच्या सहवासात वावरायला मिळावे असे सर्वांनाच वाटायचे. विचार ठासून भरलेला असायचा. कबीर जात-पात-धर्म ह्यांच्या पलिकडे गेलेल होता. मूर्तीपूजा, तीर्थयात्रा, उपास-तापास, तीर्थस्नान, हठयोग ह्या सर्वांच्या विरोधात त्याने आपली परखड मते मांडली. परमेश्वराला जात नाही की धर्म नाही तर त्याच्या भक्तांना ही जात-पात-धर्म कशाला चिकटायला हवीत, असे तो रोखठोकपणे विचार मांडत होता.

जात नहीं जगदीश की, हरि-जन कि कहा होय।
जात पात की कीच में, डूब मरो मत कोय।।

ज्या बनारसमध्ये कबिराचे अवघे आयुष्य व्यतीत झाले, त्या बनारसमध्ये कर्मकाण्डांचा अक्षरशः उच्छाद मांडला गेला होता. बनारसमध्ये वर्षानुवर्षे गंगास्नान, पुण्यकर्म, व्रतवैकल्ये, शास्त्रपठण, यज्ञहवन आदी भक्तांच्या भावनांना खतपाणी घालणाऱ्या क्रिया अष्टौप्रहर झडत होत्या. त्याच बनारसमध्ये कबीर ह्या थोतांडांना आपल्या कृतीतून आव्हान देत होता. लोकांना ह्या कर्मठ कर्मकाण्डातून बाहेर काढणे एवढे सोपे नव्हते. कबिराने अत्यंत कठोर शब्दात आपले विचार मांडून नामसाधनेचे महत्व सांगितले. कबिराचे कुठल्याही जातीशी वा धर्माशी वैर नव्हते. तो फक्त सत्य शाश्वत विचार मांडत होता. त्याचा परिणाम असा झाला की, हिंदू पंडित आणि मुसलमान मौलवी कबीराचा द्वेष करू लागले. त्याचा छळ करू लागले. कारण कबीराच्या उपदेशाचा जनसामान्यांवर हळूहळू परिणाम होऊ लागला होता. पंडित आणि मौला मौल्लवींच्या आर्थिक कमाईवर परिणाम होत होता. प्रत्येक संत पुरूषाला समाजिक रोषाला सामोरे जावेच लागते. त्याचे स्वरूप वेगळे वेगळे असेल, परंतु छळ हा प्रत्येक सत्पुरूषाला सोसावाच लागतो. कबीरानेसुद्धा तो आनंदाने सोसला. परंतु आपला उपदेशधर्म त्याने चुकूनही सोडला नाही. कबीर स्पष्ट भाषेत बोलत होता.

माला तिलक पहरि मन मानाँ,
लोगन राम खिलौना जाना।

परमेश्वराने प्रसन्न व्हावे म्हणून लोक विविध प्रकारे प्रयत्न करीत असत. तऱ्हेतऱ्हेने रंगीत पेहराव घालून, अंगावर भस्माचे पट्टे ओढून, कपाळावर तिलक कोरून,गळ्यात विविध प्रकारच्या रंगीबेरंगी माळा घालून देवाच्या मूर्तीला सजवतात. त्यांना वाटते, देवावर अशी आभुषणे आणि वस्त्रे घालून देव प्रसन्न होतो. हे भक्त लोक देवाला जणू खेळणे समजतात ह्याची चीड कबिराला येत होती. भक्ती पातळीवर देवाचे खेळणे करून खेळणे कबिराला अजिबात मान्य नव्हते. परंतु कबीराचा हा उपदेश पंडित वर्गाला आणि मौलवींना झोंबणारा होता. कबीराचा कितीही छळ केला तरी तो शरण येत नाही हे पाहून त्यांनी सुलतान सिकंदर लोदीकडे खोटी तक्रार केली. सुलतानानेसुद्धा कबीराचे अतोनात हाल केले. त्याने कबीराला नदीत बुडवण्याचा प्रयत्न केला. कबिराचे हात-पाय साखळदंडाने बांधून नदीत फेकून दिले. आश्चर्य म्हणजे हाता-पायाला बांधलेल्या साखळ्या तुटल्या आणि कबीरावर परमेश्वराने कृपा करून बुडण्यापासून वाचवले. ही रामकृपा होती. अखंड रामनामाची किमया होती. मग सुलतानाने पुन्हा साखळदंडाने हातपाय करकचून बांधून पिसाळलेल्या हत्तीपुढे टाकले. माहुताने कबीराला हत्तीला पायाखाली चिरडण्याचा प्रयत्न केली. परंतु हत्ती काही जागेवरून हल्लाच नाही. माहुताने आपल्या अकुंशाने हत्तीच्या माथ्यावर प्रहार केले. हत्ती जागचा हल्ला नाही. त्यानंतर सुलतानाने धगधगीत आगीत कबीरला फेकण्याची आज्ञा केली, परंतु आग आपोआप विझली. मुल्लामौलवी आणि पंडित वर्ग स्तब्ध झाला. ते सर्व चुपचाप खडे उभे होते. सुलतानाने लज्जेने मान खाली घातली आणि तो कबीराला शरण गेला. सुलतानाने कबिराची क्षमा मागितली.

कबीराने केवळ कर्मकाण्डावर प्रहार केला नव्हता तर त्यातले लपलेले ढोंग उघडकीस आणण्याचा जबरदस्त प्रयत्न केला होता. बाह्यांगाने साधू होणे, हे लोकांना फसवणे आहे ह्याची जाणीव कबीराने समाजाला दिली होती. अर्थहीन कर्मकाण्डे स्वर्गाचे द्वार कधीच उघडत नाहीत वा ही अर्थहीन कर्मकाण्डे मोक्षाचा मार्ग लख्ख करीत नाहीत. अशा लोकांपासून सर्वसामान्य भाविक जनतेचे रक्षण करण्यासाठी कबीरवाणी घुमत होती. कबीराने कधी पोकळ वचनांचा सडा टाकला नाही. प्रत्यक्ष कृतीतून कबिराने सर्वसामान्यांसाठी ज्ञानमार्ग खुला करुन दिला

होता. परमेश्वर आपल्या देहातच नांदतो आहे. त्या परमात्म्याला बाहेर शोधायला जाऊ नका हे कबीराचे सर्वांनाच सांगणे होते.

तेरा साहेब है घट मार्ग,
बाहर नैना क्यों खोले ।
कहैं कबीर सुनो भाई साधो,
साहेब मिल गये तिल ओले ।।

परमात्मा आपल्या देहातच नांदतो आहे. त्या परमात्म्याचा अनुभव घ्यायचा असेल तर आपण आपल्या देहातच डोकावून पहा म्हणजे परमेश्वराचे अस्तित्व आपल्यापाशीच नांदते आहे हे प्रकर्षाने जाणवेल. कबीर म्हणतो की ''परमेश्वर आपल्या देहातच नांदतो आहे हे सत्य लक्षात आले की मग त्याचा शोध घेण्यासाठी त्याला डोळे उघडून बाहेर बघायला कशाला प्रयत्न करायला हवा. आपल्या दोन डोळ्यांच्या मध्यभागी जो तीळाएवढा एक सूक्ष्म डोळा आहे. त्यालाच दिव्यचक्षु म्हणतात. त्या ठिकाणी परमेश्वराचे वास्तव्य आहे ह्याचं ज्ञान झाले की, परमात्म्याचा शोधच संपतो. तेच मुख्य द्वार आहे. हा दरवाजा एकदा का उघडला की, परमेश्वराचं सहजपणे दर्शन घडते. त्यासाठी कुठल्याही कर्मकाण्डाची अजिबात गरज भासत नाही.

ददा देखी जु बिनसन हारा,
जस अदेखी तस सखी बिचारा ।
दसवै दुआरी कुंची जब दिजै,
तउ दइआल को दरसनु कीजै ।।

षट्चक्रांपैकी दोन भुवयांमध्ये जे चक्र आहे त्याला आज्ञाचक्र म्हणतात. या चक्राची देवता सदगुरु आहे. याच्या ठिकाणी सायुज्यमुक्ती प्राप्त होते. षट्चक्रांमध्ये हे आज्ञाचक्र अत्यंत

महत्वाचे आहे. या चक्राशी साधकाला स्वस्वरुपाचे ज्ञान होते. प्रकाशरुप आणि नादरुप ब्रह्माचा प्रत्यक्ष अनुभव येतो. नित्यानंदाची प्राप्ती होते. कबिराने ह्या आज्ञाचक्राला तिसरा नेत्र म्हणून संबोधले आहे. हे आंतरिक सूक्ष्म द्वार आहे, असे कबीर म्हणतो. हे द्वार उघडणे सोपे नाही. कारण मन आणि जीव ह्या बाह्य विश्वाशी हे जखडले गेले आहे. जीव मनाबरोबरच तर जखडला जातो. हा आत्मा शरीराच्या पिंजऱ्यात जखडला गेला आहे. तो आत्मा आपल्या मूळ स्वगृहाविषयी म्हणजेच मूळ परमात्म्याविषयी अजाण आहे. कबीर म्हणतो की, ''ही आत्मरुपी शरीराची जी मूळ नऊ द्वारे आहेत त्या दरवाज्यातून मुक्तपणे भटकत राहाते. त्यामुळे तिचा पती जो परमात्मा आहे त्याच्याशी तिचे मीलनच होत नाही, कारण ते तर ह्या आज्ञाचक्राच्या दहाव्या द्वाराशी आहे.'' त्याला कबीर दिव्यदृष्टी म्हणतो. त्या द्वाराचा वेध घेणे म्हणजे साधना. कबिराचे अध्यात्म हे सूक्ष्म आहे. बनारसचे पंडित लोक ह्या शुध्द ज्ञानाविषयी अनभिज्ञ आहेत. म्हणून ते कर्मकाण्डांमधून त्यांचे अध्यात्मज्ञान सतत फिरवत ठेवतात, म्हणून तर परमात्याची प्राप्ती होत नाही. कबीराचे ह्या पंडितवर्गाबरेबर आणि मुल्ला मौलवींबरोबर म्हणूनच हे वाक्युध्द चालू होते. हा कबिराचा रोखठोकपणा लक्षात घेतला की कबीराचे श्रेष्ठत्व लक्षात येते. कबीराचा अवघा प्रयत्न ह्या दहाव्या द्वाराशी घोटाळत होता. आध्यात्मिक साधनेत अत्यावश्यक गोष्ट कुठली तर मन आणि जीव वश करुण घेणे कारण या दोन गोष्टी देहाच्या नवद्वारांमधून आयुष्यभर तर भरकटत राहातात. कबीराचे एक वारंवार सांगणे होते की, नवद्वारे बंद करुन वृत्तीला प्रथम आवर घाला. ह्या विश्वाच्या मोहपसाऱ्यातून मनाला मोकळे करा. शरीर भावनेशी रत होणारा आत्मा जेव्हा मुक्त होऊन ह्या भुवयांमधल्या दहाव्या द्वाराशी स्थिर होईल आणि परमात्म तत्त्वाची जाणीव तेव्हाच जीवाला होईल. त्यासाठी ज्ञानसाधना हवी, केवळ कर्मकाण्डांमध्ये जीव अडकवून नवद्वारांमध्ये भटकत राहू नका, हेच कबीराचे सांगणे आहे, हाच त्याचा खरा उपदेश आहे. त्यासाठी नामसाधना आवश्यक आहे. नामच परमपदाच्या म्हणजे परमेश्वराच्या प्राप्तीचे साधन आहे.

जहाँ भक्ति तहँ भेष नहि, बर्नासम तँह नाहिं ।
नाम भक्ति जो प्रेम से, सो दुर्लभ जग माहिं ।।

कबिराचे वारंवार सर्वांना एकच सांगणे होते की, जेव्हा सद्गुरुकृपा होईल तेव्हा भक्तीचा शाश्वत मार्ग आपोआप खुला होईल. ज्याला सद्गुरुंचे महद्भाग्याने निकट सान्निध्य मिळेल

त्याला प्रेमाने आणि अतीव श्रध्देने परमेश्वराचे नाम अखंड घेता येईल. मौला-मौल्लवी काय किंवा समाजातला कर्मकाण्डामध्ये बुडून गेलेला पंडित वर्ग काय, तो तुमचा श्रध्देय ज्ञानभक्तीचा मार्ग कधीच खुला करुन देणार नाही. महत्त्वाचे काय तर जिथे श्रध्देय भक्ती आहे, परमेश्वराविषयी अत्यंत प्रेम आहे. तेथे भोंदुपणाचा देखावा करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. त्या ठिकाणी वर्णाश्रमभेद नाही, जातीभेद नाही. केवळ नामसाधनेत अखंड दंग झालेला साधन भक्त, ज्ञानभारती भक्ती केवळ दुर्लभच आहे. हे विश्व भोंदु साधूंनी भरलेले आहे. त्यांच्यामागे लागू नका, हाच कबीराचा संदेश आहे.

मध्ययुगीन संतांमध्ये काहीसा बंडखोर वृत्तीचा, परंतु समाजाला परमेश्वर प्राप्तीचा अत्यंत योग्य असा श्रेष्ठ ज्ञानभारला भक्तीमार्ग प्रेमाने विशद करणारा संत कबीर हा फार मोठा चमत्कार होता. एकशे-वीस वर्षांचे प्रदीर्घ आयुष्य लाभलेल्या कबीराने आयुष्यभर रामनामात आपला प्रत्येक श्वास ओतला. समाजातली अंधश्रध्दा दूर करत कबीराने सर्व धर्मांना, पंथांना ज्ञानमार्ग खुला केला. कबीराचे सांगणे सत्य होते की,

साच बराबर तप नहीं, झूठ बराबर पाप ।
जा के हिरदे साच है, ता हिरदे गुरु आप ।।

सत्यासारखे तप नाही आणि असत्यासारखे पाप नाही. ज्याच्या हृदयगाभाऱ्यात केवळ सत्याचाच शांत-शीतल पौर्णिमेच्या पूर्णचंद्राचा प्रकाश पसरलेला आहे, त्याच्याच हृदयात सद्‌गुरुंचा निवास असतो. ज्याच्या हृदयात सद्‌गुरुंचा वास आहे, तो पापकर्मांपासून आपोआप मुक्त होतो. त्याला कधीच शाप लागत नाहीत. त्याच्यावर काळाची झडप पडणार नाही.

कबीराचा नश्वर देह जरी वयाच्या एकशेविसाव्या वर्षी पचंत्वात विलीन झाला तरी कबीर-वाणी अवकाशात घुमत राहिली. जो पर्यंत आकाशात चंद्र-सूर्य-तारे चमकत राहातील, तोपर्यंत कबीराची अभंग विचारधारा ब्रम्हांडभर घुमत राहील. कबीराच्या शब्दात सांगायचे झाले तर कबीर सतत म्हणत असे की ''मी एक साधा विणकर, परंतु मला परमेश्वराशी मीलन व्हावे एवढीच आस लागली आहे. माझा देह प्रभुचरणी विसावा घेत पडता एवढीच इच्छा आहे.

ज्यूँ जलमें जल पैसि न निकसै,
यूँ ढुरि मिलै जुलाहा ।।

पाण्यात पाणी मिसळले गेल्यावर ते जसे एकमेकांपासून विलग करता येत नाही ना, त्याप्रमाणे हा गरीब विणकर परमेश्वरामध्ये पूर्णपणे सामावून गेला आहे.''

कबीराच्या समग्र वाङःमयातून, महत्त्वाचा विचार प्रत्येक साधकाने घ्यावा असा एक विचार कोणता तर,

भाग बडे जो संत पधारे,
करि सुमिरन भवसागर तारे ।।
एही संत है परउपकारी,
सरन आय वाको लेत उबारी ।।
साहेब को घर संतना माहीं,
साहेब संत कछु अंतर नाहीं ।।
कहै कबीर संत भले पधारे,
जनम जनम के कारज सारे ।।

कबीर कृतज्ञतेच्या भावनेने ओथंबलेल्या स्वरात म्हणतात की, ''माझे भाग्य थोर, पूर्व सुकृत जबरदस्त, म्हणून मला संत भेटले. त्यांचा पवित्र सहवास लाभला. ह्याच संतांनी मला नामस्मरणाचे महत्त्व समजावून सांगितले. माझ्याकडून नामस्मरण करवून घेतले. त्यांनीच तर मला ह्या भवसागरातून तारुन नेले. संत पुरुष परोपकारी असतात. जे साधक भक्त, संत पुरुषांना सर्वार्थाने शरण जातात, त्यांचा उध्दार केवळ संतच तर करतात. परमेश्वराचे प्रगट रुप म्हणजे संत. परमेश्वर आणि संत यांच्यात तीळमात्र फरक नाही. मला संत भेटले म्हणून ही माझी मानवी कुडी धन्य झाली. चौऱ्याऐंशी लक्ष योनींच्या प्रवास चक्रातून सोडवण्याचे कार्य ह्या संतांनीच तर केले. माझी जन्म-मृत्यूच्या यातनाचक्रातून सुटका झाली.

कबीर साक्षात्कारी संतपुरुष होते. त्यांनी आपला देह विसर्जित केला तेव्हा त्यांच्या देहाचे दफन करायचे की दहन करायचे हा हिंदु-मुसलमानांमध्ये मतभेद जेव्हा उत्पन्न झाला तेव्हा एक चमत्कार घडला. कबिराच्या देहावरची चादर दूर केली गेली तेव्हा त्या मृत शरीराच्या जागी फुलांचा गालिचा पसरलेल्या दिसला. स्वतः कबीरांनी आपला हा प्रश्न स्वतःच सोडवलेला होता....

श्री. वामनराव अच्युत देशपांडे
१३, प्रियदर्शनी, अग्रवाल हॉल लेन,
मानपाडा रोड, डोबिंवली (पूर्व) ४२१ २०१.
भ्रमणध्वनी : ९३२४६ १५०७७.
गुरु अंतर्यामी

आत्मशोध

माधवी कुंटे

नेहमीच्या शिरस्त्याने ड्रायव्हरने किल्यातून गाडीची किल्ली घेतली. महेंद्रांनी बॅग घेतली आणि तो खाली उतरला. महेंद्राचा नाश्ता संपत आला होता. ते गौरीला म्हणाले,

"चहा नको आता, तिकडे ऑफिसातच घेईन".

गौरी म्हणाली,"एवढा काही उशीर होत नाहीए. चहा घेऊन जा आणि आज जरा लवकर या. अनायसे चंदरला सुट्टी आहे. त्याच्याशी बोलून घेऊ ".

तिचं हे सूतोवाच ऐकल्यावर ते अस्वस्थ झाले. त्याला त्याच्या आयुष्याचा जो मार्गक्रम आखायचा तो आखू द्यावा. आपण ढवळाढवळ करू नाही असं त्यांना वाटत होतं. गौरीचं म्हणणं होत, त्याला काय करायचय ते आता आपल्याला कळायला हवं. आय.आय. टी. तून केमिकल इंजिनीयर झाल्यावर त्याला उत्तम नोकरी लागली. भरपूर पगार आहे. घरदार आहे. त्याच्यासाठी म्हणून या फ्लॅटला जोडूनच फ्लॅट घेतलाय. नोकरी लागून तीन वर्षे झाली. लग्नाचं वय झालय. त्यानं काही ठरवलं नसेल तर मुली बघून योग्य स्थळ पारखून त्याचं लग्न लावून देणं आपलं कर्तव्य आहे.त्यामुळे याबाबतीत त्याच्याशी बोलायला हवेच. त्यांनी विचारलं ''

"आत चंदर काय करतोय? सुट्टी आहे तर नाश्त्याला कसा आला नाही"?

"तो सकाळपासून ध्यानाला बसलाय, ध्यानातून उठला की मी त्याला सांगणार आहे. संध्याकाळी आपल्याला त्याच्याशी बोलायचय. तेव्हा तुम्ही जरा लवकरच या."

महेंद्रनी खांदे उडवले,नाइलाज आहे यायला हवं. असा तो आविर्भाव होता. त्याकडे गौरीनं दुर्लक्ष केलं. चहा संपवून ते निघाले. गाडीत बसले तरी चंद्रशेखरचा त्यांच्या धाकट्या मुलाचा विचार त्यांच्या डोक्यात होताच. चंद्रशेखर हे नाव सुद्धा आपण आपल्या वडिलांच्या आग्रहावरून ठेवलं. त्यांना कैलाशला मानसरोवर गेलेली स्वप्ने पडत होती. त्या सुमाराला ते मानससरोवरच्या यात्रेला गेले होते. तिथे त्यांना कसलासा दृष्टांत झाला होता. त्यामुळे याचं नाव चंद्रशेखर ठेवायचं हे त्यांनी ठरवून टाकले होते. आपला मुलगा वडिलांच्या श्रद्धेहून वेगळा असलेला,आध्यात्मिक पिंडांचे नेहमी नवल वाटे. आपल्या मतांना त्यांनी विरोधही केला नाही. ते म्हणत,

"तुला पूजा करायची नसेल, मूर्तीत देवत्व असल्याचं मान्य नसेल तर नको करूस. हे सगळं मनापासून व्हायला हवं. एरवी श्रद्धेविना त्याला अर्थ नाही. आपण नेहमी म्हणत असू, रोकडी प्रचीती आल्याशिवाय विश्वास कसा बसणार बाबा"?

बाबा म्हणत, "ज्या मार्गाकडे तू पाठ फिरवलीस त्यात शिरून काही जाणून घेण्याचा प्रयत्न केला नाहीस त्याची प्रचीती कशी येणार"?

मला तर जपजाप्य पूजा, नेम वगैरे वेळेचा अपव्यय वाटतो. जप करण्याऐवजी त्या वेळेत काही तरी विधायक कार्य का करू नये?

जपाने बुद्धी एकाग्र होऊ लागते. त्यामुळे कामे झपाट्याने होतात. एकाग्रता साधण्याचा तो मार्ग आहे. शिवाय पुढे जप मनोभूमीत इतका समाविष्ट होतो की काम करताना आपोआप चालत राहतो. माझं कामच मला इतकं आवडतं की त्यात आपोआप बुद्धी एकाग्र होते.

ठीक आहे महेंद्र, ते काम हीच तुझी ईश्वर पूजा आहे. कर्तृत्वाचा अहंकार मात्र होऊ देऊ नकोस. तुझं काम हेच तुझं

जीवन सर्वस्व असल्याने ते चांगलं केलस तरी तू स्वत:साठी केलस त्याचा गर्व होऊ देऊ नकोस म्हणजे झालं ".

इतक्या सरळ रीतीने बाबांनी आपल्याला आपलं जीवन आपल्या मताप्रमाणे जगण्याची मुभा देऊन टाकली होती. आपली मोठी मुलगी अमरजा. ही आपल्यासारखीच सध्या नासात कामाला आहे. तिचा नवराही तिथेच शास्त्रज्ञ आहे. याचा अहंकार नाही तरी अभिमान मात्र आपल्याला नक्कीच वाटतो. चंद्रशेखरच्या बुद्धीची चुणुक लहानपणापासूनच दिसत होती. पण तो पहिल्यापासून शांत होता.बाबा जपाला बसायचे त्यांचा मनात जप चाले. त्यांच्याबरोबर तो बसायचा मग तो ज्योतीवर नजर केंद्रित करून ध्यान करू लागला. सुरूवातीला त्या काळातच क्षणमात्र झोप लागायची.त्याच्या म्हणण्याप्रमाणे त्याचं भान हरपायचं. माग हळूहळू हा प्रकार नाहीसा झाला. त्याच्यात काही तरी एक्स्ट्रा सेन्सरी परसेप्शन उपजत असावं असं आपल्याला नेहमी वाटत आलय. अमरजाची नासाच्या विशेष प्रॉजेक्टसाठी निवड झाल्याचा तिचा फोन आपल्याला पहाटे आला. त्याच्या आदल्या रात्रीच तो म्हणाला होता, अमरजाला खूप चांगली संधी चालून आलीय. तेव्हा त्याच्या आदल्या दिवशीच्या भाकिताचं आपल्याला नवल वाटलं होतं. आपल्या बाबांची जाण्याच्या आदल्या दिवसापर्यंत उत्तम तब्बेत होती. तो आदल्या दिवशी म्हणाला होता,

"आजोबांना उद्या जपायला हवं "बाबांना असा हार्ट अटॅक यावा याला वरकरणी काहीच कारण नव्हतं. चंदर मात्र शांतपणे म्हणाला, आजोबांचा यापुढचा प्रवास खूप आनंदाचा असेल,

आपण शोक करता कामा नये. नाहीतर त्यांचं चैतन्य आपल्या या संवेदनाच्या जवळ घुटमळेल. त्याची पुढची प्रगती थांबेल.

आपल्याला तेव्हा चंदरला हलवून म्हणावसं वाटलं होतं, असलं अनाकालनीय निराधार, आता काहीही बोलू नकोस. पण मग लक्षात आलं तो बुवाबाजी करत नाही. श्राद्ध करा, पिंडीदान करा म्हणत नाहीए. तो फक्त म्हणतोय, त्यांच्यासाठी शोक करू नका. तो तर बाबांशी घट्ट जोडलेला होता. पण तो शांत आहे आणि बाबांच्या मृत्युची चाहूल त्याला लागली तशी मृत्यूनंतरच्या वाटचालीची चाहूलही लागली असण्याची शक्यता आहे. त्यानं जो जीवनक्रम जी मूल्ये जी तत्वे स्वीकारली त्याबद्दल प्रश्न उपस्थित करण्याचं कारण नाही. चंदरनं मनाशी काही तरी ठरवलं असलच पाहीजे. आपण कशाला त्याला विचारायचं ? कळेल आपोआप. असं आपल्याला वाटतं. पण गौरी फार अस्वस्थ आहे. चंदरबाबत जरा जास्तच जपणूकीचा कल आहे तिचा. ती नाही थांबायची आता. कदाचित तिला असं वाटत असेल की नीट संसार सुरू झाला की चंदर असा मधेमधे भ्रमंतीला जाणार नाही. वाचन आणि ध्यान करतो. जगातल्या सुखांकडे त्यानं पाठ फिरवलीय. ते सगळं बदलेल. त्याला कसंही जेवण चालतं. जेवण नसलं तरी चालतं. कपड्याच्या बाबतीत उदासीन कसलीच कॉस्मॅटिक्स वापरत नाही. अगदी कमी बोलतो. नव्या पिढीची गाणी त्याला चालत नाहीत. नाटक, सिनेमा काहीच आवडत नाही. आवडत नाही म्हणण्यापेक्षा तो त्याबाबतीत उदासीन आहे. आपला मुलगा इतका निरिच्छ आणि नीरस असावा हे तिला धोक्याचं वाटतं . त्यानं निवडलेल्या मार्गावरूनच तो जाईल. आपण त्याबाबतीत काहीही करू शकणार नाही हे तिला कितीही समजावलं तरी समजत नाही. त्यामुळे आता काय तो सोक्षमोक्ष होऊनच जाऊ द्यावा.

"साहेब संध्याकाळी किती वाजता यायचं ? "

ड्रायव्हरच्या प्रश्नानं महेंद्र भानावर आले ते म्हणाले, संध्याकाळी साडेचार वाजता आपल्या आजच्या कामाचं नियोजन त्यांच्या मनात तयारच होते. सकाळच्या मिटिंगसाठी आपण काढलेल्या मुद्द्यावर ते बारकाईने विचार करू लागले. चारपर्यंत वेळ कसा गेला त्यांना कळलंच नाही.सेक्रेटरीने आठवण करुन दिली चार वाजता निघायचे

हो ! आजचं काम सगळं शेड्युलप्रमाणे पूर्ण झालं न ?

"हो सर, उद्याच्या कामाचं शेड्युलिंगही तयार आहे. त्याची प्रत तुमच्यासाठी या पाकीटात घालून ठेवलीय. पाकीट त्यांच्या हाती देतांना नेहमी प्रमाणेच सेक्ररेटरीच्या मनात आले. या माणसाचा कामाचा वेग अफलातून आहे आणि कामात काडी इतकी चूक नसते या वयातही हे कसं जमतं यांना ? देवानं यांना जन्मजात बुद्धी आणि कामाची शक्ती देऊन ठेवली असावी. महेंद्रानी ड्रायव्हरला फोन केला. त्यानं गाडी पोर्चमध्ये आणली. गाडीनं वेग घेतला. महेंद्र विचार करू लागले. चन्दरजवळ हा विषय काढावा तरी कसा ? गौरीच का बोलून घेत नाही त्याच्याशी ? आपणही त्यात सामील असावं असा का विचार आहे तिचा ?

महेंद्र घरात शिरले तरी अस्वस्थच होते. ते हातपाय धुवून कपडे बदलून आले. तोवर गौरीनं टेबलवर चहाची मांडामांड केली होती.

तिनं स्वतः अक्रोडचा केक भाजला होता. एगलेस केक चंदर नॉनवेज खात नाही म्हणून केला त्या केकचा खमंग सुगंध दरवळला होता. नानकटाई सुद्धा तिनं ताजीच केली असावी. त्याच्यावर भाजलेल्या बदाम पिस्त्यांची नक्षी होती. गौरी म्हणजे अन्नपूर्णा आहे. चंदरला अशीच बायको हवी असं त्यांच्या मनात आलं आणि मग त्यांनी स्वतःला थांबवलं. आपली आवड निवड आपण आपल्याजवळ ठेवावी. चंदरकडून ती पूरी होईल अशी अपेक्षा कशाला बाळगायची. असा विचार करत असतांनाच चंदर शेजारी येऊन बसला. तरतरीत ताजातवाना प्रसन्न चेहऱ्याचा आपला मुलगा बघता बघता त्यांच्या मनात वात्सल्य दाटून आलं.

गौरीनं चहा कपात ओतला. ताजा केक, नानकटाई समोर ठेवली तेंव्हा हसून चंदर म्हणाला, "आई तुला जे काही विचारायचं आहे त्यासाठी एवढी पूर्वतयारी कशाला हवी ? तुझ्या मनात कधीपासून माझ्या भवितव्याचा प्रश्न सतत येतो आणि आज तू मला तेच विचारणार आहेस".

पुन्हा एकदा महेंद्राला आश्चर्य वाटलं मनातले विचार याला अचुक कसे कळतात. उद्या काय घडणार त्याची आदल्या दिवशी चाहूल लागते. हे सगळं याला त्याच्या त्या योगप्रक्रीयांमधून मिळालं की ही जन्मजात देणगी आहे ?त्यांच्याकडे वळून तो म्हणाला, बाबा यात काही कठीण नाही. थोड्या अभ्यासानं थोड्या सरावातं ही गोष्ट कुणालाही साध्य होऊ शकते. पण मला इथे थांबायचं नाही. मला थोडा शोध घ्यायचाय. मानवी अस्तित्व काय आहे ? शक्तीचं रूपांतर भौतिक वस्तूत होतं. आपला देह हा भौतिक वस्तुलाच आहे. त्याच्या आत कोणती शक्ती आहे ? ती शक्ती क्रिस्टलाईज होऊन देह निर्माण झाला का ? मग मृत्यूनंतर या चैतन्याचं काय होतं ? ते चैतन्य एकंदर विश्वचैतन्याशी विश्वशक्ती एकरुप होत असेल तर मग पुर्नजन्म कसा असू शकतो ?

"मग तर तुला शुद्ध भौतिकशास्त्रात संशोधन करायला हव".

"म्हटलं तर हे तसंच आहे बाबा, माझ्या देहावरच मी प्रयोग करून पाहतोय. ''

गौरी अस्वस्थ झाली ती म्हणाली, "चंदर एकदाच हे आयुष्य मिळतं ते नीट आनंदाने जग न, सगळे भौतिक पातळीवरचे आनंद अनुभवून घे आतापासून सन्यस्तपणे जगण्याची आवश्यकता नाही. वंश विस्तार हे माणसाचं प्राथमिक कर्तव्य असल्याचं आपल्या पुराणांमधूनही लिहिलेलं आहे" "आई, तुला वाटतय मी लग्न करावं. पैसे कमवावेत. गाड्या घोडे, सोनं नाणं मुलांना उत्तम शिक्षण असं सगळं !आई तुझी ही अपेक्षा अमरजा पूरी करते आहे न. माझा तो पिंड नाही ". हे मला केव्हापासूनच ठाऊक झालय.

चौदा पंधरा वर्षांचा असेन तेव्हा एकदा आजोबांबरोबर मी बसलो होतो. ते त्यांचा अजपा जप करत होते. मन शांत झालं होतं. विचार थांबले होते त्या एका क्षणी मला सगळीकडे निळा प्रकाश पसरला आहे असं जाणवलं. ते सगळं फार आनंदमय होतं. बाकीचं त्याच्यापुढे काहीच नाही. मग त्या एका गोष्टीशी मी जोडला गेलो होतो. मनात विचार यायला लागले. ध्यान भंग पावलं. ध्यान करताना हे असे अनुभव कधीतरी येतात. त्या अनुभवांचं रहस्य मला जाणून घ्यायचं आहे. त्यातूनच माझी पुढली वाट मला सापडेल. गौरी म्हणाली,

"म्हणजे तू नक्की काय करणार आहेस? लग्न करायचं नाही. प्रापंचिक गोष्टीत रस नाही..या नुसत्याच ध्यान धारणेला अंत नाही "

"ते शोधायलाच निघणार आहे मी. जंगलात, पर्वतांवर, साधू संन्यासांबरोबर, तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी हिंडणार आहे.बाबा घाबरू नका, मला माणसांची पारख होते साधारणपणे बुवाबाजी करणाऱ्यांच्या वाऱ्यालाही उभा राहणार नाही.

"अरे, पण असं काहीच आखलेलं नाही. काही ठरवलेलं नाही उगीच निरूद्देश असं भटकण्यात मतलब काय " ?

"निरूद्देश असं नाही. न ठरवता असं ही नाही. मी गेली तीन वर्षे नोकरी करतोय. भरपूर पैसे साठलेत. तुम्ही माझ्याकडून

कधीही पैसे घेतले नाहीत. हे पैसे गुंतवून त्याचं व्याज येईल अशी मी व्यवस्था केलीय. या व्याजावर माझी गुजराण होईल. आजकाल गावोगाव बँका आहेत ए.टी. एम्. व्यवस्था आहे. माझ्या गरजा काहीच नाहीत. जंगलात राहिलो, गुहेत राहिलो तर तिथे जे मिळेल ते खाऊन राहिन. ती एक जाणीवपूर्वक केलेली शोधयात्राच असेल. नाहीतरी शोध किंवा शोधाच्या अंतिम उद्दिष्टापर्यंत घेऊन जाणारा मार्ग हा ट्रायल अॅन्ड एरर बेसीसवरच आधारलेला असतो ना" ?

गौरी थोडी हादरली. याची थोडी बहुत पूर्वकल्पना असूनही तिला धक्का बसला."ती म्हणाली, चंदर तू संन्यास घेणार आहेस ?

"नाही, पण मी संन्यास न घेता परिव्राजकासारखा भ्रमंती करणार आहे. वेळोवेळी मी तुमच्याशी संपर्क करीन. मी सुखरूप असेन काळजी करू नका जन्म अमूल्य आहे याची जाणीव मला आहे मी तो फुकट घालवणार नाही. मला काहीही होणार नाही. माझा मार्ग सापडला की मी परत येईन.

स्वतः वर प्रयत्नपूर्वक ताबा मिळवत महेंद्र म्हणाले, "जगाच्या निर्मितीच्या वेळी कोणती शक्ती कार्यरत होती त्याचं संशोधन चाललय. तुझी बुद्धी इतकी प्रकांड आहे की त्या शोधयात्रेत तू सहज सामील होऊ शकतोस आणि ते संशाधन कसं आहे. सप्रमाण सिद्ध करता येण्याजोगं. या तुझ्या शोधयात्रेत तुला जी अनुभूती येईल ती तुझ्या पुरतीच असेल. तिला काही प्रमाण सिद्ध करण्याची शक्यता धूसर.

" मला माझ्यापुरतं सिद्ध झालं तरी पुष्कळ आहे. निदान सध्या तरी. तुम्ही म्हणता तसे वैज्ञानिक शोध ही रद्द न ठरवता नवे उदयाला येतात. नव्या थेरीजवर संशोधन सुरू होतं."

"अरे पण विज्ञानानं जे दिलय ते रोकडं आहे. आपण टेलीफोन वापरतो. रेल्वे, विमानाचा प्रवास करतो. इतर अनेक साधनं जगण्यात समाविष्ट झाली आहेत "

"हो, विज्ञानानं विविध शक्तींना पकडून कार्यरत केले. तीच शक्ती मानसिक स्तरावर, मानसिक पेक्षा अध्यात्मिक स्तरावर दृष्टीपथात येते का, ? तिचं कार्य समजतं काय ? हे शोधण्याचं काम खूप माणसं करत आली आहेत. मेंदूच्या अफाट शक्तीविषयी विज्ञान केवळ तर्ककरू शकतंय त्या शक्तीबद्दल विचार करतोय तुमच्या या चर्चासत्राला अंत नाही. "

"तू ठरवलं आहेस ते स्वीकारणे आम्हाला जड जाणार आहे"
"आम्ही तुझी इथं सारखी वाट पाहत राहणार आहोत. एवढं लक्षात ठेव चंदर"

त्यावर तो नुसताच हंसला.महेंद्रांनी विचारलं, "कधी निघणार आहेस"

"निघेन लवकरच"

"गौरी म्हणाली, आठ दिवसांनी अवस येते. ती टळून जाऊ देत.

चंदर हसून म्हणाला,"आई शुभ अशुभ म्हटलं तर काही नाही म्हटलं तर आहे एका नाण्याच्या दोन बाजू आहेत."

"म्हणजे कसं ?

" म्हणजे अशुभ नसेल तर शुभची पारख कशी होणार आपण ठरवलेलं असतं अमुक शुभ अमुक अशुभ.अशुभ असलं तर शुभंची किंमत अमंगल असते म्हणून मंगलतेचं महात्म्य ! आपल्या अंगी अविचलपणा असला की अशुभ आपल्याला स्पर्श करू शकत नाही".

त्या क्षणी गौरीला वाटलं, आपला चंदर कुठेही गेला तरी त्याचं संरक्षण करायला तो समर्थ आहे. पुढल्या क्षणी त्याच्या या

कष्टमय प्रवासाच्या कल्पनेनेच ती कष्टी झाली.

चंदर म्हणाला, "आई, तू अजिबात त्रास करून घेऊ नकोस. आपण स्वतः निर्णय घेऊन जे काही करतो ते कष्टमय वाटत नाही आपल्यावर वरून लादलेलं गुलामीचं असं जे असतं ते कष्टमय असतं. आई मला एक सांग सगळ्या जगण्यात तुझे सर्वात आनंदाचे क्षण कोणते."

"तुम्हा मुलांच्या जन्माचे! बाळ जन्मतांना आईला आपार वेदना होतात पण,बाळाच्या जन्मापुढे त्या फिक्या पडतात त्या ऐवजी बाळाचा आनंद लक्षात रहातो ."

"तेच म्हणजे आपल्याला हवं ते साध्य करतांना झालेले कष्ट हे कष्ट वाटत नाहीत. "

गौरी वैतागून म्हणाली,"चंदर,उगाच बोलण्यात पकडू नकोस. "

"बरं आई,मी पंचांग पाहून शुभदिवशी निघेन. तुमचं दोघांचं प्रेम माझ्या बरोबर सतत असेल. तू काळजी करूच नकोस. "

अगदी अत्यल्प सामान घेऊन तो निघाला तेव्हा महेद्रानं विचारल, निदान तुझं पहिलं मुक्कामाचं

ठिकाण तरी सांग. चंद्रशेखर म्हणाला, "बाबा आजोबांचे एक गुरू होते. आपल्या गावच्या वेशीला लागून एका पडक्या घरात रहात. त्यांचा एक शिष्य आता तिथे आसतो. आजोबा त्यांच्या गुरूंच्या भेटीला मला घेऊन गेले होते. तेव्हा गुरूजी म्हणाले होते. "चंद्रशेखर, जेव्हा तू तुझ्या अंतर्यात्रेला निघशील तेव्हा पहिल्यांदा इथे ये. हा रघू तुला बरच काही सांगेल. मी असीनच,त्यांच्या त्या बोलण्यानं मी अक्षरशः थरारलो होतो. इतक्या आत्मविश्वासाने ते म्हणाले होते, मी असीनच, मग काय असेल ते अस्तित्व. माझ्या पहिल्या मुक्कामात निदान ते तर उलगडेल. "

"जपून रहा रे चंदर आणि काहीही गरज लागली तर आम्हाला कळव. जिथे कुठे असशिल तिथे येऊ हं," सांगता सांगता गौरीचे डोळे भरून आले चंदर निघाला. एस्. टी. चं स्थानक गाठलं गावचं तिकीट काढलं स्थानकावर नुसता कोलाहल होता. पण गाडी सुटली आणि बरचसं शांत झालं. त्यानं डोळे मिटून घेतले. आपल्या मनाचं अवकाश तो शांत करू लागला. आईचे विचार, बाबांचे विचार कामाचे विचार तरंगत आले आणि गेले. मन शांत झालं. तो निर्विकार स्थितीत मग्न असतांना गाडीत एक मूल रडू लागलं. त्याचं ते शांत आवकाश वितळून गेलं. क्षणार्धात तो बाह्य मनाशी जोडला गेला. त्याला वाटलं हे असं वारंवार भंग होणं खंड पावणं टळावं म्हणूनच बहुतेक सारे साधक जंगले,गुहा, पर्वत शिखरे यांचा एकान्त शोधत आसावेत. आजोबांचे गुरूजीही गावांपासून जरा लांब पडक्या घरात रहात होते. तिथे आता तो रघू असेल. त्याची या मार्गावर कितपत प्रगती झाली असेल.आपण विचारांच्या जाळ्यात अडकत असल्याचं लक्षात आल्यावर पुन्हा एकवार त्याचं ध्यान लागत नव्हतं. आईचा विचार मनात आला. तिनं दिलेली परवानगी ही अगदीच वरवरची होती. बाबा फारसं बोलले नाहीत. त्यांना कळतय की रूळलेल्या चाकोरात अडकून मी दुःखी होईन.अखेर आपल्या आनंदाच्या व्याख्यात घडवलेल्या साच्यात मुलाला अडकवून तो जर दुःखी होणार असेल तर ते योग्य नाही हे त्यांच्या मनात तरी स्पष्ट आहे.

आईलाही कळेल कदाचित. अमरजा इथे जवळपास असती तर आईचं आताचं आपण बाहेर पडल्याचं दुःख फिकट झालं असतं का ?हा विचारंचा गलबला ध्यान करते वेळी बाहेर पडतो. मग नंतर किती हलकं ताजतवानं,चैतन्यमय वाटतं. परत आपले हे विचार कब्जा घेतातच. पण माणसाला ही जन्मजात प्रेरणा असेल! म्हणजे विचारभावनांची शक्ती. तर तिचा त्याग करणंही कृत्रीम नाही का .. की विचार भावना षड्विकार या गोष्टाचे अनेक तऱ्हांच्या धाग्यांची निर्मिती करीत आपलं मूळ रूप झाकून टाकतात असं साक्षात्करी महात्मे सांगतात ते खरं. ते पुरातत्ववेते कसे खणत खणत माती, दगड आणखी कसलेकसले थर दूर करत करत आत जातात. मग हलक्या हातांनी वस्तूवरचा मातीचा थर सारतात तेव्हा कुठे मूळ वस्तू दिसू लागते. तशी ही सगळी प्रक्रिया असेल का? सतत कसं ध्यानस्थ राहणार. त्या मूळरूपाशी सतत समरस पावून जगता येईल? आणि देहाचं काय ? तो नसेल तर हा सगळा उलगडा होणं अशक्यच आहे. नीट जेवणखावण झालं पाहिजे. आजारी पडता कामा नये. बुद्धानं नव्हतं का सांगितलं,"पराकाष्ठेचा देहदंड उपयोगाचा नाही आणि जिभेचे चोचलेही नकोत. साधा सात्विक आहार! बुद्धाचं सगळं सांगणं असं संतुलन ठेवण्यावर आधारित. इतकं काटेकोर संतुलन जमेल आपल्याला? अनेक विचारांनी त्यांचे मन गजबजून गेलं. ध्यानाच्या शांती नंतर हा आक्रमक हल्ला त्याला नकोसा झाला. डोकं थोडं दुखत असल्याचं त्याच्या लक्षात आलं. त्याचवेळी आकलन झालं की विचारांचा तान देहावरही काही फारसा चांगला परिणाम करीत नाही.

कंडक्टरनं घंटी वाजवली आणि त्याच्या गावचा पुकारा

केला. भानावर येऊन आपली बॅग घेऊन तो खाली उतरला. रात्रीचे दहा वाजले होते. अंधार पडला होता. पण गावात वीज आलेली दिसत होती. चार दोन रिक्षा दिसत होत्या. त्याला गुरूजींच्या घराचा साधारण पत्ता माहित होता. पण चालत जाण्याजोगा मार्ग ठाऊक नव्हता.गावच्या पूर्व वेशीच्या अलिकडे जंगल होते वेशीजवळ मारूतीचं देऊळ. त्यापासून पंधरा वीस मिनिटांवर आडव्या फाटयाच्या वाटेला चालत गेलं की ते पडकं घर होतं. सत्यस्वरूपानंदांना सगळेच ओळखत असणार. एवढसं गाव. आता विस्तारलं तरी गावचे लोक संतमहात्म्यांना मान देतात. आता तिथे रघू असेल. गावचे लोक त्याला सत्य-स्वरूपानंदांएवढाच मान देत असतील का ?

त्यानं एका रिक्षावाल्याला विचारलं. तो म्हणाला ''रात्री तिथे कोणी नाय बा घरी जायचय,धा वाजत आले ''

दुसऱ्यानं आपनहून सल्ला दिला ''हितं लॉजवर वस्ती करा पाव्हणे मग सकाळी न्हेतो.लॉजचं भाडं बी येकदम अफोर्डेबल ?

त्याच्या तोडंचा इंग्रजी शब्द ऐकून त्याला आश्चर्य वाटलं.आणि मग वाटलं आपल्याला दुसऱ्याचे विचार पुष्कळदा कळतात ते त्या शब्दांच्या माध्यमातून येत नसावेत. आपल्या मनात ते शब्द माध्यमाची आवश्यकता आहे का ? आपल्याला दुसऱ्याचे विचार कळतात ती शक्ती इतरांमध्ये ही असेल म्हणा किंवा कशीही ! तिचा वापर न झाल्याने गंजलेली, निकामी अशी होऊन ती शक्ती पडली असेल का ? आशा किती गोष्टी आपल्या जवळ असतील त्या निकामी होत असतील. त्या रिक्षावाल्यानं त्याला भानावर आणत म्हटलं, रातचे तिकडे रानात कुटं जानार. सापकिरडं हाईत. जनावरं बी हाईत. त्यानं मनाशी काही एक निश्चय केला. पूर्व दिशेची पाऊलवाट जोखली.

पाऊल उचललं आणि निघाला...वस्ती सुनसान होती. बाहेर कसलाही आवाज, चाहूल नाही. मंद चांदणं सर्वत्र पसरलं होतं. वाऱ्यामुळे झाडांची होणारी सळसळ तेवढी ऐकू येत होती. रस्ता माहीत नसताना अशावेळी एकट्यानं जाणं धोक्याचच पण त्याचं मन निःशक आणि शांत होतं. एक चौदा पंधरा वर्षाचा मुलगा समोरून येतांना दिसला. अगदी ओळखीचा असल्यागत हसून त्या मुलानं, 'रामराम' म्हटलं. चंदरनही रामराम म्हटलं आणि मारूतीच्या देवळाची वाट विचारली.

''रातचे देवळात मुक्कामाला काय पावणे ?त्या मुलाने चौकशी केली .

''नाही,सत्यस्वरूपानंदाकडे जायचय म्हणजे,त्यांचा शिष्य रघुनाथ असेल आता तिथे . ''

'' देवळाच्या उजव्या हातच्या फाट्याचं ते बुढ्या बाबाचं घर व्हय, चला.. मी नेऊन सोडतो तुमचा रस्ता वाईच चुकला पावणे घ्या ती बॅग हिकडं जड असल न्हवं ?''

''नाही रे, ठीक आहे तू रस्ता दाखवायला येतो आहेस हेच खूप आहे.कोण अशी मदत करतं हल्ली ?''

मुलगा नुसताच हंसला मग त्यांच्यात काही विशेष संवाद झाला नाही तरी आपुलकीचं असं काही एक स्पंदन चंदनाला निरंतर जाणवत राहीलं. सर्वत्र शांतता होती. त्याचं मनही हलके हलके विचाररहित होऊ लागलं. मुलाच्या शब्दानं तो स्थीरभाव विचलीत झाला. मुलगा हसऱ्या आवाजात म्हणाला, ''पावणे, ती बघा बुढ्या बाबाची झोपडी. आजून लाईट हाय बगा ''

हो, म्हणून चंदर चार पावलं पुढे गेला असेल नसेल तोच अचानक त्यांच्या लक्षात आलं शेजारी तो पोरगा नाहीए. त्यानं मागे वळून पाहिलं. त्या मुलाला थोडं बक्षिस द्यावं असं त्याच्या मनात होतं. त्यानं आसपास नजर फिरवली लांबवर,नजर टाकली, कुणीही नव्हतं. झाडीत तो मुलगा लघवीसाठी तर गेला नसेल ? पाच मिनीटे चंदर उभा राहिला. पण कुणीही आलं नाही. तो मुलगा जणू हवेत नाहीसा झाला. त्याला फार आश्चर्य वाटलं आणि मग एकाएकी मनात आलं आपल्याला वाट दाखवायलाच त्याची नियुक्ती झाली असावी तरीही त्याला तो चमत्कारच वाटला. एक जड अस्तित्व असं एकाएकी अवतरावं आणि काम करून क्षणार्धात नाहीसं व्हावं.हा निव्वळ योगायोग. तो मुलगा सहज घर दाखवायला आला आणि झाडीतल्या एखादया शॉर्टकटने तातडीने

निघून गेला, असं घडलं असेल का ? खरं आश्चर्य आणखी पुढे वाढून ठेवलं होतं. त्यानं झोपडीचं दार खटखटवलं. बाहेर न्हाणीत पाणी होतं. त्यानं हातपाय धुतले. चाळीशीच्या पुरूषानं दार उघडलं. त्यानं विचार केला हाच बहुतेक रघू असावा,तेव्हाचा रघू आता आठवत नाही चंदरचा विचारओळखल्यासारखा रघू म्हणाला "हो, मीच रघू या तुमचीच वाट बघत होतो. "

म्हणजे, याला आपला विचार कळला तसंच आपण आता इथे असण्याची घटना प्रत्यक्ष होणार हे ही कळलं होतं. रघूनं दार आणखी उघडलं बाहेरची ती खोली मोठी होती. एका कोपऱ्यात देवघर होतं आणि शेजारी असलेल्या एका खाटेवर स्वामी सत्यस्वरूपानंद बसले होते. त्यांना कित्येक वर्षांपूर्वी आपण पाहिलं तसेच आहेत हे. थोडं सुरकुत्यांचं जाळं वाढलय..पण कमाल आहे. शंभर वर्षे केव्हाच पार केली आसावित. पण अजून आहेत तसेच,काय अंदाज लावायचा यांच्या वयाचा ? सत्यस्वरूपानंद हंसले, आणि म्हणाले, "ये, बाळ चंद्रशेखर मी तुझी वाट बघत होतो. खरं तर माझा इथला मुक्काम संपायला हवा, पण हे एक काम शिल्लक होतं."

चंद्रशेखरनं बाहेर अंगणात हातपाय धुतले होते. आता त्यानं गुरूजींच्या पायांवर डोकं ठेवलं.
ते म्हणाले, "ये दमला आहेस भूक लागली असेल ना " त्यानं होकारार्थी मान हलवली. तोपर्यंत रघू आतून त्याचं ताट घेऊन आला. गरम रोटी, डाळ, दही थोडा गोड शिरा समाधानपणे जेवण झालं.

गुरूजी म्हणाले,"आता थोडी शतपावली कर, ध्यान लाव, झोप घे, सकाळी आपण बोलू. सत्यस्वरूपानंदांचं वागणं बोलणं इतकं प्रेमळ होतं की चंदरला आपल्या आजोबांची आठवण झाली. गुरूजींच्या सांगण्यानुसार जेवण झाल्यावर तो अंगणात थोडा फिरला. सर्वत्र चांदणं पसरलं होतं. एक नीरवता तिथे नांदत होती. रातकिड्यांची किरकिर होती पण ती त्या वातावरणात मिसळून गेली होती. मनाला जागं करणारा असा आवाज नव्हता. त्यामुळे ध्यान उत्तम लागलं. ध्यानातून तो हलके हलके बाहेर पडला तेव्हा मनात इतका निवांतपणा होता की चटकन झोप लागली. पहाटेस ब्रम्ह मुहूर्तावर जाग आली. त्यानं मुख समार्जनादिविधी उरकले. गुरूजी त्यांच्या आसनावर पद्मासनात अविचल होते. त्यानं देवाला नमस्कार करून त्यांना प्रणाम केला. गुरूंजीसमोर तो उत्सुकतेने बसला. त्यानं कालचा त्या मुलाचा प्रसंग सांगितला.

ते हसून म्हणाले,"आपण कुणी वेगळे नाही. विश्वशक्तीचा एक अंश आहोत.सर्वच एकमेकांना जोडलेले आहोत. आपल्याला गरज असते आणि ती रास्त असते तेव्हा आपल्याला नसते. तुझ्या आयुष्यमार्गात तुला दाखवण्यासाठी कुणा वाटाड्याची गरज होती. ती आपोआप अंतर्मनाकडून भागवली गेली "

चंदरला ते थोडं गूढ वाटलं, तरी हळूहळू समजूही लागलं चंदर म्हणाला,"गुरूजी ध्यान संपलं की परत आपण गोंधळ गडबडीत लपेटले जातो आतमध्ये ती स्थिरता नसते. राग येतो, सगळं आपलं पुन्हा सुरू होत "

. "हे खरं आहे बाळ.पण या सगळ्यांची तीव्रता ध्यानाने कमी झालेली असते आणि ते चित्तात फार काळ ठाण मांडून रहात नाहीत. सतत ध्यान करणारा माणूस तसा शांत होतो. इतर सगळे आपल्यासारखेच आहेत.या विचाराने एक उदारपणा अंगी येतो. चित्ताकाशातील क्षुब्धता ओसरते. त्यामुळे साधकाला जो काही शोध ध्यायचा त्याची पूर्वतयारी झालेली असते. तशी तुझी पूर्वतयारी झाली आहे.

गुरूजी, या अस्तित्वाचा उगम काय ? सगळं काही भौतिक पातळीवरच घडतं का ? म्हणजे आईच्या गर्भातून जन्म होतो हाडामासाचं अस्तित्व घेऊन विचार विकार....

"चंद्रशेखर, म्हटलं तसं तर नाही. तुम्ही त्याकडे कसं बघता

यावर अवलंबून अंतरीक शक्ती एकच आहे.शाश्वत,अखंड,सर्वत्र पसरलेली. शक्तीचं रूपांतर जड वस्तूत होतं हे तू शिकला आहेस.ह्या सर्वांच्या ठायी आत चैतन्य असतं हेही तू शिकला आहेस. अणूंची अखंड भ्रमणयात्रा जडातही असते. ज्या शक्तीचं अस्तित्व संपूर्ण जड वस्तूला जाणवत नाही. माणसांना तरी कुठे जाणवतं. तो जन्मल्यापासू जगाच्या कोलाहालात टिकून रहाण्यासाठी आवश्यक ते विचार विकार त्याला मिळाले. जडापासून तो उत्क्रांत झाला. पण ते विचार विकार अस्तित्व टिकवण्याएवढे मर्यादित राहिले नाहीत. त्याचं प्राबल्य वाढलं.त्याचा मी हा विचार विकार संस्कार अनुभवजन्य निष्कर्ष या सगळ्यांनी वेढून टाकला. हा जाड पडदा जेव्हा भेदता येईल तेव्हा अस्तित्वाच्या मूळ रूपाचं भान येईल."

"गुरूजी, विचार थांबणं फक्त ध्यानात घडतं. ध्यान तर कसंही भंग पावतं. विचार येत राहतात. भल्याबुऱ्याची जाण मनात जागी असते. त्यामुळे राग लोभ असतातच. ही सगळी मनुष्यत्वाची लक्षणेच आहेत ना ? "

"बरोबर आहे तुझं, कसं आहे बघ चंदर, आपल्याला ठऊक आहे ज्याला आपण सजीव मानत नाही अशा वस्तूजातीच्या ठायी ही मूळ शक्ती असतेच आत अगदी अणूच्या आतही हालचाल सुरू असते.त्या अणूंमध्ये शक्ती कोंडलेली असते.त्यातून उत्क्रांत होत होत मनुष्य जात अस्तित्वात आली. माणसांमध्ये सुद्धा काही अगदीच जड असतात.त्यातून उन्नयन झालेली माणसे असताता. त्यांना या शक्तीचं अंधुक स्वरूप कळलेले असते.ज्यांची जेवढी ताकद असते तेवढं त्या शक्तीचं स्वरूप कळत जातं. ही शक्ती पकडून माणसाने अनेक सुखसाधने निर्माण केली. खूप सुखाची आकांक्षा केली तरीही सुख तर निसटतच हातून! "मग त्या शक्तीचा शोध आपण घेतो ते कशासाठी. त्याची मनाला ओढ का लागावी गुरूजी ? "

"सुखही परत ज्या त्या व्यक्तीच्या मनोधर्मानुसार असतं.एखाद्याला दुसऱ्याला छळ करण्यात सुख वाटेल. एखाद्याला स्वतःचा छळ करून घेण्यात सुख वाटेल. कुणाला काय वाटेल कसं सांगणार ? शिवाय तेच तेच सुख निरंतर राहीलं तर दुःख रूपांतरीत होतं. मग आणखी वेगळं, मन उत्तेजित करणारं हवं असतं. चांगल्या वाईटच्या कल्पना सापेक्ष असतात. तुला तर माहितच आहे की शुभ अशुभ, मंगळ अमंगळ, सुख दुःख यांना एकमेकांविना अस्तित्व नाही. या सगळ्याच्या पलिकडे जाऊन मुळ रूपाचा शोध लागला, त्याचं क्षणिक दर्शन जरी झालं तरी आपण सर्वत्र आहोत आणि सगळे आपलेच आहेत याचं भान येतं. हे भान येणं म्हणजे अखंड आनंद आणि शांतीची प्राप्ती होय.त्यानंतर आपल्याला काहीही लागत नाही. केवळ सूर्यप्रकाश आणि जलावर देह धारणा करणारे आणि बर्फातही निर्वसन हिंडणारे लोक तुला भेटतील. शरीरावर ताबा मिळवलेले हटयोगी भेटतील.विवक्षित अभ्यासानंतर देहातून बाहेर पडून तुला अन्य ठिकाणी जाता येईल. बाहेर पडणारे जड असं काही नसतं. ती शक्तीच क्षणार्धात अन्य स्थानाच्या शक्तीजवळ पोहोचते.तिथलं सारं काही आपल्या ज्ञानेंद्रियांना जाणवतं या कोणत्याही गोष्टीमध्ये अडकून न पडता आपण सतत आपल्या चैतन्यातच अवस्थित राहणं म्हणजे आत्मशोध पूर्णत्वाला जाणं. ही गोष्ट मलाही साध्य झालेली नाही. पण वाट सापडलेली आहे. पुढल्या निरंतरच्या प्रवासात ती कधातरी साध्य होईल. तू ही त्या वाटेच्या शोधात निघाला आहेस. मी केवळ सुरुवातीचा वाटाड्या आहे चंद्रशेखर.

कुणाकडे जाऊ गुरूजी ? आपल्या गुररुचा शोध घे खात्री पटली की ज्ञान प्राप्ती होईल बाळा. ट्रायल अ‍ॅन्ड एररची मेथड शास्त्रज्ञ वापरतात. ती सर्वत्र लागू असते."

चंद्रशेखर मध्य प्रदेशाला लागून असलेल्या योगी रामस्वरूप यांच्या मठात दाखल झाला. तिथं सतत भजन कीर्तन चाललेलं असे. स्वतः रामस्वरूप यांच्या अखंड नामजपात मग्न असत. गोरगरिबांना रोज अन्नदान होई. अनेक लोक रस्त्यावर रहात आणि मठात जेवत. कपडे भीक मागून आणत. चंद्रशेखरला वाटलं हे सगळं तमोगुण वाढवणारं, अधोगतीला नेणारं आहे. आपली ऊर्जा यांनी निद्रीस्त ठेवली आहे. रजोगुण वाढीला लागायला हवा. या माणसांच्या हाताला काम दिलं पाहिजे. तो स्वामी रामस्वरूपांना तसं म्हणालाही, ते म्हणाले,"काम काय देणार ?

चंद्रशेखर म्हणाला, "इथे मठात सरकार दरबारी लोक प्रवचनासाठी येतात. त्यांना काम काढायला सांगा. या माणसांना मजुरी मिळेल. त्यांच्या कष्टातून काही निर्माण होईल. "

रामस्वरूप हसले ते म्हणाले, " मठात ही मंडळी येतात ती क्षणिक मन शांती मिळवायला. ते लोक काही गंभीरपणे विचार करणार नाहीत. केलाच तर ज्यात त्यांच्या भ्रष्टाचाराला वाव मिळेल जे त्यांना ओरबडून घेता येईल तेवढं घेण्याचा मार्ग असेल त्याचा विचार करतील. तू म्हणतोस तसं करावं उत्साह माझ्या अंगीही होता. सुरुवातीला मी प्रयत्न केले. मग मठाच्या

जमिनीबाबत वाद काढले गेले. मठात गैरप्रकार वाईट कृत्ये असल्याचा अफवा पसरू लागल्या. मठाकडून अमुक काम व्हवं..त्यात सरकारची मदत असावी असे प्रयत्न उखडून टाकले गेले. कारण हा सगळा व्यवहार पारदर्शी स्वच्छ असणार होता. ”

गावकरी म्हणाले,“आम्ही कुटीजवल शिधा ठेवतो. आठवड्यातून एक दिवस सकाळी ते गावात फेरी मारतात. तेव्हा सर्वांना आशीर्वाद देतात. ते गावाजवळ असल्याने गावाचं रक्षण होतं.अमंगळ गोष्टी इथे शिवत नाहीत.”

चंद्रशेखरला कुतूहल वाटलं,हे योगी चमत्कार करीत होते. पण त्यांनी त्याचा स्वार्थासाठी बाजार मांडला नव्हता.लोकांना बुवाबाजीच्या जंजाळात गुंतवले नव्हते. ते कुणाला कुटीजवळ फटकू देत नव्हते. कदाचित तंत्रसाधना करत असतील.का कुणास ठाऊक? चंद्रशेखरला त्यांना भेटावसं वाटलं. गावकऱ्यांनी सांगितलेल्या खाणाखुणा बघत तो कुटीजवळ पोहोचला.बाहेर झाडाखाली पद्मासनात ध्यानात बसलेले योगी बघून त्याला जाणवलं की हे खरे साधक आहेत. त्यांच्याकडून येणारी प्रारणे शुद्ध आहेत. मन प्रसन्न करणारी आहेत. त्यांचे ध्यान संपेपर्यंत तो शेजारी बसला आणि सहजच डोळे मिटले.क्षणार्धात त्याचे विचार थांबले. चित्ताकाश निरभ्र झाले. त्याचे ध्यान लागले. ध्यानातून तो जागृत झाला तेव्हा योगीराज समोर बसले होते.

ते हसून म्हणाले,“ चंद्रशेखर ये तुझी वाट बघत होतो. त्याचा आश्चर्यभाव त्यांच्यापर्यंत पोहोचला असावा. ते म्हणाले शब्दांशिवाय विचारतरंग आपण ग्रहण करू शकतो हे तुला माहित असूनही आश्चर्य कां वाटलं . तू येणार हे मला माहीत होतं. खरं तर मी ध्यान लावलं तेव्हा तुझ्या मार्गदर्शकाशीच संपर्क केला होता. तुझ्या मनात माझ्या चमत्कारांबद्दल शंका आहेत. मीतंत्रसाधना करतो का अशीही शंका आहे. आपण आधी त्या शंका दूर करू. मी तंत्रसाधना करत नाही. अधोरपंथ मी मानत नाही. तंत्रसाधना ही सुद्धा साधनाच असते. अत्यंत एकाग्रतेने कर्मकांडे करीत. काही एक शक्ती मिळवलेली असते. पण ती शक्ती इतरांना दु:ख देण्यासाठी सूड घेण्यासाठी स्वर्थासाठी वापरली जाते. वश झालेली शक्ती ताब्यात ठेवता आली नाही तर तो माणूस वेडा होतो किंवा आत्मघात करून घेतो. योगीराज ज्या मार्गाला मला जायचच नाही त्याच्या सत्यासत्येला पडताळा घेण्यात मला वेळ घालवायचा नाही.

योगी हसले. ते म्हणाले, नामरूपाला तत्सम अर्थ नसला. शब्दांचे माध्यम पुढे निरर्थक वाटू लागलं तरी सामान्य व्यवहारात नामरूप शब्द सगळ्यांचा वापर करावा लागतो. म्हणून माझं नाव सांगतो. माझ्या गुरूंनी मला चिदानंद हे नाव दिलं आहे. आता तुझ्या दुसऱ्या शंकेकडे वळूया, आत्मशक्ती, चैतन्य, विश्वशक्ती काहीही म्हण ती आपल्या आत अवस्थित असते. ती मूलाधार चक्रापासून जागृत करत नेत षटचक्रे भेदत सुषुम्नेतून वर चढत जाते आणि मस्तकावरील सहस्त्रकार चक्रापर्यंत पोहोचते. या कुंडलीनी जागृतीचा मार्ग अत्यंत क्लेशदायक खडतर असतो. योगीक क्रियांनी आपल्या बाह्य अवयवांवर ताबा मिळवत बुद्धी एकाग्र करीत बुद्धी भेदून पलिकडे जाण्याचा हा मार्ग आहे. कुंडलीनी जागृत झाल्यावर आपल्या शरीरावर आपला पूर्ण ताबा असतो.

“मग काय केलत ?

“ लोकांनी एकत्र यायला हवं. असं घडत नाही. मग हाती एकच उपाय होता. मठाचं व्यवस्थापन नीट संभळणं आणि भक्तीमार्ग असल्याने मग त्याची शिकवण द्यायला सुरूवात केली.

“तुम्ही स्वतः नामजपाचं अनुसरण करता ? ”. हो, पण मी पूर्णवेळ नामाच्या अधील राहून दैनिक कामे पार पाडतो असेही

नाही. नाम जपात खूप वेळ एकाग्र झाल्यावर एकदा अनुभव असा आला होत की मी शरीर सोडून माझ्या गुरूंच्या शोधात हिमालयात गेलो. गुरूजी भेटले त्यांनी देह ठेवला होता. पण त्यांच्याशी संपर्क झाला. त्यांच्या आज्ञेने काम सुरू ठेवले आहे. ”

स्वामी रामस्वरूप आपल्याला काही विशेष मार्गदर्शन करू शकतील असा चंद्रशेखरला विश्वास वाटला नाही. शिवाय आपलाच मठ किती चांगला आहे. हे सांगतांना सेवेकऱ्यांनी इतर मठांमध्ये चालणारे गैरव्यवहार त्याला सांगितले ते ऐकून तर त्याला भोवंडून गेल्यासारखे झाले.

धर्म आणि आत्मिक उन्नती या काही एकमेकांना चिकटलेल्या गोष्टी नाहीत. तरी मठामध्ये गुंतागुत, अनाचार किंवा गोंधळलेली अवस्था होती. शिवाय मठाच्या आर्थिक ऐहिक लाभात मठधिपती अडकून पडतही असतील. रामस्वरूप त्यातले नव्हते. पण त्यांचा मार्ग कुंठित झाला होता. कदाचित नामजप वाढत जाऊन एखाद्या उत्कट क्षणी त्यांना आत्मदर्शन होईल ही पण या क्षणी ते आपल्याला मार्गदर्शन करू शकत नाहीत हे लक्षात येऊन चंद्रशेखरने आपला मुकाम आवरता घेतला.त्याची भ्रमंती सुरू झाली. पुढे जावे. गावच्या वेशीतील मारूतीच्या देवळात किंवा ग्रामदेवतेच्या देवळात मुक्काम करावा. एखाद्या घरी काही काम करून द्यावे आणि त्याबदली डाळ तांदूळ मागावे. ते तीन घरी

दगडांच्या चुलीवर शिडवून खावे. अन्न नाहीतर दूध फळे विकत घेऊन क्षुधा भागवावी गावात कुणी साधु पुरूष,संन्यासी,योगी आहे का बघावे ?. त्याच्याशी बोलावे. या व्यक्तीने सुचवलेला मार्ग काही आपला नव्हे. हे लक्षात आल्यावर पुढे व्हावे. तत्वाची खुप झाल्या. पण शाब्दीक आकलनाचा उपयोग नाही तो जाणून होता असा त्यांचा क्रम सुरू झाला. बहुतेक सज्जन, साधु, सन्यस्त कृतीने राहणारे अशा सगळ्यांचा अहंकार सुटला नव्हता. सूक्ष्म असा लोभ,क्रोधही होता. कोणत्यातरी एका पायरावर ते अडकून पडले होते. चंद्रशेखरचे ध्यान मात्र उत्तम सांधत होते. कित्येकदा त्याला अभूतपूर्व शांती मिळत होती. आपली स्वतःची थोडीशी का होईना प्रगती होते आहे याबद्दल तरी त्याला समाधान वाटत होतं. कधी कधी आईवडिलांचा फोन येई. सुरूवातीला त्यामुळे मन व्याकुळ होई. आता तसेही होत नव्हते.चित्तात प्रक्षुब्धता येत नव्हती. मार्गक्रमण करता करता तो हरिद्वारला येऊन पोहोचला. एव्हाना त्याच्या लक्षात आलं होतं की मठ, आखाडे वगैरे आपल्यासाठी निरर्थक आहेत. गावापासून दूर जंगलात, गंगेकाठी एका कुटीत एक हटयोगी

रहात असल्याचे त्याला कळले. अनेक सिद्धी त्यांना वश होत्या. असेही कळले. पण ते लोकांना आपल्याकडे येऊ देत नाहीत. मी तुम्हाला काहीही देऊ शकत नाही तुम्ही परमेश्वर चिंतन करा. दुसऱ्याच्या गोष्टींला हात लावू नका.गरजूंना सहाय्य करा. आपली प्रापंचिक कर्तव्ये निष्ठेनं पार पाडा. एवढेच तो सांगतो असे गावकऱ्यांनी सांगितले. तो सिद्धपुरूष आहे यावर मात्र त्याचं एकमत होतं. कुणी त्याला गंगा प्रवाहावरून चालतांना पाहिलं होतं. कुणी पाहिलं होतं की पद्मासनात बसून तपस्या करीत असतांना ते हवेत उचलले गेले होते. फार पूर्वी कुणीतरी त्याला बसल्याजागी फळा फुलांची रास निर्माण करताना पाहिले होते.

ध्यानात शरीर वर उचललं जाणे किंवा पाण्यावरून चालणं ह्या क्रिया साध्य होतात. पण त्यामुळे आत्मस्वरूप जाणता येत नाही. त्यासाठी अविरत प्रयत्न करीत रहावे लागतात. माझे ते प्रयत्न चालू आहेत. क्वचित कधी विजेसारखे काही जाणवते. पण अजून अखंड आत्मस्थित असण्याची अवस्था साध्य झाली नाही. मी जो मार्ग अनुसरला तो तुझ्यासाठी योग्य नाही. तुला योग्य मार्ग मिळण्यासाठी तुला पाँडीचेरीला जावे लागेल.तीर्थस्थाने बघत बघत या देशाचे खालचे टोक तुला गाठायचे आहे.

"चिदानंद महाराज, अन्न ग्रहणाविना माणसे राहू शकतात हे खरं आहे का ?"

"हो, आपल्या पेशींना हवी असलेली ऊर्जा सूर्यप्रकाशपासून मिळण्याचे काही मार्ग आहेत. त्यासाठी काही योग क्रिया आहे. तसेच असू दे. इथे काही काळ रहा. श्वासावर आणि शरीरावर संयम करणारी योगक्रिया मी तुला शिकवीन. पण ते तुझं अंतिम साध्य नाही."

चंद्रशेखरने नुसतीच मान हलवली. चिदानंदांचे विचार त्याच्यापर्यंत पोहोचले. त्याने बाहेरच्या कुंडातून पाणी घेऊन हात पाय धुतले आणि बॅग कुटीत ठेवली. चिदानंद पारावर बसले होते. त्यांच्या पायाशी तो बसला. ज्ञानग्रहणसाठी त्याचं मन स्थिर झालं होतं.काही दिवसांनी चिदानंदांनी आदेस दिल्यानंतर तो तितून निघाला तीर्थक्षेत्री रमत गमत अनेक अनुभव घेत चंद्रशेखर पाँडीचेराला पोहोचला. अरविंदाश्रमात त्यानं दर्शन घेतलं. त्या जागेतच त्याला विलक्षण स्पंदने जाणवली. मग तो बाहेर आला. लोक इथे राहून साधना करत आहेत मीही इथे राहून साधना करायला हवी त्यासाठी मी तंत्रसाधना करतो

जागा शोधायला हवी. असा विचार करत तो आश्रमासमोरच उभा असताना त्याला समोरून एक मध्यमवयीन हसतमुख गृहस्थ येताना दिसले. त्याला ते ओळखीचे वाटले. मग असाही विचार आला इथे कोण ओळखीचं असणार.? पण हे आपल्यालाच भेटणार असं वाटेपर्यंत ते त्याच्याजवळ पोहोचले सुद्धा. साधेसे शर्टपँट घातलेले गृहस्थ.

" त्यांनी म्हटलं चंद्रशेखर ना,

त्यानं होकारार्थी मान हलवली

ते म्हणाले, "माझं नाव जयंत. माझ्याकड़ेच तुमची रहाण्याची व्यवस्था केली आहे. अरोविल मध्ये माझं छोटं घर आहे." त्यांच्या नजरेतल तेज चंद्रशेखरच्या लक्षात आलं. हे आपले मार्गदर्शक आहेत अशी जाणीव त्याच्या अंतरंगात उत्पन्न झाली.निःशंक मनाने तो त्याच्याबरोबर चालू लागला. दोघंही शांतच होते. जयंतच्या घरात आणखी कुणीही नव्हतं. घर एका बाजूला होते. भोवताली बाग होती. खोलीत शांतता होती. जयंतनं त्याला अंघोळ उरकून घ्यायला सांगितली. जेवणही तयार होतं. दोघं निःशब्दपणेच जेवले. हात धुतल्यावर हॉलमध्ये बसले.

जयंत म्हणाला, "तुझी योगमार्गात बरीच प्रगती आहे. "ध्यान नीट लागतं. पण ध्यानावस्थेत मन पूर्ण शांत जालं की विकार विचार मनात येतात तेंव्हा जी ऊर्जा निर्मान होते ती बाह्य जगातील जगण्यात आपल्याच बाह्य आस्तित्वात क्षीण होते.ती अंतःशक्ती बाह्य जीवनातही उतरवता यायला हवी. या दोन्ही जगांमध्ये एक मार्ग निर्माण व्हायला हवा.जी अंतःशक्ती ती ऊर्जा मस्तकातून प्रवेश करते, ती सर्वत्र सर्वाभूती असते. त्यामुळे सर्वत्र एकरसभाव मनात उपजतो. त्यालाच प्रेम म्हण, करूणा म्हण, नावं काहीही दे ती अवस्था आत निरंतर नांदायला हवी. मीही साधकच आहे. त्या दिशेने माझे प्रयत्न चालले आहेत. तू इथे रहा. साधना सुरू ठेव मी थोडं बहुत मार्गदर्शन करीनही. पण तुलाच आतून वाटायला हवं की मार्ग सापडला आहे.ती साधना पूर्णत्वाला केव्हाही जाऊ शकते. पण वाटचाल योग्य दिशेने होते आहे असं लक्षात आलं की मग आपण कुठे रहायच ?उपजीविकेसाठी काय करायचं ? या सर्वांबद्दल आपोआप एक सूचना आपल्याला मिळते.

"अस्तित्वाचा उगम म्हणजे ती ऊर्जा का? असा प्रश्न चंदरच्या मनात आला आणि तो समजल्यासारखा जयंत म्हणाला, "तसच आहे. ती ऊर्जा वेगवेगळे आकार,रूपे धारण करते. ती तुझ्यात, माझ्यात, झाडांमध्ये, ढगांमध्ये, समुद्रात, पर्वतांमध्ये सर्वत्र तीच आहे ?

" मग आपल्याला दर्शन कसं घडत नाही तिचं? कारण आपल्या आत जी दैवी स्पंदनं असतात.

माधवी कुंटे

भ्रमणध्वनी - ९८१९६७९५५० / २६११६४८०

madhavikunte@gmail.com

मध्ययुगीन संतकाव्य लोकजीवन आणि लोकभाषा

वि.शं. चौघुले

संत समाज आणि अध्यात्म संत्‌विचार कशासाठी ?

'संतांची समाज धारणा' संतसाहित्य आणि 'समाजप्रबोधन' ही त्यांची पुस्तके प्रसिध्द झाली आहेत. या लेखात त्यांनी मध्ययुगीन संतकाव्य आणि लोकभाषा यांनी अनुबंध स्पष्ट केला असून लोकभाषेचे सांस्कृती आणि वाङ्मयीन मूल्य अधोरेखित केले आहे.

भाषेचा विकास वेगवेगळ्या स्थित्यंतरांमधून होतो. म्हणूनच सर्व काळात भाषेचे रुप एकसारखे नसते बदलते असते. उदाहरणार्थ. एखादा खेड्यातील शेतकरी 'पायातील वहाण पायात बरी', 'जसे पेरावे तसे उगवते'. याप्रकारचे वाक्यप्रचार वापरतो किंवा शब्दप्रयोग करतो, त्यामागे त्याचा भूतकाळ, त्याचा व्यवसाय, त्याची जात त्याचे व्यक्तिमत्व इत्यादी घटक असतात. भाषेच्या विकासक्रमात काही नवे शब्द येतात, परभाषेतले (हिंदी, उर्दू, कन्नड, गुजराथी, इंग्रजी इ.) येतात याचे कारण भाषा हे विनिमयाचे साधन आहे. काही वेळा कृषिसंस्कृतीतले, शेतीतले शब्द नष्ट होतात, त्यांच्याऐवजी नवे शब्द येतात. जेव्हा ट्रॅक्टर अस्तित्वात नव्हता. जेव्हा त्या शब्दाचा वापर होणे अशक्य होते. 'नांगर' म्हणजे काय, हे इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांना चित्रांच्याद्वारे समजावून द्यावे लागते. म्हणून भाषेतील श्रेष्ठ-कनिष्ठता ज्ञान, धर्म, व्यवसाय-उद्देश, भूप्रदेश यांवर अवलंबून नसते. आता विचार करावयाचा आहे तो संतसाहित्यातील लोकभाषेचा किंवा बोली भाषेतील उपयोगाचा वापराचा. १२-१३ व्या शतकानंतर मराठी संतांची मांदियाळी निर्माण झाली. ज्ञानेश्वर समकालीन व उत्तरकालीन संत वेगवेगळ्या जातींमधील होते, जसे संत नामदेव, संत जनी, नरहरी सोनार, संताजी जगनोड (तेली), रोहिदास (चांभार), सावता माळी, गोरा कुंभार, सेना न्हावी, परिसा भागवत, चोखामेळा या संतांच्या काव्यात काही लोकसंकेत आहेत. व्यवसायाची पार्श्वभूमी आहे. त्याच्याही आधी महानुभाव पंथ असित्वात होता. लीळा चरित्र,' 'दृष्टांत पाठ' श्रीगोविंद प्रभू चरित्र' इ. महानुभाव ग्रंथांत अस्सल मराठी भाषा देशी भाषा पहायला मिळते. 'लीळा चरित्रातील' गद्य भाषेत अनेक चित्रे रेखाटली गेली आहेत. चक्रधराची एखादी 'लीला' वाचताना किंवा 'दृष्टांताच्या अनुभव घेताना त्यावेळची गद्य भाषा चित्रदर्शी प्रवाही, नाट्यपूर्ण, संवादमय, कथात्मक होती हे लक्षात येते.

'सेवाकलेचा खडकाचा दृष्टांत असा'

सूत्र : राजसा तामसा धर्मी अधिकार नाही.

दृष्टांत : सेवाळले खडक असे तथावरि पावों देउची
तथा ढेंकचि नए । ऐसांहि ठेवीजे तरि नीरसौनि पाडी :
गुडघे कोंपर झांजरीती ।।

दृष्टांतिक : तैसे तामसाप्रति धैर्य बोलोचि नए ।
ऐसांही बोलीजे तरि दुःखातेचि दे ।।

जो माणूस सात्विक असतो त्यालाच धर्माचा (धार्मिक) म्हणवून घेण्याचा अधिकार असतो. राजस किंवा तामसी माणसाला उपदेश करणे म्हणजे सेवाळ असलेल्या खडकावर पाय ठेवणे, म्हणजे गुडघे झांजरुन घेणे. सोप्या दृष्टांतातून परमार्थामधले तत्व इथे सांगितले आहे.

अठरापगड जातीतील संतांनी स्वतःच्या व्यवसायाची भाषा अभंगात वापरली. लोकरुढी, सामाजिक संकेत, शेती व्यवसाय,

वस्त्रे आवरणे, चालिरीती, सणवार, खाद्यपदार्थ इ. चे उल्लेख महानुभावांच्या व संतांच्या वाङ्‌मयात येतात. महदंबा ही महानुभावीय कवयित्री मराठीतील आदय कवयित्री मानली जाते. तिने ‘धवले’ म्हणजे लग्नात गावयाची वरविषयक गीते लिहिली. त्यावेळच्या विवाहपध्दतीची माहिती धवळ्यांतून मिळते. स्वाभाविकता, गतिमानता, सहजसुंदरता, स्त्रीसुलभता, साधी भाषा हे धवळ्यांचे विशेष आहेत. मराठीतील लोकगीतांचे संशोधक विवाहगीतांचा अभ्यास करतात. आगरी समाजात विवाह प्रसंगी गाणी म्हटली जातात.

संत नामदेवांपासून संत तुकारामांपर्यंत झालेल्या संतानी आपल्या व्यवसायातील शब्द काव्यात आणले.

‘ज्याचे जे औजार । तेच त्याचे शस्त्र ।
घेता नाव ज्ञानरुप भक्तांचे ।
स्मरण होते त्यांच्या व्यवसायाचे’ ।।

संत तुकारामाचे ‘शेतावरील अभंग’प्रसिध्द आहेत. शेतीच्या रुपकातून तुकारामांनी भक्तीचा प्रचार केला ‘‘शुध्द बीजापोटी। फळे रसाळ गोमटी ” हे सुभाषित आपल्या परिचयाचे आहे. संततुकारामांच्या लोकोक्ती, म्हणी, वाक्यप्रचार, वाक्यप्रयोग अजूनही वापरात आहेत. जन मानसात रुजलेले आहेत.

संतसाहित्याचा आणि लोकभाषेचा निकटचा संबंध आहे. याचा अर्थ तुकारामांचे अभंग, एकनाथी भारुडे, पदे-गीते, गौळणी या सगळ्यात लोकजीवनाचे लोकसंस्कृतीचे प्रतिबिंब पडलेले असते. एकनाथांच्या काळात भाषिक आणि सांस्कृतिक अवनतीची परिसीमा झाली होती.

एकनाथांच्या वैयक्तिक जीवनातही भाषिक संघर्ष निर्माण झाला होता.एकनाथांचा मुलगा हरि पंडीत संस्कृताकिगामी होता. प्राकृत मराठी बद्दल त्याला आस्था नव्हती. एकनाथांनी मुलाला विचारले. ‘गीर्वाण भाषा देवे केली प्राकृत काय चोरापासोनि आली’’ ? ‘‘एकनाथांनी भागवत, रामायण, रुक्मिणी स्वयंवरासारखे प्रौढ व गंभीर भाषेतील ग्रंथ मराठीत लिहिले त्याचप्रमाणे लोकरंजनासाठी, अध्यात्मबोध करण्यासाठी भारुडे लिहिली. ‘बहु रुढ’ शब्दापासून भारुड शब्द निर्माण झाला आहे. गोंधळी, वाघ्यामुरली, भराडी, वासुदेव, जोशी, जागल्या, बाळसंतोष असा लोककलाकारांचा समुदाय समाजात होता. तत्त्वचर्चेस हास्याची डूब दिली की गंभीर तत्वज्ञान बहुजनांच्या गळी सहजपणे उतरवता येते. समाज वास्तवाचे डोळस निरीक्षण, आंतरिक उमाळा आणि आस्था असल्यामुळे एकनाथांनी भारुडे लिहिली. म्हणूनच लोकसाहित्यकार एकनाथ असे एकनाथांचे वर्णन केले जाते.

मराठी भाषा समृध्द करणारे आणखी एक समाजाभिमुख संत म्हणजे भागवत किंवा वैष्णव परंपरेचा कळस ठरलेले ‘‘संत तुकाराम” होत. तुकारामांच्या चार साडेचार हजार अंभगात आलेल्या शब्दांचा, वाक्यांचा, वाक्योउपयोग, म्हणींचा आजही वापर केला जातो. ज्ञानेश्वर-नामदेव-एकनाथ-तुकाराम-रामदास या प्रमुख संतांचा काळ, त्यांचे व्यक्तिमत्व, त्यांची प्रतिभा यात काही प्रमाणात भेद आहे. एकनाथी भारुडे समाजभिमुख आहेत, तर तुकारामांच्या अभंगवाणीत तत्कालीन समाजाचे रंग प्रकट झाले आहे.

तुकाराम वारकरी होते, कीर्तनकार होते संवादमयता हे त्यांच्या शैलीचे वैशिट्य होते. उदाहरणार्थ एखादया अभंगात ते विठ्ठलाची आळवणी करतात तेव्हा ते आर्तपणे त्याच्याशी संवाद साधतात, कधी कधी नाट्यपूर्ण प्रसंग उभा करतात, तर कधी चिंतनशिलता वैचारिकता व्यक्त करतात. तुकारामांच्या भाषेतील अवतरणक्षमता उल्लेखनीय आहे. त्यांची काही सुभाषिते-अवतरणे अशी :

मोले घेतले रडाया था । नाही आंतर नाही माया ।।
आलीया भोगाशी असावे सादर । देवावरी भार घालुनिया ।।
जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती।
देह कष्टविती उपकारे ।।

दया क्षमा शांती तेथे देवाची वसती ।
महापुरे झाडे जाती तेथें लव्हाळी वाचती ।
निश्चयाचे बळ तुका म्हणे तेचि फळ ।
कोडियाचे गोरेपण । तैसे अहंकारी मन
आंधळ्यासाठी जग अवलोकी आंधळे
तुका म्हणे तैसे जाणा संतजन सर्वत्र संपूर्ण गगन जैसे ।
अर्भकाचेसाठी पंते हाती धरिली पाटी
तैसे संत जगी क्रिया करूनि दाविती अंगी ।
तुका म्हणे अवधे फिके भाषाविण मीठ नाही अन्न तेणे त्याचे
कोणाही जिवाचा न घडो मत्सर ।

वर्म सर्वेश्र्वर पूजनाचे

अमुक गृहस्थ म्हणजे दारोदार भीक मागणारे लोभीचे मांजरच आहे.

''टाकीचे धाव सोसल्याशिवाय देवपण येत नाही''

आळशावर गंगा आली असे नानाप्रकारचे भाषा प्रयोग करताना आपण तुकारामांच्या भाषेत बोलत असतो. तुकारामांची लोकभाषा समाजाच्या ओठी नेहमीच खेळत असते. शेक्सपीअरच्या नाटकातील प्रवेश पाहिल्यावर प्रा. वा. ल. कुळकर्णी यांना वर्तमानकालीन इंग्रजी भाषा, शेक्स्पीरन भाषा यांचे नाते आहे असे वाटले. वा. ल. कुलकर्णी लिहितात, आपले वाङमयधन लोकधनाच्या लोकसभेच्या पदवीला नेऊन पोहचण्याचे भाग्य सगळ्याच लेखकांना लाभले असे नाही. शेक्सपीअर सारख्या थोडयांच्या कपाळी हे भाग्य लिहलेले असते. आपल्याकडे हे भाग्य माझ्या समजुतीप्रमाणे तुकारामाला विशेष लाभलेले आहे. तुकामाची बरीचशी अभंगवाणी ही गेल्या तीनशे वर्षांच्या काळात महाराष्ट्रवाणीचा एक अविभाग्य घटक बनलेली आहे. गेल्या तीनशे वर्षांच्या काळात महाराष्ट्रवाणीने एका अंभगवाणीतून किती तरी जीवन रस स्वबल संवर्धनार्थ शोषून घेतलेला आहे.

मराठी स्त्रीगीतांची परंपरा पूर्वीपासून सुरु आहे. जशी व्यावसायिकांची भाषा असते. तशी स्त्रियांचीही भाषा असते स्त्रीगीतांतून समाजव्यवस्था, स्त्रीचा समाजाकडे पाहाण्याचा दृष्टिकोन, स्त्रीमनाचे कंगोरे दिसतात. स्त्री ज्या काळात, ज्या भौगोलिक परिसरात, ज्या कुटुंब व्यवस्थेत वावरते त्याचे प्रतिबिंब भाषेत पडते. म्हणून संत स्त्री कवयित्रींचा वेगळा विचार केला जातो आधी महदंबेच्या धवळ्यांचा निर्देश झाला आहे. स्त्रियांच्या गीतांतील काव्यातील शब्द या प्रकारचे शब्द आढळून येतात. संतकवियित्रीच्या अभंगात, पदांत, गीतही आढळून येतात. उदाहरणार्थ तेलवण (लग्न लावण्यापूर्वी नवऱ्याकडून नवरीकडे पाठवलेले पदार्थ), दीट - दृष्टी, दुरडी - बाबूंची टोपली, दुल्लड-दागिना, मावळचारि (आत्याचा आहेर), मावळण-आदा, बाळुती- बाळाच्या अंगावरचे कपडे, अस्तुरी-स्त्री, चून-बेसन, गळसरी-दागिना इ.

ऋतुप्राप्तीचा उल्लेख येणारे शब्द न्हाणं येणे, शहाणी होणे, पदर येणे, पालव येणे. मंगळसूत्र-डोरलं, कुंकवाची चिरी मुलीच्या रुपागुणाचं वर्णन करताना पुतळ्याची माळ, सोन्याचं तारं-हिरकणी, चांदणी असो रुपकात्मक शब्द वापरले जातात. ग्रामीण स्त्री दैनंदिन जीवनात जी भाषा वापरते त्याचे मूळ मध्यकालीन काव्यात सापडते . लोकपरंपरेत शब्द कालाप्रवाहनुसार सुरु राहतात.

महानुभाव पथांनी आणि मध्ययुगीन वारकरी संतांनी मराठी भाषा समृध्द केली, तिचे भरण षोषण केले, देशीपणा टिकवून ठेवला. कालांतराने उर्दू व इंग्रजी भाषांचे आक्रमण देशी मराठीवर झाले. भाषा-साहित्य-भाषाशास्त्र-संस्कृती, समाजशास्त्र, लोकशाही त्याचे अभ्यासक भाषेचा उपेक्षा करत नाहीत. मातृभाषेतून शिक्षण झाले पाहिजे असा आग्रह शिक्षणतज्ञ, मानसोपचार तज्ञ धरतात. कारण मातृभाषा आपली आकलन शक्ती, विचार प्रकटीकरणाची कुवत आणि सर्जनशीलता वाढवते. आपल्या परंपरेतून आलेल्या साहित्याचा अभ्यास केला तर समाज सांस्कृतिशी जोडला गेला आहे हे समजून येते. लोकभाषा मग ती संतांनी, कवींनी, लेखकांनी उपयोजिलेली असो, समग्र संस्कृतीचे 'संचीत' असते. काही परभाषा मूळ भाषेवर आक्रमण करतात आणि भाषेचे 'स्वत्व' नाहीसे करतात. खरे म्हणजे लोकभाषा जिवंत, चैतन्यदायी असतात. या भाषांमध्ये समाजाचे प्रतिबिंब पडलेले असते, त्याचप्रमाणे त्या 'भाषिक' अस्मिता जागी ठेवतात. म्हणूनच लोकभाषेची उपेक्षा म्हणजे संस्कृतीची उपेक्षा, आंतरराष्ट्रीय पातळीवरील इंग्रजीचे महत्त्व मान्य केले पाहिजे. मात्र 'स्वभाषा' सहित्य निर्मितीला सर्जनशीलतेला साहाय्यभूत होते. विशेषतः ग्लोबलायझेशनच्या काळात व्यावहारिक पातळीवर, आर्थिक वर्चस्व कायम राखण्यासाठी इंग्रजीचा स्वीकार केला जात आहे. तसा तो अनेक राष्ट्रांतही केला जात आहे. तथापि ती राष्ट्रे आपल्या भाषेचा, पर्यायाने जनभाषेचा विसर पडू देत नाहीत. अनुवादित साहित्या द्वारे विशिष्ट प्रदेशातील साहित्याची गुणवत्ता समजते. साहित्याच्या श्रेष्ठत्वाचे मानदंड किंवा निकष निश्चित करता येतात.

मध्ययुगीन संतांनी कवींनी, उपलब्ध करुन दिलेला भाषिक सांस्कृतिक ठेवा जतन करण्यासाठी लोकभाषेचा अभ्यास, संशोधन आणि उपयोजन ही काळाची गरज आहे.

वि.शं. चौघुले

ए/५, ॐ विजयश्री, संतजनाबाई पथ,

विलेपार्ले (पूर्व), मुंबई - ४०० ०५७

प्रज्ञाचक्षु गुलाबराव महाराज

डॉ. चारुशिला ओक

महाराष्ट्रात तेराव्या शतकात संतांची मांदियाळी निर्माण झाली. जी अठराव्या शतकापर्यंत ओघवती राहिली. दुरितांचे तिमिर जावो. विश्व स्वधर्म सूर्ये पाहो, जो जे वांछिल तो ते लाहो प्राणिजात ।। असे पसायदान मागून ज्ञानेश्वरांनी कोणत्याही एका धर्माची नव्हे तर वैश्विक धर्माची प्राणप्रतिष्ठा केली. त्यानंतर नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास या संतांनी मध्ययुगातील महाराष्ट्रात संस्कृतीची जोपासना करून जीवन मूल्यांचे रक्षण केले. आद्य कवी मुकुंदराजांपासून ज्ञानेश्वरादि भावंडे, भागवत भक्ती प्रपंचातले नंतरचे सर्व विठ्ठल भक्त यांनी समाजाचे आध्यात्मिक उन्नयन केले. त्याचप्रमाणे राष्ट्रीय भावनाही जागृत केल्या. त्यामुळेच रामदासांनंतर ही राष्ट्रसंत तुकडोजी महाराज गाडगेबाबा यांचं ही कार्य पुढे समाजाला प्रेरक ठरलं.

गुलाबरावांचा जन्म संतांच्या ह्या काळखंडाच्या नंतर, खुप काळानंतर, १८८१ मध्ये वऱ्हाडात अमरवतीच्या उत्तरेस तेवीस मैलावर इलिचपूर तालुक्यात माधाल नावाचं एक खेडं आहे, जिथे मोहोडांची वस्ती जास्त आहे. तिथे निस्सिम शिवभक्त आजोबा राणोजी यांच्या घरात झाला. आपल्या नातवाच्या रूपाने एक दिव्य पुरूष आपल्या घराण्यात जन्माला येणार आहे. असा दृष्टांत राणोजींना झाला होता. जो असामान्य बुद्धीचा प्रज्ञावंत पुरूष वऱ्हाडातल्या त्या घरात जन्मला. त्या बाळाचे नाव ठेवले गुलाब.

त्यांच्या जन्मानंतरच्या भारताच्या राजकीय पटलावरचे चित्र अगदी वेगळेच होते. विपरीतच होते. त्या वातावरणातील जे उत्तम व ग्राह्य होते ते घेऊन, जे भारतीय धर्म संस्कार, परंपरा ह्यांची हानी करणारे होते त्याचा त्याग करण्याचा संयम आणि विवेक गुलाबरावांनी चाणाक्षपणे सांभाळला. तो काळ कसा होता. तर देश एका विशिष्ट संक्रमणातून जात होता. व्यापाराच्या निमित्ताने हातात तराजू घेऊन ईस्टइंडिया कंपनीने भारतात चंचुप्रवेश केलेला होता आणि बघता बघता त्यांनी आपल्या देशावर राजकीय अंमल बसवलेला होता. त्यामुळे उत्तरोत्तर आपले तेज झाकाळत होते.

लॉर्ड मेकॉलेने आपल्या पारंपारिक संस्कृत पाठशाळा बंद केल्या. त्याऐवजी इंग्रजी शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. ही भारताला सर्वार्थानं जिंकण्याची ब्रिटीशांची मुत्सदेगिरी होती. पण हयांची प्रवृत्ती मात्र वैदिक धर्माकडे होती. बालवयातील त्यांची कुशाग्र बुद्धी आणि शिघ्र कवित्व सर्वांच्या कौतुका पलिकडचं होतं. तो कुणी साक्षात्कारी महापुरूष आहे असेच सर्वांना वाटे. पोथ्या पुराणं आरत्या सर्व तोंडपाठ असे. श्रीकृष्णावर त्यांचे अपरंपार प्रेम होते. ते जन्म जातीने शुद्र

होते पण वैदिक धर्माचे अनुयायी. अशा या बाळमूर्तीला खरोखरच कुणाची तरी दृष्ट लागली. ते नऊ महिन्याचे झाले तेव्हा डोळे आल्याचे निमित्त होऊन त्यांचे डोळे गेले. ज्या क्षणी हया बालकाचे बाहयचक्षू हरपले त्याच क्षणी त्याचे प्रज्ञाचक्षू उघडले.''

कवी म्हणतात, ''नश्वर चर्मचक्षू मिटले, त्याच वेळी शाश्वत प्रज्ञाचक्षू उघडले.'' एकीकडे अस्त, दुसरीकडे उदय.

''तो पापाचा आचळू कुटे पुण्याची पहाट फुटे ''

असा हा अद्‌भूत प्रसंग !

तत्क्षणीच दिशादिशांतून प्रार्थना
शुभंकर शब्द निनादले.
तमसो मा ज्योतिर्गमय ।।

बालवयातच जणू त्यांची सत्वपरिक्षा सुरू झाली. चारवर्षांचे असताना ते मातृसुखाला मुकले. पण आजीने गुल्ल्याला जीवापाड जपले . शालेय शिक्षणापासून ते वंचित राहिले. खोडकर खटयाळ ही होते, पण उपजत तीव्र, तीक्ष्ण, प्रगल्भ आकलन शक्ती, एकपाठी स्मरणशक्ती म्हणूनच गावातले उपाध्ये लक्ष्मणभटजींकडे जाऊन श्लोक, शिवलीला मृत, अकरावा अध्याय, व्यंकटेश स्तोत्र वगैरे पाठ केलं. त्याकाळातील पद्धतीनुसार १८९६ मध्ये त्यांचा पूर्णीशी विवाह झाला. त्यांनी तिचे नाव मनकर्णीका ठेवले. भोजन समारंभात स्वरचित पदे म्हटली. लग्नात जावयाने रूसण्याची पद्धत होती. पण ती नाकारून ते रूसले नाहीत. पुढे आयुष्यातही कधी नाही. उलट मनकर्णिकेला चौदा ओळीचं एकपत्र लिहीलं. रामकृष्ण परमहंसाबद्दलही सांगतात की त्यांनी पत्नीला शारदामणींना शिक्षण दिले. महाराजांनी आपल्या पत्रात पत्नाने आपल्या संगतीतून काय लाभ कसा घ्यावा याबद्दल कविता लिहिली... ती अशी

श्री ज्ञानेश्वर प्रसादे करून,
प्रिये तू सत्वर होई पूर्ण
स्त्रियांस सदुपदेश करून
सन्मार्ग दावी
हे माझे आज्ञापत्र
वाचोनि सतवर धाडी उत्तर
सद्‌गुरू माऊली ज्ञानेश्वर
पूर्ण करोत तुज देवी ।।

वयाच्या १२ वर्षापासून ते नित्य हरिउपासना करीत. त्यांच्यामुखी अभंगवाणी उमटू लागली. पोथी आणि ग्रंथ वाचना बरोबरच एकविसाव्या शतकात ज्ञान विज्ञानाचे वाचन, विचार, संस्कार,सामाजिक प्रगतीशीलतेचा अभ्यास, दुसऱ्यांकडून वाचून समजून घेण्याचा प्रयत्न गुलाबराव महाराजांनी चालूच ठेवला. ह्या उदाहरणाबरोबर आपल्याला उत्तरभारतातील सूरदास हया अंध कवीच्या रसाळ भक्तीपूर्ण काव्य, कृष्णभक्ती, कृष्णलीला मानवी जीवनातल्या विविध रसात्मक काव्यत्वीही आठवण येईल. त्याचप्रमाणे हेलन केलर ही मूक आणि अंध असून श्रम, धैर्य, प्रयत्न यातून विव्दत्तेत तिने सन्मान मिळवला. ती म्हणते, Life is either a challange (आव्हान) or adventure (साहस) if its none it is not a life at all . महाराज असेच धेयाला, आव्हानाला सामोरे गेले.

तसेच नेपोलियनने ज्या प्रमाणे स्वत: परीस्थिती घडवली एवढेच नव्हे तर प्रतिकूल परिस्थितीला आपल्या समोर नतमस्तक केले. तद्ववतर्च गुलाबराव महाराजांनी आध्यात्मिक प्रतिभेच्या तेजाने केले त्यांचे ते पुस्तकी पांडित्य पोपटाचं नव्हतं. ते त्यांचं ज्ञान संचित होतं. ते निरूपण करू लागल्यावर चार लेखनिक लेखनासाठी समोर बसत. तरी ते त्याने वाचन आणि पुस्तकाबद्दल लिहीतात,

कोण मुक्त झाला वाचोनि पुस्तक
जीवन ही एक शुद्ध भाव ।।
जवं (जोवर) नाही जीवी सत्य तळमळ
जवं अंगी राहे विज्ञानाचा ताठा
तो न मिळे मोठा साधुसंग ।।
कबीरानेही असाच दोहा लिहिलेला आहे.
पोथी पढिपढिजग मुआ (मृत)

पंडित भया न कोय
ढाई अक्षर प्रेम के
पढे सो पंडित होय ।।

अल्पवयात सर्व धर्माबद्दलची जिज्ञासा त्यांच्या मनात होती. सर्व धर्म पंथांचा अविरोध स्वीकार करण्याची सहिष्णुता होती. चिंतन म्हणजे एकांगी अंधश्रद्धा नव्हती. अशिक्षित ग्रामीण लोकांच्या जुनाट विचारात सुधारणा करणारे ते संत सुधारक होते. याशिवाय आधुनिक भौतिक शास्त्रांचे ज्ञान त्यांनी शिकून घेतलेले होते. मानसशास्त्र थिऑसॉफी शिवाय स्वामी दयानंद, केशवचंद्र सेन, रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद रामतीर्थ, लोकमान्य टिळक या सर्वांचे विचार पाश्चात्य विचारसरणी आणि धर्मविचार यांचा समतोल होता. हा तोल त्यांच्या काव्य लेखनातही दिसून येतो. ज्याला लावणी समजली जाते अशा विराणी (विरहिणी) ची गीते ते लिहित. ती भगवंताच्या भेटीसाठी व्याकुळ, भक्ती प्रीतीची गीते असत.

विराणी गीत :

सखुबाई मजविषयी कसे कोपले गडे नारायण
चातक पक्षी लक्ष सख्याकडे रात्रंदिन ।।
जसा वाळुवरी मासा तळमळ करितो उदकाविण
तशीगत मजला झाली कधी भेटले ग मनमोहन
सख्या वाचून जीव झाला पिसा
कधी रे भेटशील सख्या राजसा
नेत्रातूनी अश्रु वाहे पसापसा
धरणीवर लोळे रडे ढसाढसा ।।

असाच निर्मळ पती पत्नी मधील ओढघेणारा भाव त्यांनी पत्नीला लिहिलेल्या पत्रातून व्यक्त झालेला आहे.

प्रिये तू नव्हेस स्त्री वा पुरूष । सच्चितानंद स्वयंभूप्रकाश ।। अविद्येने भुलोनी चयास । स्त्री पुरूष तुज वाटे ।। स्त्री पुरूष देहासी नाम । त्याहुनी वेगळा आत्माराम ।। तो नव्हे काम निष्काम । कर्मोकर्मा वेगळा जो ।। पती पुत्र गोत्र बंधू । जे अवघेचि स्वार्थ साधू ।। यांचा सोडूनिया संबंध । चित्ती मुकुंद आठवी ।।

या पत्राचं यथोयोग्य उत्तर मनकर्णिका बाईंनी पाठवलं.मी स्त्री किंवा पुरूष या रुपाने मानवी देहात आहे तो पर्यंत गुरू सेवा पतिसेवा इत्यादी कर्तव्य बुद्धीने करणेच उचित आहे. महाराजांनी घेतलेल्या याही सत्व परिक्षेला मन कर्णिकाबाई तंतोतंत उतरल्या.

यानंतर १८९९ ते १९०३ हा महाराजांचा कालखंड सिरसगावात सद्‌विद्या दान करण्यात गेला. ग्रंथांवर महाराजांचे अपार प्रेम होते. त्याच प्रमाणे दीन दुबळ्यांचा गोर गरिबांचा उद्धार करण्याचे व्रतच त्यांनी घेतले होते.

अशा हीन दीन उपेक्षितिांमध्ये हिरा नावाची एक वेश्या होती. तिचा वावर महाराजांच्या मावशीचा घरात होता. तिला ज्ञानेश्वरांची भक्ती करावी, असे वाटे. महाराजांजवळ तिने अनुजा देऊन उपकार करावे अशी विनंती केली. तिला उपदेश देऊन सामाजिक दृष्ट्या तिरस्करणीय मानल्या गेलेल्या हिराला त्यांनी जणू जगण्याचा अधिकार दिला. हिरानेही उर्वरित आयुष्यात त्या व्रताचे पालन केले. ह्याचे प्रतिपादन करताना स्वतः महाराजांनी लिहिलेल्या पद्मपुराणात तिच्या मृत्यूनंतर व्यथितपणे म्हटले आहे.

अन्तकालेच मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम् ।
यः प्रयाति त्यचन्द हं न संशयः
आणि. अपिचेत्सुदाराचारो भजते मामनन्यभावः
साधुरेव रा मन्तव्यः संमग्ण्यव स्थितोहिसः ।।

ह्यावरून महाराजसंस्कृत भाषेतही आपले विचार कसे मांडत व त्याची मानवतावादी दृष्टी दिसून येते. भाषा प्रभुत्व वाचन आणि ग्रथांचे विवेचन हयाचा आवाका प्रचंड होता नारदभक्ती सूत्र, विचारसागरग्रंथातील तत्वज्ञान वगैरे मनकर्णिकेला ते वेदांत योग, व्याकरण शिकवू लागले. सखारामाला आपला वैदकी शिकवू लागले. गावातील लोकांसाठी ते अमृतानुभव ज्ञानेश्वरीसारख्या ग्रंथावर निरूपण करू लागले. कीर्तनातून समाजाला सदविचारांचे मार्गदर्शन करू लागले. एका दृष्टिहीन माणसाने मराठी हिंदीच नव्हे तर

संस्कृत भाषेवर एवढे प्रभुत्व मिळवणे ही खरोखर अदभुत क्रिया आहे. नेपोलियनच्या शब्दकोशात अशक्य हा शब्द नव्हता तसेच हे लोकोत्तर व्यक्तिमत्व होते. त्यांच्याविषयी बाबागर्दे यांनी एक पद्यरचना केली आहे.

अंध म्हणती मतिमंद तुला जे, अंध तेचि तत्वतां ।
नासती ज्ञानचक्षु ज्या स्वतः ।
मुनी जागतो तीतं असे जी निशाचि सर्वांभूता ।
असे हरि सांगे कुंती सुता ।
निष्णात असे जो शाब्दी परि तो गुरू ।
उद्धवासी ऐसे वदे भक्त सुरतरू ।
अशा लक्षणे युक्त दिसे त्याच्या पदवंदनी ।
व्हावे तत्पर साधकजनी गुलाबराया ।।

गुलाबरावांची बुद्धीप्रधान चिकित्सक बुद्धी फक्त वैदिक धर्म आणि भारतीय आचार विचार पद्धतीनेच विश्लेषण किंवा अंधानुकरण करत राहिली नाही तर इंग्रजीपुस्तकातील ज्ञान, विवेचन, विश्लेषण, विजय नवे सिध्दांत त्यांनी अर्थातच इतरांकडून वाचून समजून घेतले व आपले बुद्धीकौशल्य वापरून स्वतः चे विचार आणि प्रतिक्रिया त्यांनी स्पष्टपणे व्यक्त केल्या उदा. १९ व्या शतकाच्या अखेरीस चार्लस डार्विनने (Origin of species) जीवसृष्टीची उत्पत्ती हा ग्रंथ लिहिला. त्यात जीवशास्त्रीय दृष्टिकोनातून जीवाचा जन्म सूक्ष्म जीवतत्वापासून कसा होतो, त्यामध्ये नैसर्गिक निवड (Natural Selection) आणि सर्वात योग्य वस्तूचे टिकून राहणे (Survival of the fittest) ही उत्क्रांती वादाची दोन मूलतत्वे आधारभूत महत्वाची आहेत. सर्व जीववस्तू आपल्या अस्तित्वाला पोषक अशा बाहयवस्तूंची निवड करतात ऋतुनुसार स्थलांतर करतात. हयासाठी बाहय परिस्थती इतकीच त्याच्याशी जुळवून किंवा संघर्ष करीत प्रत्येक जीव स्वतःची उत्क्रांत प्रगती करत असतो. हा सिद्धांत माणसाच्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक बौद्धिक आणि कला हयांच्या वाढ आणि विकासालाही मदत करतो.

डार्विनच्या हया सिद्धांतातील जीव जिवाणूंची उत्क्रांती होत जाते हया कल्पनेने वर्षानुवर्षे आपण जोपासलेल्या श्रद्धांना मोठच धक्का दिला. सर्व सजाव निर्जीव सृष्टीसह मनुष्यप्राण्याची ही निर्मिती सर्वशक्तीमान परमेश्वराने केलेली आहे. त्याच्या इच्छेनेच सर्व व्यवहार चालतात हया श्रद्धेला हा सिद्धांत आव्हान ठरला.

गुलाबराव महाराजांनी स्वतःच्या अलौकिक व्याख्यानमाला साधुबोध सूक्तिरत्यावली इत्यादी पुस्तकातून डार्विनच्या उत्क्रांती वादावर आपले विचार व्यक्त केले आहेत. सर्व सृष्टी जडवादातून निर्माण होते. हया भूमिकेला त्यांचा विरोध होता. माकडापासून माणूस उत्कांत झाला. तेव्हा डार्विनच्या सिद्धांतानुसार त्याचा देह, रूप, बुद्धी हयाची उत्क्रांती झाली. हे चक्र प्राणीजीवात चालू राहते.

डार्विनच्या सिद्धांताप्रमाणेच महाराजांनी स्पेन्सरच्या विचाराचीही समीक्षा केली. स्पेन्सरचे दहा ग्रंथ उपलब्ध आहेत.

महाराजांच्या अगाध बुद्धीचा प्रत्यय येऊन भल्याभल्या विद्वानांची मती कुंठीत झाली. त्यापैकी श्री. जठार हया विद्वान गृहस्थांनी १९०२ मध्ये पत्र लिहून महाराजांना कळवले, तुमचा लेख वाचल्यावर वाटले, मयूर पक्ष्याच्या डोळ्याप्रमाणे डोळे बाळगण्यापेक्षा तुमच्या प्रमाणे प्रज्ञाचक्षु होणे उत्तम. डार्विन आणि स्पेन्सरच्या मतांची तुम्ही जी अभ्यास पूर्ण चिकित्सा केली आहे तितकी आजपर्यंत कुणाच केलेली नाही. हा एका अंधाच्या दृष्टी आणि बुद्धीचा चमत्कार होता.

मधुराद्वैत

गुलाबराव महाराज मधुराद्वैत दर्शनाचे आचार्य. मधुरा भक्ती ही ईश्वर मानत असताना स्त्रीरूपात त्या ते परमतत्वाशी पूर्णपणे एकरूप होऊन जात असत. ते स्वतः ला ज्ञानेश्वर कन्या व श्रीकृष्ण पत्नी म्हणवत असत. आपल्या चौतीस वर्षांच्या आयुष्यात त्यांनी १३३ ग्रंथांची निर्मिती केली.

ज्ञान, विज्ञान, समाजात सहकार समता सहिष्णुतेसाठी नित्य उपदेश केला. ह्यामध्ये त्यांचा एक महत्त्वाचा गुण म्हणजे स्त्रीचा उद्धार ही दृष्टी त्यांच्या अंध नेत्रांना लाभलेली होती. त्यांच्या माधुर्य भावनेतून त्यांनी वऱ्हाडी भाषेत अनेक स्त्री गीते लिहिली आहेत. त्यातील काही विविध गीते पाहूया. स्त्री गीतासाठी त्यांनी आठ प्रकारच्या चालीही योजिल्या आहेत. त्यानुसार शब्द योजनेची लय ठेवलेली आहे.

ज्ञानेश प्रभू माझा, देवो मजला स्फूर्ती ग बाई
तुमचे स्वरूपाची, ओळख नाही देवा
कोण्या प्रकारे करू सेवा ।।

संसार दुःख मूळ, दुःख मूळ , तो म्या त्यागीला सकळ
श्रीगुरू तुम्हा आता तुम्हा आता, माझी असो कळकळ ।।

अशा प्रकारे ओवी स्वरूपात त्यांनी लिहिलेल्या गीतातून स्त्रीचा लीन मायाळू स्वभाव दिसतो. तर काही मध्ये ती देवाकडून हक्काने कसली मागणी करते. त्यात स्वतःची दास्य बुद्धी ही कधी दिसते.

दासी मी नेत्रांधळी । ठेवी झाडाया अंगण ।।

असे भावही दिसून येतात. स्त्री गीतांची वेगळी रचना करताना ते तिच्या तोंडून गुरूचा महिमा ही व्यक्त करतात. त्यातही हा स्त्री स्वभाव ओळखू येतो – तो असा

ऐकोनी हरिगुण वाटते असे मनी ।।
सासूला न सांगता ग बाई, एकले जावे वनी ।।
देखता देखप्राची चित्त हे झाले वेडे ।।
जाऊ ते पाहतसे बाई, गोपाळा कृष्णाकडे ।।
ह्दय आकाशात, कमळाकार फूल
तयाच्या मध्यभागी ग बाई श्रीगुरू पदयुगुल ।।
भक्तांची ही मधुर प्रेम भावना कृष्णालाही कळते
अक्रुरे आणिले मथुरे जेव्हा मला
तैं झाल्या दुःखित अत्यंतचि विमला
अक्रुरा निंदिती म्हणुनी क्रुर तया
का नेसी गोकुळाची जिवकळा ।।

अशा या स्त्री गीतांच्या एकूण ओव्या ११५६ गुरूसेवेची गीते ५ प्रकरणे त्यास या अंध महाराजांनी यष्टी म्हणजे काठी म्हटले आहे. गुरू हाच त्यांचा आधार. ईश्वर भक्तीच्या भावनेत महाराजांनी स्त्रियांच्या अनेक भावभावना ओळखून त्यांना गीतातून स्थान दिलेले आहे. महाराजांचे स्त्रियांबद्दलचे विचार पुरोगामीच होते. महाराजांशी वादविवाद करतांना एकजण म्हणाला. स्त्रिया तर स्वभावतःच भ्रष्ट असतात. तेव्हा महाराज ताडकन म्हणाले, तुझं हे म्हणणं खरं असेल तर तुझी आई देखील भ्रष्टच ठरते ना.

प्रश्न : स्त्रीपुरूषांनी एकमेकांपासून काय शिकावे
उत्तर : स्त्री पासून प्रेम व पुरूषापासून धर्म
प्रश्न : कोणत्या स्त्रीला श्रेष्ठ समजावे
उत्तर : कर्तव्यपालन करणाऱ्या

स्वतःला ज्ञानेश्वरांची कन्या आणि श्रीकृष्णाची पत्नी समजणाऱ्या महाराजांचे रूप सृवरूप राहणी कशी होती. वेष कसा होता. तर तो असा

डोक्यावर काळ्या कुळकुळीत केसांची वेणी
कपाळास कुंकवाचा भव्य सौभाग्य तिलक
गळ्यात मंगळसूत्र
स्कंधावर शुभ्र यज्ञोपवीत
हातात सुवर्ण कंकण
पायात जोडवी

महाराजांनी धारण केलेला हा स्त्रीवेष काही लोकांना आक्षेपार्ह वाटतो. पण यापूर्वी रामकृष्ण परमहंस, नरसी मेहता ह्या श्रेष्ठ पुरूषांनी स्त्री वेष धारण केलेला आहे. ज्ञानेश्वरांनी देखील पांडुरंगाला उद्देश तो वल्लभ मी कांतु असे म्हटले आहे. मधुराभक्तीचा अनुभव तुकाराम ही असा सांगतात

हाचि नेम आता न फिरे माघारी
बैसले शेजारी गोविंदाच्या
घररिघी झाले पट्टराणी बळे
वरिले सावळे परब्रम्ह
वाळियाचा अंगसंग झाला आता
नाही भवचिंता तुका म्हणे

अशा या प्रेमबंधाचे पाच प्रकार आहेत. स्नेह यात माया प्रेम, स्वामी सेवक प्रेम, मुलांचे मातृपितृ प्रेम, मातापित्यांचे अपत्य प्रेम, भक्तीप्रेम सर्वोच्च शिखर होय. बायबलमधे सेंटबर्लार्ड, सेंट जॉन यांनी येशूला प्रियकर मानलेले आहे. इस्लाम मधील सूफी संप्रदायात मूसा सुहागिया ह्या उपसंप्रदायात परमेश्वराला पत्नी व स्वतःला पती मानले आहे. मालिक मुहंमद जायसी हया कवीने पदमावत हया आपल्या काव्यात सिंहलद्वीपमध्ये देवरूप म्हणून तिचा शोध ध्यास घेतला. शुकनास नावाचा त्याचा पोपट गुरू म्हणून त्याला मार्ग दाखवत होता.सब्रिया या सूफीपंथी स्त्रीनं आपलं लग्न भगवंताशी झाले आहे हे ठामपणे ठरवून दुसरे लौकिक लग्न करण्यास नकार दिला. दक्षिण भारतात गोदा उर्फ आंडल ही स्वतःला रंगनाथांची पत्नी समजत असे. हया् भक्तीसंप्रदायात गुलाबराव महाराज विद्वान होते. उदारमतवादी श्रेष्ठ भक्त होते. डॉ. रामपंडीत यांनी हया प्रज्ञाचक्षु असलेल्या भक्ताबद्दल म्हटले

एक चक्षुहीन
अनेक चक्षुहीन लोकांना चक्षु देऊन
चक्षुंच्या पलीकडे गेला
नंतर कळले
तो तर चक्षुहीन नव्हता
खरे म्हणजे
मोठ्या डोळ्यांचे साक्षर
आम्हीच आंधळे होतो
आता आमच्या सारख्यांचे डोळे
त्या चक्षुहीनाला बघतात
त्यांच्या मार्गाने जाता जाता

डॉ. चारुशिला ओक
मो. ९३२४२३६८८५

तूच सर्वांना आधार

तूच सर्वांना आधार, आलो तुला शरण
तेजाच्या आरतीसाठी, तिमिरास कर हरण ।।धृ।।

मन हे वाऱ्यापरी सुसाट
दिशाहिन उधळले
सुखाच्या लालसेत त्याने
दुःखास कवटाळले
तुझ्यावीण कोण करील, या दुबळ्या मनाचे सांत्वन
तेजाच्या आरतीसाठी, तिमिरास कर हरण ।।१।।

यातनांच्या बाजारात
जीवनाची मिणमिणती ज्योत
आनंदाची लकेर नाही
ओठांवर किती दिवसात
आशेच्या वाटेवर दिसू दे तुझे मंगलचरण
तेजाच्या आरतीसाठी, तिमिरास कर हरण ।।२।।

मी पणा नाठाळ होऊनी
बेगडी जगात वागला
घडल्या कित्येक चुका
शब्दाला न जागला
पामराला कर क्षमा, तुझे विशाल अंतःकरण
तेजाच्या आरतीसाठी, तिमिरास कर हरण ।।३।।

तुझा सहवास घडूनी
जगण्याला अर्थ यावा
षडरिपुंच्या दमनातूनी
आतला आवाज कळावा
तुझ्या कृपेने रे होईल, सार्थक जीवनभरण
तेजाच्या आरतीसाठी, तिमिरास कर हरण ।।४।।

एकनाथ आव्हाड
चेंबूर मुंबई.
भ्रमणध्वनी - ९८२१७७७९६८

माझं अध्यात्म

डॉ. विजया वाड

अध्यात्म म्हणजे काय? त्याचा अर्थ काय? हे सारं कळायच्या आत माझ्या प्रिय आईने त्याची बैठक माझ्या मनात पक्की केली.

मी आणि माझा चुलत भाऊ अरूण, दोघे आठ वर्षांचे होतो. तो माझ्या आईला (काकू असली तरी) मामी म्हणे. मला म्हणाला, ''चला, आज मामीला खूश करू. आपण भाजी घेऊन येऊ.''

माझे वडील तेव्हा पनवेलीस होते. ते प्रांत ऑफिसर होते नि खूप प्रसिद्ध होते. पट्टेवाला, जीप, शिपाई असा थाट! आम्ही ज्या गुळवे वाड्यात राहायचो तो रतन टॉकीजच्या आसपास होता. (आता दोन्ही नाहीत) भाजी मार्केटात आम्ही दोघं पिशव्या घेऊन गेलो. नोकर माणूस न पाठविता बाईसाहेबांनी बारकी मुले कशी पाठविली बरे भाजी आणायला? असा प्रश्न मार्केटातल्या भाजीवाल्यांना पडला असावा. बटाटे, कोबी, फुलवर, दुधी भोपळा अशी काही बाही आम्हाला माहीत असलेली भाजी घेऊन आम्ही घरी आलो . कोणीच आमच्याकडून पैसे घेतले नाहीत'' मामी, आम्ही बघ, केवढी भाजी आणली ''अरूणने पिशवी उघडली ''पैसे शून्य पडले मामी!'' मला आणि अरूणला अभिमान वाटला ''आम्ही देत होतो पण ते नक्कोच नकोच म्हणाले'' मी म्हणाले, पण आई खूश झाली नाही. लगोलगच खूप घाईने ती उठली, ''चला''

आम्हाला घेऊन त्या पिशवीसकट मार्केटात आली कोणाकोणाकडून भाजी घेतली त्यांना पैसे दिले.

''वैनीसाहेब राहूद्यात लहान लेकरं आहेत'' भाजीवाल्यांचं तिनं ऐकलंच नाही सर्व पैसे चुकते करून ती घरी आमच्यासोबत आली. आम्हाला देवासमोर उभे केले ''हात जोडा व म्हणा, कोणाचे काहीही, फुकट घेणार नाही'' आम्ही तसे म्हटल्यावर तिच्या डोळ्यात अश्रू होते. आम्हाला जवळ घेऊन ती म्हणाली, ''सच्चरित्र माणसे कोणतीही वस्तू फुकट घेत नाहीत. अगदी कायम लक्षात ठेवा'' सच्चरित्राचा अर्थ कळला तेव्हा वय मोठे होते पण हा उपदेश हृदयावर कोरला होता. मोठे झाल्यावर मग तो जीवनाचा परिपाठ झाला.

देता आले तर दोन्ही हातांनी द्या! फुलविता आले तर एखाद्याच्या ओठांवर हसू फुलवा. पुसता आले तर एखाद्याच्या डोळ्यातले अश्रु पुसा, आणि प्रेम द्या — प्रेम घ्या 'लव्ह इज द बिगेस्ट बँक इन द वर्ल्ड'' हे कायम ध्यानी ठेवा. अशा खूप साध्या वाटणाऱ्या पण आचरणात आणावयास कठीण गोष्टी आईने आम्हांस लहानपणापासून सांगितल्या आणि तेच मग माझ्या आयुष्याचे अध्यात्म बनले. माझी आई माझे पहिले विद्यापीठ होती, आहे आणि राहील.

मी आयुष्यभर गरीब मुलांची शिक्षिका राहिले आहे. जेव्हा तिचा आशीर्वाद घ्यायला गेले, तेव्हा ती म्हणाली,

''तुझ्या दोन चिमुकल्या मुली आहेत त्यांना प्रेम देतेस ना? तसेच आपल्या प्रत्येक विद्यार्थ्याला दे. मुलगा असो, मुलगी असो. प्रेमाची भुकेली असतात सारी. त्यांची नुसती बाई होऊ नकोस, आई हो.''

मी आयुष्यभर तिचा संदेश, देह - मनाने स्वीकारला. माझी मुले, माझे प्रिय वाचक मला आईच म्हणतात नि माझे मन फुलारते. बरे माया ही अशी चीज आहे की ती संपता संपत नाही. खुलभर दुधाची वाटी जशी कायम आपली भरलेली राहाते ना तशीच माया हृदयातून रितीच न होणारी अक्षय माया वाटी आहे.

मुलींचे आत्मभान जागृत व्हावे, त्यांनी स्वतःला दुय्यम लेखू नये म्हणून मी कायम प्रयत्नशील असते. रंग, रुप, उंची या दैवदत्त गोष्टी. तुम्हास आहे का काही चॉईस? पण मुली खूप लवकर नाउमेद होतात. अहो चॉईस असता तर अगदी प्रत्येक मुलीने देवाला सांगितले असते ना। ''देवा, जरा मला ऐश्वर्या सारखे रुप दे हं!'' पण रुप निवडता येत नसेल तरी भाग्य घडविता येते हे मी प्रत्येक मुलीच्या मनावर नक्की बिंबविते. त्यांच्या मनात आत्मविश्वास जागा करते की, प्रिय मुलींनो, जगातले सर्वात महागडे मॉडेल नाओमी कॅमबेल पायापासून डोक्यापर्यंत काळे आहे. काळे कुळकुळीत! मग तुम्ही कशाला 'न्यून' समजता?

मुलींना हा आत्मविश्वास किती कामी येतो ते पहा एका प्रसिद्ध कॉलेजात इयत्ता ११ वीत माझी मुलगी (म्हणजे माझी एक विद्यार्थिनी) जाऊ लागली. खूप सावळी होती. तिच्या मागे एक मुलगा रिमार्क घेऊन वावरू लागला. कोणता? माकडछाप काळी टूथ पावडर! एक दिवस तिने ऐकले दोन दिवस ऐकले .. मग म्हणाली, ''मला म्हणतोस कारे?''

तो म्हणतो कसा ? ''छे छे ! मी म्हणतो माकडछाप काळी टूथ पावडर दंतमंजन मी वापरतो. '' ते दंतमंजनाचं मी नाही ऐकलं '' ती म्हणाली.

''कारण ते मी मनातल्या मनात म्हणालो ना ! '' इति तो.

''चल... '' अनपेक्षितपणे त्याची कॉलर पकडून तिने त्याला खेचत प्राचार्यांच्या केबिनपर्यंत नेलं

''क्षमा कर ताई, '' मनोधैर्य पार बुटात गेलेला तो वाचाळ म्हणाला.

''असं ? '' तिने त्याच्याकडे बघत अगदी झटक्यात त्याची कॉलर सोडली. ''जा ! तू भी क्या याद करेगा ? ''

तो तर सुटकेच्या आनंदात ! ''थँक्यू ताई '' (आता ताईशिवाय बात नाही) मग माझी विद्यार्थिनी म्हणाली,

''यदा कदाचित सावळी पत्नी वाट्याला आली तर माझी आठवण ठेवून तिला सन्मानाने वागव काय ? ''...

''होय ताई''

अशी ही आत्मविश्वासाची कहाणी. मुलींना मी नेहमी एक गोष्ट सांगते. ''सौदर्यांचा मार्ग ह्रदयापासून सुरू होतो आणि कर्तृत्वापाशी थांबतो ''

तुमचा चेहरा रुपसुंदर दिसावा म्हणून तुम्ही ''फेअर अँड लव्हली '' क्रीम लावता ना ? लावा गं चिमण्यांनो, जरूर लावा. पण तुमची करिअर कशी ''फेअर अँड लव्हली '' होईल याकडेही जरूर जरूर लक्ष द्या.

कर्तृत्वान स्त्री आत्मविश्वासामुळे सुंदर दिसते. माझ्या विद्यार्थिनी जेव्हा लक्षणीय कामगिरी करतात तेव्हा माझा ऊर अभिमानाने भरून येतो. वाटतं, चला, माझं मिशन यशस्वी झालं.

माझं अध्यात्म माझ्या विद्यार्थी वर्गाने व्याप्त आहे. त्यांच्यावर अमर्याद प्रेम करून मी इतकं समाधान मिळविलं आहे की ती माझी आयुष्यभराची जमा राशी आहे.

एक आणखी गोष्ट सांगायचीय तुम्हाला 'जो जो जगी जगतो, त्यासी प्रेमभावे आवडतो त्याचा स्नेहबंध जुडतो. आत्मभावे.''

अंध, अपंग, कर्णबधिर आणि अदिवासी यांच्या जगात मी अगदी रमून जाते. ती ही मला त्यांच्यापेक्षा वेगळी समजत नाहीत. जीवेभावे आपली मानतात. हे माझे सर्वात मोठे सौभाग्य आहे. माझ्या अध्यात्मात 'आपपर' भाव वितळून जातो आणि मला फक्त चांगले (प्रत्येकात ते असतेच) बघण्याची दृष्टी भली वाटते त्यामुळे मी निरामय असते. प्रलोभन, तुलना, जेलेसी यापासून माझे जीवन अलिप्त ठेवणे मला प्रयत्नांती जमू लागले आहे.

अध्यात्म म्हणजे काय ? शेवटी जीवनधारा, जगण्याची रीत आणि आत्म्याची तुष्टीच हा प्रवास ठरविते. माझे मन ज्यात रमते, आनंदते अशाच गोष्टी मी करते. कारण आता न आवडणाऱ्या गोष्टी केवळ द्रव्यप्राप्तीसाठी करण्याची मला गरज उरलेली नाही. माझ्या गरजा फार थोड्या आहेत. माझ्या मुली, माझे विद्यार्थी, माझे वाचक प्रेमाने जी वस्त्रे आणतात ती मला आयुष्यभर पुरावीत एवढी आहेत. मला सोने, नाणे यात रसच नाही. मुलींच्या लग्नात त्यांना दोन दागिने दुकानातून आणून घातले, सोनेच नव्हते. साठणीचे ! सुदैव असे की विद्येवर भागले. काही अडून राहिले नाही. माझ्या अध्यात्मात मी सरस्वतीच्या अंकावर आरूढ आहे. तिच्या पायाशी माझी सेवा रूजू आहे.

मला मराठी विश्वकोशाचे काम हाती मिळाले तेव्हा मी ते तनमनधनाने आपले म्हटले. कारण स्वीकारलेले काम झोकून देऊन करणे हाच माझा जीवनप्रवाह आणि जीवनप्रवास आहे. विश्वकोश कोशात न राहता विश्वात यावा म्हणून मी जीवाचे रान करीत ग्रंथवाचन स्पर्धा घेत पूर्ण महाराष्ट्रभर फिरले आहे. आपल्या कामाशी एकनिष्ठ राहिले आहे. विश्वकोशाची वेबसाईट करून तो जगभर नेलाय. शिक्षक असतांना विद्यार्थ्यांशी, विद्यादानाशी पूर्ण प्रामाणिक राहिले आहे. लिहितांना सदैव सकारात्म विचार रुजविण्याचा पाठपुरावा केलाय कारण मला हवाय आनंद भवताली. मला हवी आहे सकारात्मक ऊर्जा. सुखी समाधानी कुटुंबेच आनंदमय वातावरण निर्माण करू शकतात नि त्या घरातली मुलेही संस्कारी निपजतात यावर विश्वास आहे माझा.

रोज नवनव्या दिवशी सूर्यकिरणे आपपर भाव मनी न बाळगता अवघे जग प्रकाशमान करतात, मग आपण का अंधारात चाचपडायचे ? कोणत्याही वयात (अगदी तिसरी घंटा वाजली तरी) हे बदलता येते हे ज्याच्या ध्यानी आले त्याचा आत्मा सुखावतोच सुखावतो. ज्यांना सारी मने कळो यावी इतुके लहान होता येते त्यानाच समाधानाचा मार्ग सापडतो. माझ्या आईचे कोणीशीच भांडण नसे कारण ती म्हणे, अगं त्याच्या बाजूने तो बरोबर आहे गं ! इतके मोठे मला होता आले नाही अजून पण महाराज, माझा प्रवास त्या दिशेनेच चालू आहे.

डॉ. विजया वाड
पवई, मुंबई
मो.: ९८२०३१६६९७

सुखाचा शोध

प्रदीप भिडे

एखादा माणूस अध्यात्मिक आहे किंवा सात्विक आहे असं जेव्हा आपण म्हणतो तेंव्हा आपल्याला त्याच्यात असं काय आढळलेलं असतं? किंवा आपण स्वतः अध्यात्मिक होऊ पाहतो, तेंव्हा आपल्या मानसिकतेमध्ये काय बदल झालेला असतो? हे प्रश्न मला नेहमीच पडत आलेले आहेत कोन हं? 'मी कोण? हा प्रश्न अनेकांना अनेकदा पडतो. मी या जगात असण्याचं प्रयोजन काय असावं? असंही मी स्वतःला विचारत असतो.

या सगळ्या प्रश्नांची उत्तरं शोधताना या ना त्या निमित्तानं अनेक अध्यात्मिक गुरु, बाबा यांना मी पाहात आलोय, कधीतरी भेटत आलोय, खूपदा त्यांच्या शिष्यगणांशी संवाद करत आलोय. सर्वसामान्य माणसं गुरु आणि बाबांच्या चरणी का लीन होतात? किंवा त्यांच्या नादाला का लागतात? या प्रश्नांची विविध उत्तरं मला मिळत गेली आहेत. बाबा आणि गुरु यांना अग्रभागी न ठेवता एखाद्या विशिष्ठ तत्त्वज्ञानाशी किंवा विचारधारेशी बांधिलकी मानणारे लोक ही मला दिसलेत. उदाहरणार्थ विपश्यना किंवा ब्रह्मविद्या याचं आपण उदाहरण घेऊ शकतो. मी स्वतः बऱ्याच अंशी अशा प्रकारच्या तत्त्वज्ञानाला मानत आलोय. मला ते भावलय, कारण यामध्ये एखाद्या व्यक्ती केन्द्रस्थानी नसून त्याविषयीचे तत्त्वज्ञान हे केन्द्रस्थानी आहे. आणि त्या तत्त्वज्ञानाच्या अनुषंगानं ध्यान-धारणा, मेडिटेशन, योगक्रिया या देखील त्यामध्ये आहेत.

बाबा आणि गुरुंचे अनेकविध प्रकार आहेत. ओशोंबद्दल त्यांच्या जीवनधारणेविषयी आणि त्यांच्या तत्त्वज्ञानाविषयी अनेक प्रवाद आहेत. पण ओशोंच्या मृत्यूला बरीच वर्षे लोटल्यानंतर त्यांच्या लिखाणातला सडेतोडपणा आणि ते वाचतांना पायाखालची वाळू सरकावी अशा पध्दतीने, प्रचलित विचारधारेवर त्यांनी घातलेले घाव यांनी मी अनेकवेळा विस्मयचकित होऊन गेलोय.

अनेक गुरु असेही आहेत जे स्वतःचा मोठेपणा, स्वतःविषयीचं गूढ हे वाढण्याच्या उद्योग करत आपला शिष्यसंप्रदाय उत्तरोत्तर कसा वाढत जाईल या मागे लागलेले आहेत. त्यातून त्यांच्या मनातला अहंगंड वाढून ते स्वतःच जणू ईश्वराचे अवतारच आहेत. यावर त्यांचा स्वतःचा विश्वास बसत चाललाय. त्यातून त्यांच्या आध्यात्मिक महत्त्वाकांक्षा तर वाढलेल्या आहेतच पण राजकारणी देखील माझ्या पायाशी यावेत, माझ्या रुपानं मी त्यांना एक व्होट बँक देऊ करतोय, अशी राक्षसी महत्त्वाकांक्षाही उदयाला येत आहे. त्यापोटी अशा स्वरुपाच्या महाराजांचा एक नवीनच शिष्य वर्ग तयार होतोय. कितीही पापं केली, भ्रष्टाचार केला, तरी त्यातही काही रक्कम या गुरुदेवांच्या पायाशी ठेवून त्यांचे आशीर्वाद घेतले की आम्हाला आमच्या पापातून समूळ मुक्ती मिळेल असा विश्वास हे शीष्य मनामध्ये बाळगून आहेत. गुरुंच्या भेटीला जाणं हे अशा या नाठाळ शीष्यांच्या मित्रवर्गात 'स्टेटस सिम्बॉल' झालाय.

अशा सर्व अपप्रवृत्तींपासून दूर राहिलेली आणि संप्रदाय वाढवण्याचा हव्यास न बाळगता आपला विचार अनेकापर्यंत पोचावा यासाठी कार्य करत आलेले सद्‌गुरु वामनराव पै यांच्यासारख्यांनाही मी अनेक वर्ष दुसरे म्हणते वामणराव पै. ते ज्या तत्त्वज्ञानाचा प्रचार आणि प्रसार करत आले आहेत त्यामागची भावना मला खूप भावत आलीय.

एक तर जातीधर्माच्या पलिकडं जाऊन प्रत्येक माणसानं सुखी कसं व्हावं या विषयीचा मंत्र आणि तंत्र ते आपल्या प्रवचनातून देत असतात. क्रिया आणि प्रतिक्रिया या नियमाचा दाखला देऊन ते म्हणतात. की तुम्ही जगत असताना स्वतःसाठी काहीच मागू नका. हे जग सुखी होऊ द्या हा भाव मनी बाळगा. इतरजन आनंदी राहू देत ते

सुखी समाधानी होऊ देत - त्यांना समृध्दी मिळू देत ते निरोगी राहू देत. असा भाव मनात सतत बाळगा म्हणजे तुम्ही जास्त आनंदी आणि समाधानी राहाल. अर्थात हे तत्त्वज्ञान प्रार्थनेच्या रुपानं केन्द्रस्थानी ठेवून मानवी जीवनाच्या विविध अंगाचा परामर्ष ते आपल्या पुस्तकांमधून आणि प्रवचनातून घेत आले आहेत आणि प्रवचन, व्याख्यानं याच्या माध्यमातून भक्तांकडून कुठल्याही प्रकारे पैसे न घेता ते निरागसपणे आपलं प्रबोधनाचं कार्य करत आले आहेत. मुलांवर चांगले संस्कार, राष्ट्रप्रेम आणि भ्रष्टाचार मुक्त देश या विषयांवरही त्यांचा खूप भर आहे. आज त्याचं वय ९० वर्षांच आहे. पण चेहेऱ्यावरचा आनंद आणि प्रसन्नता कुणालाही भावेल अशीच आहे. त्यांच्या तत्त्वज्ञानाचं नावंही त्यांनी अगदी समर्पकपणे 'जीवनविद्या' असं ठेवलंय. अनेकांचे संसार त्यांच्या शिकवणूकीमुळं सावरले आहेत. असंख्य लोक दारुसारख्या व्यसनातून मुक्त झाले आहेत. त्यांच्या तत्त्वज्ञानाचा प्रसार करण्यासाठी पुढच्या पिढीतल्या लोकांची एक फळीच त्यांनी तयार केलीय.

माझ्यासारख्या माध्यमातल्या माणसाला अध्यात्माच्या आणि तत्त्वज्ञानाच्या विचारधारा न्याहाळणं आणि अभ्यासणं याचा एक छंदच लागलाय. आणि तो छंद मला गुंगवून टिकतो. 'स्पिरिच्युअल शॉपिंग' किंवा 'अध्यात्मिक खरेदी मोहिम' या शब्दात माझे मित्र माझी थट्टाही करतात. पण यातून त्या गुरुंना त्यांच्या शीष्यवर्गाला अभ्यासत त्यांच्या अंत:प्रेरणा काय असाव्यात याचा शोध घेणं मला आवडतं आणि महत्त्वाचं वाटतं. बाबांच्या आणि गुरुंच्या, लाखोंच्या संख्येनं असणाऱ्या या शिष्यवर्गाला, काय हवं असतं या प्रश्नाचं मला मिळालेलं उत्तर म्हणजे, ते सगळे सुखाच्या शोधात असतात. 'सुख कसलं म्हणाल?' तर ते पैशाच्या रुपातलं, धंद्यातील किंवा व्यवसायातील प्रगतीच्या रुपातलं, नोकरीमध्ये बढती मिळावी. यासाठी मुलांनी शिक्षणात प्रगती मिळवुन रग्गड पैसे मिळवावे, परदेशी जावं याबद्दल, थोडक्यात मी आणि माझ्या कुटुंबाभोवती आमच्या स्वर्गांगीण प्रगतीची हमी देणारं सुरक्षा कवच आम्हाला लाभावं ही त्यामागची कल्पना असते. 'मला स्वत:ला काहीच नको, पण तुमचे विचार मला अनुकरणीय वाटले, असं म्हणणारी माणसं विरळच असतात, आणि याउलट माझे आशीर्वाद तुम्हाला आहेतच आणि तुम्ही निष्क्रीय राहिलात तरी माझ्या आशीर्वादाच्या बळावर तुम्हाला समृध्दी लाभेल असं म्हणणारे गुरु मात्र खूप असतात. गुरुंच्या नावानं वह्यांची पानंच्या पानं भरुन ती गुरुचरणी अर्पण करणारे शिष्यही तुम्ही खूप बघितले असतील, अशा वह्या भरुन काढणारे असंख्य महाभाग मी पाहिले आहेत आणि अशा केवळ स्वत:च्या आणि कुटुंबांच्या सुखाचा हव्यास बाळगणाऱ्या अनुयायांना काय म्हणावं ? हेच मला कळेनासं होत आलयं.

थोडक्यात मानवसमाज, 'मी आणि माझा परिवार' यांच्या प्रगतीला सुख मानून त्या सुखाच्या शोधात निरंतर भटकतोय असंच चित्र आपल्याला दिसतं वैचारिक समृध्दीला दुय्यम महत्त्व देऊन या सुखामागच्या मूलगामी प्रेरणांचा त्यांच्या कार्यकारणभावांचा अभ्यास करताना कुणी दिसत नाही आणि अनेक गुरु त्याचां शिष्यवर्ग वैचारिक दारिद्र्यांतच राहावा याच प्रयत्नात व्यस्त असलेले आपल्याला दिसतात. आयुष्याच्या प्रथमार्धातला तारुण्याचा उन्माद आणि उमेद माणसातल्या 'मी भोवती' यशापयशाची जाळी विणत जाते. आणि हे यशापयश त्या मी चे कान भरत जाते. तू महान आहेस. ग्रेट आहेस असे सांगत जाते. आणि त्यानंतरच्या काळात त्या यशापयशातल्या अनिश्चिततेमुळे बुडत्याला काडीचा आधार या म्हणीनुसार माणूस अनेकदा बेगडी गुरुंच्या शोधाला लागतो आणि तो सापडल्यावर त्यांच्या भजनी लागतो. शेवटी माणसानं असं काय करायला हवं, ज्यानं त्याला सुख मिळू शकेल.

सर्वसाधारणः कोणताही माणूस चिरंजीवी अशा स्वरुपाचं फारसं काही करु शकत नाही. त्याच्या सभोवतालचा निसर्ग निसर्गानं अनंत हस्ते देऊ केलेल्या देणग्या, जिथं त्याचा निवास आहे ती भूमी आणि या जगात प्राणी, पक्षी या रुपातले जे जीव राहात आहेत त्यांना माणसाच्या सुखाच्या संकल्पनेत यत्किंचितंही स्थान नाही. आजूबाजूला राहणारी माणसं - त्याच्या नात्यातली माणसं भोवतालचा समाज यांच्या तुलनेतंच तो या सुखाला तोलतो आणि मापतो. त्याच्या वर्तुळातल्या माणसांमध्ये जास्तातजास्त सुबत्ता समृध्दी त्यालाच मिळावी हा त्याचा प्रयत्न असतो. ज्यानं त्याला जीवन देऊ केलंय त्या निसर्गाला, प्राणी व पक्षी विश्वाला तो खिजगणतीत धरत नसल्यानं त्याचा सुखाचा शोध एका वर्तुळातच फिरत राहतो. वैचारिक समृध्दीला अनुभवणं त्याच्या कुवतीबाहेरच होत जातं. विश्वाचा अफाट पसारा आणि त्यामधलं त्यांचं एखाद्या ठिपक्याप्रमाणे असणारं अस्तित्व त्याला

अज्ञात राहतं. एखाद्या चमत्काराप्रमाणं असणारं त्याचं शरीर आणि त्या शरीरात पेशींच्या पातळीवर विश्वरुपदर्शनाप्रमाणं सातत्यानं चालणाऱ्या प्रक्रिया त्या लक्षावधी पेशींच्या कार्याच्या माध्यमातून त्याचं जीवंत असणं त्याला अज्ञात राहतं. माणसाच्या आत त्याच्या जीवंतपणी एक अफाट विश्व निवास करतय, यावर त्याचा विश्वास नसतो. त्याच्या व्यक्तिगत विश्वापलिकडं अनेक विश्व आहेत, या संकल्पना त्याला अगम्य वाटत राहतात. बाह्यविश्वचा अफाट व्याप आणि आंतरिक विश्व यातला पूल बांधायला तो असमर्थ होतो. आापल्याला कधीतरी इथून जायचय हे त्याच्या कधी-कधी लक्षात येत नाही असं नाही पण तेही क्वचितच ! मग त्यामागच्या गूढाचा किमान विचार करण्याचा प्रयत्न तरी तो कधी करु शकणार आणि कसा ?

अशाप्रकारे, असंख्य लोक सुखाचा शोध घेत भटक-भटक भटकत राहतात. विचारांपेक्षा व्यक्तिपूजेला जास्त महत्त्व देतात. सुखाच्या सरोवरातलं पाणी चाळणीतून आपापल्या घरात घेऊन येतात. आणि जोपर्यंत त्यांच्या घरातली भांडी भरत नाहीत तोपर्यंत त्यांचा सुखाचा शोध चालूच राहतो. त्यांच्याच शब्दात जन्म मृत्यूच्या चक्रासारखा !

प्रदिप भिडे
अ/८०१, परिजात,
लल्लुभाई पार्क विस्तारित रस्ता,
विलेपार्ले (प), मुंबई ५६.
मो. ९९१९१४०९४

जय वैष्णवाचा

वैष्णवाचा दास, पंढरीशी जातो
कानी धुंद नाद टाळ मृदुंगाचा येतो
वैष्णव नाचती चंद्रभागेतीरी
अंगभरे शिरशीरी पाणीयावरी
वृंद जाती वाटेने त्या, जो तो गातो नाम
टाहो फुटे आकंठी विठ्ठलाचा
डोळे झाले दंग, कंठ दाटला आठवे
परिसा जैसे लोखंड, भक्ति तेधवा केशवे
आकसुनी नका गाऊ उभारा ते हात
घ्यावा विसावा मोहनाच्या अंतरात
चंद्रभागेतीरी बैसले संत गाण्यासाठी
घोष दिला पंढरीत तुकयासाठी
नाम नाम ओठी दुमदुमली पंढरी
ज्ञानराया मनी शुद्ध झाली वैखरी

पंढरीनाथ रेडकर

श्रीहरी

तूच राधा मी श्रीहरी
तूच व्हावे बासरी
नि मीच व्हाचे धूनही
जन्मोजन्मीचे नाते असावे
दोघांच्या सूराचे सुस्वरी
तूच व्हावे ओठ
नि मिच व्हावे श्वासही
मी तुझ्या ओठावरी
नि तूच माझ्या अंतरी
तूच व्हावी राधा
नि मिच व्हावे श्रीहरी
तूच माझी राधा
नि मीच तुझा श्रीहरी

शिवाजी गावडे

आपुलिया हिता

डॉ. गोवर्धन या. घुगे

संत श्रेष्ठ तुकाराम महाराज आपल्या अभंगात म्हणतात,

आपुलिया हिता होय जो जगता।
धन्य मातापिता तयाचिया।।

म्हणजे जो आपल्या व जगाच्या हिताकरिता जागा होतो तो तर धन्य आहेच पण त्याचे जन्मदाते पण धन्यतेस पात्र होतात. मनुष्य पहिल्यापासूनच जागा नसतो तर तो जागा व्हावा लागतो. एक तर संत्संगाने, वाचनाने, चिंतनाने किंवा तत्सम प्रयत्नाने तो जागा होतो. जागा होणे म्हणजे सकाळी झोपेतून जागे होणे नव्हे तर अज्ञानाकडून ज्ञानाकडे जाणे होय

विचार करा की या जगात अत्यंत किंमत असलेला किंवा मौल्यवान पदार्थ कोणता तर त्याचे उत्तर सोने असे लोक म्हणतील. मी म्हणतो सोन्याहून महाग काहीतरी असेलच की असे दिसते की सोन्याहून महाग प्लॅटिनम हा धातू आहे. त्याच्यापेक्षाही महाग व दुर्मिळ काहीतरी असलेच की, तर त्यापेक्षा दुर्मिळ महाग वस्तू म्हणजे हिरा दिसतो. त्याच्याहीपुढे कल्पना करा की हिऱ्यापेक्षाही मौल्यवान काही असेल की, तर होय, मनुष्य जन्म अत्यंत मौल्यवान आहे. म्हणूनच महाराज म्हणतात,

"धन्य आम्ही जन्मा आलो दास विठोबाचे झालो" पण साधारणतः असे आपण समजत नाही. कारण फुकटात आणि सहजगत्या देव प्राप्त झाला आहे. असा आपला समज असतो. पण तसे नाही पूर्वीच्या जन्मी आपण केलेल्या पाप आणि पुण्यांच्या बेरीज वजाबाकित पुण्याची बाजू जड झाल्यामुळे आपल्याला मानव जन्म मिळाला आहे कारण पशूनां तो मिळाला नाही. तुकाराम महाराज म्हणतात,

जन्माचे ते मूळ पाहिले शोधुन।
दुःखाशी कारण जन्म घ्यावा।।
पाप पुण्य करुनी जन्मा येतो प्राणी।
नर देहा येऊनी हानी केली।।

असा हा दुर्मिळ मनुष्य जन्म मिळाला असताना त्याचे सार्थक करावे असे का वाटत नाही? नर जन्माचे सार्थक करण्याचे म्हणजे स्वतः आपण कोण आहोत याची ओळख करुन घेण्याचा प्रयत्न किंवा आत्म्याला ओळखण्याची क्रिया म्हणजेच अध्यात्म, म्हणजेच जागे होणे होय. प्रपंचात जागे तर बहूतेक असतातच पण अध्यात्मात जागे असतातच असे नाही.

या निशा सर्वभूतांना तस्यां जागर्ति संयमी।
यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतोमुनेः।।

ज्या क्षेत्रात अध्यात्मात सामान्य जना करीता जी रात्र असते त्या ठिकाणी योगी जनांना ती वेळ दिवसासमान असते व ज्या क्षेत्रात (प्रपंचात) सामान्य जनांना दिवसासमान असते ती योग्यांना रात्री समान असते. अध्यात्म मार्गाविषयी सतर्क असणे म्हणजे जागे असणे होय. अध्यात्मामधे जाग्रत नसण्यामधे बऱ्याच गोष्टींचा समावेश होतो. थोडा विचार करा की साधारण

माणसाला विधात्याने पोटाला जेवणाची, निवाऱ्याची व इतर सोयी सवलतींची व्यवस्था केली. थोडे फार बँक बॅलन्स इत्यादी. असे असताना पशुंना तशी हमी नसते. मग अडचण कशाची तर जगात अनेक प्रकारची आकर्षणे असल्यामुळे माणूस तिकडेच लक्ष्य देतो. इतर उलाढालींवरच लक्ष्य केंद्रीत करतो. अलीकडे इलेक्ट्रॉनिक क्षेत्रामुळे मनोरंजनात व सुखसोयीत कमालीची वाढ झालेली असल्यामुळे माणसाला विचार करायला वेळच मिळत नाही. काळ कोणताही असो जगात माणसाला आकर्षित करणाऱ्या गोष्टी असतातच फक्त त्यांचे स्वरुप वेगळे असते. जगाच्या गोष्टींचा विचार करणारा माणूस स्वतः अतर्मुख होऊन स्वतः कोण हे शोधण्याचा प्रयत्न करतांना सहसा दिसत नाही. अध्यात्म, देव वगैरे काही नसून निसर्गच सर्व करतो म्हटल्यावर सगळे संपले. पशू इत्यादी मूढ योनी ह्या भोग योनी असल्याने त्यांच्यात ते सामर्थ्य असत नाही व तसे असण्याची आवश्यकता पण नसते. पण मनुष्याला बुध्दी नावाची एक जास्तीची देणगी असते व त्या बुध्दीमुळेच विचार व निर्णय करण्याची शक्ती असते.अता पाहू की मनुष्य मनाने कश्याकशात अडकतो. समजा की एखादयाकडे भरपूर धन आहे व त्यावर तो अत्यंत सुखाने जगू शकतो असे असून देखील तो आणखी जास्तीच्या द्रव्याच्या विवंचनेत भलेही

स्वतःचे (महप्रयासाने लाभलेले) शरीर विकलांग झाले तरी बेहत्तर व अशा वासनेला 'वित्तेषणा' म्हणतात. याचा अर्थ मुळीच असा नव्हे की मनुष्याने काहीच करु नये. कष्ट करुन योग्य मार्गाने पैसा मिळवावाच लागतो. नुसत्या तत्वज्ञानाच्या गोष्टी सांगून चरितार्थ चालत नसतो.

नियंत करुत्वं कर्म ज्यायो ह्यकमर्णः।
शरीर यात्रापि च ते न प्रसिध्येद कर्मणः।।

श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात की, ''नियतीने तुझ्या वाट्याला आलेली कर्मे तुला केलीच पाहीजेत. त्या शिवाय तुझा निर्वाह देखिल चालणार नाही.'' कर्मे ही आवश्य केलीच पाहिजेत, पण मनाने त्यात गुंतू नये इतकेच आता पाहू काही लोक असे असतात की कसेही करुन प्रसिध्दीसाठी हपापलेले असतात अशी माणसे कोणत्याही संघटनेत भाग होतात, कोणत्याही समुदायात दाखल होतात. आपल्या भाकरी खाऊन इतराच्या व्यवहारात पडतात. तेथे ते शक्यतो एखादे लहान मोठे पद मिळवतात. त्याशिवाय त्यांना चैनच पडत नाही. अशांना 'लब्ध प्रतिष्ठीत' म्हणतात.

आपले नाव कोणत्यातरी पत्रात छापून आले पाहिजे. आपण कोणत्याही व्यासपीठावर झळकले पाहिजे अशा अनेक प्रकारच्या वासना इच्छा असतात व अशी माणसे कोणत्या न कोणत्या तरी प्रकारात मनाने गुंतलेले असतात.

मन एवं मनुष्यानां बंध मोक्षयोः

या प्रकारच्या अतृप्त राहीलेल्या वासनांमुळेच पुनःपुनः या संसारात जन्म घ्यावा लागतो. संत एकनाथ महाराज म्हणतात,

वासनेच्या संगे जन्म घेणे लागे ।
तो तो झाली अंगे हरीरुप।।

आता या प्रकारच्या विविध वासनांमुळे जीवात्म्यास कसे बंधन पडते याचे व्यवहारीक उदाहरण पाहू पूर्वी अशी धारणा जनमाणसात असायची की बंगालमध्ये बऱ्याच प्रकारच्या अतिंद्रिय विद्या असतात व त्या तेथे शिकवतात म्हणून महाराष्ट्रातून एक मनुष्य अशा प्रकारच्या विद्या शिकण्यासाठी बंगालमध्ये गेला. वाहतुकीची साधने त्यावेळी विशेष नव्हती म्हणून तो पायी चालत चालत बंगालमध्ये गेला. गावोगाव फिरुन चौकशी करु लागला की इथे कुणी अशी विद्या शिकवतो का ?फिरत असताना समजले की तेथे एक बाई अशा विद्येमध्ये निपुण आहे. त्या बाईशी संपर्क करुन त्याने विचारले,''मी विद्या शिकण्यासाठी लांबून मराठी मुलखातून

आलो असून मला आपण विद्या शिकवता का ? ती बाई तयार झाली व म्हणाली " तुमची खाण्यापिण्याची व रहाण्याची व्यवस्था करीन पण तुम्हाला माझ्याकडे पडलेली कामे करावी लागतील. त्याप्रमाणे ठरल्यावर ती बाई त्याला गुरेढोरे घेऊन रानात चारवयासाठी पाठवू लागली. सकाळ संध्याकाळ गायी म्हशीच्या धारा काढणे रतिबांचे दूध घरोघरी पोहचते करणे असे करता करता पुष्कळ काळ निघून गेला पण विद्या शिकवण्याचा तर पत्ताच नाही. ती बाई त्याला शेतात गुरे चारायला जातांना एका जुन्या कापडात चटणी भाकर व तल्लफ भागवण्यासाठी तंबाखूची पोटली देत असे. अशा प्रकारे राबून राबून तो गृहस्थ मेटाकुटीला आला. बऱ्याच वेळा त्याने पळून जाऊन तिच्यापासून सुटका करुन घेण्याचा प्रयत्न देखील केला. पण तो पळून गेल्यावर त्या बाईने विद्येने तो कोठेही असला तरी त्या माणसास घरी आणले. तो चांगलाच अडकला यातून मार्ग काढण्याचा तो प्रयत्न करु लागला. योगायोगाने त्या बाईची एक शेजारीण होती तिला पण अशा प्रकारची विद्या येत होती व तिचे अन् त्या बाईचे वाकडे होते. शेजारणीला त्या मराठी माणसाची खूप दया आली व तिने त्याला त्या बंधनातून सुटण्याचा उपाय सांगितला. त्या शेजारणीने सांगितले " उदया गुरे चारायला जातांना त्या बाईने बांधून दिलेल्या भाकरीचे गाठोडे त्यात तंबाखुची असलेली पोटली तू बरोबर घेऊन जा व त्या गाठोडयातली भाकर व तंबाखू न खाताच एखाद्या झाडाला बांधून ठेव व गुरे तशीच सोडून तू तडक तुझ्या मुलखात पळून जा." त्याप्रमाणे त्याने त्या भाकरीचे गाठोडे एका काटेरी झुडपाला बांधून तो पळून गेला. संध्याकाळ झाली गुरे आपोआप घरी आली पण त्या माणसाचा पत्ताच नाही. थोडी वाट पाहून रात्री त्या बाईने त्याला घरी आणण्यासाठी विद्येचा प्रयोग केला पण तो माणूस घरी न येता ते लहासे काटेरी झुडुप त्याला बांधलेल्या भाकरीच्या गाठोड्यासहीत समोर आले. पण तो माणूस निसटला. अशा रितीने त्या चेटकिणीच्या तावडीतून स्वतःची सुटका त्याने करुन घेतली.

हे एक प्रतिकात्मक उदाहरण झाले. आपण समजा की ती बंगाली बाई म्हणजे माया व तो माणूस म्हणजे जीवात्मा, ती शेजारीण म्हणजे गुरु व ते भाकरीचे गाठोडे व तंबाखूची पोटली म्हणजे वासना किंवा इच्छा आकांक्षा. त्या सोडून दिल्यानेच या संसार चक्रातून सुटका होऊ शकते.

अलिकडे दिवसेंदिवस मनुष्याचे आयुष्यमान कमी कमी होऊ लागले आहे. मनुष्य या नश्वर देहालाच स्थावर मानून त्यांचे चोचले व लाड पुरवण्याच्या प्रयत्नात गुरफटला आहे.

या नश्वर देहा कारणे नश्वराची लेती लेणे ।
येणे चौऱ्यांशीचा फेरा फिरणे ।।

या जीवनात व्यवस्थित सोयी लागतात पण त्यांचा अतिरेक नसावा. सुरवातीला पायी चालणारा मनूष्य सायकल मिळाल्यावर मोटार सायकलची इच्छा करतो. मोटार सायकल मिळाल्यावर वाटू लागते की सुलभ प्रवासासाठी चार चाकी वाहनाची इच्छा करतो. यात गैर असे काहीच नाही पण चार चाकी मोटार मिळाल्यावर तरी समाधान मानावे की नाही ? पण नाही

त्या चार चाकी(कार) ला ए.सी. नाही, ए.सी. बसवला पण दरवाजे खिडक्या आटोमॅटीक नाहीत ते झाल्यावर ऐकायला संगीत म्हणुन टेप रेकॉर्डर नाही बर टेप बसवला पण तरीही समाधान नाही कारण गाडीला म्हणावा तसा पिकअप नाही.

तर तात्पर्य हे की सुखाचा शोध बाह्य वस्तुत घेवून काहीही फायदा होत नाही त्यासाठी आत्मज्ञानाचीच कास धरावी लागते व ह्यासाठी संताची शिकवणूक कामी येते.

डॉ. गोवर्धन घुगे
तेजस्विनी सोसायटी
डी. पी. रोड, औंध, पुणे.

अद्‌भूत

कैलास मानसरोवर

सौ. संगीता अनभुले

तिबेटमध्ये ल्हासापासून २०० कि.मि. वर कैलास पर्वताच्या दक्षिणेस मानसरोवर आहे. समुद्रसपाटीपासून ४५६ मि. वर असलेले हे गोड्यापाण्याचे सरोवर ३२० कि.मि. एवढ्या जागेत पसरलेले आहे. जगातलं पाहिलं गोड्या पाण्याचं तळं इतक्या उंचावर असलेलं निळशार सरोवर म्हणजे ज्ञानसरोवर शिव शक्तिचं निवास स्थान आहे . अतिप्राचीन संस्कृतीत समावलेला कैलास मानसरोवर, स्वयंभू, अलौकिक सौंदर्याने नटलेले हे ठिकाण अनेक मौल्यवान हिऱ्या माणकासारखे कैलास पर्वत चमकतो. पुराणात तर काही ठिकाणी ही कुबेराची नगरी होती असाही उल्लेख आढळतो. मानसरोवरचा उल्लेख हिंदू, जैन, बौध्द या धर्मातही पाहायला मिळतो. हिमालयात तपश्चर्यला गेलेले ऋषी, मुनी यांना पूजा, अर्चा व नित्य गरजांसाठी पाणी हवे होते ते ब्रम्हदेवाकडे गेले त्यांना पाण्याची अडचण सांगितली तेव्हा मानसरोवराची कल्पना प्रथम ब्रम्हदेवांच्या मनात निर्माण झाली. त्या कल्पनेतूनच मानसरोवर निर्माण झाले म्हणून त्याला मानसरोवर असे नाव दिले आहे. (मानस म्हणजे मन) दुसरे असे की मानसरोवराचा उल्लेख क्षिरसागर असा केला जातो. येथे देव आणि दैत्य यांच्यामध्ये समुद्र मंथन झाले होते शंकराने विष प्राशन केले ही कथा सर्वांनाच माहित आहे. ब्रम्हपुत्रा, सतलज, सिंधु अशा पवित्र नद्यांचा उगम तेथे आहे. मानसरोवरात आंघोळ करुन ते पाणी प्राशन केल्यामुळे मन पवित्र होते व सर्व पापापासून मुक्तता होते असे समजतात. मानसरोवर हे तीर्थस्थळ असून त्यांच्या किनाऱ्यावर अनेक गरम पाण्याचे झरे व छोटे मोठे मठ आहेत. बौध्द धर्मचे भाविक मानसरोवराच्या दर्शनाला मोठ्या संख्येने येतात. कारण बौध्दाना राणी मातेचे दर्शन तिथेच झाले होते. प्रत्येक भाविकांना त्यांच्या श्रध्देनुसार अनुभव तेथे येतो. त्यामुळे शिवशक्तिच्या चैतन्यमय रुपाचे दर्शन तिथे जाणाऱ्या यात्रिकला त्या निसर्गाच्या देखण्या सौंदर्यात घडते. तेथे राजहंस पक्षाचे वस्तीस्थान आहे सरोवरात विहार करणारे राजहंस पक्षी ओमकाराचा जप करत आहेत असे वाटते असेही काही भाविक सांगतात.

भारत व इतर देशातील शिवभक्त भाविक येथे यात्रेसाठी जातात. कैलास पर्वताची परिक्रमा करणे म्हणजे ती एक तपश्चर्याच,अतिशय अवघड आहे. तसेच तेथे महाविष्णूच्या हातातील कमळातून निघून गंगा शिवाच्या डोक्यावर विराजमान झालेली आहे.

बौध्द्धर्माचे जे पवित्र तिर्थस्थानं आहेत त्यापैकी एक म्हणजे कैलास मानसरोवर आहे. तेथे बौध्दांचे मानसरोवराच्या किनाऱ्यावर मठ आहेत. भिक्षू तेथे राहतात अनेक देव देवतांच्या, ऋषी मुनींच्या पावनस्पर्शाने पवित्र झालेले हे ठिकाण म्हणजे भाविकांचे तिर्थक्षेत्रच आहे. शिवशक्तीची आराधना करणाऱ्याच्या मनात सदैव भेटीची ओढ निर्माण करणारे तिर्थक्षेत्र आहे. ऋग्वेदामध्ये जमिनीवर उतरणाऱ्या ताऱ्यांचा उल्लेख आढळतो. कैलास मानसरोवराला धर्तीचा केंद्रही मानतात. हे शिवशंभूचे अलौकिक उद्‌भूत ठिकाण आहे. ही यात्रा केल्यानंतर तन, मन पवित्र होते. त्याचबरोबर मोक्ष प्राप्ती होते असा समज आहे.

देवालाही निवास कारावा वाटला असा पृथ्वीवरील स्वग म्हणजे मानससरोवर.ते पहाण्याची अतोनात ओढ लागली होती. भारतभर भ्रमंती करुनही मन तृप्त झाल्यासारखे वाटत नव्हते कैलास मानससरोवर यात्रा करण्याचे मनात एकदाचे पक्के केले आणि चांगल्या यात्रा कंपनीचा शोध सुरु झाला. कोणीतरी सुचवले पुण्यातीलच शिल्पा ट्रॅव्हल कंपनी चांगली आहे. अनेक वर्षाचा त्यांना अनुभव असल्यामुळे आम्ही शिल्पाताईंना जाऊन भेटलो. त्यानी सविस्तर माहिती सांगीतली तेथील व्हीडीओ शुटींग ही दाखवले. आम्ही आमच्या सोईची ५ जुलै ते १२ ऑगस्ट ही तारीख ठरवली व बुकिंग केले अन् जाण्याची तयाराही सुरु केली.

बऱ्याच लोकांकडून समजले होते की ही यात्रा अतिशय धोक्याची आहे ,सर्व संसारीक जबाबदाऱ्या पूर्ण झाल्यानंतर लोक ही कैलास मानससरोवरला जातात परंतु मला जाऊन आल्यानंतर माझ्या अनुभवावरुन समजले की ही यात्रा करण्यासाठी प्रचंड आत्मविश्वास,ईश्वरावर गाढ श्रध्दा,सुदृढ शरीर,व पैसा इत्यादी गोष्टींची गरज आहे कारण अनेक समस्यांना आपल्याला तोंड द्यावे लागते.जाण्याच्या आदल्या दिवसापर्यंत पंन्नास हजार रुपयाची सोय होत नव्हती. मनात तर जाण्याची ओढ लागली होती शिल्पाताईचेही फोनवर फोन चालू होते. मला काहीच सुचत नव्हते शेवटी आदल्या दिवशी रात्री नऊ वाजता सोनाराकडे चैन गहान टाकली त्याने ५० हजार रुपये दिले. मला मुलाने लोहगांव येथील विमानतळावर सकाळी सहा वाजता पोहचविले अगदी स्वप्नातल्या सारखे हे सर्व घडले होते . आमचा पन्नास लोकांचा ग्रुप काठमांडूला पोहचला तेथे गेल्यानंतर बंगलोर,उजैन, सिमला येथीलही लोक आले होते आम्ही ८४ लोक पुढे यात्रेसाठी जाणार होतो.

पशुपतीनाथ येथून निघून दुसऱ्या दिवशी चिनला बसने गेलो तेथे वातावरण खुपच प्रसन्न होते. हिमालयाच्या उत्तुंग रांगा दिसू लागल्या बर्फाच्छदित पर्वत कोसाळत खाली धावणारे धबधबे हे सर्व खूप विलोभनिय होते. लक्ष पर्वताच्या टोकाकडे लागले होते. चिन, टिबेट, नेपाळ असा प्रवास करत पुढेपुढे जाऊ लागलो मानससरोवर येथे पोहचायला बसने दोन दिवस लागले

तेथे पोहचल्यावर समजले मानससरोवराला पृथ्वीवरील स्वर्ग असे का म्हणतात? खरोखरच देवाने सौदर्याची उधळण करुनही पृथ्वी स्वर्गाप्रमाणेच निर्माण केली आहे. अद्भूत आणि विशाल डोंगर रांगा, सुंदर हिरवीगार शाल पांघरलेल्या छोट्या मोठ्या टेकड्या, हिऱ्याचा पांढराशुभ्र मुकुट परिधान केलेल्या हिमालयाच्या रांगा, व खळाळत धर्तीच्या दर्शनाला स्वर्गातून धावत येणारे मोठमोठे धबधबे, तो शांत गुढ गंभीर आवाज, वेडी वाकडी वळणे घेत जाणारा रस्ता, दिवास्वप्नात घालवलेले ते क्षण आम्ही उंच उंच हिमालयात चीनची हद्द पार करुन कैलाश सरोवराकडे जात होतो. दोन्ही बाजूने दुधाच्या घागरी लवंडून दिल्यासारखे धबधबे वाहत होते.ढग अगदी हातात आल्यासारखे

जवळ भासत होते. डोळ्याचे पारणे फिटणारे विलोभनिय दृष्य मनाच्या कॅमेऱ्यात उतरत होते. त्यामुळे मन अगदी प्रसन्न झाले. निर्सगाचा आगळावेगळा नजराना न्याहळत आम्ही कोदारी वरुन दारचेन येथे पोहचलो. तिथे गेल्यावर आम्ही तिबेटमधील बसने मानससरोवरांची परिक्रमा केली. स्नान करुन मनाप्रमाणे पूजा केली. जिवन कृतार्थ झाल्यासारखे वाटले. कैलाशराणा मानसरोवरासमोरुन चैतन्य रुपात प्रसन्न, तपश्चर्यला बसलेल्या ऋषीसारखा पांढराशुभ्र दिसत होता. हात जोडून त्याला सर्वांसाठी खुशहाली मागितली. आमचा ऐंशी लोकांचा ग्रुप होता. आम्ही तिथे एक दिवस छान मुक्काम केला. रात्रभर जागून आम्ही त्या विलोभनिय दृश्यासाठी आतूरतेने रात्रभर वाट पाहिली. पुराणात सांगितलेले आहे कि "मानससरोवरात पहाटे यक्ष, गंधर्व व किन्नर स्नान करण्यासाठी तेथे येतात"आम्हाला ते पहायचे होते पाऊस येत होता तरीही त्या प्रचंड थंडीत तो नजराना पाहण्यासाठी आम्ही उतावीळ होतो. जसजसा वेळ पुढे ढकलत होता तसतशी आमची उत्कंठा शिगेला पोहचत होती. पहाटचे चार वाजले. तारे पाण्यावर तरंगायला लागले ते लुकलुकते तारे अनेकांनी कॅमेऱ्यात बंद केले संपूर्ण सरोवरावर कितीतरी वेळ प्रकाशझोत फिरु लागला आजूबाजूला प्रकाश पसरला. त्यांचे दर्शन घेतले ही गोष्ट खरी आहे. आम्ही अगदी जवळून त्या ताऱ्यांचे दर्शन घेतले. दुसऱ्या दिवशी दारचेन वरुन प्रादक्षिणेसाठी जायचे होते. घोडे मिळत नव्हते. म्हणून दोन दिवस तिथेच थांबून रहायला लागले. फक्त चौतीस जनांणाच घोडे मिळाले. बाकीचे लोक पायी प्रदक्षिणेला गेले. काही लोक तिथेच हॉटेलवर थांबून राहिले. आम्ही पहिल्यादिवशी बारा किलोमीटर पायी प्रवास केला.

रस्त्याने खूप त्रास होत होता. कडाक्याची थंडीअंगावर हल्ला करत होती. तेथे ऑक्सीजन कमी असल्यामुळे चालतांना फार दम लागत होता. मनात त्या शंकराची ओढ लागलेली पायी परिक्रमा पूर्ण करण्याच्या एकाच ध्येयाणे मनाची पकड घेतली होती. त्या धर्तीवरच्या स्वर्गात आम्ही स्वतः हारवून गेलो होतो आत्मिक धुंदीत लोक चालत होते. आम्ही पायी चालतच पहिला टप्पा पूर्ण केला. त्यामुळे आम्हांला कैलाशपर्वताचे अगदी जवळून दर्शन झाले. त्याच्या एका बाजूला हत्ती पर्वत व दुसऱ्या बाजूला नंदी पर्वत देखणे सरोवरं जसे काही शंकराचे सर्व कुटुंबच तिथे वसलेले दिसत होते. निळ्या सावळ्या ढगांचे असंख्य वेगवेगळे आकार मनाला भुलवत होते तनमन आनंदाच्या जललहरींनी न्हाऊन निघत होते.

देव एवढ्या उंचावर जावून बसलेले असतांना सुद्धा माणूस त्याला शोधतो व तिथपर्यंत पोहचतोच. खरोखर जिद्द व चिकाटी व मनापासून परमेश्वराला भेटण्याची ओढ जर असेल तरच अशा यात्रा आपण करु शकतो. कारण कुठल्याही क्षणी काय होईल हे सांगता येत नाही. आपल्या हातात काहीच नसते. सर्व काही त्या ईश्वराच्या स्वाधीन असते. आम्ही केवळ त्या विधाताच्या मर्जीमुळे जवळ कसलेही पैसे नसताना ही यात्रा करुन व्यवस्थित परतही आलो. छान अनुभव पाठीशी घेऊन अनेक विलक्षण गोष्टी पाहायला मिळाल्या. खरोखर हा एक अविस्मरणीय प्रवास होता.

सौ. संगीता अनभुले
हडपसर, पुणे
९७६६३६७७५७

अध्यात्म ज्ञान

समता गंधे

''हे मुनी '', नित्य माझे म्हणजेच परमात्म्याचे चिंतन केल्या - मुळे तुझे अंतःकरण शुद्ध झाले आहे हे मला ठाऊक आहे. म्हणूनच मी तुला भेटायला आलो. मला प्रसन्न करण्यासाठी तुला अन्य कोणतीही साधना करण्याची आवश्यकता नाही.

या जगात, माझे चिंतन करीत आणि माझ्या पवित्र नाममंत्राचा जप करीत, जे मला शरण येतात त्यांना न मागताही माझे दर्शन घडते, हे अगदी निश्चित. कारण, ते अनन्यशरण आहेत हे मी ओळखतो.

योगसाधना केल्यामुळे तू या क्षणीच सर्व ऐहिक वासनांपासून मुक्त झाला आहेस. मृत्यूनंतर तू माझ्याप्रत येऊन पोहचशील.शुद्ध ज्ञानी आणि परमानंदप्राप्त अशा माझ्या योगी भक्तांची जो सेवा करतो, त्याला अगदी तळहातावर मुक्ती गवसते.

तुम्ही स्त्री की पुरूष, याला महत्व नाही. तुमची जात, नाव, पद, आश्रम यांचाही येथे विचार केला जात नाही. माझ्या पूजेसाठी भक्ती हीच एकमात्र आवश्यक गोष्ट आहे. माझ्याठायी भक्ती न ठेवता कोणी जर असे म्हणेल की, मी यज्ञ, व्रताचरण, दान, वेदाध्ययन किंवा शास्त्रनिर्दिष्ट कर्मकांड यांच्याच द्वारे माझे दर्शन घेईन तर ते अशक्य आहे.

भगवान श्रीरामचंद्र म्हणतात,

" हे मुनी, भक्तीसाधना म्हणजे काय? ते मी तुला थोडक्यात समजावून सांगतो. पवित्र आणि सदाचरणी लोकांची संगती धरणे हा या साधनेतील पहिला पाठ होय हे तू लक्षात ठेव.

डोळे असूनही माणसाला रात्रीच्या वेळी नीट दिसत नाही पण दिवा आणल्याबरोबर वाट उमजू लागते. त्याप्रमाणे ज्यांची माझ्या ठायी भक्ती असते त्यांचे जीवनपथ आत्मप्रकाशाने उजळतात.

भक्तीची वेल बहरावी, फुलावी आणि फळावी यासाठी पुढील मार्ग चोखाळावा -

माझ्या भक्तांचा सहवास, माझी आणि माझ्या भक्तांची नित्यसेवा, एकादशीला उपवास करणे, माझ्याशी संबंधित अन्य उत्सव साजरे करणे, माझ्या यशोकथांचे श्रवण आणि पठण करून त्यांचा प्रसार करणे, अविरत भक्तीने माझे पूजन करणे, आणि माझ्या श्रेष्ठ गुणांचे गायन करणे.

या आदेशांचे जो नित्य पालन करतो त्याला शुद्ध भक्ती प्राप्त होते.ज्यांची माझ्या ठायी भक्ती असते त्यांना ज्ञान - वैराग्य प्राप्त होते आणि मग जन्ममृत्यूच्या चक्रातून ते मुक्त होतात.माझ्या ठायी भक्ती न ठेवता नुसत्या जिज्ञासेपोटी जे शास्त्रांवर शास्त्रे धुंडाळतात ते आधिकाधिक भ्रमात मात्र सापडतात. अशा लोकांना कधीही खऱ्या ज्ञानाची प्राप्ती होऊ शकत नाही. शंभरच काय पण हजारो जन्मातही त्यांच्या मुक्तीची अपेक्षा करता येणार नाही.पण एकदा का तुम्ही भक्ती प्राप्त केली की मग कोणतीही बाधा न येता तुम्हाला मोक्ष लाभ घडेल. माझ्या स्वतःच्या आदेशानुसार, माझ्या ठायी अतिशय भक्ती असल्यामुळे तुम्ही परमोच्चपदी पोहोचाल "

पुरूष असो की स्त्री, उच्च असो की नीच, जो कोणी हा मार्ग चोखाळतो त्याला मुक्ती प्राप्त होते. भक्ती म्हणजे वैश्विक प्रेम.

भक्ती अंगी बाणली की माझी सगळी तत्वे आपोआप स्पष्ट होतात. ज्याला माझा साक्षात्कार घडतो त्याला याचि देही मुक्ती प्राप्त होते. अशा रीतीने मोक्ष मिळवून देण्यासाठी भक्ती ही साधनीभूत होते हे अगदी निःसंशय म्हणून समज. एकदा पहिल्या साधनेला प्रारंभ केला की बाकीच्या यथाकाल मागोमाग येतातच.

तू माझा भक्त असल्यामुळे भक्ती आणि मुक्ती तुझ्यासाठी राखून ठेवल्या आहेत असे खात्रीने समज. मी तुझ्याकडे आलो आहे. माझ्या दर्शनाने तुला मुक्ती लाभेल. यासंबंधी तू अगदी काळजी करू नकोस.

पूर्वजन्मी तुझी माझ्यावर फार भक्ती होती. म्हणून तुला आता माझे दर्शन घडू शकले. सर्व दुःखांचा परित्याग करून माझ्या ह्या स्वरूपाचे ध्यान कर. मी केलेला उपदेश चित्तात नीट धारण कर म्हणजे तुला मोक्षप्राप्ती होईल. ही मिथ्या आशा नसून ते एक चिरंतन सत्य आहे.

हे तू जाणून आहे की, एकाग्र भक्तीने आणि अनन्यशरण वृत्तीने जर माझा नामजप केला तर त्या माझ्या नामाने या जगातील सर्व पापे नष्ट होतात.

जे आपल्या निष्ठेनुसार वागतात, विश्वसनीय असतात, शब्दाला चुकत नाहीत आणि प्रतिज्ञेला जागतात तेच खरे श्रद्धावान, म्हणजे मुसलमान होत.

श्रद्धावानांना हे जग म्हणजे एक कारागृह होय. पण अश्रद्ध पाखंडी लोकांना ते स्वर्गच होय.

आपल्या अंतःकरणात मोहरीच्या एका दाण्याइतकीही जो श्रद्धा बाळगतो त्याला नरकात प्रवेश करावा लागणार नाही आणि जो आपल्या अंतःकरणात मोहरीच्या एका दाण्याइतका गर्व बाळगतो त्याला स्वर्गात प्रवेश मिळणार नाही.

श्रद्धा असल्याशिवाय तुम्हाला स्वर्गात प्रवेश करता येणार नाही.आणि तुम्ही जोपर्यंत एकमेकांवर प्रेम करीत नाही तोपर्यंत तुम्ही पूर्ण श्रद्धावान होणार नाही.

एक माणसाने विचारले, ''हे ईश्वराच्या प्रेषिता, श्रद्धेचे लक्षण काय आहे ? " प्रेषित म्हणाला, ''चांगले कर्म केल्यावर ज्याला आनंद होतो आणि वाईट कर्म केल्यावर ज्याला दुःख होते तो श्रद्धावान मनुष्य आहे, असे समजावे." मग तो मनुष्य म्हणाला, " आणि पाप कशाला म्हणावे ? " प्रेषित म्हणाला, जे आतल्या आत तुला बोचत असेल ते त्याचा त्याग कर की झाले. "

श्रद्धेची ओळख तीन गोष्टींनी पटते. ह्या तीन गोष्टी ज्याच्या ठायी असतील त्याला श्रद्धेची माधुरी चाखायला मिळेल. पहिली गोष्टी म्हणजे ईश्वरावर आणि त्याच्या प्रेषितावर अनन्यसाधारण प्रेम करणे. दुसरी गोष्टी अशी की, ईश्वराच्या सेवकांवर केवळ ईश्वरासाठी म्हणून प्रेम करणे आणि तिसरी गोष्ट म्हणजे नास्तिकतेपासून किंवा पाखंडी मतापासून ईश्वराने परावृत्त केल्यानंतर, त्या गोष्टींना नरकाग्निवत् तिरस्करणीय मानून तिकडे न वळणे.

श्रद्धा म्हणजे सर्व प्रकारच्या हिंसेच्या त्याग होय. कोणत्याही मुसलमानाने कधीही हिंसा व अत्याचार करता कामा नये.

जो विश्वासघात करतो त्याला कुठली आली आहे श्रद्धा आणि जो आपल्या वचनाला जागत नाही त्याला कुठला आला आहे धर्म ?

जोपर्यंत आपल्या पित्यापेक्षा, भावापेक्षा, आणि समस्त मानवजातीपेक्षा तुम्ही मला प्रिय लेखीत नाही तोपर्यंत तुमच्या ठायी खरोखर श्रद्धाच नाही.

एखाद्या माणसाने जर एखादे कुकृत्य घडताना पाहिले तर त्याने आपल्या हातांनी त्याचे निवारण करावे. ते जर त्याला शक्य नसेल, तर निदान त्याने आपल्या वाणीने त्याचा निषेध करावा. आणि तेही जर शक्य नसेल तर त्याने आपल्या अंतःकरणात त्यांविषयी घृणा बाळगावी. ज्याच्याठायी श्रद्धा आहे त्याच्याकडून कमीतकमी एवढी अपेक्षा आहे.

नवविधा भक्तिमार्गः- विश्वनिर्मिती विषयक क्रियाकलापाचा वृत्तांत कथन करणे ही दूसरी साधना होय. ''माझे सद्गुण गणन ही तिसरी साधना होय. माझ्या वचनांचे व उपदेशांचे चिंतन करून ते विस्ताराने समजावून सांगणे ही चौथी साधना होय, सद्गुरूशोधन आणि शास्त्रनियमाचा अभ्यास करून जाणिवपूर्वक स्वतःला चांगल्या सवयी लावून घेणे ही पाचवी साधना ह़ोय. नित्यनियमाचे माझे पूजन करणे हा सहावा आणि गुरूमुखातून माझ्यासंबंधीचा गुह्यमंत्र प्राप्त करणे हा सातवा नियम जाणावा. सर्व उपचारांनी माझ्या भक्तांचे पूजन करणे आणि प्रत्येक वस्तूत मलाच पाहणे ही आठवी साधना होय. माझ्याव्यतिरिक्त अन्य सगळ्या गोष्टींची अनासक्ती ही नववी साधना होय, असा हा नवविधा भक्तिमार्ग आहे.''

ज्ञानमार्गः-

१) कृतज्ञताः- आपणास आनंदी करणाऱ्या व्यक्तिबद्दल कृतज्ञता व्यक्त करु या. चांगले विचार आपल्या आत्माच्या बागेला फुलवणारे ते फार थोर माळी आहेत. आपल्या नकारात्मक आणि नाराज मनस्थितीचे सकारात्मक मनस्थितीत रुपांतर करण्याचा एक साधा आणि त्वरित साध्य होणारा मार्ग म्हणजे 'कृतज्ञता' हा होय. ज्यासाठी तुम्ही कृतज्ञता व्यक्त करु शकला आहात अशा काही गोष्टी उदाहरणादाखल पुढे दिल्या आहेत. सूर्यप्रकाश आणि छान हवामान जे तुमचे घर, तुमचे आरोग्य निरोगी राखते त्याच प्रमाणे काही काळ तुम्हा सोबत असणारी एखादी व्यक्ती जीच्या विषयी कृतज्ञतेची भावना व्यक्त करायची आहे. काही क्षण मनात फुलवा आणि तुमचे मन कसे बहरुन येते ते अनुभवा त्यातून एक समाधान सुध्दा निर्माण होते. तुम्ही तुमच्या सभोवतालच्या जगाबद्दल कृतज्ञ असल्यामुळे एक आनंदाची भावना तुमच्या मनात साकार होते. तर ज्यांच्या बाबत तुम्ही कृतज्ञता व्यक्त करता त्यानांही त्यांचा गौरव झाल्यामुळे सन्मानित झाल्याचे वाटत वाहते. म्हणून कृतज्ञता व्यक्त करण्यास कधीही विसरु नये. अन्यथा आपल्या जिवनात तो आनंद आधी पासूनच आहे तो तुम्ही कदाचित विसरुन जाल.

२) परोपकारः-आपल्याला आनंद मिळवायचा असेल तर इतरांना मदत करा. तुमच्या कमी महत्त्वाच्या इच्छांचा त्याग करा. ज्याच्या सुखाची किंमत अगदी कमी असते तो मनुष्य सर्वात श्रीमंत असतो. आपण केल्या मदतीमुळे एखाद्याचे दुःख कमी होत असेल तर मदतीचा हात पुढे करायला पाहिजे दुसऱ्याच्या चेहऱ्यावरचा आनंद पहाण्यात खरे सुख आहे.

सकारात्मक विचारः- सकारात्मक दृष्टीकोनामुळे आपण आपल्या आयुष्यातील नकारात्मकता पार बदलून टाकू शकतो. आपण आपल्या आजूबाजूच्या लोकांनाही आनंदी ठेवू शकतो. आपण आनंदी यशस्वी होवून आयुष्य खऱ्या अर्थाने जगून उन्नत अनुभव घेऊ शकतो. त्यामुळे आपण आयुष्यातील उत्तमातील उत्तम गोष्टीची सक्रिय निवड करु शकतो. काम करण्याचे उत्तम मार्गही मिळवू शकतो. म्हणजेच आपण परिस्थितीचे गुलाम बनून न राहता आपले संपूर्ण आयुष्य आपल्याला हवे तसे नियंत्रित करु शकतो. सकारात्मक दृष्टी कोनातून आयुष्याकडे वेगळ्या नजरेने बघू लागतो.त्यामुळे प्रत्येक काळ्या ढगातील सोनेरी किनारीकडे बघण्याची शक्ती आपल्याला मिळते. जीवन झऱ्याप्रमाणे खळाखळत रहाते. त्याचे डबके होत नाही. आणि आपल्या जगण्याला एक दिशा सापडते. सदैव सकारात्मक विचारांची स्पंदने वाढवत आपले जीवन आनंदमय बनवा. जे हवे ते मिळविण्याची ताकद या स्पंदनात आहे.

समता गंधे
५८/८, वसंतस्मृती पांडुरंग,
गोरेगाव (पूर्व) मुंबई ६३
मो. ९८२०३७८४४८

गीतरामायणातील

अमृताचा झरा

मुकुंद सराफ

रामायण महाभारताचा प्रभाव आज दोन अडीच हजार वर्षानंतरही भारतीय जनमानसावर कायम आहे कारण हे दोन पुजनीय महान ग्रंथच आपल्या संस्कृतीचा पाया आहेत. रामायणाचा श्रीराम तर महाभारताचा श्रीकृष्ण दोन्हीही नायक आज शतकानुशतके भारतीयांचे आदर्श आहेत, ज्यांच्यामुळे भारतीय जनमानसाची जडणघडण झालेली आहे.

रामायणाबद्दल असे म्हटले जाते की ते आधी लिहिले गेले आणि मग ते तसे घडत गेले. यातच रामायणकार महर्षि वाल्मिकींच्या प्रतिभेचे दिव्यत्व व भव्यत्व दडलेले आहे.

पण मराठी रामभक्तांच्या दृष्टीने साठ 'वर्षापूर्वी पातली सहद्भाग्य वेला' असे म्हणायचे कारण म्हणजे चोवीस हजार ओव्यांचे रामायण केवळ छप्पन्न गीतात छंदबद्ध करण्याचे महत्कार्य घडले ते महाराष्ट्र वाल्मिकी कै. गजानन दिगंबर उर्फ अण्णासाहेब माडगुळकर यांच्या हातून. महाभारताच्या लेखनासाठी चौदा विद्या व चौसष्ट कलाचा अधिष्ठाता श्री गजानन महर्षि व्यासांचा लेखनिक झाला तर या 'गजानना' च्या लेखणीमधून गीतरामायण साकारले. शब्दप्रभू गदिमा आणि स्वरराज बाबुजी यांच्या प्रतिमेचा अलौकिक, अद्वितीय आणि अभूतपूर्व संगम म्हणजे गीतरामायण १ एप्रिल १९५५ ते १९ एप्रिल १९५६ अशा दोन रामनवमीच्यामधील वर्षात आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून प्रसारीत झालेल्या गीतांनी ''महाराष्ट्रातील प्रत्येक घराला व घरातील प्रत्येकाला'' अक्षरश: वेड लावले. आज हिरकमहोत्सवाच्या उंबरठ्यावर असलेल्या गीतरामायणाने मराठी रसिकांवर घातलेली जनसंमोहिनी अजूनही ओसरलेली नाही. कारण गीतरामायण म्हणजे महाराष्ट्र शारदेच्या गळ्यातील छप्पन्न हिऱ्यांचा लखलखता रत्नहार आणि त्यातील प्रत्येक गीत म्हणजे जणु ''हिरकांच्या मेळाव्यात नीलमणी उजळतो '' अध्यात्माचा पाया असलेल्या वाल्मिकि रामायणाचा मराठी अनुवाद गीतरामायणतील अध्यात्माचा थोडक्यात शोध घेण्याचा एक छोटासा प्रयत्न.

पण प्रश्न असा पडतो की अनेक वर्षे चित्रपटसृष्टीच्या मोहमयी दुनियेत वावरलेल्या गदिमांच्या लेखणीतून गीतरामायणाची निर्मिती कशी झाली असेल. तर स्वत:विषयी फारसे कधी न बोलणाऱ्या अण्णासाहेबांनीच या प्रश्नाचे उत्तर ''ज्ञानियांचा अन् तुक्याचा एक अमुचा वंश आहे माझिया रक्तात थोडा ईश्वराचा अंश आहे.'' अशा शब्दात देऊन ठेवले आहे. एवढेच नव्हे तर गीतरामायणाप्रमाणेच त्यांनीच लिहिलेल्या 'गीतगोपाल' महाकाव्यातही 'अजन्मा जन्मासी आला' अशा शब्दात कृष्णजन्माचे वर्णन करणाऱ्या ग. दि. मां. ची दैवी प्रतिभा देवासाठी 'अजन्मा' शब्द वापरणाऱ्या एकनाथ महाराजांच्या प्रतिभेशी नाते सांगून जाते .

आपल्याला गीतरामायण लिहिण्याची प्रज्ञा कशी झाली याचीही आठवण खुद्द माडगुळकरांनीच सांगितली होती माडगुळ्यातला आमच्या शेतालगतच्या विहिरीतून पोहून बाहेर आल्यावर मला काहीतरी स्पर्शून गेले व मी दिपून गेलो. त्याच क्षणी आपल्या हातून काहीतरी दिव्य भव्य लिहिले जाणार आहे असे मला वाटले. अशा दिव्यस्वाच्या प्रचीतीनेच महाराष्ट्राचे कालिदास ग. दि. माडगुळकरांच्या प्रतिभेने गीतरामायणाचे शिवधनुष्य केवळ

पेललेच नाही तर त्याचे इंद्रधनुष्य केले. अशा गीतरामायणाची स्वतः कविराजांनीच सांगितलेली या महाकाव्यांच्या भाषांतराची पूर्वपिठीकाही भारावून टाकणारी आहे. ''देववाणीतील ओज शीतळले माझ्या ओठी, वाल्मिकीच्या भास्कराचे होई चांदणे मराठी. झंकारती कंठ वीणा येती चांदण्याला सूर, भावमाधुर्याला येई महाराष्ट्री महापूर'' महर्षि वाल्मिकीच्या रामायणाचा गीतरामायण नावाचा मराठी अनुवाद म्हणजे भगवद्गीता प्राकृतात आणणाऱ्या ज्ञानेश्वर माऊलींच्या शब्दात सांगायत तर ये ह्रदयीचे ते ह्रदयी घातले. त्यामुळे 'पिंडी ते ब्रह्मांडी' च्या उलट रामायण नामक ब्रह्मांडरूपी नीलाकाशचे सांगायचं तर ये ह्रदयीचे ते ह्रदयी घातले, त्यामुळे 'पिंडी ते ब्रह्मांडी' च्या उलट रामायण नामक ब्रह्मांडरूपी नीलाकाशचे गीतरामायण नावाच्या महान जलाशयात पडलेले आध्यत्मिक प्रतिबिंबच नाही का ?

ज्याप्रमाणे दिव्यदृष्टी असलेला संजय ध्रतराष्ट्राला महाभारतातील युद्धाचे वर्णन सांगतो किंवा, गीतगोपालचे गायन राधिका करते त्याप्रमाणे अश्वमेघ यज्ञमंडपात तापसवेषधारी लवकुश प्रत्यक्ष श्रीरामांसमोरच गीतरामायणाचे गायन करतात. ''पुत्र सांगती चरित पित्याचे'' म्हणजे ''ज्योतीने तेजाची आरती'' अशा एका वेगळ्या अध्यात्मिक उंचीवरूनच गीतरामायणाचा शुभारंभ होतो. तर ''प्रत्यक्षाहून प्रतिमा उत्कट'' अशा आपल्या चरित्रापेक्षा त्यांचे अधिक परिणामकारक गायन ऐकून ''प्रभुचे लोचन पाणावती'' मग श्रोते हेलावले तर आश्चर्य काय ? राजा दशरथाच्या अयोध्यानगरीचे वर्णनही असेच मनाला भिडणारे आहे. ''स्त्रिया पतिव्रता, पुरूषही धार्मिक'' अशा प्रजाजनांची ''राजसौख्य ते सौख्यजनांचे'' अशी आपल्या राजाविषयीची भावनाही आपलेपणाची आदर्श परीसीमा नाही का ?

''उगा का काळीज माझे उले, पाहूनी वेलीवरची फुले ही'' अयोध्येची महाराणी कौशलेची इच्छा अखोर ''दशरथा घे हे पायसदान'' या यज्ञपुरूषाच्या आशिर्वादाने सफल होते. ''चार बोबडे वेद नांदतील तुझ्या धर्मरत घरी'' किंवा ''त्यांच्या पोटी जन्मा येतिल योध्दे चार महान'' अशा काव्यपंक्तीमधून व्यक्त होणारी यज्ञपुरूषाची भविष्यवाणी महाकाव्याच्या प्रवासाची दिशा सांगूण जाते. ''आनंद सांगू किती'' हे प्रत्यक्ष रामजन्माच्या आनंदाचे गीत पुन्हा एकदा आदर्श राजा दशरथ व त्यांचे पुत्रवत प्रेम असलेले प्रजाजन यांच्या निरपेक्ष नात्याचे प्रतिक आहे.

आपल्या यज्ञाच्या रक्षणासाठी दशरथाकडे राजपुत्र रामलक्ष्मणाची मागणी करणारे विश्वमित्र त्राटिकावधाची आज्ञा करताना ''जो जना सुखवितो नारीवध क्षम्य'' तो असा राजधर्म श्रीरामांना सांगून जातात. तर प्रभुरामचन्द्रानी उद्धार केल्यावर आपल्या भावना व्यक्त करणाऱ्या अहिल्येचे ''तुझ्या दयेने आज हलाहल अमृतात नाहले'' किंवा ''पुनर्जात हे जीवित अवघे पायांवर वाहिले'' हे शब्दही अध्यात्माचे मन हेलावणारे रुप आहेत. सीता स्वयंवराच्या गीतातील ''आकाशाशी जडले नाते धरणीमातेचे'' तसेच ''सभामंडपी झाले मीलन मायाब्रह्माचे'' या भावनाही ''अंश विष्णूचा राम धरेची दुहिता ती सीता'' चा अर्थ सांगणाऱ्या आहेत श्रीरांमाच्या राज्यभिषकाच्या गीतामधील सीतेबद्दलची ''अखिल प्रजेच्या मातृपदाची तुज करणे स्वीकृती'' ही अपेक्षाही राजधर्माचे एक वेगळे रुप आहे.

सीतेचा निरोप घेण्यासाठी आलेल्या श्रीरामांना ''जेथे राघव तेथे सीता'' हे शब्द पती पत्नींच्या शतजन्मीच्या नात्यांचे भावगीत आहे. ''पतीची छाया पतीचं भूषण, पतिचरणांचे अखंड पूजन'' हा आर्य स्त्रीचा पतिधर्मही गदिमा सांगून जातात श्रीरामांना गंगापार करताना गीतही नावाड्यांच्या रामभक्तिचा अविष्कार आहे. श्रीरामांना पैलतीरावर नेणे म्हणजे ''तारक त्याला तारून नेऊ'' किंवा ''भले बुरे ते राम जाणता, आपण आपुले काम करू'' हाही निष्काम कर्मयोगाच आहे.

वनवासात सोडून आल्यानंतर सुमंताने सांगितलेला श्रीरामांचा निरोप म्हणजे बंधुप्रेम, पितृप्रेम व मातृप्रेमाचा आदर्श अध्यात्म आहे. सुमंताला दशरथ महाराजांना माझ्या वतीने वंदन कर असे सांगताना. तातचरण म्हणजे ''शत तीर्थाचे धाम'', कौशल्येला ''तुझिया श्रवणी सदा असावा मुनिवर घोषित साम'' किंवा भरताला ''राज्य नीतिने करून वाढवी रघुवंशाचे नाम'' अशा श्रीरामांच्या उद्देशावरून गीतरामायणाच्या उंचीची कल्पना येते.

गीतरामायणातील गौरीशंकर असलेले ''पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा'' गीतातून केलेली भरताची समजावणी भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला केलेल्या उपदेशाशी सार्धम्य साधणारे आहे. त्यातील ''दोन ओडक्यांची होते. सागरात भेट

एक लाट तोडी दोघा पुन्हा नाही गाठ'' हे संस्कृत ''यशा कापठं च कापठंच या श्लोकाचे सहससुंदर मराठी भाषांतर आयुष्याचे सार आहे. तर तुम्ही वनवासाहून परत येईपर्यत ''नांदतो राज्यात तीर्थी कमल पात्रासारखा'' हा भरताची विरक्ती ''राजा म्हणजे राज्याचा उपभोगशून्य स्वामी'' या रामदास स्वामींच्या राजधर्माचे पालन आहे.

श्रीरामांचे चरण आश्रमाला लागल्याने शबरीला वाटणार धन्यता रामभक्तीचे आणखी एक आगळे दर्शन ''गुरूसेवेतच निजले चंदन निजज्ञानाचे दीप चेतवुन " अशा शब्दातली शबरीची श्रीरामाबद्दलची भावना व ''या अधरी तर नित्य नांदतो वेदांचा मधुरिमा " मधुरा भक्तीचे मनोहरी रुप आहे.

''सन्मित्र राघवाचा सुग्रीव आज झाला" गीतामधील ''दु:खीच साह्य होतो दु:खित दु:खिताला" ही मैत्रीची भावना सामान्यांना एक आदर्श आहे. आनंदाच्या व दु:खाच्या प्रसंगी पाठीशी उभा रहाणारा मित्र नव्हे तर बांधव ही आपल्या सांस्कृतिक शिकवणीची उंची आहे. तर वाली वधाच्या गीतातील ''न्यायनिती तो भरत जाणारा, जैसा राजा तसे प्रजानन" हे शब्द ही रामाच्या नि:सीम बंधुप्रेमाचा एक वेगळा पैलू आहे. तर ''अंत्य घडी तुज ठरो मोक्षदा'' वालीला श्रारामांचा आशिर्वाद ''मरणान्ती न वैराणी अशा भारतीय संस्कृतीचा मानदंड. लंकेवर चाल करून जाण्यासाठी वानरगणांचे सेतुबंधन गीतसुद्धा श्रीरामाबद्दलच्या भक्तीचा साक्षात्कार आहे. ''युद्धाआधी झडु लागू द्या स्फूर्तीच्या फेरी किंवा सेतु नच हा ऋतु श्रमांचा विशाल हेतु श्रीरामांचा" ही सामान्य कपि गणांची आपल्या दैवताची भावना अनन्य साधारण आहे. अचानक रावणाला भिडणाऱ्या सुग्रीवाची केलेली कानउघडणी श्रीरामांच्या मित्रप्रेमाचा व युद्धनेतृत्वाचा भावधर्म ''नंतर विक्रम प्रथम योजना करी रणज्ञा सुयोग्य रचना" हा सुग्रीवाला केलेला उपदेश तसाच त्रिकालाबाधीत सत्यात मोडणारा" जा झणी जा रावणास सांग अंगदा शेवटचा करी विचार फिरून एकदा" हा युद्धाआधी श्रीरामाची शत्रूलाही शेवटची संधी देणाऱ्या उदात्त भारतीय परंपरेचा परमोच्च बिंदू.

''भूषरी रावणवध झाला गीतातील'' स्वये जाणता असुन नेणता युद्ध करी हा जगताकरिता दाखवी अतुल रामलीला पंक्तीतून'' सभवामी युगे युगे या श्रीकृष्णांच्या शब्दांची आठवण होते.

युद्धात रावणाचा पराभव केल्यावर आधी ''मी केले निजकार्यासी दशदिशा मोकळ्या तुजसी सखी सरले ते दोघांमधले नाते'' असे सांगणारे कर्तव्यकठोर व अग्निदिव्य केल्यावर तिचा स्वीकार करणारे कर्तव्यदक्ष श्रीराम ही एकाच राजाची परस्परविरोधी रुपे. ''प्रजा हीच कोटी रुपे मला ईश्वराची" किंवा ''लोकमान्यता ही शक्ती लोकनायकाची" अशी आदर्श राजाची व लोकनायकाची लक्षणे सांगणारे श्रीराम जेव्हा ''राम एक हृदयी आहे सखी जानकीच्या जानकीविणा ना नारी मनी राघवाच्या'' असे सांगत. ''शपथ पुन्हा घेतो मी देवा तुझ्या पाऊलांची" असे अग्नि देवाला म्हणतात तेव्हा देवस्वरूप श्रीरामांचे सामान्य माणसासारखे भावभावना असलेले रुप रामभक्तांना अधिकच भावते ते लंकाविजयानंतर अयोध्येला परतलेच्या श्रीरामाच्या त्रिवार जयजयकार 'गीतातील' प्रजाजनी जे रचिले स्वप्ना मूर्त दिसे ते स्वप्न लोचनी राजा राघव, सीता राक्षी चतुवैदसे लोक पूजिती रघुकुलदीपक चार सारखे शब्द आदर्श रामराज्य म्हणजे काय सांगणाऱ्या आहे.

म्हणूनच अखिल भारताच्या समाजजीवनातील वाल्मिकी रामायणांचे व आधुनिक महाराष्ट्र वाल्मिकी ग. दि. माडगुळकरांच्या गीतरामायणाचे मराठी जनमानसातील स्थान अढळ व अनन्यसाधारण आहे मर्यादापुरषोत्तम एकपत्नी एक वचनी व एक वाणी श्रीरामाना पुत्र मित्र, बंधु, पती व राजा अशा अनेक विध रुपातून आपण आदर्श मानलेले आहे ग. दि. माडगुळकरांची शब्दकळा व सुधीर फडक्यांची स्वरकला यांचा मनमोहक संगम गीतरामायणात साकारला आहे भुप ते भैरवी असा राग रागिण्याचा प्रवास आता हिरकमहोत्सवाच्या पूर्ततेकडे जात असताना रामभक्त हनुमंताच्या शब्दात ''जोवरी जग हे जोवरी भाषण, तोवरि नूतन नित रामायण'' सप्तस्वरांनी रामकथेचा स्वाद द्यावा" हीच समस्त मराठी रसिकांची श्रीरामचरणी प्रार्थना .

मुकुंद सराफ
विलेपार्ले (पूर्व), मुंबई
भ्रमणध्वनी - ९९३०७७५३७५

अध्यात्म म्हणजे...

प्रकाश लब्धे

भारत हा संस्कृती प्रधान देश आहे. त्यामुळेच अनंत काळापासून लाभलेली संस्काराची परंपरा आजही समाज आणि कुटुंबसंस्थेमध्ये आपणास दिसून येते. मानवा मानवामधील आणि कुटुंबसंस्थेतील संबंध सौहार्दाचे आणि एकसंघ रहावेत ह्यासाठी काही नियम, रूढी आणि संस्काराची परंपरा लाभलेली दिसून येईल आणि त्यामुळेच जीवनाचे सार्थक व्हावे ह्यासाठी आजही आपल्या देशामध्ये अध्यात्म संस्कृतीची जपवणूक केली जाते.

महाराष्ट्रात संतांनी अध्यात्म विद्या सर्वसामान्य माणसांना कळावी म्हणून त्याचे भाषांतर प्रचलीत भाषेत करून त्यावर ग्रंथ लिहीले, काव्ये लिहिली. त्यामुळे वेगवेगळ्या सांप्रदायाची स्थापना झाली. ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, भागवत, मनाचे श्लोक, दासबोध इ. जीवनग्रंथाना सांप्रदायाचे स्वरूप लाभले व त्यातूनच मुक्तीचा मार्ग सुलभ झाला भगवान श्रीकृष्णाने सांगितलेल्या ''भगवतगीता'' वर संतानी लिहीलेल्या ग्रंथाद्वारे अध्यात्मविद्येची कवाडे उघडी झाली. आणि अध्यात्म विद्येच्या श्रीमंतीचे रहस्य सर्व थरातील लोकांना समजू लागले त्यामुळेच आजही महाराष्ट्रामध्ये संत आणि त्याची परंपरा कोणीही विसरलेले नाहीत.

अध्यात्म म्हणजे काय? अध्यात्म हा एक गहन विषय आहे. आपण एखाद्या डोहामध्ये जसे जसे उतरत जातो, तस तशी त्याची खोली वाढत जाते आणि ती किती आहे ह्याचा ठाव आपणास लागत नाही. अध्यात्माचेही तसेच आहे.

अध्यात्म आहे तरी काय? अध्यात्म म्हणजे माणूसकी, सदाचार, प्रेम, ईश्वराचा शोध आणि आत्मज्ञान किंवा चिंतन होय. अध्यात्माचा बारकाईने विचार केल्यास विचारवंत, ज्ञानी लोक ह्याच गोष्टीचा अंगीकार करून ध्येय प्राप्तीसाठी निश्चय, निष्ठा, तळमळ, मेहनत आणि स्वयंशिस्त बाळगून जीवनात आपले इप्सित साध्य करतात आणि आपल्या मानसीक कुवतीनुसार ते आपल्या जीवनात यशस्वी झाले असे समजतात. आणि त्यालाच अध्यात्म समजून तृप्त होतात.

जगामध्ये एक अज्ञात शक्ती आहे आणि तीनेच विश्वाची निर्मिती केलेली असून ती विश्वाचे कल्याणही करणारी आहे, ही श्रद्धा ठेवून ''ईश्वर'' ही कल्पना लोकांच्या मनात रूढी झाली आणि त्यामुळेच निसर्गातल्या चमत्कारांना आणि पंचमहाभूतांना देवता मानून त्यांची पूजा करण्यास सुरूवात झाली. ईश्वराचे अस्तित्व मानणारे भाविक ईश्वर भक्तीने ज्ञान मिळते आणि जीवनाचे सार्थक होते ह्या कल्पनेवर साकारलेल्या विश्वासाकडे ओढले जाऊ लागले आणि नाम हेच रुप आणि माध्यम असून त्याच्या चिंतनाच्या सामर्थ्याचे अनुभव घेऊ लागले.

एकंदरीत पहाता अध्यात्माची सुरूवात भक्तीभावाने नामस्मरणाने आणि आत्मचिंतनाने झाली. सर्व धर्मात नामचिंतनाचे महत्व असून त्याचा महीमा वर्णीलेला आहे. सर्व

भाषेत नाम रसाने भरलेले लेखनही झालेले आहे काव्यही झालेले आहे. अनेक भक्तांनी, संतानी आपापल्या परीने नाम रसाचे वर्णन केलेले आहे. आपले विचार आणि आपले अनुभव कथन केलेले आहेत. ईश्वराच्या अनेक चमत्कारांचे वर्णन भजन, किर्तन, आख्यान व्याख्यानाद्वारे लोकांना पटवून परमेश्वर कणाकणात भरलेला आहे आणि त्याला प्राप्त करण्यासाठी त्याची मनापासून भक्ती करा त्याची निष्काम सेवा करा, त्यामुळे चित्ताची शुद्धी होऊन गर्व, अहंकार नाहीसा होऊन अध्यात्म साधता येईल अशी शिकवण संतमुखातून बाहेर पडलेल्या अभंगातून मिळत होती.

काळानुसार निर्माण झालेले संत महात्मे ह्यांनी संस्कृत भाषेमधील नाम रहस्य अगदी सोप्या भाषेत सर्व सामान्य लोकांना समजेल अशा त्यांच्या बोली भाषेत भाषांतर करून त्यांच्या मनामध्ये परमेश्वराच्या नामाचे निरूपण केले. संत ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, नरसी मेहता, तुलसीदास, एकनाथ, कबीर, सावता माळी, गोरा कुंभार, जनाबाई इ. ह्या सर्वांनी केलेल्या काव्यामुळे/अभंगामुळे, भारूडामुळे माणसाची जीवनाकडे बघण्याची दृष्टी पार बदलून गेली. समाजातील चालीरीतीवर

कोरडे ओढून त्याचे दुष्परिणाम वर्णन करून सामान्य लोकांना ईश्वरनामाचा रस सेवन करण्यास प्रवृत्त केले. त्यामुळेच त्यांचा शिष्यगण, पंथ किंवा संप्रदाय निर्माण झाले.

अध्यात्माची सुरूवात अपौरूषेय वेदांपासून झालेली आहे व ती आजतागायत भारतात दृढ आहे आणि त्यामुळेच अध्यात्म भारतीयांच्या रक्तातच भिनलेले आहे आणि त्यामुळेच त्यांना भक्तीसंप्रदायाची उर्जा मिळते. डोक्यावर टोपी, कपाळी टिळा लावलेले, पांढरा झब्बा, लेंगा परिधान केलेले, हाताने टाळ आणि चिपळ्या वाजवत, मुखाने विठ्ठलाचा जप करणारे अनवाणी, शिस्तबद्ध चालणारे आणि दरवर्षी न चुकता आषाढी कार्तिकीची वारी करणारे निरिच्छ वारकरी आपण पहातो. चंद्रभागेच्या तीरी जमणाऱ्या ह्या वारकऱ्यांना आमंत्रणांची गरज नसते. विठूरायाच्या दर्शनासाठी सर्व हाल अपेष्टांना सामोरे जात मुखी ''जय जय राम कृष्ण हरी '' चा गजर करीत संसाराची चिंता विठ्ठलावर सोडून ते पंढरीच्या वाटेला लागतात. विठ्ठलाच्या दर्शनाचा आनंद लुटणाऱ्या ह्या भक्तांना काहीही मागावयाचे नसते. नामदेवानी विठ्ठलाची स्तुती केलेली आहे आणि त्याचा सर्वश्रूत अभंग आज सातशे वर्षानंतरही भाविकांच्या मुखोद्गत आहे.

युगे अठ्ठावीस विटेवरी उभा
वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा।
पुंडलिका भेटी परब्रह्म आले गा।
चरणी वाहे भीमा उद्धरी जगा।
जय देव जय देव जय पांडूरंगा।।
रखुमाई वल्लभा राहीच्या वल्लभा
पावे जिवलगा ।।धृ।।
तुळसी माळा गळा कर ठेवून कटी ।
कासे पीतांबर कस्तुरी लल्लाटी।
देव सुरवर नित्य येती भेटी ।
गरूड हनुमंत पुढे उभे रहाती।।२।।
आषाढी कार्तिकी भक्त जन येती ।
चंद्रभागेमाजी स्नाने जे करिती।
दर्शन हेळामात्रे तया होय मुक्ती ।
केशवासी नामदेव भावे ओवाळिती।।३।।

''बोलावा विठ्ठल पहावा विठ्ठल '' ह्या भावनेने दरवर्षी न चुकता आषाढी कार्तिकीला पंढरीची वारी करणाऱ्या वारकऱ्यांमध्ये अध्यात्माचा प्रत्येक गुण त्याच्या नसानसात भिनलेला असतो. सभोवतालच्या वारकऱ्यालाही प्रेमाने, ममतेने, आदराने, आपुलकीने तो कोणत्याही जातीचा, पातीचा असो फक्त विठ्ठलभक्त आहे हा एकच निकष लावून सगळे वारकरी विठूरायाच्या ओढीने पंढरीची वाट चालत असतात. मोक्षप्राप्तीच्या मार्गावर आनंदाने सर्व देहभान विसरून नाचत जाणारे वारकरी पाहिले की, वाटते हा ही एक अध्यात्माचा भाग आहे. भारतीयाच्या मनात कायम ठसलेला हा एक अध्यात्माचा पैलू होय असे मला वाटते. जीवनातील ताणतणावावर मात करत सर्व जण जाती भेद विसरून मनोभावे परमेश्वराची भक्ती केल्यास चांगली फलप्राप्ती साध्य करता येते.

प्रत्येक भारतीयाला त्याच्या वाडवडिलांकडून पुण्याईने आणि आशिर्वादाने अध्यात्माचा वारसा मिळालेला आहे. तसेच त्याच्या सभोवतालचे वातावरणही अध्यात्माने भारलेले असल्यामुळे भारतातील निरक्षर माणूस सुद्धा अध्यात्माबद्दल बोलू शकतो. भारतातील प्रत्येक राज्यात साजरे होणारे सण, उत्सव हे सर्वसामान्य माणसाच्या मनात अध्यात्माची ज्योत तेवत ठेवत असतात, आणि त्यापासून त्यांना उर्जा मिळून अत्यंत दुर्लभ असलेल्या नरदेहाची महती त्यांना कळलेली असते. सन १९६६ साली युकॅरिस्टीक काँग्रेस ही कॅथॉलिक ख्रिश्चनांची जागतीक परिषद मुंबई येथे भरली असताना त्यावेळेस त्यांचे सर्वोच्य धर्मगुरू पोप ह्यांनी कनिष्ट धर्मगुरूंना बजावले होते कि तुम्ही शिडी चढताना पहिल्या पायरीवर असलेल्या भारतीय माणसाशी अध्यात्माबद्दल बोलू नका. कारण त्या विषयामध्ये काहीही न शिकलेला माणूस तुमच्यापेक्षा पारंगत असतो आणि अध्यात्मबाबात जन्मजात वारसा त्याला मिळालेला असतो. तेव्हा त्याच्याशी अध्यात्माबद्दल बोलून स्वतःची फटफजिती करून घेऊ नका.

फार वर्षापूर्वी अशांत मनस्थितीमध्ये असलेली आणि अध्यात्माच्या शोधात असलेली एक स्त्री मादाम ब्लॅव्हास्टकी (रशीयन) घराबाहेर पडली आणि तीने कर्नल ऑलकॉट, लेटबिटर आणि डॉ. ॲनी बेझंट ह्यांच्या मदतीने थिऑसॉफी सोसायटीची अमेरीकेत स्थापना केली. आणि अनेक मनःशांती ढळलेल्या लोकांना अध्यात्माचा ज्ञानदीप दाखविला. आज भारतात जवळ जवळ पन्नास थिऑसॉफीक सोसायट्या कार्यरत आहेत. तिथे अध्यात्माबद्दल व्याख्याने देऊन सभासदांना मार्गदर्शन केले जाते. भारतात थिऑसॉफीचे मुळ ठिकाण मद्रासजवळील अडयार येथे आहे. अध्यात्म आणि भारतीय संस्कृतीचा शोध आणि त्याबद्दल तळमळ लागून राहीलेल्या श्रीमती ब्लॅव्हास्टकी ह्यांनी हा मार्ग शोधून लोकांना अध्यात्माचा मार्ग दाखविला. श्री जे. कृष्णामूर्ती हे भारतातील प्रमुख थिऑसॉफिस्ट होते.

भगवद्‌गीता आपण भक्तीभावाने वाचतो,काहीना तर मुखोद्‌गती आहे. भगवान श्रीकृष्णांनी गुरूवर्य अंगीरस ह्यांनी दिलेल्या पठणावरून जगाला ज्ञान भक्ती आणि अध्यात्म मार्ग दाखविला आणि आजही लोक त्याच मार्गाने चालत आहेत.

महर्षी व्यासापासून आजतागायत बरेच महान तत्ववेत्ते अध्यात्मावर भाष्य करून गेले. प्रत्येकाच्या मानसीक कुवतीप्रमाणे धारणेप्रमाणे आणि त्यांच्या अनुभवाप्रमाणे अध्यात्म समजून ते त्यात समरस झाले. भक्तीभावाने आणि आत्मचिंतनाने माणसाच्या मनात प्रेम वृद्धींगत होते आणि त्यामुळेच तो सदाचारी, कनवाळू बनतो ही संतपणाची पहिली पायरी होय.

भगवान श्रीकृष्णांना जरी आपण देवाचा किंवा परमेश्वराचा अंश मानतो. तरी त्यांना आठही योगांचे ज्ञान त्यांचे गुरू सांदिपनी आणि गुरूवर्य अंगीरस ह्यांच्याकडून मिळाले होते. आत्मज्ञान प्राप्त झालेले फक्त दोघेच आपल्याला माहीत आहेत. आद्य शंकराचार्य आणि ज्ञानेश्वर माऊली. दोघेही अल्पवयीन असूनही दोघांनी फार मोठी मोलाची कामगीरी केलेली आहे.

वरील पाचही गुणांपैकी एका गुणाचे सदासर्वकाळ नित्यनियमाने आचरण केल्यास कोणतीही आपत्ती अथवा संकटाची बाधा न होता उलट ईशस्तुतीने परमेश्वरावरची निष्ठा दृढहोऊन भाविकाचे संकट निवारण होऊन मनुष्यास रुप, गुण ऐश्वर्य आणि ज्ञान प्राप्त होऊन त्याचे ''आयुष्य मोलाचे '' होऊन तो संतपदास पोहोचतो. ईश्वराची मनापासून भक्ती केल्यास सर्व कणाकणात भरलेला परमेश्वर त्याचे अस्तित्व दाखवून त्याची प्रचिती दाखवतो त्याचे उदाहरण म्हणजे एका वार्ताहराने खवचटपणे मदर टेरेसांना प्रश्न विचारला होता की, मॅडम आपण परमेश्वर पाहीला आहे का? त्याचे स्वरूप कसे असते? तो दिसतो कसा? आणि मॅडमनी त्यास उत्तर दिले होते होय मी परमेश्वर पाहीला आहे. आणि त्याला

पाहाण्याची दृष्टी मजजवळ आहे. असे म्हणून मॅडमनी आपल्या आयुष्यात घडलेली एक गोष्ट त्याला सांगितली. त्या म्हणाला एके दिवशी कलकत्ता शहरातून काही कामानिमित्त गाडीतून जात असताना एक महारोगी मरणासन्न अवस्थेत रस्त्याच्या कडेला पडलेला होता. मला त्याची दया आली. मी ताबडतोब गाडी थांबवली. त्याच्याजवळ गेले परंतु तो रोगी काहीही हालचाल करत नव्हता. त्याची नाडी चालू होती मी माझ्या सहकाऱ्याच्या मदतीने त्याला गाडीतून माझ्या घरी आणले. त्याची शुश्रूषा केली. त्याला औषधे दिली. त्याच्यात काहीही हालचाल दिसत नव्हती दोन दिवस गेले त्याने डोळेही उघडून पाहीले नाहीत. मी मात्र त्याची सेवा करत होते. त्यावर नजर ठेऊन त्याच्यावर वैद्यकीय उपचार चालूच ठेवले होते असेच आणखी दोन दिवस गेले. मी त्याच्या उशाशी बसून परमेश्वराला प्रार्थना करत असे आणि एके दिवशी त्याने डोळे हळू हळू उघडले. मी त्याच्या बाजूलाच बसले होते आणि त्याने माझ्याकडे बसून स्मितहास्य केले. मी ही त्याच्या डोळ्याकडे पाहिले आणि मीही स्मित हास्य केले. मला बरं वाटल. माझ्या कष्टाला फळ आले हे पाहून मला आनंद झाला, म्हणून मी त्याच्या डोळ्यात माझे डोळे मिसळले त्याच्या डोळ्यात मला वेगळाच भाव दिसला मी त्याच्याकडे पहात राहीले आणि मला परमेश्वराची जाणीव झाली., मी पहात असताना त्याने डोळे मिटले मी डॉक्टरांना बोलविले पण त्याने काही परत डोळे उघडले नाहीत. मला कळले होते. मला दुःख झाले. परंतु त्या दिवशी मला परमेश्वर दिसला, त्याने माझ्याशी स्मितहास्य केले. अशाप्रकारे एका महारोग्याची सेवा करताना मला परमेश्वर भेटला होता. इथे एक गोष्ट नमूद कराविशी वाटते की, मानवप्राणी हा हावरट असून कधीही तृप्त होणारा नाही. तो परमेश्वराकडे नेहमी काही ना काही मागणी करावयाचा आणि परमेश्वर त्याची इच्छा पूर्ण करावयाचा शेवटी वैतागून परमेश्वराने आपली रहाण्याची ठिकाणे बदलली परंतु काहीही करून माणूस त्याला शोधून काढायचाच, व आपल्या मागण्याचा ससेमीरा त्याच्या मागे लावायचा परमेश्वर शेवटी कंटाळला. काय करावे कोठे जावे, असा विचार त्याला पडला. त्यावेळेस ब्रह्मदेवाने त्याला उपाय सांगितला की तू माणसाच्या हृदयात जाऊन बस आणि जो तुला शोधून काढील तो अध्यात्म जाणणारा संत होय आणि म्हणूनच अध्यात्म समजण्यासाठी स्वतःमधील ईश्वरास शोधा आणि त्या ईश्वराच्या आदेशाप्रमाणे वागा हाच संदेश अध्यात्म जाणणाऱ्या संतमहात्म्यांनी आपणास दिलेला आहे.

प्रकाश लब्धे

मनाला पवित्र करणारी व्रतवैकल्ये

सौ. वसुधा पंडित

ऋतु काल दर्शक शब्द ! निसर्गाला मिठी मारणारा, सृष्टीचे कोड कौतुक करीत तिला पावसात भिजवून, थंडीने काकडून उन्हात वाळत टाकणारा, तिच्यावर सुंदर फुलापानांची परवरण करीत सुगंधाने दरवळणारा, निसर्गाच्या चित्रांत रंगवणारा ऋतु एक महान कलाकारच ! मानवाचे आयुष्य या ऋतु चक्रात वर्षानुवर्षे रंगवून निसर्गाजवळ नेण्याचे कार्य ऋतु करीत आहे. कार्य नव्हे जणू त्याने हे व्रतच स्वीकारले आहे.

भारतीय संस्कृतिची जीवन पद्धती ऋतुमानाच्या आगमना बरोबरच व्रतस्थ झालेली आहे चैत्रसुद्ध पाडव्याला संकल्पाची उभारलेली गुढी हे पहिलेच प्रतीक होय. तर दारावर आंब्याची पाने झेंडूची फुले सुपारी, भाताच्या लोंब्या यानी गुंफलेले तोरण, तोरण म्हणजे विचाराचे स्वागत करणारे प्रवेशद्वार होय आणि या प्रवेश दारातूनच व्रत वैकल्याचे स्वागत होते.

भारतीय समाजातील व्रतवैकल्ये वर्षानुवर्षाची स्त्रीमनातल्या गुंफणाची परंपरा आहे धातूपासून व्रत हा शब्द - म्हणजे वरणे, स्वीकारणे तयार झाल्या. त्यात संकल्प इच्छा आज्ञापालन, उपासना, प्रतिज्ञा अभिप्रेत असून विशिष्ट कालासाठी, विशिष्ट हेतू मनात धरून आचारावयाचा विशिष्ट नेमधर्म म्हणजे व्रत होय व्रत म्हणजे संकल्प होय व्रताच्या बरोबर वैकल्य हा शब्द येतो. वैकल्य म्हणजे संकल्पाच्या उपचार पद्धती अवलंबिताना शरीर हलके, कृश करणे, मनावर संयम ठेवून, उपवासाचा स्वीकार करीत निसर्गाशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करणे ही व्रते वैकल्ये देवाच्या पूजा अर्चनेशी संबंधित असतात.

वेद काळात देव ही संकल्पना पंचमहाभूतामधून आली आपल्या आयुष्याला सहाय्यभूत आणि संरक्षक शक्ति तो देव किंवा देवता असे समाज मानू लागला त्याचे पूजन स्मरण, ध्यान निसर्गात घराबाहेर राहून करणे हा दैनंदिन जीवनांतला नित्यनेम होत गेला. ह्या पूजेचे अधिकार पुरूष वर्गाकडे राहिले. परंतू देव पूजनात सगुण पूजेचा अंर्तभाव झाला. आठवड्यातील सात दिवस

ग्रहांच्या नावाने ओळखू लागतो आणि पूजेस व्रतांचे स्वरूप येऊ लागले. त्यात तिथी वार नक्षत्राची मिळवणी झाली. ऋतुमानाप्रमाणे वर्षाचे चैत्र ते फाल्गुन हे बारामासाचे कालचक्र निश्चित झाले आणि त्या प्रमाणे नित्यपूजा हे एक व्रत कायमस्वरूपी पूजा व्रत होत गेले. एखाद्या विशिष्ट हेतूसाठी विशिष्ठ पद्धतीने करून त्याचे आचरण ही वैशिष्ठ्यपूर्ण ठरत गेले. आणि व्रतांचा उगम झाला. महाभारत, दानपर्व, नारदपुराण, पदयपुराण, सर्वच पुराणे व्रतराज या पुस्तकातून व्रताची माहिती मिळते. त्यावेळी स्त्रियांना पूजेचे अधिकार नव्हते परंतू पुराणकाळात स्त्रियांना पूजा, व्रत वैकल्येचे अधिकार दिले. खास स्त्रियांसाठी काही पूजा व्रतासह स्वीकारल्या गेल्या. तर सावित्री, नागपंचमी, हरितालिका अशा काही पूजा निसर्गात, वनात जाऊन स्त्रिया करू लागल्या एका स्त्रीने व्रत केले त्याचे फळ मिळाले दुसरी पण ते व्रत स्वीकारी ते देखील वसा घेऊन. कुमारीकेने पित्याची, विवाहितेने पतीची, विधवा स्त्रीने पुत्राची संमती घेऊन व्रताचा स्वीकार करावा असे उदार धोरण स्वीकारले. त्या काळात शंकर, विष्णू, सूर्य, गणपती, श्रीराम,

श्रीकृष्ण आणि लक्ष्मी, सरस्वती यांची व्रतस्थ देवता म्हणून निवड झाली. पुढे वेगवेगळ्या व्रतांची संख्या समाजाने वाढविली. कारण भारत देशांतील भौगोलिक एतिहासिक वैशिष्ट्ये कारणीभूत ठरली. ऐच्छिक, वाचिक, कर्मिक मानसिक असे प्रकारही पडले. व्रत आचरतांना डोळसपणा, कठोर पालन, खंडन करता पूर्णता, स्नान वस्त्र उपोषण आहार, गुणाची जोपासना अन्नदान, दान, असहाय्य लोकांना मदत करणे हे अंर्तभूत झाले ते आजही आहे. निसर्ग त्यांचे लेणे मानवास देतो हा संकेतही पाळला गेला. आजही व्रताची नीट माहिती करून, आचार विचार शुभदिवस, संकल्प, देवतेचे नाव घेऊन आवाहन करून महानैवेद्य दाखवून पूर्ण करावे लागतात व्रताचे फळ ताबडतोब मिळत नाही.

एकादशी, संकष्टी लोकप्रिय आहेत. तर पंढरपूरची वारी, सार्वजनिक, गणपती समाजाभिमुख व्रत होत. तरी देखील स्त्रियांच्यामुळे खूपशी पारंपारीक व्रते टिकून राहिली.

वळवाचा पाऊस वैशाखाअखेर येऊन तापलेल्या मातीवर पडला की मातीचा ओला सुगंध, व्रताची झुळुक घेऊन येतो. ज्येष्ठातही तसेच होते. ज्येष्ठाची सुरूवात दशहाराने होते. पाण्यांचे कुंभ आंबे, फणस, जांभळे यांचे दान देतात तोपर्यंत वटपौर्णिमा येते. सत्यवान सावित्रीच्या प्रेमाची सावित्रीच्या निष्ठा पातिव्रत्याची युगानयुगे चालत आलेली परंपरागत कथा ही पौर्णिमा सांगते. राजकन्येचं नाव सावित्री अंतर्बाह्य सुंदर निर्मळ गुणवान प्रखर तेजस्वी राजकन्येस आसपासच्या राज्यातील तरूण राजपुत्र तिला मागणी घालण्यास पुढे येत नसत. शेवटी वडिलानी तुझा सहचर स्वतःच निवड हे स्वातंत्र्य दिले. पती शोधाण्यासाठी सावित्री निसर्गाजवळ वनांतून फिरू लागली आणि निर्धन कष्टकरी राज्य गमावलेले पण सदाचारी सत्यवानाची निवड केली. नारदानी त्याच्या अल्पायुषाची सूचना करूनही तिने निवड फिरविली नाही. आपला निर्णय सर्वार्थाने निभावला. कुशाग्रबुद्धीने यमालाही जिंकले, पतीचे आयुष्य परत मिळवून पुढे आरोग्य जपले वटवृक्षांची आठवण पाठीराखा म्हणून स्मरली. फांद्या तोडून पूजा केली नाही. ही पूजा निसर्गाची पूजा, चित्रांतल्या फांद्याची पुजा ते व्रत नाही. माझ्या लहानपणी माझ्या आईबरोबर पूजेचे सामान घेऊन मी जात असे. कितीतरी बायका सर्व थरातील, नटून थटून पूजेला येत. वाण देत असत, एकमेकींची चौकशी होई दुपारी सर्वजणी मिळून फराळ करीत, अनुभवाचं सुख दुःखाचे लेणं देणं होई. सावित्री आख्यान होई.

वडिलकीचा मान, ज्येष्ठाचा ताप, तहान वेदना, काळवंडलेला निसर्ग पावसाचा थेंब येईपर्यंत वटपौर्णिमेचा हात फिरवितो. आठखल गंगावतरण ज्येष्ठ महिन्यातच झालं सागराच्या साठ हजार पुत्राचा उद्धार करून पावन करणारी ती गंगा आजही मानवाच्या पातक नाशाचं व्रत युगानयुग करीत आहे. स्त्री आणि निसर्ग यांच्या ओढीत व्रताची जादू आहे.

मग येतो लडिवाळ घननीळ श्रावण. पर्जन्यमहोत्सवाचा महाराज पूर्ण मास होय. संवत्सराच्या राज्यसभेतील बारामासातील व्रत वैकल्याचा ठसठशीस मानकरी. हा सृष्टीचा किमयागार – जादूगर, श्रावण सरींनी सर्वाची मने जिंकतो सृष्टीवर हिरव्य रंगाच्या छटाची उधळण करीत विविध रंगाच्या फुलांनी रांगोळी काढतो. स्त्रियांची घरसफाई जोरात सुरू होते. आणि कहाणीचे पुस्तक बासनांतून बाहेर येते. कुठलेही व्रत समजावून घ्यायचे असेल तर कहाणीचे पुस्तक किंवा संपूर्ण चार्तुमास घरी हवेत.चमत्कार कुतुहल अशा गोष्टीचे पुस्तक ती पोथीनाही पण पोथी सारखच एखाद्या अज्ञान नादातून यांनी तशी मंत्र मुग्धता अनुभवत, व्यथा सोसण्याचे बळ मिळवून देणाऱ्या श्रद्धा गर्भित कहाण्या ह्यात आहे. कहाण्यातील सोपी, रसाळ, उत्सुकता पूर्वक वाढवणारी भाषा म्हणजे माधुर्याची अलौकिता आहे या कहाण्या लोक संस्कृतिचा गद्य वारसा असून हजारो वर्षाची परंपरा सांगत यांनी स्वतःचे सुंदर विश्व उभे करीत साहित्याची अंगे समृद्धही केली आहेत.

या कहाण्यांनी स्त्रियांच्या संपत्ती, सौदर्य, सख्य, स्नेह वाढवितो. विष्णू प्रिया तुळस घरात देवात अधिक प्रिय झाली तुळसदारात हवीच तिच औषधी उपयोग समजले तर शंकराला प्रिय असलेला बेल मधुमेहीसाठी उपयोगी ठरला. दुर्वाचा रस स्त्री बीज निर्मितीच्या प्रक्रियेस सहाय्यभूत झाला. श्रावण भाद्रपदामधल्या पत्री फुलांनी मंगळागौर हरतालिका नटली म्हणून खाल्ली जाऊ लागली.

हरतालिकेची पूजा वनात पत्रि फुलांनी झाली त्या काळातील प्रभावी वाळूच्या शिवलिंगामधील शंकर पती व्हावा म्हणून पार्वतीने चौसष्टवर्षे व्रत आचरिले, साथ द्यायला सखी जिवाभावाची होती.

पूर्वी कहाण्या मौखिक होत्या मग मुद्रित झाल्या सगळ्या चटकदार व्रतकथा. व्रतपूजेनंतर कहाणी वाचायचीच हा लोक संस्कृतिच्या धार्मिक आधाराच्या एका अंगाशी बांधलेल्या. कहाणीतून व्रताच्या इतिहासापेक्षा व्रत महात्म्य कळते आणि सोपेही जाते, उजवले जाते.

स्वयंपाक घराच्या चक्रातून फिरणाऱ्या स्त्रीचे जीवन ऋतु चक्राशी जोडून जवळीक साधण्याचे प्रयत्न व्रतानी केले. कहाण्यातील व्रतामधील व्यक्तीगत जीवन मध्ययुगीन एकत्र कुटुंबातील नाते परिवार असे दिसते. त्यातून स्त्रीमन प्रतीत होते

'नावडतीची आडवती झाली.'

'पलंगाखालचं ताट सोन्या मोत्यानं भरून गेलं'

आदित्य राणूबाईचे व्रत वेळेचे व्यवस्थापन सांगते. शुक्रवारचे व्रत मुलाच्या दीर्घायुष्यासाठी, श्रीमंत गरीब झाल्यास मिळणारी वागणूक, मंगळगौर अखंड सौभाग्यासाठी, शिवामूठ नेम आचरण यासाठी संसारिक व्रते सगळी, पिठोरीने श्रावण आवरला तरी भाद्रपद हरितालीका अनंत चर्तुदशी, नवरात्र, पुढची सगळी व्रत शिवरात्रीपर्यंत महानंदेच्या कहाणीपर्यंत चालूच राहतात. ही सगळी व्रते भारतभर चालू असून नव्याने त्यात भर पडतेच कुठून तरी ऐकू येते पांढरे बुधवार वैभव लक्ष्मी.

ह्या व्रताना, कहाण्या वाणीने ताल तत्वात नेतात. हा ताल स्वयंभू, मनोहर असतो वाचनाला ठेका असतो त्यामुळे व्रते चैतन्यशील होतात.

'निर्मळ मळे, उदकाचे तळे, सुवर्णाची कमळे, विनायकांची देवळे रावळे, मनाचा गणेश मनी वसावा हा वसा कधी घ्यावा शब्दाला वाक्याला तालाला सुंदर डौल असतो. ती लोककथांची संपत्ती आहे.

''काय ग बायानो कसला वसा वसता ? तो मला सांगा

''तुला रे वसा कशाला हवा ? उतशील मातशील घेतला वसा टाकून देशील ?

''उतणार नाही मातणार नाही घेतला वसा टाकणाार नाही''

कहाणीची सुरवात देखील -

आट पाट नगर होते. तिथं एक राजा होता. किंवा गरीब ब्राह्मण होता असे हे कहाण्यांचे गद्य, म्हणजे पद्याच्या सीमेवरचे गद्य आणि व्रताचे संपूर्ण भाष्य वाटते. जितक्या कहाण्या लाघवी तितकीच व्रतेही लडिवाळ चार चौघीसारखी आणि चारचौघीना करता येण्यासारखी. व्रताची सार्थकता साठाउत्तराची पाया उत्तरी सफळ संपूर्ण सांगणारी. माझ्या ओळखीची एका स्त्री आहे. संसार सुखाचा व्हावा मुलगा मार्गी लावावा मुलीचे शिक्षण पूर्ण व्हावे म्हणून एकमार्गी व्रते शोधून काढते तिची ती, ती कुठल्या पुस्तकाच्या काहाणीत नसतात तर तिच तिची कहाणी असते. अगदी पाचा उत्तरी सफळ संपूर्ण !

सौ. वसुधा पंडित
विलेपार्ले, मुंबई
दूरध्वनी - ०२२-२६११७२६६

तूच साई, तू समर्थ, तू गजानन

तूच साई, तू समर्थ, तू गजानन
अनेक रुपांठायी वसला असे एक प्राण...

असून अजन्मा जन्म घेतला तू आम्हासाठी
धारण करीशी अवतारही तू तव भक्तांसाठी
संसाराला त्रासून आता आलो तुज शरण....

प्रपंचमाया सोडून आता धरले तव चरण
पंचप्राण ओवाळून मी केले तुज नमन
जीवशिवाच्या पडल्या गाठी, होती तल्लीन....

सुटले, तुटले बंध जीवाचे, नसे देहभान
चरण लाभता तुझे आम्हांला नुरले बंधन
तुझिया चरणी धन्य जाहलो....जगणे हो पावन....
तुझे विशाल अंतःकरण

ज्योती कपिले
९७६९१४१०७४

गजानना हे गणराया, भक्तांसाठी कास तुला धरावी लागते !
अन तुझी चालवलेली विटंबना, दुर्दैवाने सहन करावी लागते...

विटंबना

तुझ्या नावाने अनेक मंडळे, उत्सवाचा धंदा करत आहेत ।
जिवंत आहे माणूस, पण माणूसकी आतून मरत आहे ।
हिशोबाचा इथं मेळ नसून, पैसा कधी पुरला नाही ।
कार्यकर्ता वाढलाय मात्र, खरा भक्त आता उरला नाही
खायला पोटाला नसलं तरीही, निमूटपणे वर्गणी भरावी लागते।
अन तुझी चालवलेली विटंबना, दुर्दैवाने सहन करावी लागते ।।

गल्ला स्वत:चा भरण्यासाठी, जो-तो नवीन युक्ती काढत आहे ।
पैशानुसार तुझ्या मुर्तीची, उंची आजकाल वाढत आहे ।
अनेक रूपामध्ये तुझ्या मुर्त्या, बाजारात सर्रास मिळत आहेत ।
तुझ्या नावावर दुकानदार, सामान्य माणसाला पिळत आहे ।
सारं काही कळुनपण आहाला, लांबलचक रांग धरावी लागते ।
अन तुझी चालवलेली विटंबना, दुर्दैवाने सहन करावी लागते ।।

आरतीचा तुझ्या पत्ता नाही, पण खेळांचा इथं मेळ लागतो ।
दिवसभर झोपा काढून, रात्रभर जुगार खेळावा लागतो ।
मनोरंजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन सुद्धा करावे लागते ।
अन पैसे मोजून तुझे देवा, दर्शनाने पोट भरावे लागते ।
खरी भक्ती आता राहिली नसून, नस्ती बढाई इथं मारावी लागते ।
अन तुझी चालवलेली विटंबना. दुर्दैवाने सहन करावी लागते ।।

तुझ्या केवळ दर्शनासाठी, खरे भक्त तर रडत असतात ।
पण देखावे पाहण्यासाठी मात्र, दिवस कमी पडत असतात ।
आकर्षणासाठी बोलावलेल्या, मंत्र्यांना गराडा इथं केला जातो ।
अन विसर्जनाच्या नावावर, पैशांचा चुराडा इथं केला जातो ।
शेवटी मुर्ती डुबत नाही म्हणून, पाण्यावर लाथ मारावी लागते
अन तुझी चालवलेली विटंबना दुर्दैवाने सहन करावी लागते ।।४।।

कवि : डॉ.शांताराम कारंडे ९८२०१५८८८५, ९९८७७५८८८५